जलमानव

अलेक्सान्द्र
बेल्यायेव



अलेक्सान्द्र बेल्यायेव

जलमानव

रादुगा प्रकाशन
मॉस्को

लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
मुंबई

अनुवाद : अनिल हवालदार
सजावट : प्योत्र काराचेन्त्सोव

А. Беляев
ЧЕЛОВЕК-АМФИБИЯ
На языке маратхи

A. Belyaev
THE AMPHIBIOUS MAN
In Marathi

सोविएत संघात मुद्रित

ISBN 5-05-001895-1

अणुक्रमणिका

प्रकाशकांकडून

जेव्हा महासागरांच्या तळांमधील रहस्यांचा पाणबुड्यांनी फार मोठ्या प्रमाणावर थांग लावला नव्हता, तेव्हाच्या काळात 'जलमानव' हे पुस्तक तुम्हाला घेऊन जाईल. मानव महासागरावर कसे प्रभुत्व मिळवील ह्याचे चित्र लेखक अलेक्सान्द्र बेल्यायेव यांनी पूर्वीच, १९२८ साली कसे पाहिले होते, हे प्रस्तुत पुस्तकावरून वाचकाला समजून येईल.

रीओ दे ला प्लाता येथे सागरी राक्षस अवतरला. सागरावर भयानक आरोळ्या उमटतात, मच्छीमारांची जाळी तोडण्यात येतात, डोल्फीन माशाच्या पाठीवर बसून कुणी विचित्र प्राणी जाताना दिसतो: संशयाला जागा रहात नाही. स्पॅनिश झूरीता अफवांवर विश्वास ठेवत नाही, सागरी राक्षसाला पकडून मोती वेचण्याच्या कामाला जुंपण्याचा तो घाट घालतो, पण त्याचा बेत फसतो.

ब्यूनोस-आयर्सपासून जवळच एकाकी सागरकिनारी पट्ट्यात, एका उंच कुंपणापलिकडे डॉ. साल्वातोर राहतात. त्यांच्या घराचे लोखंडी पत्र्यांचे दरवाजे फक्त रेड इंडियन आजारी माणसांना आत घेण्यासाठी उघडले जातात. रेड इंडियन त्यांना साक्षात देव मानतात, पण ह्या जमिनीवरील देवाचा आणि सागरावरील राक्षसाचा काहीतरी संबंध असावा असा झूरीताला संशय आहे. ह्या गूढाचा भेद करण्यासाठी दोन धूर्त आराऊकान भावांची तो मदत घेतो.

कथेचा केंद्रबिंदू सागरतळापासून स्पॅनिश झूरीताच्या 'मेदूझा' दुकाठी गलबताकडे सरकतो व परत सागरतळाशी जातो: दरम्यान उन्हात न्हाणाऱ्या ब्यूनोस आयर्समध्ये व जवळच्या ग्रामीण प्रदेशात काही घटना घडतात. सागरी राक्षस इखतीआन्द्रबद्दलचे रहस्य रंजक निवेदनामार्फत आकर्षकपणे उलगडत जाते.

अलेक्सान्द्र बेल्यायेव हे पहिले व सर्वोत्तम सोविएत वैज्ञानिक कादंबरीलेखक मानले जातात. इ. स. १८८४ साली स्मोलेन्स्क येथे त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच अलेक्सान्द्रच्या डोक्यात तऱ्हेतऱ्हेच्या कल्पनांची दाटी उसळत होती. त्यातील एक कल्पना होती: उड्डाण करण्याची. आणि त्यांनी घराच्या छपरावरून उड्डाणाचे प्रयोग सुरू केले. अखेर एक दिवस पाठीचा मणका मोडून घेण्यात त्यांची समाप्ती झाली. जेव्हा बेल्यायेव ३२ वर्षांचे झाले, तेव्हा त्यांना हाडांचा क्षय जडला व सहा वर्षे ते अंथरुणाला खिळले. नंतरही अधूनमधून ते आजारी पडत होते.

शाळेनंतर त्यांनी कायदा व संगीत विषयांचा अभ्यास केला. फीचे पैसे देता यावेत म्हणून त्यांनी वाद्यवृंदात वादकाचे काम केले, रंगमंचावरील नेपथ्ये बनविली आणि स्वतंत्र पत्रकारी केली. पदवीप्राप्तीनंतरही ते पत्रकाराचे काम करीत राहिले. १९२५ साली त्यांनी कायद्याचा अभ्यास सोडला व पूर्णपणे लेखनाला वाहून घेतले.

१९२६ साली एका लोकप्रिय नियतकालिकामधून मालिकारूपाने प्रसिद्ध होणारी त्यांची पहिलीच कादंबरी "प्रा. डॉवेल यांचे डोके" तात्काळ यशस्वी ठरली. त्यानंतर अ. बेल्यायेव यांनी सुमारे पन्नासपेक्षा अधिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्यातील अनेक सद्य:कालीन विषयांवर असून अगदी आज लिहिल्याप्रमाणे भासतात. १९४२ साली लेनिनग्रादपाशी ते

वारले, तेव्हा त्यांच्या कादंबऱ्यांच्या प्रतींची संख्या दहा लाखांवर पोचली होती. "जलमानव", "शून्यात उडी",. "हवेचा विक्रेता" आणि इतर अनेक पुस्तके अफाट लोकप्रिय ठरली.

भाग पहिला

"सागरी सैतान"

जीव घुसमटवून टाकणारी अर्जेंटिनाच्या उन्हाळयातील जानेवारीची रात्र पसरली. काळया नभात तारे विखुरले. 'मेदूझा' शांतपणे नांगरून पडले होते. लाटांच्या आवाजांनी अथवा जहाजाच्या लाकडी फळयांच्या करकरीने रात्रीची शांतता मुळीच भंगत नव्हती. महासागर जणू गाढ झोपल्या-प्रमाणे भासत होता.

अर्धनग्न मोतीवेचे पाणबुडे डेकवर निजले होते. भाजणाऱ्या उन्हात दिवसभर काम करून थकल्यामुळे झोपेत ते तळमळत होते, कण्हत होते, भयानक स्वप्नांमध्ये किंचाळत होते. त्यांच्या हाता-पायांना झटके बसत होते. कदाचित स्वप्नात त्यांनी त्यांच्या शत्रूंना पाहिले होते – शार्क माशांना! ह्या उन्हाळी लोक एवढे दमून जात होते की, काम संप-ल्यानंतर होडया गलबतावर उचलून घेण्याचेसुद्धा त्राण त्यांच्यात रहात नव्हते. वस्तुतः त्याची गरज नव्हती: हवेत बदल होण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नव्हते. म्हणून नांगराच्या साखळीला बांधलेल्या होडया रात्रभर पाण्यावरच तरंगत राहिल्या होत्या. डोलकाठीची दोरखंडे घट्ट खेचण्याची अथवा पोगी मिटवून ठेवण्याची तसदी कुणीही घेतली नव्हती. वाऱ्याच्या प्रत्येक झुळुकेबरोबर पोगी हलकेच फडफडत होती. नाळाच्या डोलकाठीपासून ते वरामाच्या कठडयापर्यंत त्या

दुकाठी गलबतावर मोत्यांच्या शिंपल्यांचे ढीग, प्रवाळाचे तुकडे, पाणबुड्यांच्या दोऱ्या, शिंपले भरण्याची पोती व रिकामी पिंपे ह्या वस्तू अस्ताव्यस्त पडल्या होत्या.

मागच्या डोलकाठीजवळ एक मोठे पाण्याचे पिंप उभे होते व पिंपाला साखळीने बांधलेला लोखंडी वाडगा तेथे होता. पिंपाभोवतालच्या डेकवर सांडलेल्या पाण्याचे गडद काळे डाग उमटले होते.

अधूनमधून एखाद-दुसरा पाणबुड्या उठायचा, अर्धवट झोपेत लटपटत्या पायांनी, झोपलेल्या इतर लोकांच्या हाता-पायांना तुडवीत, पाण्याच्या पिंपाकडे जायचा. डोळे न उघडताच तो वाडगाभर पाणी घटाघटा प्यायचा आणि कुठेही धपकन खाली पडून निजायचा; जणू पाणी नव्हे, तर शुद्ध स्पिरीट तो प्यायला होता. पाणबुड्यांना नेहमी तहान लागायची. सकाळी काही न खाताच ते काम करीत, कारण भरल्या पोटावर पाण्याखालील दबाव धोकादायक ठरतो; म्हणून पाण्याखाली खूप अंधार दाटेपर्यंत सबंध दिवसभर ते उपाशीपोटी काम करीत. झोपण्यापूर्वी फक्त ते जेवत आणि त्यांना खारवलेले मांस देत.

रेड इंडियन बाल्ताझार गलबतावर रात्रीच्या पहाऱ्याला उभा होता. दुकाठी गलबत 'मेदूझा' चा मालक, कप्तान पेद्रो झूरीता याचा तो उजवा हात होता.

बाल्ताझार त्याच्या तरुणपणी मोती वेचणारा नामवंत पाणबुड्या होता. तो पाण्याखाली नव्वद ते शंभर सेकंदपर्यंत राहू शकायचा – सर्वसाधारण पाणबुड्याच्या दुप्पट.

"का? कारण आमच्या काळात आम्हाला अगदी लहानपणापासून शिकवायला सुरवात करत आणि शिकवण्याचं तंत्र त्यांना माहीत होतं," तरुण मोतीवेच्या पाणबुड्यांना बाल्ताझार सांगायचा. "मी दहा वर्षांचा पोरगा होतो तेव्हा

माझ्या बापानं टेंडरवाल्या होझेच्या ताब्यात मला दिलं. होझेपाशी बारा पोरं शिकत होती. तो आम्हाला असं शिकवायचा: पाण्यात पांढरा खडा किंवा शिंपला फेकून म्हणायचा: 'मार बुडी आणि आणून दे!' आणि दरवेळी जास्त जास्त खोल पाण्यात फेकायचा. जर आणला नाही, तर चाबकाच्या वादीचे एक-दोन फटके मारायचा आणि कुत्र्याला फेकावं तसं पाण्यात फेकून द्यायचा. 'परत मार बुडी!' अशा रीतीनं त्यानं पाण्याखाली बुड्या मारायला आम्हाला शिकवलं. मग पाण्याखाली जास्त वेळ राहण्याचा आम्हाला सराव व्हावा, अशा रीतीनं तो शिकवू लागला. जुना अनुभवी पाणबुड्या पाण्याच्या तळाशी जायचा आणि नांगराला करंडी अथवा जाळं बांधायचा. मग आम्ही बुड्या मारायचे आणि पाण्याखाली गाठी सोडवायचे. जर जमले नाही, तर चाबकाचे फटके.

"आम्हाला दयामाया न ठेवता चोप देत. फार कमी पोरांचा शेवटपर्यंत टिकाव लागला. पण भोवतालच्या पंचक्रोशीत मी पहिला पाणबुड्या ठरलो. कमाई चांगली करू लागलो."

वय झाल्यानंतर मोतीवेच्या पाणबुड्याचा धोकेबाज धंदा बाल्ताझारने बंद केला. शार्क माशांच्या दातांनी त्याच्या डाव्या पायाचे लचके तोडून खुणा ठेवल्या होत्या व त्याच्या कुशीवर नांगराच्या साखळीचे वण होते. ब्यूनोस आयर्समध्ये त्याचे छोटे दुकान होते व मोती, प्रवाळ, शिंपले आणि सागरी विचित्र वस्तू विकण्याचा धंदा तो करीत होता. पण किनाऱ्यावर तो कंटाळायचा आणि कधी कधी मोती वेचण्याच्या मोहीमेवर जायचा. धंदेवाले त्याचे महत्त्व जाणायचे. ला प्लाताच्या आखाताची, त्याच्या किनाऱ्यांची, मोत्यांचे शिंपले नेमके कुठे सापडत त्या जागांची, बाल्ताझारएवढी अचूक माहिती

दुसऱ्या कुणालाही नव्हती. पाणबुडे त्याचा आदर करीत. पाणबुड्यांना आणि मालकांना – सर्वांनाच तो हवा-हवा वाटायचा.

मोती वेचण्याच्या धंद्यातील सर्व गुपिते तो तरुण पाणबुड्यांना शिकवायचा: पाण्याखाली श्वास कसा रोधायचा, शार्क माशांशी कशी झुंज द्यायची आणि खास मनःस्थितीत तो असला, तर मालकाचा डोळा चुकवून जादा छान मोती कुठे लपवावा, ह्याबद्दलही तो सांगायचा.

तो एका नजरेत मोत्यांची अचूक पारख करतो आणि मालकाला फायद्याचे ठरतील असे मोती लौकर वेचतो, म्हणून गलबतांचे मालक त्याचे मोल जाणून होते.

म्हणून मदतनीस आणि सल्लागार ह्या नात्याने गलबतांचे मालक त्याला नेहमी आनंदाने बरोबर घेऊन जात.

बाल्ताझार पिंपावर बसून जाडजूड सिगार सावकाशपणे ओढत होता. डोलकाठीला बांधलेल्या कंदिलाचा उजेड त्याच्या चेहऱ्यावर पडत होता. त्याच्या उभट चेहऱ्यावर धारदार सरळ नाक होते आणि टपोरे सुंदर डोळे होते – अस्सल आराऊकानाचा * तो चेहरा होता. बाल्ताझारच्या पापण्या जडावल्या होत्या, सावकाशपणे वर उचलत होत्या. तो डुलकी काढत होता. पण त्याचे डोळे जरी झोपले होते, तरी कान झोपलेले नव्हते. सर्व आवाज ते टिपत होते आणि गाढ झोपेतसुद्धा त्याला ते धोक्याचा इशारा देत. आत्ता बाल्ताझारला फक्त झोपलेल्या पाणबुड्यांचे निःश्वास व बरळण्यांचे आवाज ऐकू येत होते. मोत्यांच्या कुजलेल्या शिंपल्यांचा दर्प किनाऱ्याच्या दिशेने येत होता – मोती काढणे सोपे व्हावे म्हणून शिंपल्यांना मुद्दाम कुजविण्यात येत होते.

---

* आराऊकान – अमेरिकन इंडियनांची एक टोळी.

जिवंत शिंपल्याचे तोंड उघडणे सोपे नव्हते. ज्याला सवय नाही अशा माणसाला हा दर्प असह्य वाटला असता, पण बाल्ताझार मात्र अत्यंत खुषीने तो उग्र वास हुंगत होता. त्याच्यासारख्या भटक्या मोतीवेच्याला हा वास आयुष्यातील आनंदाच्या क्षणांची आणि धाडसी दर्यावर्दी जीवनाची आठवण करून देत होता.

मोती वेचल्यानंतर सर्वांत मोठे मोठे शिंपले 'मेदूझा' वर आणण्यात आले होते. झूरीता हिशोबी होता: बटणे आणि मनगटी खडे बनविणाऱ्या कारखान्याला तो हे शिंपले विकायचा.

बाल्ताझार झोपला होता. त्याच्या दुबळया बनलेल्या बोटांमधून लौकरच सिगार खाली पडली. त्याची हनुवटी त्याच्या छातीवर झुकली.

दूर महासागरावर उमटलेला एक आवाज त्याच्या कानांना ऐकू आला. पुन्हा तो आवाज जवळ ऐकू आला. बाल्ताझारने डोळे उघडले. कुणीतरी शिंग फुंकल्याचा भास झाला आणि मग जणू दमदार तरुणाची आरोळी उमटली: "आ!" त्या पाठोपाठ अधिक उच्च स्वरात: "आ-आ!"

शिंगाचा नादमय आवाज आगबोटीच्या कर्कश्य भोंग्याशी साम्य दाखविणारा नव्हता आणि तरुणाची आनंदी आरोळी बुडणाऱ्या माणसाच्या मदतीच्या किंचाळयांसारखी मुळीच नव्हती. हे काहीतरी नवे, अपरिचित होते. बाल्ताझार उठला. त्याची झोप एकदम पळाली. तो कठड्यापाशी गेला आणि महासागराकडे त्याने निरखून पाहिले. कुणाचाही मागमूस नव्हता. शांतता. डेकवर झोपलेल्या एका इंडियनाला बाल्ताझारने पायाने ढोसून जागे केले. जेव्हा तो माणूस जागा झाला, तेव्हा बाल्ताझार हळू आवाजात म्हणाला:

"ओरडतोय. हा आवाज बहुधा **त्याचाच**!"

"मला नाही ऐकू येत," गुडघ्यांवर उभे रहात कानोसा घेत इंडियन गूरोन* म्हणाला. पण तेवढ्यात शिंगाच्या आणि आरोळीच्या आवाजांनी शांतता भंगली:

"आ-आ..!"

हा आवाज ऐकताच जणू चाबकाचा तडाखा बसावा, तसा गूरोन झटकन खाली वाकला.

"होय, बहुधा **तोच**." दात कडकड वाजवीत घाबरटपणे गूरोन म्हणाला.

दुसऱ्या पाणबुड्यांनाही जाग आली. ते कंदिलाच्या प्रकाशाकडे सरपटत गेले. जणू भयानक अंधारापासून संरक्षण व्हावे म्हणून पिवळट प्रकाशाच्या मंद किरणांकडे ते सरकत होते. सारे एकमेकांना घट्ट बिलगून कान टवकारून ऐकू लागले. शिंगाचा आणि तरुणाच्या आरोळीचा आवाज परत एकदा दूरवर घुमला व मग सर्वत्र शांतता पसरली.

"तो होता..."

"सागरी सैतान," दबत्या आवाजांमध्ये मच्छीमार कुजबुजले.

"आता यापुढं आपण इथं थांबू शकणार नाही!"

"हे शार्कपेक्षा जास्त भयंकर!"

"मालकाला इथं बोलवा!"

अनवाणी पावलांचे आवाज झाले. जांभया देत आणि केसाळ छाती खाजवीत गलबताचा मालक पेद्रो झूरीता डेकवर आला. त्याच्या अंगात सदरा नव्हता, फक्त कॅन्व्हासची विजार होती; रुंद चामडी कमरपट्ट्याला रिवॉल्वरची पिशवी लटकावलेली होती. झूरीता माणसांजवळ आला. त्याचा झोपाळलेला उन्हात रापलेला चेहरा, कपाळावर विखुरलेले

* गूरोन – अमेरिकन इंडियनांची एक टोळी.

दाट कुरळे केस, काळ्या भुवया, टोकदार मिशा व पांढरी होत चाललेली बोकडदाढी कंदिलाच्या प्रकाशात उजळली.

"काय घडलंय?"

त्याचा करडा शांत आवाज ऐकून आणि आत्मविश्वासपूर्वक हालचाली पाहून इंडियन काहीसे शांत झाले.

सगळे एकदम बोलू लागले.

बाल्ताझारने हात उचलून त्यांना गप्प राहण्याची खूण केली. तो म्हणाला:

"आम्ही त्याचा आवाज ऐकला... "सागरी सैतानाचा!"

"तुम्हाला स्वप्नात भास झाला!" डोके छातीवर झुकवीत पेद्रो झोपाळू आवाजात उत्तरला.

"नाही, भास नव्हता. आम्ही सर्वांनी "आ-आ" अशी आरोळी ऐकली आणि शिंगाचा आवाज ऐकला!" मच्छीमार ओरडले.

बाल्ताझारने परत हाताच्या खुणेने त्यांना गप्प केले व तो पुढे म्हणाला:

"मी स्वत: ऐकले ते आवाज. फक्त "सैतानच" तसं शिंग वाजवू शकेल. समुद्रावर दुसरा कुणीही तसं शिंग वाजवत नाही आणि आरोळ्या ठोकत नाही. इथून लौकर निघून गेलं पाहिजे."

"भाकडकथा," तशाच पेंगुळल्या आवाजात पेद्रो झूरीता उत्तरला. अजून उघडण्यास तयार न झालेल्या उग्र वासाच्या शिंपल्यांना किनाऱ्यावरून गलबतात भरून नांगर उचलण्याची त्याची इच्छा नव्हती. पण इंडियनांचे मन वळविणे त्याला शक्य झाले नाही. ते घाबरले होते, हातवारे करून ओरडत होते; जर झूरीताने नांगर उचलला नाही, तर उद्याच किनाऱ्यावर जाऊ व तेथून ब्यूनोस-आयर्सला पायी जाऊ, अशी ते धमकी घालीत होते.

"तुमच्यासकट त्या "समुद्र-सैतानाचा" नायनाट होवो! ठीक आहे. पहाटे आपण नांगर उचलू." कुरकुरत, शिव्याशाप देत कप्तान स्वतःच्या केबिनकडे गेला.

आता आणखी झोपण्याची त्याची इच्छा नव्हती. त्याने दिवा पेटविला, सिगार शिलगावली व छोटचा केबिनमध्ये एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत तो फेऱ्या मारू लागला. स्थानिक पाण्यात गेल्या काही काळात अवतरलेल्या आणि मच्छीमारांना व किनारपट्टीच्या रहिवाशांना घाबरवून टाकणाऱ्या गूढ प्राण्याबद्दल तो विचार करू लागला.

ह्या राक्षसाला अजून कुणीही पाहिले नव्हते, पण त्याने स्वतःच्या अस्तित्वाची अनेकदा जाणीव करून दिली होती. त्याच्याबद्दलच्या कथा प्रसारीत होत होत्या. खलाशी दबत्या आवाजांमध्ये त्या कथा सांगत. जणू राक्षसाला त्या ऐकू जातील अशी त्यांना भीती वाटायची.

हा प्राणी काही लोकांची हानी करीत होता, काही लोकांना अनपेक्षित मदत करीत होता. "हा सागरी देव आहे," म्हातारे इंडियन म्हणत, "पृथ्वीवर न्यायाची परत स्थापना करण्यासाठी हजार वर्षातून एकदा तो महासागराच्या तळातून वरती येतो."

धर्मभीरू स्पॅनिश लोकांना कॅथलिक पाद्री सांगू लागले की, हा सागरी सैतान होता. पवित्र कॅथलिक चर्चला लोक विसरू लागले होते, म्हणून सागरी सैतान लोकांमध्ये अवतरू लागला होता.

ह्या सर्व अफवा तोंडातोंडी पसरत ब्यूनोस-आयर्सपर्यंत पोहोचल्या होत्या. सनसनाटी बातम्या देण्यास सोकावलेल्या वर्तमानपत्रांच्या स्तंभांमधून "सागरी सैताना" चा विषय काही आठवडेपर्यंत गाजत राहिला. जर अज्ञात कारणांपायी गलबते, मच्छीमारांच्या बोटी बुडाल्या अथवा मासे पकडण्याच्या

जाळ्यांची किंवा पकडलेल्या माशांची चोरी झाली, तर ह्या सर्व गोष्टींचे खापर "सागरी सैताना"च्या माथ्यावर फोडण्यात येऊ लागले. पण काही लोक सांगत की, मच्छीमा-रांच्या होड्यांमध्ये काही वेळा सैतान मोठे मासे टाकायचा आणि एकदा तर बुडणाऱ्या माणसांना त्याने वाचविले होते.

निदान बुडणाऱ्यांपैकी एकाने शपथेवर सांगितले होते की, जेव्हा शेवटच्या वेळी तो पाण्याखाली गेला, तेव्हा कुणीतरी पाठीमागून त्याला धरले होते आणि किनाऱ्यापर्यंत वाहून आणले होते व ज्या क्षणी वाळूवर त्याचे पाय टेकले आणि त्याने मागे वळून पाहिले, त्याच क्षणी लाटेमागे त्याचा रक्षणकर्ता अदृश्य झाला होता.

आश्चर्य म्हणजे खुद्द "सैताना"ला कुणीही पाहिले नव्हते. हा गूढ प्राणी कसा दिसत होता त्याचे वर्णन करणे कुणालाही शक्य झाले नव्हते. अर्थात काही साक्षीदार छातीवर हात ठेवून सांगत होते–"सैतानाच्या" डोक्यावर शिंगे होती, बोकडासारखी दाढी होती, सिंहाचे पंजे होते आणि माशाची शेपटी होती; अथवा "सैतान" महाप्रचंड शिंगवाल्या बेडकासारखा होता व त्याला माणसाचे पाय होते, असे काहींनी त्याचे चित्र रेखाटले होते.

ब्यूनोस-आयर्समधील सरकारी अंमलदारांनी आरंभी ह्या कथांकडे व वर्तमानपत्रांमधील बातम्यांकडे लक्ष दिले नव्हते. ह्या सनसनाटी अफवा लौकरच विरून जातील अशी त्यांची अपेक्षा होती.

पण मच्छीमारांमध्ये मात्र चिंता वाढत चालल्या होत्या. अनेक मच्छीमार समुद्रात जायला घाबरू लागले. मासळीची आवक कमी झाली व नागरिकांना मासळीचा तुटवडा जाणवू लागला. तेव्हा स्थानिक अधिकाऱ्यांनी ह्या भानगडीत लक्ष घालण्याचे ठरविले. "किनारपट्टीच्या रहिवाशांमध्ये घबराट

माजविणाऱ्या अज्ञात व्यक्तीला पकडण्याचा" हुकूम देऊन किनारा-रक्षकांच्या काही बोटी आणि पोलीसांच्या लाँच धाडण्यात आल्या.

ला प्लात आखाताचा प्रदेश पोलीसांनी दोन आठवडेपर्यंत विंचरून काढला, अफवा पसरवून घबराट निर्माण केल्याबद्दल काही इंडियनांना त्यांनी अटक केली, पण "सैतान" सापडला नाही.

पोलीसांच्या प्रमुखाने अधिकृतपणे जाहीर निवेदन प्रसिद्ध केले की, कोणताही "सैतान" अस्तित्वात नाही, काही अडाणी माणसांनी त्याच्याबद्दल निर्माण केलेल्या ह्या केवळ अफवा आहेत, त्यांना एव्हाना अटक झाली असून योग्य ते शासन लौकरच करण्यात येईल, मच्छीमारांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि मासे पकडण्याचे काम चालू ठेवावे.

ह्या निवेदनाचा काही काळ उपयोग झाला. पण "सैताना" चे चाळे थांबले नाहीत.

एकदा रात्रीच्या वेळी किनाऱ्यापासून खूप दूर अंतरावर लाँचमध्ये झोपलेले मच्छीमार शेळीच्या कोकराच्या बेंबाट-ण्यामुळे जागे झाले. भर समुद्रात ते कोकरू लाँचमध्ये कसे आले हे गूढच राहिले. दुसऱ्या मच्छीमारांची जाळी तोडलेली आढळली.

"सैतान" पुन्हा प्रकट झाल्यामुळे आनंदित झालेले पत्रकार शास्त्रज्ञांकडून खुलाशांची अपेक्षा करू लागले.

शास्त्रज्ञांनी त्यांना फार काळ वाट पहायला लावली नाही.

त्यांनी जाहीर केले की, केवळ माणसाला शक्य असणाऱ्या कृती करू शकणारा, शास्त्राला माहीत नसलेला सागरी राक्षस महासागरात अस्तित्वात असणे शक्य नाही. "मात्र", शास्त्रज्ञांनी पुढे लिहिले होते, "महासागरांच्या फार कमी

संशोधन झालेल्या अधिक खोलवर भागात असा प्राणी आढळणे शक्य आहे." तरीही, असा प्राणी चतुर वागू शकेल ह्याबाबत शास्त्रज्ञ मान्यता द्यायला राजी नव्हते. सागरी पोलीसांच्या प्रमुखाप्रमाणेच शास्त्रज्ञांचे मत होते की, कुणा वात्रट माणसाचे हे उद्योग होते.

पण सगळ्याच शास्त्रज्ञांचे असे मत नव्हते.

सागरी कन्या, सागरी सैतान, सागरी संन्यासी आणि सागरी पाद्री यांचे वर्णन करणाऱ्या नामवंत जर्मन निसर्गशास्त्रज्ञ कॉनरॅड हेस्नेर* यांचा काही शास्त्रज्ञांनी दाखला दिला.

"सरतेशेवटी प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील शास्त्रज्ञांनी लिहिलेल्या अनेक गोष्टी खऱ्या ठरल्या आहेत, जरी आधुनिक शास्त्राने त्या जुन्या शास्त्रज्ञांवर विश्वास ठेवला नव्हता. देवाची करणी अक्षय आहे आणि इतर कुणाही-पेक्षा आम्ही शास्त्रज्ञांनी निष्कर्ष काढताना नम्र आणि सावध राहणे आवश्यक आहे," काही वृद्ध शास्त्रज्ञांनी लिहिले होते.

पण ह्या शास्त्रज्ञांना नम्र आणि सावध माणसे म्हणणे अवघड होते. शास्त्रापेक्षा चमत्कारांवर त्यांचा जास्त विश्वास होता आणि त्यांची व्याख्याने धार्मिक प्रवचनांसारखी असत.

अखेरीस वादाचा निर्णय लावण्यासाठी शास्त्रीय मोहीम धाडण्यात आली.

मोहीमेतील सदस्यांना "सैताना"ची भेट घेण्याचा सुयोग लाभला नाही. पण "अज्ञात व्यक्ती"च्या अनेक नव्या

---

* कॉनरॅड हेस्नेर – १६ व्या शतकातील नामवंत जर्मन शास्त्रज्ञ. 'प्राण्यांबद्दलचे पुस्तक' त्यांनी लिहिले होते. निसर्गशास्त्रज्ञांमध्ये दीर्घ काळ हे पुस्तक असाधारण मानले गेले. (लेखकाची टीप).

उद्योगांबद्दलची माहिती त्यांना समजली ("प्राणी" ह्या शब्दाऐवजी "व्यक्ती" असा शब्द वापरण्याचा वृद्ध शास्त्रज्ञांनी आग्रह धरला).

वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या मोहीमेच्या अहवालात म्हटले होते:

"१. आम्ही पाहणी केलेल्या किनारपट्टीच्या काही प्रदेशात वाळूवर माणसाच्या अरुंद पावलांचे ठसे आढळले. समुद्रापासून ठसे आले होते आणि परत समुद्राकडे गेले होते. अर्थात होडीतून येणाऱ्या माणसाचे असे ठसे राहणे शक्य आहे.

"२. आम्ही पाहिलेली जाळी धारदार हत्यारांनी तोडलेली आढळली. पाण्याखालील टोकदार खडकांना अथवा बुडालेल्या गलबतांच्या वाकलेल्या पत्र्यांना अडकून जाळी तुटली असणे शक्य आहे.

"३. काही लोकांनी हकीकत सांगितली की, तुफानापायी किनाऱ्यावर फेकला गेलेला डोल्फिन मासा रात्रीच्या वेळी कुणीतरी परत पाण्यात ओढून नेला व वाळूवर लांब नख्यांच्या पावलांचे ठसे उमटले होते. बहुधा एखाद्या दयाळू मच्छीमाराने डोल्फिनला समुद्रात ओढून नेले असावे.

"सर्वज्ञात आहे की, माशांची शिकार करीत असताना डोल्फिन नकळतपणे मच्छीमारांना मदत करतात, मासळीला उथळ पाण्यात लोटत आणतात. मच्छीमार अनेकदा डोल्फिनना संकटातून मुक्त करतात. नख्यांचे ठसे माणसाच्या पावलांच्या बोटांचे असणे शक्य आहे. नख्या भासणे कल्पनेचा खेळ असावा.

"४. कोकराला होडीतून नेले असावे आणि कुणी चेष्टेखोराने त्याला मच्छीमारांच्या लाँचमध्ये टाकले असावे."

"सैताना" ने मागे ठेवलेल्या ठशांचा खुलासा करताना शास्त्रज्ञांना आणखी बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी आढळल्या.

शास्त्रज्ञ अशा निष्कर्षाला आले की, एकाही सागरी राक्षसाला अशा अवघड करामती पार पाडणे शक्य नव्हते.

ह्या खुलाशांमुळे सर्वांचेच समाधान झाले नव्हते. खुद्द शास्त्रज्ञांमध्ये काहींना हे खुलासे अपुरे भासले. चेष्टेखोर कितीही चपळ आणि चतुर असला, तरी लोकांच्या नजरेस प्रदीर्घ काळ न पडता असले उद्योग कसे करू शकेल? पण सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे शास्त्रज्ञांना आढळले होते की – ज्याचा त्यांनी अहवालात मुळीच उल्लेख केला नव्हता – "सैताना"ने अवघ्या थोड्या अवधीत दूर दूर अंतरांवर त्याचे पराक्रम केलेले होते. एक तर "सैतान" अश्रुत वेगाने पोहू शकत होता, अथवा त्याच्या अंगी विशेष सामर्थ्य होते, किंवा "सैतान" एकटा नव्हता, ते अनेकजण होते. असे असेल तर ह्या सर्व चाळ्यांना अधिकच गूढता व भयानकता लाभत होती.

केबिनमध्ये सतत येरझाऱ्या घालताना पेद्रो झूरीताच्या मनात हा सारा गूढ इतिहास उमटून गेला.

पहाट केव्हा झाली हे त्याच्या ध्यानात आले नाही आणि केबिनच्या गवाक्षातून गुलाबी सूर्यकिरण आत घुसला. पेद्रोने दिवा विझविला व तो तोंड धुवू लागला.

डोक्यावर कोमट पाणी ओतत असताना डेकवरून उमटलेल्या भेदरट किंकाळ्या त्याच्या कानी पडल्या. डोके धुणे तसेच अर्धवट सोडून झूरीता घाईघाईने शिडी चढू लागला.

कमरेभोवती फक्त लंगोट्या गुंडाळलेले पाणबुडे कठड्यापाशी उभे राहून हातवारे करीत होते व गोंगाट माजवीत होते. पेद्रोने खाली नजर टाकली – रात्री बांधून ठेवलेल्या होड्या कुणीतरी सोडल्या होत्या. रात्रीच्या वाऱ्यांनी त्या उघड्या महासागरात दूर वाहात गेल्या होत्या. आता पहाटेच्या वाऱ्यांनी त्यांना सावकाशपणे किनाऱ्याकडे ढकलत आणले होते. त्यांची वल्ही आखातात चौफेर तरंगत होती.

झूरीताने पाणबुड्यांना होड्या एकत्र करण्याचा हुकूम

दिला. पण डेकवरून पाण्यात उतरण्यास कुणीही तयार नव्हता. झूरीताने हुकूमाचा पुन्हा उच्चार केला.

"सैतानाच्या" पंजात तू स्वतःच जा," कुणीतरी उलट उत्तर केले.

झूरीताने रिवॉल्वरच्या पिशवीला हात घातला. पाणबुड्यांचा जमाव मागे सरला आणि डोलकाठीपाशी एकवटला. पाणबुडे खुनशी नजरांनी झूरीताकडे पहात होते. संघर्ष अटळ भासत होता. तेवढ्यात बाल्ताझारने हस्तक्षेप केला.

"आराऊकान कुणालाही भीत नाही," तो म्हणाला, "शार्कनं मला खाल्लं नाही आणि "सैतानालाही" माझी म्हातारी हाडं पचायची नाहीत." त्याने हात डोक्यावर धरले, डेकवरून पाण्यात उडी मारली व सर्वांत जवळच्या होडीपाशी तो पोहत गेला. आता पाणबुडे कठड्यापाशी आले व बाल्ताझारकडे घाबरल्या नाजरांनी पाहू लागले. जरी तो म्हातारा झाला होता, त्याचा एक पाय अधू होता, तरी तो उत्तम पोहत होता. काही जोरदार हात मारून बाल्ताझार होडीपाशी पोहोचला, तरंगणारे वल्हे त्याने उचलले व तो होडीत चढून बसला.

"दोरी सुऱ्यानं तोडलीय," तो ओरडला, "आणि छान तोडलीय! सुरा वस्तऱ्यासारखा धारदार होता."

बाल्ताझारच्या बाबतीत भयानक काही घडले नव्हते असे पाहून काही मच्छीमारांनी त्याच्या कृतीचे अनुकरण केले.

डोल्फिनवर स्वार

सूर्य नुकताच वर चढला होता, पण एव्हाना ऊन चांगलेच रणरणू लागले होते. रुपेरी निळसर नभात एकही ढग नव्हता,

महासागर स्तब्ध होता. 'मेदूझा' एव्हाना ब्यूनोस-आयर्सच्या दक्षिणेला वीस किलोमीटरवर होते. बाल्ताझारच्या सल्ल्यानुसार पाण्यातून वर आलेल्या दोन खडकांदरम्यानच्या जागेत नांगर टाकण्यात आला होता.

होड्या आखातात विखुरल्या होत्या. प्रत्येक होडीत रीतीनुसार दोन पाणबुडे होते: एकजण पाण्यात बुडी मारायचा, दुसरा त्याला वरती खेचून घ्यायचा. मग ते आळीपाळीने बुड्या मारीत.

एक होडी किनाऱ्याच्या खूप जवळ गेली. पाणबुड्याने दोन पायांदरम्यान प्रवाळाचा मोठा तुकडा धरला आणि पटकन तळाशी सूर मारला.

पाणी खूप उबदार आणि पारदर्शी होते – तळाशी प्रत्येक गोटा स्पष्ट दिसत होता. किनाऱ्याजवळच्या समुद्रतळात प्रवाळ उभे होते – पाण्याखालील बागांमधील स्थिर झुडुपां-सारखी. सोनेरी आणि रुपेरी कांती चमकवीत छोटे मासे ह्या झुडुपांदरम्यान सुळकांड्या मारीत होते.

पाणबुड्या तळापाशी गेला व खाली वाकून भराभरा शिंपले गोळा करून कमरपट्ट्याला बांधलेल्या छोट्या पिशवीत भरू लागला. त्याच्या कामातील साथीदार इंडियन गूरोनने हातांमध्ये दोरीचे टोक पकडले होते व होडीच्या कठड्याशी वाकून तो पाण्यात पहात होता.

एवढ्यात त्याने पाहिले की, पाणबुड्याने पटकन वरती झेप घेतली होती, हातांनी दोरीला जोरात हिसका मारला होता; होडीतील गूरोनला जेमतेम स्वतःचा तोल सावरता आला. होडी चांगलीच हेलकावली. इंडियन गुरोनने भरभर त्याच्या सोबत्याला वरती ओढून घेतले आणि होडीत चढायला मदत केली. पाणबुड्या तोंडाचा आ वासून धापा टाकीत होता, त्याचे डोळे भीतीने विस्फारलेले होते. त्याचा काळपट तांबूस

चेहरा राखाडी बनला होता.

"शार्क?"

पण पाणबुड्याला उत्तर देणे शक्य झाले नाही. होडीच्या तळाशी तो धपदिशी निजला.

समुद्राच्या तळाशी त्याला कशाची एवढी भीती वाटली? गूरोन खाली वाकून पाण्यात निरखून पाहू लागला. तेथे काहीतरी भानगड नक्की होती. बहिरीससाण्याला पाहताच छोट्या पाखरांची जशी पळापळ होते, तशी छोट्या माशांची धांदल उडाली होती व पाण्याखालील जंगलांमधल्या दाट झुडुपांआड लपण्याची त्यांची घाई चालली होती.

पाण्याखालील खडकाच्या कोपऱ्यामागून एकदम जांभळ्या रंगाच्या धुराचा लोट वर उसळलेला इंडियन गूरोनने पाहिला. धूर सावकाशपणे सर्व दिशांना पांगला व पाण्याला गुलाबी रंग चढला. तेवढ्यात काहीतरी काळसर दिसले. शार्क माशाचे ते शरीर होते. त्याने सावकाश पलटी मारली व खडकाआड तो नाहीसा झाला. पाण्याखालील जांभळा धूर म्हणजे महासागराच्या तळाशी सांडलेले रक्त होते. काय घडले तेथे? गूरोनने त्याच्या साथीदाराकडे नजर टाकली, पण साथीदार निपचित उताणा पडला होता, तोंडाचा आ वासून हवा गिळत होता व नभाकडे शून्य नजरेने पहात होता. इंडियनाने वल्हे हाती घेतले आणि अनपेक्षितपणे आजारी पडलेल्या साथीदाराला तो घाईघाईने 'मेदूझा'च्या डेककडे नेऊ लागला.

अखेरीस पाणबुड्या थाऱ्यावर आला, पण जणू त्याची वाचा नाहीशी झाली होती – तो नुसता तोंडाने मच मच आवाज करीत होता, डोके हलवीत होता आणि ओठ आवळून फुंकरी मारीत होता.

दुकाठी गलबताच्या डेकवर पाणबुड्यांनी त्याच्याभोवती

कोंडाळे केले व आतुरतेने त्याच्या खुलाशाची ते वाट पाहू लागले.

"बोल!" पाणबुड्याला गदगदा हलवीत एक तरुण इंडियन अखेर किंचाळला. "तुझा भित्रा आत्मा शरीरातून उडून जाईल अशा भीतीनं तोंड उघडत नाहीस काय?"

पाणबुड्याने डोके हलविले आणि अस्पष्ट आवाजात तो म्हणाला :

"बघितलं... "सागरी सैतानाला!"

"**त्याला?**"

"बोल, अरे बोल ना!" अधीरपणे पाणबुडे ओरडले.

"बघतो – शार्क! थेट माझ्या अंगावर शार्क चालून येत होता. म्हटलं, संपलं सगळं! मोठ्ठा, काळाकुट्ट, जबडा वासलेला, कुठल्याही क्षणी त्यानं मला गिळलं असतं! तेवढ्यात बघितलं – आणखी चालून घेत होता..."

"दुसऱ्या शार्कला?"

"सैतानाला!"

"कसा आहे तो? त्याला डोकं आहे?"

"डोकं? बहुधा आहे. ग्लासाएवढे मोठे डोळे!"

"जर डोळे आहेत, तर डोकं असलंच पाहिजे," तरुण इंडियन ठामपणे म्हणाला. "डोळे आपोआप येत नाहीत. त्याला पंजे आहेत?"

"त्याचे पंजे बेडकासारखे आहेत. बोटं लांबसडक, हिरवी, नख्या असलेली आणि जाळीदार. तो स्वतः खवलेदार माशा-सारखा चमकतो. शार्कपाशी पोहत गेला, पंजाचा आघात केला – खस्स! शार्कच्या पोटामधून रक्ताचं कारंजं उसळलं..."

"त्याचे पाय कसे आहेत?" एका पाणबुड्याने विचारले.

"पाय? त्याला पाय मुळीच नाहीत. मोठ्ठी शेपूट आहे.

आणि शेपटीच्या टोकाशी दोन साप."

"कुणाला तू जास्त घाबरलास – शार्कला अथवा राक्षसाला?"

"राक्षसाला," मुळीच न डळमळता त्याने उत्तर दिले. "राक्षसाला, जरी त्यानं माझा जीव वाचवला होता. **तोच** होता..."

"होय, **तोच** होता."

"सागरी सैतान," इंडियन म्हणाला.

"सागरी देव" – गरीबांच्या मदतीला धावून येणारा," म्हाताऱ्या इंडियनाने चूक दुरुस्त करीत म्हटले.

आखातात तरंगणाऱ्या होड्यांमध्ये ही बातमी वेगाने पसरली. मोतीवेचे घाईघाईने गलबताकडे गेले आणि त्यांनी होड्या डेकवर उचलून घेतल्या.

"सागरी सैतानाने" वाचविलेल्या पाणबुड्याभोवती सगळे गर्दी करू लागले. तो पुन:पुन्हा सर्व हकीकत तपशीलवार सांगत होता. आता त्याला आठवण झाली की, राक्षसाच्या नाकपुड्यांमधून तांबड्या ज्वाला उमटत होत्या, दात तीक्ष्ण आणि बोटभर लांब होते. त्याचे कान हलत होते, कुशींवर पंख होते आणि मागे वल्ह्यासारखी शेपूट.

कमरेपर्यंत उघडाबंब असलेला, आखूड पांढरी विजार घातलेला, मोजेविरहित पायांमध्ये सँडल चढविलेला आणि डोक्यावर उंच, रुंद किनारीची गवती टोपी घातलेला पेद्रो झूरीता ही संभाषणे ऐकत, सँडल फरफटत डेकवर येरझाऱ्या मारत होता.

निवेदक जेवढी जास्त बडबड करीत होता, तेवढी पेद्रोची खात्री पटत चालली होती की, शार्क जवळ आल्यामुळे घाबरलेल्या पाणबुड्याचे ते सर्व कल्पनेचे खेळ होते.

"पण कदाचित सर्वच काही काल्पनिक नव्हते. कुणीतरी

शार्कचं पोट फाडलं होतं: कारण आखातामधील पाण्याचा रंग गुलाबी बनला होता. इंडियन थापा मारत होता, पण ह्या हकीकतीत सत्याचा काही अंश निश्चित होता. च्यायला, विचित्र घटना होती!"

एवढ्यात कड्यांमागून अचानक उमटलेल्या शिंगाच्या आवाजाने झूरीताची विचारमालिका इथे तुटली.

ह्या आवाजामुळे 'मेदूझा'चे खलाशी वज्राघात व्हावा तसे हतबल बनले. सगळी बडबड एकदम थांबली, सर्वांचे चेहरे पांढरेफटक पडले. शिंगाचा आवाज जेथून आला होता त्या कड्याच्या दिशेने पाणबुडे भेदरून पहात होते.

कड्यांपासून जवळच महासागराच्या पाण्यावरती डोल्फिनांचा कळप हुंदडत होता. एक डोल्फिन कळपापासून अलग झाला, शिंगाच्या आवाजाच्या इशाऱ्याला उत्तर म्हणून तो जोरात फुरकला आणि वेगाने पोहत येऊन कड्यांमागे नाहीसा झाला. तीव्र ताणाचे काही क्षण उलटले. कड्यांमागून एकदम डोल्फिन परत अवतरल्याचे पाणबुड्यांनी पाहिले. घोड्यावर स्वार होतात तसा डोल्फिनच्या पाठीवर एक विचित्र प्राणी स्वार झालेला होता – थोड्याच वेळापूर्वी पाणबुड्याने ज्याच्याबद्दल हकीकत सांगितली होती तो "सैतान"! राक्षसाचे शरीर माणसाप्रमाणे होते; पण त्याच्या चेहऱ्यावर जुन्या घड्याळांप्रमाणे प्रचंड डोळे होते व सूर्याच्या उन्हात ते मोटारीच्या दिव्यांप्रमाणे चमकत होते. त्याची कांती नाजुक निळसर रुपेरी दिसत होती आणि हातांचे पंजे बेडकासारखे होते – गडद हिरवेगार, लांब बोटांचे व बोटांदरम्यान जाळी असलेले. पाय गुडघ्यांपासून खाली पाण्यात होते. त्यांच्या टोकांना शेपट्या होत्या अथवा सरळ माणसासारखेच त्याचे पाय होते हे समजायला मार्ग नव्हता. विचित्र प्राण्याने हातांमध्ये लांबोडा गोलाकार शंख धरला

होता. त्याने परत एकदा शंख वाजविला, माणसासारखा तो खदखदा हसला आणि अचानक स्पष्ट स्पॅनिश भाषेत ओरडला: "लौकर लीडिंग, पुढं चल!" बेडकाच्या हातांनी त्याने डोल्फिनच्या गुळगुळीत पाठीवर थापटी मारली आणि पायांनी डोल्फिनच्या कुशींमध्ये ढोसले. उमद्या घोड्याप्रमाणे डोल्फिनने वेग वाढविला.

पाणबुडे नकळतपणे ओरडले.

आगळ्या स्वाराने मागे वळून पाहिले. माणसांना पाहताच पटकन तो डोल्फिनच्या पाठीवरून खाली घसरला आणि दुसऱ्या दिशेला लपला. डोल्फिनच्या पाठीवर आघात करणारा हिरवा हात पलीकडील बाजूने दिसला. आज्ञाधारक डोल्फिन त्या राक्षसासह पाण्याखाली शिरला.

त्या विचित्र जोडीने पाण्याखाली अर्धवर्तुळ मारले आणि पाण्याखालील कड्यांमागे ती नाहीशी झाली...

ही सर्व असाधारण घटना अवघ्या एका मिनिटाच्या आत घडून गेली, पण प्रेक्षकांना आश्चर्याच्या धक्क्यामधून सावरण्यास मात्र खूप वेळ लागला.

पाणबुड्यांनी आरोळ्या ठोकल्या, डेकवर धावाधाव केली, डोकी हातांनी गच्च आवळून धरली. इंडियनांनी गुडघे टेकले व सागरी देवापाशी ते क्षमायाचना करू लागले. घाबरलेला तरुण मेक्सिकन मुख्य डोलकाठीवर चढून ओरडत होता. नीग्रो डेकच्या खालच्या जागेत कोपऱ्यामध्ये लपून बसले.

मोती वेचण्याचा विचार कुणाच्याही मनाला शिवत नव्हता. पेद्रोने व बाल्ताझारने अत्यंत कष्टाने सुव्यवस्था परत स्थापन केली. 'मेदूझा' ने नांगर उचलला आणि उत्तरेची वाट धरली.

झूरीताचे अपयश

घडलेल्या गोष्टींवर विचार करण्यासाठी 'मेदूझा' चा कप्तान स्वतःच्या केबिनमध्ये गेला.

"वेड लागणं शक्य आहे!" खुजातील कोमट पाणी डोक्यावर ओतत झूरीता म्हणाला. "सागरी राक्षस स्वच्छ कॅस्टेलानो बोलीत बोलतो! काय म्हणायचं ह्याला? सैतानीपणा? भास? पण सगळ्या खलाशांना एकाच वेळी कसा भास होईल? दोन माणसांना सारखं स्वप्नसुद्धा पडत नाही! पण आम्ही सर्वांनी सागरी सैतानाला पाहिलं. ह्याबाबत वाद नाही. जरी विश्वास ठेवणं शक्य नसलं, तरी तो अस्तित्वात आहे हे मात्र खरं!" झूरीताने परत स्वतःच्या डोक्यावर पाणी ओतले आणि ताजी हवा घेण्यासाठी गवाक्षामधून तो बाहेर झुकला. "काहीही असो," काहीसे शांत होत तो पुढे विचार करू लागला, "ह्या राक्षसी प्राण्यापाशी माणसाची बुद्धिमत्ता आहे आणि तो बौद्धिक कामगिऱ्या पार पाडू शकतो. असं दिसतंय की, पाण्यात आणि जमिनीवर अशा दोन्ही ठिकाणी तो सारख्याच सहजतेनं राहू शकतोय. शिवाय तो स्पॅनिश भाषेत बोलू शकतो – म्हणजे त्याच्याशी खुलासा करणं शक्य आहे. जर... जर राक्षसाला पकडलं आणि मोती वेचायच्या कामाला जुंपलं, तर काय होईल? पाण्याखाली जगू शकणारा हा एकटा बेडूक पाणबुड्यांच्या आख्ख्या कळपाचं काम करील! केवढा मोठा फायदा होईल! प्रत्येक पाणबुड्याला वेचलेल्या मोत्यांपैकी निदान चौथा हिस्सा द्यावा लागतो. पण हा बेडूक स्वस्तात पडेल. अगदी थोड्या अवधीत शेकडो हजार, दशलक्षावधी पेसो कमावता येतील!"

झूरीता स्वप्नरंजनात गुंगला. आत्तापर्यंत श्रीमंत होण्याची

स्वप्ने तो नेहमी पहात होता, जेथे कुणी मोती वेचले नव्हते अशा जागी मोत्यांचे शिंपले शोधण्याचे त्याने प्रयत्न केले होते. पर्शियन आखात, सीलोनचा पश्चिम किनारा, तांबडा समुद्र, ऑस्ट्रेलियानजीकचा समुद्र – मोती वेचण्याच्या ह्या सर्व जागा दूर होत्या आणि फार पूर्वीपासून माणसे तेथे मोती शोधत होती. मेक्सिकोच्या अथवा कॅलिफोर्नियाच्या आखाता-मध्ये जायचे? फोमा आणि मार्गारीता बेटांवर जायचे? सर्वोत्तम अमेरिकन मोती जेथे सापडत त्या व्हेनेझुएलाच्या किनारपट्टीत गलबतामधून जाणे झूरीताला शक्य नव्हते. ह्या प्रवासाला त्याचे जुनाट गलबत योग्य नव्हते आणि पाणबुड्यांची संख्या अपुरी पडत होती. थोडक्यात, मोठी जोखीम पत्करायला पाहिजे होते आणि झूरीतापाशी पैसे पुरेसे नव्हते. म्हणून आर्जेंटिनाच्या किनाऱ्यांजवळच तो राहिला होता. पण आता! आता जर "सागरी सैतानाला" पकडण्यात त्याला यश आले, तर अवघ्या एका वर्षाच्या आत तो श्रीमंत बनणे शक्य होईल.

आर्जेंटिनात तो सर्वांत श्रीमंत माणूस होईल, कदाचित आख्ख्या अमेरिकेत! पैशाच्या जोरावर त्याला सत्ता लाभेल. पेद्रो झूरीताचे नाव सर्वांच्या तोंडी गाजत राहील. पण खूप सावध वागले पाहिजे. सर्वप्रथम गुपित राखले पाहिजे.

झूरीता डेकवर गेला आणि आचाऱ्यापर्यंत सर्व खलाशांना व पाणबुड्यांना त्याने एकत्र बोलाविले. तो म्हणाला:

"सागरी सैतानाबाबत" अफवा पसरवणाऱ्या लोकांच्या नशीबी काय आलंय हे तुम्हाला माहीत आहे का? त्यांना पोलीसांनी अटक केली आणि ते तुरुंगात बसलेत. मी तुम्हाला इशारा देतो की, "सागरी सैतान" पाहिलात असं निदान एका शब्दानं कुठं बोललात, तर तुमच्यापैकी प्रत्येकाच्या वाट्याला तसाच तुरुंगवास येईल. समजलं? म्हणून जर

तुम्हाला जीव जास्त मोलाचा वाटत असेल, तर "सैताना-बद्दल" कुणापाशीही काहीही बोलू नका!"

"त्यांच्यावर कुणीही विश्वास ठेवणार नाही. हे सगळं परीकथेतल्याप्रमाणं वाटेल," झूरीताच्या मनात विचार आला. त्याने बाल्ताझारला एकटचाला स्वतःच्या केबिनमध्ये बोलावून घेतले आणि आपली योजना समजावून सांगितली.

बाल्ताझारने मालकाचे बोलणे लक्षपूर्वक ऐकून घेतले, थोडा वेळ तो गप्प राहिला व मग म्हणाला:

"हे छान आहे. "सागरी सैतान" शेकडो पाणबुडचांच्या तोडीचा आहे. "सैतानाला" स्वतःच्या चाकरीत ठेवणं छान होईल. पण त्याला कसं पकडायचं?"

"जाळं लावून," झूरीता उत्तरला.

"शार्कचं पोट त्यानं जसं चिरलं, तसं तो जाळं फाडून टाकील."

"आपण पोलादी जाळं आणू."

"कोण त्याला पकडणार? आपल्या पाणबुडचांना "सैतान" असा नुसता शब्द सांगितला, तर ते मटकन खाली बसतील. पोतं भरून सोनं दिलं, तरी ते कबूल होणार नाहीत."

"तू कबूल होशील बाल्ताझार?"

इंडियनाने खांदे उडविले:

"मी अजूनपर्यंत कधी "सागरी सैतानांची" शिकार केलेली नाही. त्याला पकडणं अर्थातच सोपं जाणार नाही. जर तो फक्त हाडा-मांसाचा बनलेला असेल तर त्याला ठार मारता येईल. पण तुम्हाला जिवंत "सैतान" हवा आहे."

"तू त्याला भीत नाहीस, बाल्ताझार? "सागरी सैताना-बद्दल" तुझं काय मत आहे?"

"समुद्रावर उडणाऱ्या बिबळ्या वाघाबद्दल किंवा झाडांवर चढणाऱ्या शार्क माशाबद्दल मी काय विचार करू शकणार?

न पाहिलेलं जनावर जास्त भयानक. पण भयानक जनावराची शिकार करायला मला आवडतं!"

"मी तुला भरपूर इनाम देईन", झूरीताने बाल्ताझारच्या हातात आपला हात दिला व स्वतःची योजना तो जास्त तपशीलवारपणे पुढे सांगू लागला: "ह्या कामात माणसं जेवढी कमी, तेवढं जास्त चांगलं. तू सगळ्या आराऊकानांशी बोल. ते धीट आणि धाडसी आहेत. पाचापेक्षा जास्त माणसांची निवड करू नको. जर आपल्या लोकांनी मान्यता दिली नाही, बाहेरच्यांना शोध. "सैतान" किनाऱ्याशी वावरतोय. प्रथम त्याची गुंफा शोधली पाहिजे. मग त्याला जाळ्यात धरणं आपल्याला सोपं जाईल."

झूरीता आणि बाल्ताझार झटपट कामाला लागले. झूरीताच्या मागणीनुसार तारेची जाळीदार विणलेली थैली बनविण्यात आली. उघडचा तळाच्या पिंपासारखी ती दिसत होती. तिच्या आतमध्ये झूरीताने साधी जाळी बसविली – कोळ्याच्या जाळ्यात गुरफटल्याप्रमाणे "सैतान" अडकावा म्हणून! पाणबुड्यांचे हिशेब चुकते करण्यात आले. "सैतानाच्या" शिकारीत भाग घेण्यासाठी 'मेदूझा' वर काम करणाऱ्यांपैकी फक्त दोघा इंडियन आराऊकानांचे मन वळविण्यात बाल्ताझारला यश आले होते. आणखी तिघांना त्याने ब्यूनोस-आयर्समध्ये भरती केले.

'मेदूझा' च्या खलाशांनी "सैतानाला" प्रथम जेथे पाहिले होते त्या आखातात "सैतानाचा" शोध सुरू करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. "सैतानाचा" संशय जागा होऊ नये म्हणून त्या छोट्या आखातापासून काही किलोमीटर अंतरावर दुकाठी गलबताचा नांगर टाकण्यात आला. झूरीता व त्याचे साहाय्यक अधूनमधून मासे पकडण्याच्या उद्योगात गुंतत होते – जणू त्यांच्या सागरी प्रवासाचा तोच उद्देश होता असे भास-

विण्यासाठी. पण त्याचवेळी त्यांच्यापैकी तिघे किनाऱ्यावर खडकांमागे लपून बसत होते, आखातामधील पाण्यात काय घडतेय ह्याबाबत आळीपाळीने पहारा देत होते.

दुसरा आठवडा संपत आला होता, पण "सैतानाने" दर्शन दिले नव्हते.

किनारपट्टीवर राहणाऱ्या लोकांशी, इंडियन शेतकऱ्यांशी, बाल्ताझारने ओळखी केल्या होत्या. त्यांना तो स्वस्तात मासे विकत होता, त्यांच्याशी वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारत होता व नकळतपणे संभाषणाचा ओघ "सागरी सैतानाकडे" वळवीत होता. त्या संभाषणांमधून म्हाताऱ्या बाल्ताझारची खात्री पटली होती की, शिकारीच्या जागेची त्याची निवड अचूक होती. आखाताजवळ राहणाऱ्या अनेक इंडियनांनी शिंगाचा आवाज ऐकला होता व वाळूवर पावलांचे ठसे पाहिले होते. "सैतानाची" टाच मानवी होती अशी त्यांनी खात्री दिली होती, पण बोटे मात्र खूपच लांबोडी होती. कधी कधी इंडियनांना पाठीचे खोल ठसे दिसले होते – "सैतान" किनाऱ्यावर झोपून गेला होता.

किनाऱ्यावरील माणसांचे "सैतानाने" कधी नुकसान केले नव्हते, त्यामुळे स्वतःची आठवण करून देणारे ठसे त्याने मागे सोडले, तरी त्यांच्याकडे लक्ष देणे लोकांनी बंद केले होते. पण खुद्द "सैतानाला" मात्र कुणीही पाहिले नव्हते.

मासे पकडण्याचा देखावा करीत 'मेदूझा' दोन आठवडेपर्यंत आखातात उभे होते. झूरीता, बाल्ताझार आणि भाडोत्री इंडियन दोन आठवडेपर्यंत महासागराच्या पृष्ठभागावर डोळ्यात तेल घालून शोध घेत होते, पण "सागरी सैतान" दिसला नाही. झूरीता अस्वस्थ बनला होता. तो अधीर स्वभावाचा आणि कंजूस होता. दर दिवसाला खर्च वाढत होता आणि हा "सैतान" वाट पहायला भाग पाडत होता. पेद्रोचे मन

डळमळू लागले होते. जर "सैतान" अमानुष प्राणी असेल, तर कुठल्याही जाळ्यांमध्ये त्याला पकडणे शक्य होणार नाही. शिवाय अशा सैतानाशी संबंध धोक्याचा ठरला असता — झूरीताचा शकुन-अपशकुनांवर विश्वास होता. 'मेदूझा'वर पाद्र्याला बोलावून पवित्र विधी करवून घेता आले असते, पण तो जादा खर्च झाला असता. कदाचित "सागरी सैतान" मुळीच सैतान नसेल, कुणी वात्रट माणूस असेल, उत्तम पोहणारा असेल आणि लोकांना घाबरविण्यासाठी सैतानाचे सोंग घेत असेल? पण डोल्फिन? कुठल्याही प्राण्याप्रमाणे त्याला पाळून शिकविणे शक्य होते. ह्या भानगडीचा नाद पूर्ण सोडून देणे योग्य ठरेल काय?

"सैतानाला" जो प्रथम पाहील, त्याला इनाम देण्याचे झूरीताने जाहीर केले व आणखी काही दिवस वाट पाहण्याचा निर्णय घेतला.

त्याच्या सुदैवाने तिसऱ्या आठवड्याच्या आरंभी "सैतान" अखेरीस तोंड दाखवू लागला.

दिवसभर मासे पकडल्यानंतर बाल्ताझारने मासे भरलेली होडी किनाऱ्याशी उभी केली होती. पहाटे मासे खरेदी करणारी माणसे यायची होती. ओळखीच्या इंडियनाला भेटण्यासाठी बाल्ताझार जवळच्या फार्मवर गेला, पण जेव्हा किनाऱ्यावर परतला, तेव्हा होडी रिकामी होती. "सैतानाचा" हा उद्योग होता असे बाल्ताझारने तात्काळ ठरविले.

"खरंच त्यानं एवढे सगळे मासे खाल्ले असतील?" बाल्ताझार मनाशी आश्चर्य करीत होता.

त्याच रात्री पहाऱ्यावरच्या एका इंडियनाने आखाताच्या दक्षिणेकडून शिंगाचा आवाज ऐकला. आणखी दोन दिवसांनंतर भल्या सकाळी तरुण आराऊकानाने सांगितले की, "सैतानाला" पाहण्यात त्याला अखेरीस यश आले होते. तो डोल्फिनबरोबर

पोहत होता. ह्यावेळी "सैतान" डोल्फिनवर स्वार झाला नव्हता, तर डोल्फिनच्या मानेभोवती अडकवलेल्या रुंद कातडी पट्ट्याला हाताने धरून तो त्याच्याबरोबर पोहत होता. आखातात "सैतानाने" डोल्फिनचा गळपट्टा काढून टाकला, डोल्फिनला हाताने थोपटले आणि उंच कड्याच्या पायथ्याशी आखाताच्या खोल पाण्यात नाहीसा झाला. डोल्फिन पाण्याच्या वरच्या भागातून पोहत अदृश्य झाला.

झूरीताने आरांऊकानाचे बोलणे ऐकून झाल्यावर त्याचे आभार मानले, त्याला इनाम देण्याचे वचन दिले व तो म्हणाला :

"आज "सैतान" त्याच्या गुंफेतून परत बाहेर पडणं शक्य नाही. म्हणून आखाताच्या तळाची आपण पाहणी केली पाहिजे. कोण हे काम हाती घेईल?"

पण अज्ञात राक्षसाशी समोरासमोर भेटण्याचा धोका पत्करायला महासागराच्या तळाशी बुडी मारण्याची कुणाचीही इच्छा नव्हती.

बाल्ताझार पुढे सरसावला.

"मी तयार आहे!" तो एवढेच म्हणाला. बाल्ताझार स्वतःचा शब्द पाळणारा होता.

'मेदूझा' अजून नांगरून उभे होते. फक्त एका पहारेकऱ्याला गलबतावर ठेवून बाकीचे सारे किनाऱ्यावर गेले व तेथून आखातामधील उंच कड्यापाशी गेले.

बाल्ताझारने स्वतःला दोरी बांधली. जर पाण्याखाली तो जखमी झाला, तर त्याच्या साथीदारांना त्याला वर ओढून घेता यावे, म्हणून त्याने ही तरतूद केली होती. त्याने सुरा घेतला, पायांमध्ये दगड धरला, पाण्याच्या तळाशी त्याने बुडी मारली.

त्याच्या परतण्याची आराऊकान अधीरतेने वाट पहात

होते. आखातामधील गढूळ निळसर पाण्यात कड्यांची सावली पडली होती तेथे निरखून पहात होते. चाळीस सेकंद, पन्नास सेकंद, एक मिनिट उलटले – बाल्ताझार परतला नव्हता. शेवटी त्याने दोरीला हिसका दिला आणि त्याला वरती ओढून घेण्यात आले. धापा टाकीत बाल्ताझार म्हणाला:

"जमिनीखालच्या गुहेत अरुंद वाट जातेय. शार्कच्या पोटात असतो तसा तिथं अंधार आहे. "सागरी सैतान" केवळ ह्याच गुंफेत लपणं शक्य आहे. तिच्याभोवती गुळगुळीत भिंत आहे."

"उत्तम!" झूरीता ओरडला. "तिथं अंधार आहे हे फारच चांगलं! आपण जाळी लावू आणि मासा नेमका अडकेल!"

सूर्य मावळल्यानंतर ताबडतोब इंडियनांनी भक्कम दोरांना बांधलेली तारांची जाळी पाण्याखालच्या गुंफेच्या दाराशी सोडली. दोरांची टोके किनाऱ्यावर गच्च बांधून ठेवली. दोरांना बाल्ताझारने घंटा बांधल्या होत्या. जाळ्यांना कुणा-चाही किंचित स्पर्श घडल्यास घंटा वाजणार होत्या.

झूरीता, बाल्ताझार व पाच आराऊकान किनाऱ्यावर बसून मुकाट वाट पाहू लागले.

दुकाठी गलबतावर कुणीही नव्हते.

अंधार लौकर दाटला. चंद्र उगवला आणि महासागरा-च्या पृष्ठावर त्याचे चांदणे पसरले. शांतता नांदत होती. सर्वांना आगळयाच ताणाने झपाटले होते. मच्छीमारांना आणि मोतीवेच्यांना दहशत घालणारा तो विचित्र प्राणी कोणत्याही क्षणी त्यांच्या नजरेला पडण्याची शक्यता होती

रात्रीचे तास सावकाशपणे सरकत होते लोकाना झापड येंऊ लागली.

अचानक घंटा खणखणल्या लोक ताडकन उठले, दोर

पकडून जाळे वर खेचू लागले. जाळे खूप जड भासत होते. दोर ताणले होते. जाळयात कुणाचीतरी धडपड चालली होती.

जाळे महासागराच्या पृष्ठावर आले व चंद्राच्या पांढुरक्या प्रकाशात अर्धमानवी आणि अर्धपशूचे शरीर जाळयातून सुटण्याची धडपड करताना दिसले. चांदण्यात त्याचे प्रचंड डोळे व रुपेरी खवले चमकत होते. जाळयात अडकलेला हात सोडविण्यासाठी "सैतान" कमालीच्या ताकदीने झटापट करीत होता. त्याच्या प्रयत्नात त्याला यश आले. कमरेच्या अरुंद पट्ट्यातून त्याने सुरा बाहेर खेचला व तो जाळे तोडू लागला.

"बेटया, तारेचं जाळं तुला तोडता येणार नाही!" बाल्ताझार हळूच म्हणाला.

पण सुऱ्याने तारेचे जाळे कापले गेलेले पाहून तो चकित झाला. चपळ हालचालींनी "सैतानाने" भोक रुंद केले आणि जाळे किनाऱ्यावर आणण्यासाठी मोतीवेचे घाई करू लागले.

"जोरात! ओढा!" बाल्ताझार ओरडला.

पण सावज हातात सापडले असे जेव्हा वाटले, नेमक्या त्याच क्षणाला जाळयाला फाडलेल्या भोकातून "सैतान" बाहेर पडला, त्याने पाण्यात बुडी मारली, पाण्याचे जोरदार कारंजे उडाले व तो नाहीसा झाला.

मोतीवेच्यांनी निराशेने जाळे खाली टाकले.

"झकास सुरा! तार कापतो!" बाल्ताझार कौतुकाने म्हणाला. "पाण्याखालचे लोहार आपल्या लोहारांपेक्षा जास्त चांगले आहेत!"

जणू काही सर्व संपत्ती बुडाली अशा विषण्ण नजरेने झूरीता पाण्याकडे टक लावून पहात होता.

मग त्याने डोके वर केले, मिशी खेचली आणि पाय आपटला.

"नाही, असं चालणार नाही!" तो ओरडला. "मी माघार घेणार नाही, तुला पाण्याखालच्या गुंफेत उपाशी ठेवून मारीन! पैशांची पर्वा बाळगणार नाही, पाणबुड्यांना कामाला लावीन, सबंध आखातात जाळी आणि सापळे लावीन, तू माझ्या हातून सुटणार नाहीस!"

तो धाडसी, चिकाटीचा आणि हट्टी होता. पेद्रो झूरीताच्या नसांमधून स्पॅनिश लढवय्यांचे रक्त उगीच वाहात नव्हते. शिवाय लढाईचे कारण लायक होते.

"सागरी सैतान" अमानुष नव्हता, सर्वसामर्थ्यवान प्राणी नव्हता. बाल्ताझार म्हणाला होता त्याप्रमाणे खरोखरीच हाडा-मांसाचा होता. म्हणजे त्याला पकडणे शक्य होते, साखळ्या बांधून घालणे शक्य होते, महासागराच्या तळातून झूरीतासाठी संपत्ती काढायच्या कामाला जुंपणे शक्य होते. "सागरी सैतानाच्या" रक्षणासाठी जरी सागरदेव नेपच्यून उभा राहिला असता, तरी बाल्ताझार त्याला पकडणार आहे.

डॉक्टर साल्वातोर

झूरीताने स्वतःची धमकी अंमलात आणली. आखाताच्या तळाशी त्याने तारांची अनेक भेंडोळी पसरली, सर्व दिशांना जाळी ताणली व सापळे लावले. पण फक्त मासे त्याचे बळी ठरले; "सागरी सैतान" जणू जमिनीत गडप झाला होता. त्याने परत तोंड दाखविले नव्हते अथवा कोणत्याही रीतीने स्वतःचे अस्तित्व जाणवू दिले नव्हते. माणसाळवलेला डोल्फिन निष्कारण दररोज आखातात यायचा, पाण्यात बुड्या मारून फुरफुरायचा, जणू स्वतःच्या आगळ्या मित्राला भटकायला

चलण्याचे निमंत्रण द्यायचा. पण त्याचा मित्र तोंड दाखवायचा नाही आणि डोल्फिन शेवटच्या वेळी रागाने फुरफुरून उघडचा समुद्रात पोहत जायचा.

हवा बिघडली. पूर्वेच्या वाऱ्यांनी महासागराला ढवळले. तळापासून घुसळून वर आलेल्या वाळूमुळे आखाताचे पाणी गढूळ बनले. फेसाळ लाटांमुळे तळ दिसेना. पाण्याखाली काय चालले होते हे पाहणे कुणालाही शक्य नव्हते.

फेसाळणाऱ्या लाटांकडे पहात झूरीता तासचे तास किनाऱ्यावर उभा रहात होता. लाटा एकीहून एक मोठ्या होत्या, फुटताना प्रचंड आवाज करीत होत्या, पाण्याचा खालचा थर फूत्कारत वाळूवरून, गोटयांवरून व शिंपल्यांवरून धावत होता, झूरीताच्या पायांपाशी गडगडत जात होता.

"नाही, असं चालायचं नाही," झूरीता म्हणाला. "दुसरा मार्ग शोधला पाहिजे. "सैतान" समुद्राच्या तळाशी राहतोय आणि स्वतःच्या गुंफेतून बाहेर येण्याची त्याची इच्छा नाही. म्हणजे त्याला पकडायचं असेल, तर आपणच समुद्राच्या तळाशी त्याच्यापर्यंत गेलं पाहिजे. अगदी स्पष्ट आहे!" आणि नवा अवघड सापळा बनविणाऱ्या बाल्ताझारकडे वळून झूरीता म्हणाला:

"ताबडतोब ब्यूनोस-आयर्सला जा आणि प्राणवायूच्या साठ्यांच्या नळकांड्यांसह दोन पाणबुडे पोषाख तिथून घेऊन ये. रबरी नळ्यांचे साधे पोषाख चालणार नाहीत. "सैतान" नळी कापू शकेल. शिवाय, आपल्याला पाण्याखाली छोटी सफर करावी लागण्याची शक्यता आहे. विजेच्या बरोबर घ्यायला विसरू नको."

"सैतानाकडं" पाहुणे म्हणून जाण्याची तुमची इच्छा आहे?" बाल्ताझारने विचारले.

"अर्थात तुझ्याबरोबर, मित्रा!"

बाल्ताझारने डोके झुकविले आणि तो प्रवासाला निघाला.

त्याने केवळ पाणबुड्यांचे पोषाख व विजेऱ्या आणल्या नाहीत, तर दोन बाकदार लांब पात्यांचे ब्राँझचे सुरेही आणले.

"आता असले सुरे कुणी बनवू शकत नाहीत," तो म्हणाला. "आराऊकानांच्या ह्या प्राचीन सुऱ्यांनी माझे पूर्वज तुमच्या पूर्वजांचे कोथळे बाहेर काढत होते. मात्र माझ्या बोलण्याचा राग मानू नका."

झूरीताला हे ऐतिहासिक सत्य आवडले नाही, पण सुरे मात्र आवडले.

"तू खूप दूरदर्शी आहेस, बाल्ताझार."

दुसऱ्या दिवशी पहाटेच्या वेळी जोरदार लाटा उसळत असूनही, झूरीताने व बाल्ताझारने पाणबुडे पोषाख चढविले आणि समुद्राच्या तळाशी त्यांनी बुड्या मारल्या. त्यांनीच ताणून लावलेल्या जाळ्यांमधून वाट काढत गुंफेच्या तोंडापाशी पोहोचण्यात त्यांना खूप अडचणी आल्या. शेवटी ते गुंफेच्या तोंडातून अरुंद रस्त्यात घुसले. पूर्ण अंधाराने त्यांना वेढले होते. ते पायांवर उभे राहिले, त्यांनी सुरे उपसले आणि विजेऱ्या पेटविल्या. प्रकाशाला घाबरून छोट्या मासोळ्या प्रथम दूर एका बाजूला धावल्या आणि मग विजेऱ्याच्या निळसर किरणांकडे कीटकांच्या झुंडींप्रमाणे तुटून पडल्या.

झूरीताने त्यांना हाताने दूर लोटले. त्यांच्या खवल्यांच्या चमकण्यामुळे त्याला दिसेनासे झाले होते. ती खूप मोठी गुंफा होती: उंची किमान चार मीटर आणि रुंदी पाच-सहा मीटर. पाणबुड्यांनी कोपरे न्याहाळले. गुंफा मोकळी होती, तिच्यात कुणाचे वास्तव्य दिसत नव्हते. फक्त समुद्र खवळल्यानंतर छोटे-मोठे मासे इथे लाटांपासून आणि हिंस्त्र माशांपासून आसरा घ्यायला येत असावेत.

सावधपणे पावले टाकीत झूरीता व बाल्ताझार पुढे

सरकले. गुंफा हळूहळू अरुंद होत गेली. झूरीता एकदम आश्चर्याने थबकला. वाट अडविणारी जाडजूड सळयांची जाळी विजेरीच्या प्रकाशात उजळली.

झूरीताचा स्वतःच्या डोळयांवर विश्वास बसेना. त्याने हाताने लोखंडी सळई पकडली व लोखंडी जाळी उघडण्याच्या हेतूने गदगदा सळई हलविण्याचा तो प्रयत्न करू लागला. पण जाळी भक्कम होती. विजेरीच्या प्रकाशात बारकाईने पाहिल्यानंतर झूरीताच्या ध्यानात आले की, गुंफेच्या तासलेल्या भिंतीमध्ये जाळी गच्च बसविलेली होती व आतल्या बाजूने तिला कुलूप होते.

हे नवे कोडे होते.

"सागरी सैतान" केवळ बुद्धिमानच नव्हता, तर असाधारण गुणवत्ता लाभलेला प्राणी होता. तो डोल्फिनला माणसाळवू शकला होता, धातूकाम त्याला उत्तम येत होते. शिवाय, त्याच्या घराचे रक्षण करू शकतील अशा लोखंडी जाळयांचे अडथळे समुद्रतळाशी तो उभारू शकला होता. ह्या सगळया गोष्टींवर विश्वास ठेवणे अवघड होते! पाण्याखाली लोखंड घडवणे त्याला कसे शक्य होते. म्हणजे तो पाण्यात रहात नव्हता किंवा निदानपक्षी पाण्यामधून काही काळपर्यंत जमिनीवर येत होता.

जणू प्राणवायूचा पुरवठा कमी पडत होता अशा रीतीने झूरीताच्या कानशीलांमध्ये ठणका बसत होत्या. वस्तुतः अवघी काही मिनिटेच तो पाण्याखाली होता.

झूरीताने बाल्ताझारला खूण केली व पाण्याखालील गुंफेतून ते बाहेर पडले. आता तेथे आणखी काही त्यांना करण्यासारखे उरले नव्हते. ते पाण्यावरती आले.

पाणबुडे सुखरूप परतल्याचे पाहून अधीरपणे त्यांची वाट पाहणारे आराऊकान खूप आनंदले.

शिरस्त्राण काढून धापा टाकीत झूरीताने विचारले: "आता तुझं काय म्हणणं आहे, बाल्ताझार?"

बाल्ताझारने हात झटकत म्हटले:

"आपल्याला इथं खूप काळपर्यंत वाट पहात बसावं लागणार. "सैतान" बहुधा मासे खाऊन जगतो आणि मासे तेथे भरपूर आहेत. त्याची उपासमार करून आपण त्याला गुंफेबाहेर काढू शकणार नाही. लोखंडी जाळी सुरुंग लावूनच तोडावी लागणार."

"अरे बाल्ताझार, गुंफेला दोन दारं आहेत असं तुला वाटत नाही? एक आखाताच्या बाजूनं आणि दुसरं – जमिनी-वरती?"

बाल्ताझारने ह्याबाबत विचार केला नव्हता.

"विचार करण्यासारखा आहे. आसपासच्या प्रदेशाची टेहळणी करण्याची कल्पना आपल्याला यापूर्वी कशी काय सुचली नाही?" झूरीता म्हणाला.

आता त्यांनी किनाऱ्याची पाहणी सुरू केली.

किनाऱ्यावर जमिनीच्या एका प्रचंड तुकड्याभोवती पांढ-ऱ्या दगडांच्या उंच भिंतीचे कुंपण घातलेले झूरीताला आढळले. निदान दहा हेक्टर प्रदेशाभोवती ते कुंपण होते. झूरीता भिंतीलगत चालू लागला. सबंध भिंतीला फक्त एकच फाटक होते. जाडजूड लोखंडी पत्र्यांचे ते फाटक होते. फाटकामध्ये एक छोटे लोखंडी दार होते व त्यावर आतून बंद केलेले भोक होते.

"अस्सल तुरुंग किंवा किल्ला," झूरीताच्या मनात विचार आला. "आश्चर्य आहे. शेतकरी अशा जाडजूड आणि उंच भिंती बांधत नाहीत. आत डोकावून पाहता येईल अशा फटीसुद्धा भिंतीला नाहीत."

सभोवार निर्जन प्रदेश होता. फक्त राखी बोडके खडक,

अधूनमधून उगवलेली काटेरी झुडुपे. खाली — आखात.

झूरीता अनेक दिवसपर्यंत भिंतीभोवती फिरत राहिला. लोखंडी फाटकांवर खूप वेळपर्यंत त्याने पाळत ठेवली. पण फाटक उघडले नाही: ना कुणी आत गेले, ना कुणी बाहेर आले; भिंतीपलीकडून एकही आवाज ऐकू आला नाही.

संध्याकाळी 'मेदूझा'च्या डेकवर परतल्यानंतर झूरीताने बाल्ताझारला बोलावून विचारले:

"आखातावरच्या किल्ल्यात कोण राहतं, तुला माहीत आहे?"

"माहीत आहे. याबद्दल मी आधीच फार्मवर काम करणाऱ्या इंडियनांना विचारलंय. तिथं साल्वातोर राहतो."

"कोण आहे हा साल्वातोर?"

"देव," बाल्ताझार उत्तरला.

झूरीताने आश्चर्याने आपल्या काळ्या दाट भुवया उंचावल्या.

"तू थट्टा करतोस, बाल्ताझार?"

इंडियनाने किंचित स्मित केले.

"जे मी ऐकलं, तेच बोलतोय. अनेक इंडियन साल्वातोरला देव मानतात, रक्षणकर्ता मानतात."

"कशापासून तो त्यांचं रक्षण करतो?"

"मृत्यूपासून. तो सर्वसामर्थ्यवान आहे असं ते म्हणतात. साल्वातोर चमत्कार घडवू शकतो. त्याच्या हाती जीवन आणि मृत्यू आहेत. लंगड्यांना तो नवे पाय देतो, जिवंत पाय देतो, आंधळ्यांना दृष्टी देतो, अगदी गरुडासारखे डोळे देतो आणि मेलेल्यांना पुनर्जन्म देतो!"

"च्यायला!" भरघोस मिशांना वरती पीळ घालत झूरीता उद्‌गारला. "आखातात "सागरी राक्षस", तर आखातावरती "देव"! हा "सैतान" आणि हा "देव"

एकमेकांना मदत करत असतील, असं तुला वाटत नाही, बाल्ताझार?"

"मला वाटतं, ह्या सगळ्या चमत्कारांमुळं नासल्या दुधाप्रमाणं आपले मेंदू कुजायच्या आत लौकरात लौकर इथून आपण काढता पाय घेणं शहाणपणाचं ठरेल!"

"साल्वातोरनं बऱ्या केलेल्या माणसांपैकी तू कुणाला भेटला आहेस?"

"होय, भेटलोय. पाय मोडलेला एक माणूस मला दाखवण्यात आला. साल्वातोरकडं उपचार घेतल्यानंतर हा माणूस काळवीटासारखा धावतोय. साल्वातोरनं पुनर्जन्म दिलेल्या आणखी एका इंडियनाला मी भेटलोय. सगळं खेडं बोलतंय – ह्या इंडियनाला साल्वातोरकडं नेलं तेव्हा तो थंडगार प्रेत होता – कवटी फुटलेली, मेंदू बाहेर लोंबत होता. पण साल्वातोरकडून तो जिवंत आणि उल्हासी बनून परतला. मृत्यूनंतर त्यानं लग्न केलं. छान पोरीशी लग्न केलं. शिवाय इंडियनांची पोरं मी पाहिलीत..."

"म्हणजे साल्वातोर स्वतःच्या घरात परक्या लोकांना घेतो?"

"फक्त इंडियनांना. सगळ्या दिशांनी ते त्याच्यापाशी येतात. आगीच्या प्रदेशापासून, ॲमेझॉनपासून, आताकामी वाळवंटापासून आणि आसूनसोनापासून.

बाल्ताझारकडून ही माहिती ऐकल्यानंतर झूरीताने ब्यूनोस-आयर्सला जाण्याचे ठरविले.

तेथेही त्याला समजले की, साल्वातोर इंडियनांवर उपचार करीत आहे आणि चमत्कार करणारा म्हणून इंडियनांमध्ये त्यांची ख्याती आहे. डॉक्टरांकडे झूरीताने चौकशी केली तेव्हा त्याला सांगण्यात आले की, साल्वातोर एक अत्यंत निष्णात शल्यविशारद आहे, पण अशी गुणी माणसे बहुधा

विचित्र असतात, तसे ते माणूस म्हणून विचित्र आहे. नव्या आणि जुन्या जगांमध्ये शास्त्रीय वर्तुळांमध्ये साल्वातोरांचे नाव सुप्रसिद्ध होते. अत्यंत धाडसी शास्त्रक्रियांबद्दल अमेरिकेत त्यांची ख्याती पसरली होती. रुग्णांची परिस्थिती जेव्हा पूर्ण निराशाजनक असे आणि डॉक्टर जेव्हा शस्त्रक्रिया करण्यास नकार देत, तेव्हा साल्वातोरना बोलाविण्यात येई. त्यांनी कधीही नकार दिला नव्हता. त्यांचे धाडसीपणा व कल्पकपणा असीम होते. साम्राज्यवादी युद्धाच्या वेळी ते फ्रेंच आघाडीवर होते व केवळ मेंदूवरच्या शस्त्रक्रिया त्यांनी केल्या होत्या. अनेक हजार लोकांना त्यांनी जीवदान दिले होते. तह झाल्यानंतर ते मायभूमीला, आर्जेंटिनाला परतले होते. डॉक्टरी प्रॅक्टिस आणि जमीनविषयक यशस्वी उद्योगांमुळे माल्वातोर अफाट श्रीमंत बनले. ब्यूनोस-आयर्सपासून जवळच त्यांनी जमिनीचा खूप मोठा प्लॉट खरेदी केली, त्याभोवती प्रचंड भिंत उभारली – त्यांच्या विचित्रपणाचा हा एक नमुना – आणि तेथे स्थायिक झाल्यावर डॉक्टरी बंद केली. स्वतःच्या प्रयोगशाळेत शास्त्रीय कामात त्यांनी पूर्णतः गुंतवून घेतले. आता फक्त इंडियनांवर ते उपचार करीत व पृथ्वीवर उतर-लेला देव अशी त्यांच्याबद्दल इंडियनांची समजूत झाली होती.

साल्वातोर यांच्या आयुष्याबाबतचा आणखी एक तपशील झूरीताला माहीत झाला होता. आत्ता साल्वातोर यांची जेथे प्रचंड इस्टेट होती, त्याच जागी युद्धापूर्वी त्यांचे बागे-मकट छोटे घर होते व त्याभोवतीसुद्धा दगडी भिंत होती. जोवर साल्वातोर युद्धआघाडीवर होते, तोवर सारा वेळ एक नीग्रो व काही प्रचंड कुत्रे त्या घराची राखण करीत होते. ह्या निष्ठावंत पहारेकऱ्यांनी एकाही माणसाला घरा-च्या आवारात येऊ दिले नव्हते.

अलीकडील काळात साल्वातोर ह्यांचे जीवन अधिकच

गूढ बनले होते. विद्यापीठातील जुन्या सहकाऱ्यांचीसुद्धा भेट घेण्यास त्यांनी नकार दिला होता.

ही सर्व माहिती कळल्यानंतर झूरीताने ठरविले :

"जर साल्वातोर डॉक्टर असतील, तर आजाऱ्याला प्रवेश देण्यास ते नकार देणार नाहीत. मग मीच का आजारी पडू नये? आजाऱ्याचे सोंग घेऊन मी साल्वातोरांच्या आवारात प्रथम घुसेन, मग पुढे काय ते ठरवू!"

साल्वातोरांच्या इस्टेटीची राखण करणाऱ्या लोखंडी फाटकाकडे झूरीता गेला व दार ठोठावू लागला. खूप वेळपर्यंत तो चिकाटीने ठोठावत राहिला, पण त्याला कुणीही दार उघडले नाही. चिडून झूरीताने एक मोठा दगड उचलला आणि दारावर जोरजोराने दगड आपटायला आरंभ केला. मेलेली माणसेसुद्धा जागी झाली असती एवढा गोंगाट त्याने निर्माण केला.

भिंतीपासून दूरवर कुत्री भुंकू लागली व शेवटी दारावरच्या भोकाची झडप बाजूला सरकली.

"काय पाहिजे?" कुणीतरी मोडक्या स्पॅनिश भाषेत विचारले.

"आजारी आहे, लौकर दार उघडा," झूरीता उत्तरला.

"आजारी माणसं असं दार ठोठावत नाहीत," तोच आवाज शांतपणे म्हणाला व भोकाशी कुणाचा तरी डोळा दिसला. "डॉक्टर भेटत नाहीत."

"आजाऱ्याला मदत नाकारायचं धाडस ते करणार नाहीत," झूरीता संतापून म्हणाला.

भोकावर झडप बंद झाली, पावले दूर गेल्याचा आवाज झाला. केवळ कुत्र्यांचे भुंकणे चालू राहिले.

झूरीताने शिव्यांची मनसोक्त लाखोली वाहिली व दुकाठी गलबतावर तो परतला.

ब्यूनोस-आयर्समध्ये साल्वातोरविरुद्ध तक्रार नोंदवायची? पण त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. झूरीता संतापाने फणफणला. त्याच्या भरघोस काळया मिशा गंभीर धोक्यात आल्या होत्या, कारण मानसिक क्षोभाच्या भरात दर मिनिटाला तो मिशा खेचत होता आणि कमी दाब दाखविणाऱ्या भारमापकातील काट्याप्रमाणे त्याच्या मिशा खाली झुकल्या होत्या.

तो थोडासा शांत झाला व पुढे काय करावे ह्याबद्दल विचार करू लागला.

जोवर तो विचार करीत होता, तोवर उन्हात रापलेली त्याची बोटे वारंवार त्याच्या मिशांना वरती खेचत होती. भारमापक वर चढला.

शेवटी तो डेकवर गेला आणि नांगर उचलण्याची सर्वांना अनपेक्षित अशी आज्ञा त्याने केली.

'मेदूझा' ब्यूनोस-आयर्सकडे निघाले.

"छान," बाल्ताझार म्हणाला. "किती काळ निष्कारण खर्च झाला. ह्या "सैतानाचा" त्या "देवासकट" नायनाट होवो!"

आजारी नात

सूर्य रागाने तळपत होता. गव्हाच्या, मक्याच्या आणि ओटच्या शेतांमधून जाणाऱ्या धुळकट रस्त्यावरून फाटक्या कपड्यांमधील रोड चेहऱ्याचा एक म्हातारा इंडियन चालत होता. त्याच्या हातांवर आजारी मूल होते व उन्हाचा तडाखा बसू नये म्हणून मुलाच्या अंगावर त्याने जीर्ण पांघरूण पांघरले होते. मुलाचे डोळे अर्धवट मिटलेले होते. मानेवर प्रचंड

गाठ सुजलेली होती. अधूनमधून म्हातारा ठेचकाळायचा, तेव्हा मूल खोकायचे, कण्हायचे आणि पापण्या उघडायचे. म्हातारा थांबायचा, मुलाला तजेला यावा म्हणून तोंडावर फुंकरी मारायचा.

"तिथपर्यंत जिवंत नेलं म्हणजे मिळवली!" पावलांचा वेग वाढवीत म्हातारा पुटपुटला.

लोखंडी फाटकापाशी पोहोचल्यानंतर इंडियनाने मुलाला डाव्या हातावर पेलले आणि उजव्या हाताने चार वेळा दार ठोठावले.

भोकावरची झडप उघडली, कुणाचातरी डोळा क्षणभर दिसला, कडी खडखडली आणि छोटे दार उघडले.

इंडियनाने भीत भीत आत पाऊल टाकले. त्याच्यासमोर पांढऱ्या झग्यातील संपूर्ण शुभ्र केसांचा म्हातारा नीग्रो उभा होता.

"डॉक्टरांना भेटायचंय, मूल आजारी आहे," इंडियन म्हणाला.

नीग्रोने मूकपणे मान हलविली, दार बंद केले आणि स्वत:मागोमाग येण्याची इंडियनाला खूण केली.

इंडियनाने भोवती न्याहाळून पाहिले. भक्कम फरशा दगड बसविलेल्या छोट्या आवारात ते होते. ह्या आवाराचे एक टोक उंच भिंतीच्या कुंपणाला टेकले होते व दुसरे टोक सखल भिंतीशी पोचले होते—त्या सखल भिंतीपलिकडे इस्टेटीचा आतील भाग होता. ना गवत, ना हिरवे झुडूप—अस्सल तुरुंगाचे आवार. त्याच्या एका कोपऱ्याला दुसऱ्या भिंतीच्या फाटकापाशी मोठ्या, रुंद खिडक्यांचे पांढरे घर उभे होते. घरापाशी जमिनीवर इंडियन बसले होते—स्त्रिया व पुरुष. अनेकांपाशी मुले होती.

बहुतेक मुले पूर्ण निरोगी दिसत होती. काही मुले शिंपले

खेळत होती, काही मुले आवाज न करता कुस्ती करीत होती. मुलांनी गोंगाट करू नये याबद्दल पांढऱ्या केसांचा म्हातारा नीग्रो कडक नजर ठेवून होता.

म्हातारा इंडियन घराच्या सावलीत लीनपणे बसला व मुलाच्या निश्चल, निळसर चेहऱ्यावर फुंकरी मारू लागला. इंडियनाशेजारी पाय सुजलेली एक इंडियन म्हातारी बसली होती. इंडियनाच्या मांडयांवर निजलेल्या मुलाकडे पहात तिने विचारले :

"मुलगी ?"

"नात," इंडियन उत्तरला.

डोके हलवीत म्हातारी म्हणाली :

"तुझ्या नातीत दलदलीतलं भूत शिरलंय. पण **तो** सगळ्या दुष्ट भुतांपेक्षा जास्त भक्कम आहे. **तो** दलदलीतल्या भुताला हाकलून लावील आणि तुझी नात ठणठणीत होईल."

इंडियनाने होकारार्थी डोके हलविले.

पांढऱ्या झग्यातील नीग्रो आजाऱ्यांपाशी आला, इंडियनाच्या मुलाकडे त्याने पाहिले व घराच्या दाराकडे खूण केली.

दगडी फरशी बसविलेल्या एका मोठया खोलीत इंडियन गेला. खोलीच्या मध्यभागी पांढरी चादर पसरलेले एक अरुंद लांबोडे टेबल होते. धुरकट काचांचे दुसरे दार उघडले गेले आणि पांढऱ्या झग्यातील, उंचेपुरे, रुंद खांद्यांचे, काळसर वर्णाचे डॉक्टर साल्वातोर खोलीत आले. काळया भुवया आणि पापण्या वगळता साल्वातोरांच्या डोक्यावर एकही केस नव्हता. बहुधा ते नेहमी डोके तासत होते, कारण चेहऱ्यावरील त्वचेप्रमाणेच त्यांची डोक्यावरील कातडीसुद्धा उन्हात रापलेली दिसत होती. मोठे बाकदार नाक, टोकदार हनुवटी आणि घट्ट मिटलेल्या ओठांमुळे त्यांचा चेहरा क्रूर व काहीसा हिंस्र भासत होता. तपकिरी डोळे थंडपणे पहात होते. त्या नजरे-

खाली इंडियन अस्वस्थ बनला.

इंडियनाने झुकून नमस्कार केला व मुलाला पुढे धरले. साल्वातोरनी पटकन, ठामपणे, पण त्याचवेळी हळुवारपणे आजारी मुलीला इंडियनाच्या हातातून घेतले, मुलीच्या अंगाभोवती गुंडाळलेली फडकी उलगडली, त्यांना खोलीच्या कोपऱ्यात उभ्या केलेल्या खोक्यात अलगद फेकून दिले. त्या फडक्यांना उचलून घेण्यासाठी इंडियन खोक्याच्या दिशेने झुकला, पण साल्वातोरनी कडकपणे त्याला थोपविले:

"थांब, हात लावू नको!"

नंतर त्यांनी मुलीला टेबलावर निजविले आणि तिच्यावर ते झुकले. इंडियनाला आता ते तिरपे दिसत होते. त्याला एकदम भास झाला की, हा डॉक्टर नव्हे, तर छोट्या पाखरावर झुकलेला हिंस्र पक्षी आहे. मुलीच्या गळ्यावरील गाठीला साल्वातोर चाचपून पाहू लागले. ती बोटेसुद्धा इंडियनाला चकित करून गेली. ती लांबसडक, आगळी चपळ बोटे होती. केवळ खालीच नव्हे, तर वरतीसुद्धा ती बोटे वाकू शकत होती असे भासले. एरवी निर्भय असणारा इंडियन ह्या गूढ माणसाने त्याच्या मनात निर्माण केलेली भीती झटकून टाकण्याचा प्रयत्न करू लागला.

"छान. उत्तम," गाठीवर जणू खूष होत व बोटांनी तिला चाचपून पहात साल्वातोर म्हणाले.

तपासणी पूर्ण झाल्यानंतर इंडियनाकडे तोंड वळवून साल्वातोर म्हणाले:

"आत्ता बीजेचा चंद्र आहे. एक महिन्यानंतर पुढच्या बीजेच्या चंद्राला ये आणि तुला ही मुलगी ठणठणीत बरी झालेली मिळेल."

त्यांनी मुलीला काचेच्या दारापलिकडे नेले. तेथे न्हाणीघर होते, शस्त्रक्रियेची खोली होती व आजाऱ्यांचे वॉर्ड होते.

नीग्रोने एव्हाना स्वागतकक्षात नवी रुग्ण आणली होती— पाय सुजलेली म्हातारी.

साल्वातोरांपाठी बंद झालेल्या काचेच्या दाराला इंडियनाने झुकून नमस्कार केला व तो बाहेर पडला.

बरोब्बर अठ्ठावीस दिवसांनंतर तेच काचेचे दार उघडले.

दारामध्ये नवा फ्रॉक घातलेली, निरोगी, गुलाबी गालांची मुलगी उभी होती. आजोबाकडे ती घाबरून दृष्टिक्षेप टाकत होती. इंडियन तिच्यापाशी धावला, त्याने तिला हातांमध्ये धरले, तिच्या पाप्या घेतल्या, तिचा गळा निरखून पाहिला. गाठीच्या जागी काहीही खूण उरली नव्हती. फक्त एक बारीक, लक्षात न येणारा तांबूस वण शस्त्रक्रियेची आठवण करून देत होता.

मुलीने त्याला दूर ढकलले व आजोबाने जेव्हा पाप्या घेतल्या तेव्हा त्याची हनुवटीवर वाढलेली दाढी टोचल्यामुळे ती किंचाळली. तेव्हा तिला फरशीवर सोडणे म्हाताऱ्याला भाग पडले. मुलीपाठोपाठ साल्वातोर आले. आता डॉक्टरांनी स्मितसुद्धा केले व मुलीच्या डोक्यावर थोपटत ते म्हणाले:

"घे तुझी मुलगी. अगदी वेळेवर इथं आणलंस. आणखी थोडया तासांचा उशीर झाला असता, तर तिला जगवणं मलासुद्धा अशक्य होतं."

म्हाताऱ्या इंडियनाचा चेहरा सुरकुत्यांनी झाकोळला, त्याचे ओठ थरथरू लागले, त्याच्या डोळयांमधून आसवे वाहू लागली. त्याने पुन्हा मुलीला उचलले, छातीशी गच्च आवळले, साल्वातोरांसमोर तो गुडघे टेकून बसला आणि कापऱ्या आवाजात म्हणाला:

"तुम्ही माझ्या नातीचा जीव वाचवलात. हा गरीब इंडियन स्वतःच्या आयुष्याशिवाय दुसरा कोणता मोबदला तुम्हाला देऊ शकेल?"

"मला कशाला पाहिजे तुझं आयुष्य?" साल्वातोरनी आश्चर्याने विचारले.

"मी म्हातारा आहे, पण अजून बळकट आहे," फरशीवरून न उठता इंडियन पुढे बोलू लागला. "नातीला तिच्या आईकडं, माझ्या मुलीकडं घेऊन जातो आणि तुमच्यापाशी परत येतो. तुम्ही माझ्यावर जे उपकार केलेत त्याच्या मोबदल्यात मी माझं उरलेलं आयुष्य तुमच्या पायांवर वाहतो. कुत्र्यासारखी प्रामाणिकपणं मी तुमची सेवा करीन. विनंती करतो, कृपा करून नकार देऊ नका."

साल्वातोर विचारात पडले.

नव्या नोकरांना ते अनिच्छेने आणि सावधपणे स्वीकारीत. वस्तुतः काम भरपूर होते. जिमला बागेची व्यवस्था पाहणे झेपत नव्हते. हा इंडियन उपयोगी पडला असता, पण त्यापेक्षा नीग्रोला घेणे डॉक्टरनी जास्त पसंत केले असते.

"तू तुझ्या आयुष्याचं मला दान करतो आहेस आणि हे दान मी स्वीकारावं अशी विनंती करतो आहेस. छान. तुझ्या मनाप्रमाणं होवो. केव्हा तू येऊ शकशील?"

"अष्टमीच्या आत येतो," साल्वातोरांच्या झग्याच्या किनारीचे चुंबन घेत इंडियन म्हणाला.

"काय तुझं नाव?"

"माझं?.. क्रिस्तो – ख्रिस्तोफर."

"जा क्रिस्तो. मी तुझी वाट पाहीन."

"चल, नाती!" क्रिस्तो मुलीकडे वळला व परत त्याने तिला हातांवर उचलले. मुलगी रडू लागली. क्रिस्तो तेथून लगबगीने निघाला.

अद्‌भुत बाग

जेव्हा क्रिस्तो एक आठवड्यानंतर उगवला, तेव्हा डॉक्टर माल्वातोरनी त्याच्या डोळयांमध्ये रोखून पहात म्हटले:

"नीट लक्ष देऊन ऐक, क्रिस्तो. मी तुला नोकरीवर ठेवतोय... तुला जेवण आणि चांगला पगार मिळेल..."

क्रिस्तो हात झटकून म्हणाला:

"मला काहीही नको. फक्त तुमची सेवा करू द्या."

"चूप रहा आणि ऐक तुला सर्व काही मिळेल. पण एका अटीवर: इथं जे काही बघशील त्याबद्दल कुठेही तोंडातून चकार शब्द काढायचा नाही."

"जर मी तोंडातून एक शब्द काढला, तर माझी जीभ कापून कुत्र्यांसमोर फेकीन."

"खबरदारी घे आणि तसलं दुर्दैव स्वतःवर ओढवून घेऊ नको," साल्वातोरनी ताकीद दिली. पांढऱ्या झग्यातील नीग्रोला बोलावून डॉक्टरनी हुकूम दिला: "ह्याला बागेत घेऊन जा आणि जिमच्या ताब्यात दे."

नीग्रो मुकाट्याने झुकला, पांढऱ्या घरामधून इंडियनाला बरोबर घेऊन निघाला. क्रिस्तोला एव्हाना परिचित झालेल्या आवारामधून घेऊन तो दुसऱ्या भिंतीच्या लोखंडी दारापाशी गेला व त्याने दार ठोठावले.

भिंतीपलिकडून कुत्र्यांचे भुंकणे ऐकू आले, दार करकरले व सावकाशपणे उघडले. नीग्रोने क्रिस्तोला दारामधून बागेत ढकलले, दारापलिकडे उभ्या असलेल्या दुसऱ्या नीग्रोवर घोगरट आवाजात तो काहीतरी ओरडला व निघून गेला.

क्रिस्तो घाबरून भिंतीला बिलगला: गर्जनेसारखा आवाज करीत अंगावर काळे ठिपके असलेले तांबूस-पिवळ्या रंगाचे पशू त्याच्या अंगावर धावून येत होते. जर क्रिस्तोने त्यांना

पाम्पासमध्ये पाहिले असते, तर त्याला ते तात्काळ बिबटे वाघ वाटले असते. पण त्याच्या अंगावर धावणारे पशू कुत्र्यां-प्रमाणे भुंकत होते. कोणती जनावरे तुटून पडत होती ह्याबद्दल आत्ता क्रिस्तोच्या दृष्टीने महत्त्व नव्हते. तो शेजारच्या झाडा-कडे धावला व अनपेक्षित वेगाने फांद्यांवर चढू लागला. नीग्रो चिडलेल्या नागाप्रमाणे कुत्र्यांवर फूत्कारला. कुत्रे ताबडतोब शांत झाले. ते जमिनीवर आडवे झाले, पुढे ताणलेल्या पंजांवर डोकी ठेवून तिरप्या नजरांनी नीग्रोकडे पाहू लागले.

झाडावर बसलेल्या क्रिस्तोवर ह्यावेळी नीग्रो फूत्कारला आणि इंडियनाला झाडावरून खाली उतरण्याची त्याने हातांनी खूण केली.

"सापासारखा फुसफुस काय करतोस?" स्वतःचा आसरा न सोडता क्रिस्तो म्हणाला. "जीभ गिळून टाकलीस?"

नीग्रोने फक्त रागाने मचमच आवाज केला.

"बहुधा हा मुका आहे," क्रिस्तोच्या मनात विचार आला आणि साल्वातोरांनी दिलेल्या ताकीदीची त्याला आठवण झाली. गुपित फोडणाऱ्या नोकरांच्या जिभा साल्वातोर खरंच कापतात काय? कदाचित ह्या नीग्रोची जीभ कापून टाकलेली असेल... क्रिस्तोला एकदम कमालीची भीती वाटली आणि झाडावरून तो खाली कोसळायच्याच बेतात होता. इथून शक्य तो वेगात लौकरात लौकर पळून जाण्याची त्याला इच्छा झाली. मनातल्या मनात त्याने तो बसला होता ते झाड आणि भिंत यांच्या दरम्यानचे अंतर जोखले. नाही, झाडावरून भिंतीपलिकडे उडी मारणे शक्य नव्हते... पण नीग्रो झाडापाशी आला आणि इंडियनाचा पाय पकडून अधीर-पणे त्याने त्याला खाली खेचले. क्रिस्तोला झाडावरून उतरावे लागले. त्याने झाडावरून खाली उडी टाकली, तोंडावर जास्तीत जास्त चांगले स्मित उमटवले व हात पुढे करून

मित्रत्वाच्या आवाजात विचारले: "जिम ?"

नीग्रोने डोके होकारार्थी हलविले.

क्रिस्तोने नीग्रोचा हात जोरात दाबला. "जर नरकात पडलोच आहे, तर सैतानांबरोबर दोस्ती केलीच पाहिजे," त्याने मनाशी विचार केला आणि मोठ्यांदा पुढे विचारले:

"तू मुका आहेस?"

नीग्रोने उत्तर दिले नाही.

"जीभ नाही?"

नीग्रो पूर्वीप्रमाणेच गप्प राहिला.

"ह्याच्या तोंडात कसं डोकावून पाहता येईल?" क्रिस्तोच्या मनात आले. पण खुणांच्या भाषेत संभाषण करण्याचासुद्धा जिमचा इरादा दिसत नव्हता. त्याने क्रिस्तोचा हात पकडून त्याला तांबड्या-पिवळ्या पशूंपाशी नेले व त्यांना उद्देशून तो काहीतरी फूत्कारला. पशू उठले, क्रिस्तोपाशी गेले, त्याला त्यांनी हुंगले व शांतपणे दूर झाले. क्रिस्तोच्या काळजावरचा भार थोडा कमी झाला.

हात झटकून जिम क्रिस्तोला बाग दाखवायला निघाला.

फरशा दगडाच्या भकास आवारानंतर बागेतील झाडांची व फुलांची रेलचेल थक्क करणारी होती. बाग पूर्वेकडे पसरली होती, टप्प्याटप्प्याने खाली उतरत समुद्रकिनाऱ्याकडे गेली होती. कुटलेल्या तांबूस शिंपल्यांची पखरण केलेल्या वाटा वेगवेगळ्या दिशांना पसरल्या होत्या. वाटांच्या दुतर्फा अद्भुत निवडुंग व निळसर हिरवे रसदार आगावा* वाढले होते,

---

* आगावा – मांसल, रसदार पानांची वनस्पती. तिच्या धाग्यांपासून कापड बनवितात, रसापासून "पूल्के"पेय बनवितात; स्थानिक रहिवाशांचे ते अत्यंत आवडते पेय आहे. (लेखकाची टीप.)

पिवळसर-हिरव्या फुलांचे झुबके डोलत होते. नासपातींच्या आणि ऑलीव फळांच्या झाडांनी रंगीबेरंगी, तेजस्वी फुले पसरलेल्या दाट गवतावर स्वतःच्या सावल्या पांघरल्या होत्या. काठाशी पांढरे दगड बसविलेली तळी हिरव्या गवताच्या मध्यभागी चमकत होती. उंच उडणारी कारंजी हवा ताजी बनवीत होती.

वेगवेगळया पक्ष्यांच्या गाण्यांनी, किलबिलाटांनी आणि पशूंच्या गर्जनांनी बाग पूर्ण भरून गेली होती.

असे विचित्र प्राणी क्रिस्तोने यापूर्वी कधीही पाहिले नव्हते. ह्या बागेत आगळे पशू रहात होते.

तांबूस-हिरवे खवले चमकणारा सहा पायांचा सरडा वाटेवरून धावत गेला. दोन डोक्यांचा साप झाडावरून लोंबत होता. त्या दोन डोक्यांचा, दोन लाल तोंडांनी फूत्कारणाऱ्या सरपटणाऱ्या सापापासून क्रिस्तोने घाबरून दुसऱ्या बाजूला उडी मारली. नीग्रोने सापाला आणखी जोराने फूत्कारून उत्तर दिले व साप हवेत डोक्यांना झटके देऊन झाडावरून खाली पडला आणि दाट झुडुपांमध्ये सळसळत नाहीसा झाला. आणखी एक लांबलचक साप वाटेवरून सरपटत जात होता; त्याला दोन पाय होते. जाळीच्या पिंजऱ्यातील डुकराचे पिलू खुर्रर्र खुर्रर्र ओरडत होते. त्याच्या कपाळाच्या मध्यभागी एकच मोठा डोळा होता व त्या डोळयाने ते क्रिस्तोकडे टक लावून पहात होते.

कुशीला कूस चिकटलेल्या दोन पांढऱ्या घुशी गुलाबी वाटेवरून धावत गेल्या; दोन डोक्यांच्या व आठ पायांच्या राक्षसाप्रमाणे त्या भासल्या. हा दुहेरी प्राणी मधून मधून स्वतःशीच मारामारी करीत होता: उजवी घूस उजवीकडे धावायची, डावी डावीकडे धावायची आणि दोघी नाराजीने कुचकुचायच्या. पण उजव्या घुशीचा नेहमी विजय व्हायचा.

वाटेशेजारच्या गवतात कुशी जोडलेली "सयामी जुळी" चरत होती – सुरेख लोकरीच्या दोन मेंढ्या. त्या घुशींप्रमाणे भांडत नव्हत्या. त्यांच्यात खूप काळापासून संगनमत घडलेले दिसत होते. एका विकृत प्राण्याला पाहून मात्र क्रिस्तो पूर्ण हबकला: प्रचंड, तुळतुळीत शरीराचा गुलाबी कुत्रा. त्याच्या कुत्र्याच्या देहावर पाठीपासून वरचा भाग – छाती, पाय व डोके – छोट्या माकडासारखा भासत होता. कुत्रा क्रिस्तोपाशी येऊन शेपूट हलवू लागला. पण माकड डोके हलवीत होते, हात झटकत होते, पंजांनी कुत्र्याची पाठ थोपटत होते व क्रिस्तोकडे पाहून ओरडत होते. इंडियनाने हात खिशात घातला, साखरेचा तुकडा बाहेर काढला व माकडापुढे धरला. पण क्रिस्तोचा हात कुणीतरी पटकन बाजूला सारला. त्याच्या पाठीशी फूत्कार ऐकू आला. क्रिस्तोने मागे वळून पाहिले – जिम. माकडाला खाऊ घालण्यास मनाई आहे असे म्हाताऱ्या नीग्रोने हातवारे व खुणा करून क्रिस्तोला सांगितले. त्याच क्षणाला छोट्या पोपटाचे डोके असलेल्या चिमणीने उडता उडता क्रिस्तोच्या बोटांमधील साखरेचा तुकडा पळवला व ती झुडुपात अदृश्य झाली. दूरवर कुरणात गायीच्या डोक्याचा घोडा हंबरत होता.

घोड्यांच्या शेपट्या हलवीत दोन लामा मोकळ्या मैदानातून हुंदडत गेले. गवतांमधून, दाट झुडुपांमधून, झाडांच्या फांद्यांवरून क्रिस्तोकडे विचित्र पशु-पक्षी पहात होते: मांजरांची डोकी असलेले कुत्रे, कोंबड्याच्या डोक्याचे गूस पक्षी, शिंगवाली रानटी डुकरे, गरुडाच्या चोचीचे शहामृग, प्यूमाच्या धडाचे बकरे...

क्रिस्तोला वाईट स्वप्न पडल्यासारखे वाटत होते. त्याने डोळे चोळले, कारंजाच्या थंड पाण्यात डोके भिजविले, पण व्यर्थ! पाणसाठ्यांमध्ये माशाचे डोके व कल्ले असलेला

साप त्याने पाहिला; बेडकीच्या पायांचा मासा, सरड्या-सारख्या लांबसडक शरीराचा प्रचंड बेडूक पाहिला...

इथून पळून जाण्याची क्रिस्तोला परत तीव्र इच्छा झाली.

वाळू शिंपडलेल्या एका विस्तीर्ण चौकात जिम क्रिस्तोला घेऊन आला. त्या चौकाच्या मध्यभागी, ताडाच्या झाडांच्या गराड्यात, मूर पद्धतीने बांधलेला शुभ्र संगमरवरी व्हिला उभा होता. ताडांच्या बुंध्यांमधून कमानी व स्तंभ दिसत होते. डोल्फिनच्या आकाराच्या तांब्याच्या कारंजांमधून जल-धारा कोसळत होत्या व खालच्या पारदर्शी पाणसाठ्यात सोनेरी मासे सुळकांड्या मारीत होते. मुख्य प्रवेशद्वाराच्या समोरील सर्वांत मोठे कारंजे डोल्फिनवर बसलेल्या एका तरुणाच्या स्वरूपात होते – तोंडात शिंग धरलेल्या दंतकथेतील त्रितोनसारखा * तो तरुण भासत होता.

व्हिलाच्या पाठीमागे नोकरांसाठी बांधलेली काही घरे होती व आणखी पुढे पांढऱ्या भिंतीपर्यंत काटेरी निवडुंगांचे दाट फड पसरले होते.

"परत भिंत!" क्रिस्तोच्या मनात आले.

जिमने इंडियनाला एक थंडगार छोट्या खोलीत नेले. ही खोली क्रिस्तोसाठी होती असे त्याने खुणांनी सांगितले व क्रिस्तोला एकट्याला सोडून तो निघून गेला.

---

* त्रितोन – ग्रीक पुराणानुसार – सागरी लाटांचा देव. सागरी शंख फुंकून तो समुद्राच्या लाटांना उसळवायचा अथवा शांत करायचा. डोल्फिनवर स्वार झालेल्या अवस्थेत अनेकदा चित्र आढळते. (लेखकाची टीप.)

तिसरी भिंत

हळू हळू क्रिस्तोला त्याच्याभोवतालच्या आगळ्या जगाची सवय झाली. बागेतील सर्व पशु, पक्षी, सरपटणारे प्राणी उत्तम माणसाळवलेले होते. काहींशी तर क्रिस्तोची मैत्री जमली. पहिल्या दिवशी त्याला घाबरवून टाकणारे बिबट्याच्या कातडीचे कुत्रे आता त्याच्या पाठोपाठ फिरू लागले, त्याच्या हातांना चाटू लागले, त्याच्याशी लडिवाळ वागू लागले. लामा त्याच्या हातून पाव घेत. पोपट त्याच्या खांद्यावर येऊन बसत.

जिमप्रमाणेच गप्प राहणारे अथवा मुके असलेले बारा नीग्रो बागेची व पशूंची निगराणी करीत होते. त्यांना आपापसातसुद्धा बोलताना क्रिस्तोने कधी ऐकले नव्हते. प्रत्येक जण मुकाटपणे स्वतःचे काम करीत होता. जिम त्यांचा व्यवस्थापक होता. तो नीग्रोंवर लक्ष ठेवायचा आणि त्यांना कामे नेमून द्यायचा. क्रिस्तोला जिमचा मदतनीस बनविण्यात आले होते व ह्या गोष्टीचे खुद्द क्रिस्तोलाच आश्चर्य वाटत होते. क्रिस्तोला आता फारशी कामे नव्हती व त्याला चांगले खाऊ घालण्यात येत होते. स्वतःच्या आयुष्याबद्दल तो तक्रार करू शकला नसता. फक्त एकच गोष्ट त्याला अस्वस्थ करायची – नीग्रोंचे दडपून टाकणारे मौन. साल्वातोरनी त्या सर्वांच्या जिभा छाटल्या होत्या अशी त्याची खात्री पटली होती. जेव्हा साल्वातोर क्वचित क्रिस्तोला स्वतःकडे बोलावून घेत, तेव्हा प्रत्येक वेळी इंडियनच्या मनात यायचे: "जीभ छाटायला!" पण लौकरच क्रिस्तोची स्वतःच्या जिभेबद्दलची धास्ती कमी होत गेली.

एकदा जिम ऑलीवच्या झाडांखाली झोपलेला क्रिस्तोने

पाहिला. तोंड उघडून नीग्रो उताणा निजला होता. क्रिस्तोने ह्या संधीचा फायदा घेतला; झोपलेल्या जिमच्या तोंडात त्याने सावधपणे डोकावून पाहिले व म्हाताऱ्या नीग्रोची जीभ जागच्या जागी असल्याची त्याची खात्री पटली. तेव्हा इंडियन किंचित शांत झाला.

साल्वातोरनी स्वतःच्या दिवसाचा कार्यक्रम काटेकोर आखला होता. सकाळी सात ते नऊपर्यंत डॉक्टर आजारी इंडियनांना तपासत, नऊ ते अकरा शस्त्रक्रिया करीत, मग स्वतःच्या व्हिलामध्ये जात आणि तेथे प्रयोगशाळेत काम करीत. प्राण्यांवर ते शस्त्रक्रिया करीत, मग खूप काळपर्यंत त्यांचा अभ्यास करीत. जेव्हा त्यांची निरीक्षणे संपत, तेव्हा त्या प्राण्यांना साल्वातोर बागेत पाठवत. घराची स्वच्छता करताना क्रिस्तो कधी कधी प्रयोगशाळेत डोकावायचा. तेथे पाहिलेल्या गोष्टींनी त्याला थक्क केले. तेथे काचेच्या बरण्यांमध्ये कसल्यातरी रसायनांमध्ये वेगवेगळी इंद्रिये स्पंदत होती. कापलेले हात व पाय पुढे जगत होते. जेव्हा हे देहापासून वेगळे झालेले भाग आजारी पडत, तेव्हा साल्वातोर त्यांच्यावर उपचार करीत, विझून जाणाऱ्या जीवनाला परत आयुष्य देत.

ह्या सर्व गोष्टींची क्रिस्तोला धडकी बसली होती. बागेतील विकृत प्राण्यांमध्ये राहणे तो जास्त श्रेयस्कर मानायचा.

साल्वातोरनी इंडियनावर खूप विश्वास टाकला होता, तरी तिसऱ्या भिंतीला ओलांडून जाण्याची क्रिस्तोला हिंमत झाली नव्हती. पण त्याला त्याबाबत खूप कुतूहल होते. एकदा माध्यान्हीच्या प्रहराला सर्वजण विश्रांती घेत होते, तेव्हा त्या उंच भिंतीकडे क्रिस्तो चोरटेपणाने धावला. भिंतीपलिकडे लहान मुलांचे आवाज त्याला ऐकू आले – इंडियन शब्द त्याने ओळखले. पण काही वेळा मुलांच्या आवाजांबरोबर अधिक बारीक आवाजही ऐकू येत होते. जणू ते आवाज

कुठल्यातरी अनोळखी भाषेत मुलांशी वाद घालीत होते.

एकदा बागेत क्रिस्तोशी भेट झाली तेव्हा साल्वातोरनी सवयीनुसार क्रिस्तोच्या डोळयांना डोळे भिडवीत विचारले:

"तू एव्हाना महिनाभर माझ्याकडं काम करतो आहेस, क्रिस्तो, आणि मी तुझ्यावर खूष आहे. खालच्या बागेतला माझा एक नोकर आजारी पडलाय. तू त्याची जागा घे. तिथं तू खूप नव्या गोष्टी पाहशील. पण आपला करार लक्षात ठेव: जर तुला जीभ गमावायची नसेल, तर दातांमध्ये तिला घट्ट धरून ठेव."

"डॉक्टर, तुमच्या मुक्या नोकरांमध्ये राहून मी बोलायलाच विसरलोय," क्रिस्तो उत्तरला.

"ते जास्त छान. मौन – सोनं! जर तू गप्प राहशील तर सोन्याचे खूप पेसो कमावशील. माझ्या आजारी नोकराला दोन आठवडयांच्या अवधीत त्याच्या पायांवर उभा करीन अशी मला आशा आहे. अरे हो, अँडी पर्वताची तुला चांगली माहिती आहे?"

"माझा पर्वतातच जन्म झालाय."

"उत्तम. माझ्या प्राणिसंग्रहालयात नवीन पशुपक्ष्यांची भरती करण्याची माझी इच्छा आहे. मी तुला बरोबर घेऊन जाईन. आता जा. जिम तुला खालच्या बागेत नेईल."

क्रिस्तोला एव्हाना अनेक गोष्टींची सवय झाली होती. पण खालच्या बागेत त्याने जे काही पाहिले, ते त्याच्या कल्पनेपलिकडचे होते.

विस्तीर्ण सूर्यप्रकाशित कुरणावर नागडी मुले व माकडे बागडत होती. वेगवेगळया इंडियन टोळयांमधील लोकांची ही मुले होती. त्या मुलांमध्ये काही अगदी लहान होती – तीन वर्षांपेक्षा जास्त नव्हे, सर्वांत मोठा बारा वर्षांचा होता. ही मुले साल्वातोरांची पेशंट होती. त्यांच्यापैकी अनेक गंभीर

शस्त्रक्रियांमधून पार झाली होती व केवळ साल्वातोरांमुळे ती जिवंत होती. बरी होणारी मुले खेळत होती, बागेत धावत होती व मग जेव्हा त्यांच्या अंगात परत बळ येई, तेव्हा त्यांचे पालक त्यांना घरी घेऊन जात.

मुलांव्यतिरिक्त येथे माकडे रहात होती. बिनशेपटीची माकडे. त्या माकडांच्या अंगावर केसांचा एकही झुपका नव्हता.

सर्वांत आश्चर्य म्हणजे सर्व माकडे थोड्या-फार प्रमाणात बोलायला शिकलेली होती. मुलांशी ती वाद घालत, भांडत, चिरक्या आवाजांमध्ये ओरडत. पण तरीसुद्धा माकडे गुण्यागोविंदाने मुलांबरोबर रहात होती आणि मुले आपापसात भांडतात, त्याहून जास्त भांडत नव्हती.

ही अस्सल माकडे होती अथवा माणसे होती, ह्याचा निर्णय करणे क्रिस्तोला कधी कधी अवघड जायचे.

जेव्हा क्रिस्तोला बागेचा पूर्ण परिचय झाला, तेव्हा त्याच्या ध्यानात आले की, वरच्या बागेपेक्षा ही बाग लहान होती, समुद्राकडे उतरती होत गेली होती व भिंतीसारख्या कड्यापाशी संपली होती.

समुद्र ह्या भिंतीपलिकडे बहुधा फार दूर नव्हता. भिंतीआडून समुद्राची गाज ऐकू यायची.

ह्या कड्याची काही दिवस टेहळणी केल्यानंतर क्रिस्तोची खात्री पटली की, तो कृत्रिम होता. आणखी एक भिंत – चौथी. दाट झुडुपांआड क्रिस्तोने राखी लोखंडी दार शोधून काढले. कड्याच्या भिंतीच्या रंगाशी दाराचा रंग पुरता मिसळून गेलेला होता.

क्रिस्तो कान टवकारून बसला होता. पण कड्याआडून समुद्राच्या गाजेविना एकही आवाज ऐकू येत नव्हता. हे अरुंद दार कोणत्या दिशेला घेऊन जात होते? समुद्रकिनाऱ्याकडे?

अचानक मुलांच्या आरोळ्या उमटल्या. मुले आकाशाकडे पहात होती. क्रिस्तोने वरती पाहिले—एक छोटा लाल फुगा सावकाशपणे बागेवरून तरंगत चालला होता. वारा फुग्याला समुद्राकडे वाहून नेत होता.

बागेवरून उडणाऱ्या त्या साध्या फुग्यामुळे क्रिस्तोच्या मनात मोठी खळबळ माजली. तो अस्वस्थ बनला. आजारातून बरा झालेला नोकर परत येताच क्रिस्तो साल्वातोरांपाशी जाऊन म्हणाला:

"डॉक्टर, लौकरच आपण अँडी पर्वतात जाणार आहोत. कदाचित तिथं बराच काळ मुक्काम करावा लागेल. तोवर मुलीला आणि नातीला भेटून यायची मला परवानगी द्या."

आवारातून नोकरांनी बाहेर गेलेले साल्वातोरना आवडत नसे व एकाकी माणसे नोकरीवर ठेवणे ते जास्त पसंत करीत. साल्वातोरांच्या डोळ्यांकडे टक लावून पहात क्रिस्तो मुकाट उभा होता.

साल्वातोरनी थंड नजरेने क्रिस्तोकडे पहात त्याला आठवण करून दिली:

"आपला करार ध्यानात ठेव. जीभ सांभाळ! जा. तीन दिवसांपेक्षा परतायला जास्त उशीर करू नको. थांब!"

साल्वातोर दुसऱ्या खोलीत गेले व एक नमदी बटवा घेऊन आले. त्यात सोन्याचे पेसो खणखणत होते.

"तुझ्या नातीसाठी आणि तुझ्या मौनासाठी!"

झडप

"जर तो आज आला नाही, तर तुझी मदत मला नको, बाल्ताझार. जास्त हुशार आणि खात्रीच्या माणसांना मी

5–907

बोलावीन," अधीरपणे पिंजारलेल्या मिशा खेचत झूरीता म्हणाला. आता झूरीताने शहरी शुभ्र सूट घातला होता व डोक्यावर पनामा हॅट घातली होती. ब्यूनोस-आयर्सच्या सीमेपाशी जेथे शेतांची हद्द संपत होती व पाम्पास सुरू होत होते, तेथे तो व बाल्ताझार एकमेकांना भेटले होते.

पांढरे पोलके व निळ्या पट्ट्यांची विजार घातलेला बाल्ताझार रस्त्याच्या कडेशी मुकाट बसला होता व विमनस्कपणे उन्हात वाळलेली गवताची पाती उपटत होता.

साल्वातोरकडे स्वतःच्या भावाला – क्रिस्तोला – हेर म्हणून पाठविल्याबद्दल आता त्यालाच पश्चात्ताप वाटू लागला होता.

क्रिस्तो बाल्ताझारपेक्षा दहा वर्षांनी मोठा होता. वयाच्या मानाने क्रिस्तो चपळ आणि बळकट राहिला होता. पाम्पासमधील मांजरासारखा तो धूर्त होता. पण तरीही तो खात्रीशीर माणूस नव्हता. शेती करण्याचा त्याने अनुभव घेतला – त्याला त्यात रस वाटेना. मग बंदरात त्याने दारूचा गुत्ता चालविला. पण मद्याच्या आहारी जाऊन त्याने स्वतःचे दिवाळे वाजविले. गेल्या काही वर्षांत स्वतःच्या खास धूर्तपणाचा वापर करून, विश्वासघातकी वागून, बेकायदेशीर उद्योगांमध्ये क्रिस्तो गुंतला होता. हेरगिरीसाठी असा माणूस योग्य होता, पण त्याच्यावर विश्वास टाकणे शक्य नव्हते. स्वतःच्या फायद्यासाठी सख्ख्या भावाशी द्रोह करायला त्याने मागेपुढे पाहिले नसते. बाल्ताझारला हे ठाऊक होते आणि म्हणून झूरीताएवढाच तोसुद्धा बेचैन होता.

"तू उडवलेला फुगा क्रिस्तोनं पाहिला अशी तुझी खात्री आहे?"

बाल्ताझारने खांदे उडविले. ह्या भानगडीमधून तात्काळ बाहेर पडावे, घरी जाऊन थंडगार पाण्यासह मदिरा प्यावी आणि लौकर झोपावे, असे त्याला सतत वाटत होते.

मावळतीला जाणाऱ्या सूर्याच्या शेवटच्या किरणांनी रस्त्याच्या वळणावर उठलेल्या धुळीच्या लोटाला उजळले. त्याचवेळी एक कर्कश्य शीळ ऐकू आली.

बाल्ताझार खुलला.

"तो आला!"

"अखेर!"

ठाम पावले टाकीत क्रिस्तो त्यांच्यापाशी आला. आता तो केविलवाणा म्हातारा इंडियन दिसत नव्हता. आणखी एकदा शीळ वाजवून क्रिस्तो जवळ आला व बाल्ताझारशी आणि झूरीताशी त्याने हस्तांदोलन केले.

"सागरी सैतानाशी" तुझी ओळख झाली की नाही?" झूरीताने त्याला विचारले.

"अजून नाही, पण तो तिथं आहे. साल्वातोर त्या "सैतानाला" चार भिंतींमागं सांभाळतोय. मुख्य काम पार पडलंय: मी साल्वातोरची चाकरी करतोय आणि तो माझ्यावर विश्वास टाकतोय. आजारी नातीमुळं माझं काम फार सोपं बनलं." स्वत:चे धूर्त डोळे किलकिले करीत क्रिस्तो खो खो हसला. "ती आजारातून बरी झाली तेव्हा ऐनवेळी माझा घात करायच्या बेतात होती. प्रेमळ आजोबाप्रमाणं मी तिला मिठ्या मारतोय, तिच्या पाप्या घेतोय, पण ती कारटी मला दूर झटकू लागली आणि तिनं भोकाड पसरलं." क्रिस्तो परत हसला.

"कुठं मिळवलीस तुझी नात?" झूरीताने विचारले.

"पैसे मिळणं अवघड आहे, पण लहान पोरी सहज मिळनात," क्रिस्तो उत्तरला. "पोरीची आई खूष आहे. तिच्यापासून मला पाच पेसोंच्या नोटा मिळाल्या आणि तिला ठणठणीत बरी झालेली मुलगी मिळाली."

पण साल्वातोरांपासून सोनेरी पेसोंचा भरघोस बटवा

मिळाल्याचे मात्र क्रिस्तोने सांगितले नाही. अर्थात छोट्या मुलीच्या आईला ते पैसे देण्याचा त्याचा मुळीच इरादा नव्हता.

"साल्वातोरपाशी खूप चमत्कार आहेत. अस्सल प्राणि-संग्रहालय." आणि पाहिलेल्या सर्व गोष्टींची माहिती क्रिस्तो सांगू लागला.

"हे सगळं खूप रंजक आहे," सिगार शिलगावीत झूरीता म्हणाला, "पण मुख्य ते तू पाहिलं नाहीस: "सैतान"! क्रिस्तो, तुझा पुढचा बेत काय आहे?"

"पुढं? अँडी पर्वतात छोटी सफर." आणि क्रिस्तोने सांगितले की, जनावरे पकडण्यासाठी साल्वातोर अँडी पर्वतात जाणार आहेत.

"उत्तम!" झूरीता ओरडला. "साल्वातोरची इस्टेट गावा-पासून दूर एकाकी आहे. त्याच्या गैरहजेरीत आपण त्याच्या घरावर धाड घालू आणि "सागरी सैतानाला" पळवून नेऊ!"

क्रिस्तोने नकारार्थी डोके हलविले:

"बिबटे वाघ तुम्हाला फाडून काढतील आणि "सैतानाला" शोधणं तुम्हाला शक्य होणार नाही. त्याला शोधणं अजून मलासुद्धा शक्य झालेलं नाही – तुमची गोष्ट दूरच!"

"तर मग असं करू," विचार करून झूरीता म्हणाला. "जेव्हा साल्वातोर शिकारीला बाहेर पडेल, तेव्हा आपण त्याच्यावर झडप घालू. त्याला कैद करू आणि सुटकेबद्दल खंडणी मागू: "सागरी सैतानाची" मागणी करू!"

झूरीताच्या कुशीमधील खिशातून डोकावणारी सिगार क्रिस्तोने चपळपणे ओढून घेतली.

"धन्यवाद. झडप घालण्याची कल्पना छान! पण साल्वा-तोर फसवेल: खंडणी कबूल करील आणि देणार नाही. हे स्पॅनिश..." क्रिस्तो खोकू लागला.

"तर मग तू काय सुचवतोस?" चिडून झूरीताने विचारले.

"धीर धर, झूरीता. साल्वातोर माझ्यावर विश्वास ठेवतोय, पण फक्त चौथ्या भिंतीपर्यंत. डॉक्टर स्वतःवर विश्वास ठेवतो, तसा त्यानं माझ्यावर विश्वास ठेवला पाहिजे, तेव्हा तो मला "सैतान" दाखवील."

"तर मग?"

"तर मग असं – साल्वातोरवर गुंड झडप घालतील," क्रिस्तोने झूरीताच्या छातीवर बोट खुपसले, "आणि मी," त्याने स्वतःच्या छातीवर हात मारला, "प्रामाणिक आराऊकान त्याचा जीव वाचवीन. त्यानंतर क्रिस्तोला साल्वातोरच्या घरात गुपितं राहणार नाहीत." ("आणि माझ्या बटव्यात सोन्याचे पेसो काठोकाठ भरतील," त्याने मनाशी वाक्य पूर्ण केले.)

"ही कल्पना काही वाईट नाही."

साल्वातोरना कोणत्या रस्त्याने क्रिस्तोने न्यायचे ह्याबद्दल त्यांनी ठरविले.

"आम्ही प्रवासाला निघण्याच्या आदल्या दिवशी मी कुंपणापलिकडून लाल दगड फेकीन. तयारीत रहा."

झडप घालण्याची योजना त्यांनी जरी अगदी काटेकोर आखली होती, तरी एका अनपेक्षित गोष्टीमुळे साराच मामला फिसकटण्याच्या बेतात आला होता.

झूरीता, बाल्ताझार आणि बंदरातून भाडोत्री आणलेले दहा मारेकरी गाऊचोंच्या* पोषाखात आणि उत्तम हत्यारबंद

---

* गाऊचो – पाम्पासमध्ये राहणारे, इंडियन मिश्र वंशाचे अर्धवट रानटी गुराखी टोळीवाले. उत्तम घोडेस्वार. (लेखकाची टीप.)

होऊन साल्वातोरवर झडप घालण्यासाठी घोड्यांवर सज्ज बसून वाट पाहू लागले.

रात्र काळोखी होती. घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकण्याच्या अपेक्षेने घोडेस्वारांनी कान टवकारले होते.

पण जुन्या रीतीप्रमाणे साल्वातोर शिकारीला बाहेर पडणार नाहीत, ह्याची क्रिस्तोला कल्पना नव्हती.

गुंडांना अनपेक्षितपणे वेगाने जवळ येणाऱ्या मोटारीच्या इंजिनाचा आवाज ऐकू आला. टेकडीपलिकडून दोन प्रखर दिव्यांच्या प्रकाशाने त्यांचे डोळे दिपले. काय घडले ह्याचे भान येण्यापूर्वीच घोडेस्वारांच्या जवळून भली मोठी काळी मोटार वेगात निघून गेली.

झूरीताचा रागाने चडफडाट झाला. बाल्ताझारला ह्या गोष्टीची खूप मजा वाटली.

"चिडू नका, पेद्रो," इंडियन म्हणाला. "दिवसा खूप उकडतं, म्हणून ते रात्रीच्या वेळी प्रवास करताहेत. दिवसा ते विश्रांती घेतील. आपण त्यांना गाठू शकू," आणि घोड्याला टाच मारून बाल्ताझार मोटार गेली होती त्या दिशेने दौडू लागला. त्याच्यापाठोपाठ बाकीचे दौडू लागले.

दोन तासांच्या दौडीनंतर घोडेस्वारांना अनपेक्षितपणे दूरवर शेकोटी पेटलेली दिसली.

"तेच आहेत. काहीतरी घडलंय. थांबा, मी हळूच कानोसा घेऊन येतो. माझी वाट बघा."

आणि घोड्यावरून खाली उडी मारून बाल्ताझार सरपटत जाऊ लागला.

तासाभरानंतर तो परतला.

"मोटार बिघडलीय. ते दुरुस्ती करताहेत. क्रिस्तो पहारा देतोय. घाई केली पाहिजे."

बाकीच्या सर्व गोष्टी भराभरा पार पडल्या. गुंडांनी

झडप घातली व साल्वातोरना समजलेसुद्धा नाही की, त्यांचे, क्रिस्तोचे आणि तीन नीग्रोंचे हात-पाय केव्हा बांधण्यात आले.

भाडोत्री गुंडांच्या मुख्याने – झूरीता मुद्दाम अंधारात मागे राहिला होता – साल्वातोरांकडे खंडणी म्हणून खूप मोठ्या रकमेची मागणी केली.

"मी पैसे देईन, मला सोडा," साल्वातोर उत्तरले.

"ही रक्कम तुझ्याबद्दल. पण तुझ्या तीन माणसांसाठी आणखी तेवढीच रक्कम तू दिली पाहिजे!" दरोडेखोराला लोभ सुटला.

"एवढी रक्कम एकदम देणं मला शक्य नाही," थोडा वेळ विचार करून साल्वातोर उत्तरले.

"तर मग ठार मारा ह्याला!" दरोडेखोर किंचाळले.

"जर आमच्या अटी मान्य केल्या नाहीस, तर पहाटे आम्ही तुला ठार मारू," दरोडेखोर म्हणाला.

साल्वातोरनी खांदे उडवून उत्तर दिले:

"तेवढी रक्कम आत्ता माझ्यापाशी नाही."

साल्वातोरांचा शांतपणा पाहून दरोडेखोरसुद्धा थक्क झाले.

हात-पाय बांधलेल्या माणसांना मोटारीच्या मागे टाकून दरोडेखोरांनी मोटारीतील वस्तूंची लुटालूट सुरू केली. त्यांना स्पिरिटचा भरपूर साठा सापडला. स्पिरिट पिऊन ते झिंगले व जमिनीवर लोळू लागले.

पहाटेच्या जरा आधी कुणीतरी साल्वातोरांपाशी सरपटत आले.

"मी आहे," क्रिस्तो हळूच म्हणाला. "पट्टे सोडण्यात मला यश आलं. पहारा देणाऱ्या बंदूकवाल्या दरोडेखोरापाशी मी लपतछपत गेलो आणि त्याला ठार मारलं. बाकीचे झिंगलेत. शोफरनं इंजिन दुरुस्त केलंय. घाई केली पाहिजे."

सगळे भराभर मोटारीत बसले. नीग्रो शोफरने इंजिन

चालू केले आणि घरघराट करीत मोटार रस्त्यावरून धावू लागली.

पाठीमागे आरोळ्या आणि बेबंद गोळीबार ऐकू आले.

साल्वातोरनी क्रिस्तोचा हात घट्ट दाबला.

केवळ साल्वातोर निघून गेल्यानंतर झूरीताला स्वतःच्या दरोडेखोरांकडून समजले की, साल्वातोर खंडणी द्यायला कबूल झाले होते. "ज्याची कुवत माहीत नाही अशी त्या "सागरी सैतानाला" पकडण्याचे खटाटोप करण्यापेक्षा खंडणीची रक्कम घेणं बहुधा जास्त चांगलं ठरलं असतं," झूरीताच्या मनात विचार आला. पण संधी गमावली होती व क्रिस्तोकडून पुढच्या बातमीची वाट पहात बसून राहणे भाग होते.

जलमानव

क्रिस्तोला आशा वाटत होती की, साल्वातोर त्याच्यापाशी येऊन म्हणतील: "क्रिस्तो, तू माझा जीव वाचवलास. आता माझ्या इस्टेटीवर तुझ्यापासून काहीही गुपितं राहणार नाहीत. चल, तुला "सागरी सैतान" दाखवतो."

पण साल्वातोरांचा असे वागण्याचा मुळीच इरादा नव्हता. दरोडेखोरांच्या तावडीतून सोडविल्याबद्दल त्यांनी क्रिस्तोला भरपूर बक्षिसी दिली व स्वतःच्या शास्त्रीय कामांमध्ये ते बुडून गेले.

वेळ न गमावता क्रिस्तो चौथ्या भिंतीचा अभ्यास करू लागला व गुप्त दार शोधू लागला. खूप काळपर्यंत ते दार उघडणे त्याला जमले नाही, पण अखेर त्यात त्याला यश आले. एकदा हे दार चाचपून पहात असताना त्याने दारावरील

एक छोटे बोंड दाबले. एकदम दार उघडले. आगीपासून सुरक्षित असणाऱ्या सेफच्या दाराप्रमाणे ते दार खूप जड व जाडजूड होते. क्रिस्तो पटकन दारामधून पलिकडे गेला व दार त्याच्या पाठी तात्काळ बंद झाले. तो किंचित दचकला. त्याने दार न्याहाळले, त्यावरील बोंडे दाबली, पण दार उघडले नाही.

"मी स्वतःला सापळयात अडकवून घेतलं," क्रिस्तो बडबडला.

पण काही इलाज नव्हता. साल्वातोरांची ही शेवटची अदृश्य बाग न्याहाळून पाहणे बाकी होते.

दाट वनस्पती वाढलेल्या बागेत क्रिस्तो फिरू लागला. संपूर्ण बाग एखाद्या फार मोठ्या नसलेल्या खळग्यासारखी भासत होती. सर्व बाजूंनी बांधलेली उंच भिंत कृत्रिम कड्या-प्रमाणे दिसत होती. केवळ लाटांचाच आवाज येत नव्हता, तर वाळूच्या उथळ तळावरच्या गोट्यांची खळखळही ऐकू येत होती.

दमट मातीत वाढणारी झाडे-झुडुपे येथे होती. सूर्याच्या किरणांपासून उत्तम रक्षण करणाऱ्या मोठ्या झाडांच्या छायां-खाली अनेक झरे झुळझुळत होते. अनेक कारंजांमधून जलतुषार उडत होते व हवेत ओलावा आणत होते. मिसिसिपी नदीच्या खालच्या तीरांवर होता तसा दमटपणा येथे होता. बागेच्या मध्यभागी सपाट छपराचे एक छोटे दगडी घर उभे होते. त्याच्या भिंतींवर शेवाळाचा दाट थर चढलेला होता. खिडक्यां-वर हिरवे पडदे सोडलेले होते. घरात कुणाची वस्ती दिसत नव्हती.

क्रिस्तो बागेच्या टोकापर्यंत गेला. आखातापासून इस्टेटीला अलग करणाऱ्या भिंतीपाशी प्रचंड चौकोनी तलाव होता. दाट झाडांनी वेढलेला तलाव किमान पाचशे चौरस मीटर

क्षेत्रफळाचा होता व त्याची खोली किमान पाच मीटर होती.

क्रिस्तोची चाहूल लागताच कुणीतरी प्राणी झाडांमधून घाबरून धावला आणि तलावात उडी मारून त्याने पाण्याचे तुषार उडविले. क्रिस्तो धडधडत्या काळजाने थांबला. तोच! "सागरी सैतान"! अखेर क्रिस्तो त्याला पाहणार आहे!

इंडियन तलावापाशी आला व पारदर्शी पाण्यात त्याने डोकावून पाहिले.

तलावाच्या तळाशी, मोठ्या फरसबंदी दगडांवर एक मोठे माकड बसले होते. घाबरल्या आणि चौकस डोळ्यांनी ते पाण्याखालून क्रिस्तोकडे पहात होते. क्रिस्तो आश्चर्याच्या धक्क्यातून स्वतःला सावरू शकेना: माकड पाण्याखाली श्वासोच्छ्वास करीत होते. त्याच्या कुशींची खाली-वर हालचाल घडत होती.

आश्चर्याचा धक्का ओसरल्यावर क्रिस्तो नकळत हसू लागला: मच्छीमारांमध्ये घबराट पसरविणारा "सागरी सैतान" म्हणजे जमिनीवर व पाण्यात राहणारे एक माकड होते! "जगात काय काय घडत नाही..." म्हाताऱ्या इंडियनाच्या मनात विचार आला.

क्रिस्तोला आनंद झाला होता: अखेरीस सर्व पाहण्यात त्याला यश आले होते. पण आता त्याचा अपेक्षाभंग झाला होता. ज्यांनी "सागरी राक्षसाला" पाहिले होते, त्यांच्या वर्णनाशी माकडाचे रूप मुळीच जुळत नव्हते. भीती आणि कल्पनांच्या खेळापायी काय घडत नाही?

पण आता परतीचा विचार करणे आवश्यक होते. क्रिस्तो दारापाशी मागे परतला, कुंपणाजवळच्या उंच झाडावर चढला आणि पाय मोडण्याचा धोका पत्करून त्याने उंच भिंतीवरून पलीकडे उडी मारली.

जेमतेम तो पायांवर उभा झाला, तेवढ्यात साल्वातोरांचा

आवाज त्याने ऐकला :

"क्रिस्तो, अरे तू कुठं आहेस?"

क्रिस्तोने पटकन पायवाटेवर पडलेली दाताळी उचलली व वाळकी पाने तो गोळा करू लागला.

"मी इथं आहे."

"चल क्रिस्तो," कड्यावरील गुप्त लोखंडी दारापाशी जात साल्वातोर म्हणाले. "बघ, हे दार असं उघडायचं." आणि एव्हाना क्रिस्तोला माहीत झालेले दारावरील बोंड त्यांनी दाबले.

"डॉक्टरना उशीर झाला, मी एव्हाना "सैतान" पाहि-लाय," क्रिस्तोच्या मनात आले.

साल्वातोर व क्रिस्तो बागेत आले. शेवाळमाखल्या घरा-जवळच्या रस्त्यावरून साल्वातोर तलावाकडे गेले. बुडबुडे सोडत माकड अजून पाण्याखाली बसून होते.

जणू प्रथमच माकडाला पाहिल्याचा बहाणा करीत क्रिस्तो आश्चर्याने चीत्कारला. पण त्यानंतर मात्र खरोखरीच चकित होण्याची त्याच्यावर पाळी आली.

साल्वातोरनी माकडाकडे पूर्ण दुर्लक्ष केले. जणू माकडाने त्यांना अडथळा केला होता अशा रीतीने त्यांनी हात झटकला. माकड त्याचक्षणी पाण्यातून पोहत तलावाच्या काठावर आले, त्याने अंग झटकले व ते झाडावर चढले. साल्वातोर खाली वाकले, त्यांनी गवतात चाचपले व एका छोट्या हिरव्या चकतीला जोरात दाबले. पोकळीत गडगडाट घुमला. तलावा-च्या फरशीच्या कडांच्या झडपा उघडल्या. काही मिनिटांच्या अवधीत तलाव कोरडा बनला. झडपा बंद झाल्या. एका कोपऱ्यातून लोखंडी शिडी सरकत आली. ती तलावाच्या तळाशी घेऊन जाणारी शिडी होती.

"चल, क्रिस्तो."

ते तलावात उतरले. साल्वातोरनी एका फरशीवर पाय ठेवताच नवीन झडप उघडली – तलावाच्या मध्यभागी एक चौरस मीटर रुंदीची. लोखंडी पायऱ्या जमिनीखाली कुठेतरी उतरत गेल्या होत्या.

ह्या भुयारात साल्वातोरांपाठोपाठ क्रिस्तो जात होता. खूप वेळपर्यंत ते चालत होते. वरती झडपेतून फक्त मंद प्रकाश झिरपत होता. पण लौकरच तो नाहीसा झाला. त्यांच्याभोवती अंधाराचा पूर्ण वेढा पडला. ह्या जमिनीखालील कॉरीडॉरमध्ये पावलांचा अंधुक आवाज घुमत होता.

"अडखळू नको, क्रिस्तो, आत्ता आपण पोहचू."

साल्वातोर थांबले व त्यांनी हातांनी भिंत चाचपली. खट्ट आवाज झाला व भोवती झगझगीत उजेड पडला. चुनखडीच्या गुंफेत ते उभे होते. दातांमध्ये कड्या धरलेल्या सिंहांचे चेहरे कोरलेल्या ब्रॉंझचे दार त्यांच्यासमोर होते. साल्वातोरनी एक कडी खेचली. अवजड दार अलगदपणे उघडले व ते दोघे अंधाऱ्या दालनात शिरले. पुन्हा बटणाचा खट्ट आवाज झाला. लांबट गोलाकार दिव्याने प्रशस्त गुंफा उजळून टाकली. गुंफेची एक भिंत काचेची होती. साल्वातोरनी दिवा परत विझविला: गुंफेत अंधार दाटला व काचेच्या भिंतीपलिकडून प्रखर प्रकाशझोत उजळले. हे प्रचंड मस्त्यालय होते. अथवा योग्यपणे सांगायचे तर समुद्राच्या तळाशी काचेचे घर होते. जमिनीमधून पाणवनस्पती व प्रवाळांचे गुच्छ उगवले होते आणि त्यांच्यातून मासोळ्या सुळकांड्या मारीत होत्या. तेवढ्यात झुडुपांआडून प्रचंड डोळ्यांचा व बेडकाच्या पायांचा माणसासारखा एक प्राणी पोहत आल्याचे क्रिस्तोने पाहिले. ह्या अज्ञात प्राण्याच्या अंगावर निळसर-रुपेरी खवले चमकत होते. अत्यंत वेगवान, चपळ हालचाली करीत हा प्राणी काचेच्या भिंतीपाशी पोहत आला, साल्वातोरांना उद्देशून

त्याने डोके झुकविले, काचेच्या खोलीत तो गेला व पाठीशी त्याने दार बंद केले. खोलीतील पाणी भराभरा वाहून गेले. अज्ञात माणसाने दुसरे दार उघडले व तो गुंफेत आला.

"चष्मा आणि हातमोजे काढून टाक," साल्वातोर म्हणाले.

अज्ञात माणसाने आज्ञाधारकपणे चष्मा व हातमोजे काढले आणि एक सडपातळ शरीराचा देखणा तरुण समोर उभा असल्याचे क्रिस्तोला दिसले.

"ओळख करून घ्या: इखतीआन्द्र, माणूस-मासा अथवा जास्त अचूक – जलमानव. हाच "सागरी सैतान," साल्वातोरनी तरुणाची ओळख सांगितली.

तरुणाने स्नेहल स्मित केले, इंडियनासमोर हात धरीत स्पॅनिश भाषेत तो म्हणाला:

"नमस्ते!"

क्रिस्तोने मुकाटपणे तरुणाशी हस्तांदोलन केले. अतिआश्चर्यापायी त्याच्या तोंडून एकही शब्द उमटेना.

"इखतीआन्द्रचा नीग्रो नोकर आजारी पडलाय," साल्वातोर पुढे म्हणाले. "तुला मी काही दिवसांपुरता इखतीआन्द्रपाशी ठेवतो. जर हे नवं काम तुला जमलं, तर तुला कायम इथं ठेवीन."

क्रिस्तोने मुकाटपणे मानेने होकार भरला.

इखतीआन्द्रचा दिवस

अजून रात्र आहे, पण लौकरच पहाट होईल.

हवा उबदार आणि दमट आहे, मॅग्नोलिया, निशिगंध, मिनोन्येट फुलांच्या गोड वासांनी भरली आहे. एकही पान

हलत नाही. नीरव शांतता. इखतीआन्द्र बागेतील वाळूच्या वाटेवरून चालतोय. त्याच्या प्रत्येक पावलाबरोबर त्याच्या कमरेला लटकावलेल्या वस्तू हिंदकळताहेत – कट्यार, चष्मा, हाता-पायांचे मोजे – "बेडकीचे पाय." त्याच्या पावलां-खाली शिंपल्यांची वाळू चुरचुरतेय. वाट जेमतेम दिसतेय. झुडुपांनी व झाडांनी तिच्यावर वेडेवाकडे ठिपके टाकून तिला झाकलेय. पाणसाठ्यांवर धुके उमटतेय. अधूनमधून इखती-आन्द्र एखाद्या फांदीला घासून जातो, त्याच्या केसांना व गरम गालांना दव माखले जाते.

वाट उजवीकडे वळण घेते आणि पुढे उतारावर जाते. हवेत जास्त ताजेपणा व दमटपणा येतो. इखतीआन्द्रला पायांखाली दगडी फरशा जाणवतात, तो पावलांचा वेग मंद करतो, थांबतो. सावकाशपणे जाड काचेचा मोठा चष्मा डोळ्यांवर चढवितो, हाता-पायांवर मोजे घालतो. फुफ्फु-सांमधील हवा बाहेर टाकतो आणि पाण्यात उडी मारतो. पाणी देहाला तजेला आणते, गारवा त्याच्या कल्ल्यांना सुखद टोचणारी संवेदना देतो. कल्ल्यांची तालबद्ध हालचाल सुरू होते – माणसाचे माशात रूपांतर घडले.

हातांच्या काही जोरदार हालचाली करून इखतीआन्द्र पाण्याच्या तळाशी पोहोचला.

पूर्ण अंधारात हा तरुण विश्वासाने पोहतोय. तो हात लांबवून दगडी भिंतीवरील लोखंडी चौकट शोधतो. शेजारी दुसरी, तिसरी चौकट... अशा रीतीने तो बोगद्यापर्यंत जातो, पाण्याने वरपर्यंत भरलेल्या. गार पाण्याचा प्रवाह थेट तळापर्यंत वाहात येतोय. तळाला पायांनी रेटा देऊन तो पोहत वरती येतो – जणू गरम पाण्याच्या हौदात पडल्या-सारखे वाटते. बागांमधील उबदार पाणी बोगद्यावरून उघड्या समुद्रापर्यंत वाहात जाते. आता इखतीआन्द्र प्रवाहाबरोबर

पोहत जाऊ शकतो. छातीवर हातांची घडी घालून तो उताणा होतो व डोके पुढे ठेवून पाण्याबरोबर वाहात जातो.

बोगद्याचा शेवट जवळ आहे. महासागरात प्रवेश करण्याच्या जागेपाशी, खळखळ आवाज करणाऱ्या कड्या-पाशी, समुद्रतळापासून गरम पाण्याच्या झऱ्याचा जोरदार फवारा वर उडतो. त्याच्या जळधारा शिंपल्यांना व गोट्यांना खळखळवतात.

इखतीआन्द्र पालथा होतो व समोर पाहतो. अंधार. हात पुढे ताणतो. पाणी किंचित अधिक ताजे भासते. पंजे लोखंडी जाळीला स्पर्श करतात. तिच्या सळईभोवती मऊ व बुळबुळीत सागरी वनस्पतींचा थर चढला आहे. तरुण ते अवघड कुलूप उघडतो. बोगद्यात जाण्याची वाट अडविणारे गोलाकार अवजड लोखंडी दार सावकाशपणे उघडते. निर्माण झालेल्या फटीतून इखतीआन्द्र बाहेर निसटतो. जाळीची दारे खाडदिशी बंद होतात.

हाता-पायांनी पाण्याला कापत जलमानव महासागराकडे निघाला. पाण्यात अजून अंधार आहे. फक्त काळ्या खोल पाण्यात निशाफुलांच्या निळसर ठिणग्या व जेलीमाशांचा तांबूस प्रकाश अधूनमधून चमकतोय. पण लौकरच पहाट होईल व प्रकाशणारे प्राणी एकापाठोपाठ आपल्या दिव्यांना मालवतील.

इखतीआन्द्रच्या कल्ल्यांना हजारो बारीक सुया टोचल्या-सारखा वाटतात – त्याला श्वासोच्छ्वास करणे अवघड जाऊ लागते. म्हणजे त्याने पहाड ओलांडला. पहाडापलिकडे समु-द्राच्या पाण्यात नेहमी चिकणमाती, वाळू व वेगवेगळ्या वस्तू वाहात येतात. हा गोड्या पाण्याचा प्रवाह जवळच समुद्रात पडणाऱ्या नदीचा आहे.

"आश्चर्य आहे, गढूळ आणि गोड्या पाण्यात नदीतले मासे कसे काय जगू शकतात," इखतीआन्द्रच्या मनात विचार

येतो. "बहुधा वाळूचा आणि गाळाचा त्यांच्या कल्ल्यांवर विशेष परिणाम होत नसावा."

इखतीआन्द्र किंचित वरती येतो, एकदम उजवीकडे, दक्षिणेला वळण घेतो, नंतर खोल पाण्यात बुडी मारतो. इथे पाणी अधिक स्वच्छ आहे. इखतीआन्द्र आता पाण्याखालील थंड प्रवाहात सापडला. दक्षिणेकडून किनाऱ्यालगत हा प्रवाह उत्तरेकडे वाहात जातो व तेथे समुद्रात पडणाऱ्या पाराना नदीच्या प्रभावाखाली पूर्वेकडे वळतो. हा प्रवाह खूप खोलीतून वाहतो, पण त्याची वरची सीमा समुद्रपृष्ठापासून पंधरा-वीस मीटरवर खोल आढळते. आता इखतीआन्द्र परत प्रवाहाबरोबर वाहू शकतो – तो त्याला दूरवर उघड्या महासागरात घेऊन जाईल.

थोडी डुलकी काढायला हरकत नाही. धोका नाही. अजून अंधार आहे आणि सागरी हिंस्र प्राणी झोपलेत. सूर्योद-यापूर्वी डुलकी काढण्यात मजा येते. पाण्याखालील प्रवाहातील बदलणारे तपमान त्वचेला जाणवते.

कानांना पोकळ खडखडाट ऐकू आला. पाठोपाठ तसाच दुसरा, तिसरा आवाज आला. हे नांगरांच्या साखळ्यांचे खडखडाट आहेत: इखतीआन्द्रपासून काही किलोमीटर अंतरावर आखातात मच्छीमारांची दुकाठी गलबते नांगर उचलताहेत. पहाट जवळ आली. खूप दूरवर तालबद्ध आवाज येतोय. ब्यूनोस-आयर्स व लिव्हरपूल दरम्यान वाहतूक करणाऱ्या महासागरगामी मोठ्या इंग्लिश आगबोटीच्या – 'हॉरॉक्सच्या' – इंजिनांचा हा आवाज. 'हॉरॉक्स' अजून चाळीस किलोमीटर दूर आहे. पण केवढा आवाज! सागरी पाण्यात दर सेकंदाला दीड हजार मीटर वेगाने आवाज प्रवास करतो. 'हॉरॉक्स' रात्रीची फार सुंदर दिसते – दिव्यांनी शृंगारलेले तरंगते शहर. पण रात्रीच्या वेळी तिला पाहण्यासाठी संध्याकाळ-

पासून दूरवर उघड्या समुद्रात पोहत जावे लागते. ब्यूनोस-आयर्समध्ये 'हॉरॉक्स' सर्व दिवे मालवून सूर्योदयाच्या वेळी येते. नाही, आता आणखी डुलकी घेणे शक्य नाही. 'हॉरॉक्स' चे आवाज, तिचे प्रकाशझोत, ह्यामुळे महासागरातील प्राण्यांना जाग येईल. बहुधा 'हॉरॉक्स'चे आगमन डोल्फिनांनी सर्वांत प्रथम ऐकले असावे, कारण काही मिनिटांपूर्वी त्यांनी बुड्या मारून निर्माण केलेला किंचित दाब इखतीआन्द्र-ला जाणवला होता. कदाचित डोल्फिन आगबोटीच्या स्वागताला धावले होते.

वेगवेगळ्या बोटींच्या इंजिनांचा आवाज सर्व बाजूंनी येत आहे: बंदराला व आखाताला जाग येतेय. इखतीआन्द्र डोळे उघडतो, जणू झोपेचा शेवटचा अंश झटकून टाकण्यासाठी डोक्याला झटके देतो, हाता-पायांच्या हालचाली करीत वरती येतो.

सावधपणे त्याने पाण्यामधून डोके वरती उचलले व सभोवार न्याहाळून पाहिले. जवळपास होड्या आणि गलबते नव्हती. कमरेपर्यंत पाण्यात राहून सावकाशपणे तो पायांनी चालत गेला.

पाण्यालगत करढोक आणि सागरपक्षी उडत आहेत, कधी कधी आरशासारख्या सागरपृष्ठाला छातीचा अथवा पंखाच्या टोकाचा स्पर्श करीत आहेत व पाण्यावर मंद पुसत जाणारी वर्तुळे निर्माण करीत आहेत. शुभ्र सागरपक्ष्याचे ओरडणे लहान मुलाच्या रडण्यासारखे भासते. भल्या मोठ्या पंखांची सळसळ करीत आणि इखतीआन्द्रच्या डोक्यावर वाऱ्याचे झोत निर्माण करीत वादळाचा इशारा देणारा हिमशुभ्र प्रचंड आल्बात्रोस पक्षी उडत गेला. त्याच्या पंखाची पिसे काळी

आहेत, चोच लाल आहे व तिचे टोक पिवळे आहे आणि पंजे केशरी आहेत. तो आखाताकडे उडत गेला. इखतीआन्द्र त्याच्या पाठी काहीशा असूयेने पाहतो. पक्ष्याचे पसरलेले काळे पंख किमान चार मीटर लांबीचे आहेत. असे पंख लाभले तर काय बहार होईल!

पश्चिमेकडे दूर डोंगरांपलिकडे रात्र निघून चाललीय. पूर्व लाल बनतेय. महासागराच्या गुळगुळीत पृष्ठावर जेमतेम ध्यानात येतील अशा शांत लहरी उमटू लागल्यात – त्यांच्यावर सोनेरी रेषा. शुभ्र सागरपक्षी अधिक उंच चढले म्हणजे गुलाबी दिसू लागतात.

पाण्याच्या फिकट पृष्ठावर रंगीबेरंगी, फिकट व गडद निळया वळकटचा उमटू लागल्या. ह्या वाऱ्याच्या पहिल्या लहरी. फिकट निळया लाटा वाढू लागल्या. वाऱ्याचा जोर चढला. वाळूच्या किनाऱ्याला आता लाटांच्या पिवळट-पांढऱ्या फेसाळ जिभा चाटू लागतात. किनाऱ्याजवळचे पाणी हिरवे बनते.

मच्छीमारांच्या गलबतांचा आख्खा काफला जवळ येऊ लागतो. माणसांच्या नजरांना पडू नको असा वडिलांनी हुकूम दिलेला आहे. इखतीआन्द्र पाण्यात खोल बुडी मारतो, थंड प्रवाहात जातो. प्रवाह त्याला किनाऱ्यापासून दूर पूर्वेला उघड्या महासागरात नेतो. भोवती सागरी तळाचा निळसर-जांभळा अंधार. मासे पोहताहेत; त्यांचा रंग पोपटी दिसतो व त्यांच्या अंगांवर ठिपके आणि पट्टे दिसतात. रंगीबेरंगी फुलपाखरांच्या थव्याप्रमाणे लाल, पिवळे, लिंबोणी, तपकिरी रंगांचे मासे अखंड बागडताहेत.

वरून मोठा आवाज येतो, पाणी काळसर बनते. पाण्यावर लष्करी जलविमान खूप खालून उडत गेले.

एकदा तसे जलविमान पाण्यावर उतरले होते. इखती-

आन्द्रने नकळत त्याच्या पंखाच्या लोखंडी दांड्याला धरले. आणि... थोडक्यात त्याचा जीव वाचला: जलविमान अनपेक्षितपणे पाण्यापासून अलग झाले, इखतीआन्द्रने दहा मीटर उंचीवरून पाण्यात उडी मारली.

इखतीआन्द्र डोके वर उचलतो. सूर्याचा प्रकाश डोक्यावरती दिसतोय. माध्यान्ह जवळ आलीय. पाण्याचा पृष्ठभाग गोट्यांचे, मोठ्या माशांचे, खुद्द इखतीआन्द्रचे प्रतिबिंब दाखविणारा आरसा आता बनत नाही. आता आरसा वाकडा बनलाय, तो वाकतोय, अखंड हलतोय.

इखतीआन्द्र वरती येतो. लाटा हिंदकळतात. त्याने पाण्यातून पाहिले. लाटेच्या माथ्यावर तो चढला, खाली गेला, परत वरती चढला. ओहो, भोवती काय चालले होते! किनाऱ्यावर एव्हाना लाटा गर्जत होत्या, खडकांवर फुटत होत्या. किनाऱ्याजवळचे पाणी पिवळट-हिरवे बनले होते. नैऋत्येचा वारा जोरात वाहतोय. लाटा वाढतात. लाटांच्या माथ्यांवर पांढऱ्या फेनरेषा उमटतात. इखतीआन्द्रवर जलतुषार उडत होते. त्याला ते आवडते.

"असं का होतं," त्याच्या मनात विचार आला, "जर लाटांपाशी पोहत गेलं तर त्या गडद निळ्या दिसतात, पण मागं वळून पाहिलं तर त्या फिकट दिसतात?"

लाटांच्या माथ्यांवर उडत्या माशांचे थवे आहेत. लाटांबरोबर खाली-वर हेलकावे घेत उडते मासे शंभर मीटर वरती उडतात आणि खाली येतात, व एक-दोन मिनिटांनंतर पुन्हा पाण्यावर उड्या मारतात. शुभ्र सागरपक्षी भिरभिरतात, रडतात. सर्वांत वेगाने उडणारे फ्रीगेट पक्षी रुंद पंखांनी हवा कापत जातात. प्रचंड बाकदार चोच, तीक्ष्ण नख्या, हिरवी

धातूची छटा असलेली गडद तपकिरी पिसे, गळ्याशी केशरी पिशवी – हा नर. आणि जवळच – दुसरा फ्रीगेट, पांढऱ्या छातीसह फिकट पिसांचा – ही मादी. ती पहा, दगडासारखी धपकन पाण्यावर पडते आणि दुसऱ्याच सेकंदाला तिच्या बाकदार चोचीत निळसर-रुपेरी मासा फडफडताना दिसतो. वादळाचा आगाऊ इशारा देणारे आल्बात्रोस उडताहेत म्हणजे वादळ होणार.

वादळी ढगांच्या भेटीला ओरड्या नावाचा धीट अद्भुत पक्षी जातो आहे. गाणे गात हा पक्षी नेहमी वादळाला भेटतो. याउलट मच्छीमारांची गलबते व सुंदर यॉट सर्व शिडे उभारून किनाऱ्याकडे लगबगीने जात आहेत, वादळापासून बचावण्यासाठी घाई करीत आहेत.

हिरवट रंगाच्या संध्याछाया पडल्या आहेत, पण पाण्यामधून अजून सूर्याचा थांग लावता येतो – त्याचा मोठा चमकता ठिपका. दिशा धरायला एवढे पुरेसे आहे. काळ्या मेघाने सूर्याला झाकून टाकण्यापूर्वी उथळ किनारा गाठला पाहिजे, नाही तर – न्याहरी गमावली. पण भूक तर केव्हापासून लागलीय. अंधारात उथळ तळ सापडायचा नाही, ना पाण्याखालचा खडक. इखतीआन्द्र जोराने हात-पाय मारीत होता, बेडकांप्रमाणे पोहत होता.

अधूनमधून तो उताणा पडतो व दाट निळसर हिरव्या अर्धवट अंधारात जेमतेम दिसणाऱ्या सूर्याच्या ठिपक्यानुसार स्वतःची दिशा पारखतो. कधी कधी समोर लक्षपूर्वक पाहतो – उथळ पाण्याचा किनारा शोधतो. पाण्यातील बदल त्याच्या कल्ल्यांना व त्वचेला जाणवतात: उथळ तळाशी पाणी जास्त खारट आहे, त्यात जास्त प्राणवायू आहे – छान, हलके पाणी. जिभेवर पाण्याची चव तो घेतो. जसा जुना, अनुभवी खलाशी अजून जमीन दिसत नसतानाही केवळ त्यालाच

ठाऊक असलेल्या खुणांवरून किनारा जवळ आल्याचे ओळखतो, त्याप्रमाणे.

हळूहळू उजेड वाढत जातो. डावीकडे व उजवीकडे जुन्या परिचित पाण्याखालील खडकांच्या रूपरेषा दिसू लागतात. त्यांच्या दरम्यान छोटे सपाट मैदान व त्यापलिकडे दगडी भिंत. इखतीआन्द्र ह्या जागेला पाण्याखालचा धक्का म्हणतो. अत्यंत जोरदार तुफानाच्या वेळीसुद्धा इथे शांत असते.

पाण्याखालच्या धक्क्याच्या शांत पाण्यात खूप मासोळ्या जमल्यात. भांड्यात सार उकळताना जशी त्यांची दाटी होते, तशी पाण्यात दाटी झालीय. छोटे, काळपट, अंगावर मध्यभागी पिवळा पट्टा असलेले, पिवळ्या शेपट्यांचे; काळसर तिरप्या पट्ट्यांचे, लाल, फिकट व गडद निळे. कधी अचानक अदृश्य होतात, तर कधी अनपेक्षितपणे त्याच जागी अवतरतात. वरती पोहत गेलात, भोवती नजर टाकलीत – मासळ्यांची गर्दी उसळलेली दिसते; खाली मात्र एकदम गायब. जोवर एका माशाला हातांमध्ये पकडले नाही, तोवर खूप काळपर्यंत हे का घडते ह्याचा खुलासा इखतीआन्द्रला झाला नव्हता. हाताच्या पंजाएवढा त्या माशाचा आकार होता, पण एकदम सपाट. म्हणून वरून मासा दिसत नव्हता.

आता न्याहरी. खडकाजवळील सपाट मैदानात खूप कालव आहेत. इखतीआन्द्र पोहत त्या सपाट जागी शिंपल्यांपाशीच जाऊन निजतो आणि कालवांना खाऊ लागतो. शिंपला उघडून कालव बाहेर काढतो व त्याला तोंडात टाकतो. पाण्याखाली खाण्याची त्याला सवय झालीय. तोंडात तुकडा घातल्यावर सहजपणे ओठांचा चंबू करून तो तोंडातून पाणी बाहेर फेकतो. खाद्याबरोबर थोडे पाणी तो गिळतो, पण समुद्रपाण्याची त्याला सवय आहे.

त्याच्याभोवती पाणवनस्पती डोलत आहेत – गुंफेच्या

भेगांमधून आगाराची हिरवी पाने, पिसांच्या आकारांची मेक्सिकन काऊलेर्पाची हिरवी पाने, नाजुक गुलाबी समुद्रशेवाळ. पण आता ह्या सगळ्या वनस्पती काळपट राखी दिसतात: पाण्यात संध्याकालीन रंग आहे – मेघांचा गडगडाट व तुफान चालू आहेत. अधूनमधून विजेचा कडकडाट अस्पष्ट ऐकू येतो. इखतीआन्द्र वरती पाहतो.

एकदम काळोख का पडला? इखतीआन्द्रच्या थेट डोक्या-वरती काळा ठिपका अवतरला. काय असावे बरे हे? न्याहरी संपली. वरती डोकावून पहायला हरकत नाही. इखतीआन्द्र सावधपणे डोक्यावरील काळ्या ठिपक्याच्या दिशेने खडकालगत वर जातो. एक प्रचंड आल्बात्रोस पाण्यावर बसल्याचे आढळते. पक्ष्याचे केशरी पाय इखतीआन्द्रपासून अगदी जवळ आहेत. तो हात वर ताणतो आणि आल्बात्रोसचे पाय पकडतो. घाबरलेला पक्षी स्वतःचे बळकट पंख पसरतो व वरती उडताना इखतीआन्द्रला पाण्यातून वरती ओढतो. पण हवेत इखतीआन्द्रचे शरीर पटकन जड बनते आणि आल्बात्रोस इखतीआन्द्रसह धपकन पाण्यावर कोसळतो. त्याच्या छातीच्या मऊ पंखांचे इखतीआन्द्रवर आच्छादन पडते. वादळपक्ष्याने लाल चोचीने डोक्यावर आघात करण्यापूर्वीच इखतीआन्द्र पाण्यात बुडी मारतो आणि काही सेकंदांनंतर दुसऱ्या जागी पाण्यावरती बाहेर येतो. आल्बात्रोस पूर्वेकडे उडतो आणि तुफानी पाण्याच्या डोंगराआड नाहीसा होतो.

इखतीआन्द्र उताणा पडलाय. वादळ एव्हाना निघून गेले. दूर पूर्वेला कुठेतरी गडगडाट होतो आहे. पण पाऊस मात्र धो धो कोसळतोय. इखतीआन्द्र सुखापायी डोळे अर्धवट मिटतो. शेवटी त्याने डोळे उघडले, तो उठला आणि पाण्यात अर्धे शरीर ठेवून त्याने सभोवार पाहिले. एका प्रचंड लाटेच्या माथ्यावर तो स्वार झालाय. त्याच्याभोवती आकाश, महा-

सागर, वारा, मेघ, पाऊस, लाटा – गडगडणाऱ्या, गोंगाट-णाऱ्या, गर्जणाऱ्या, घोंघावणाऱ्या एका ओल्या आवर्तात सर्व गरगर फिरत होते. लाटांच्या माथ्यांवर फेस भिरभिरतोय आणि रागाने त्यांच्या कुशींवरून सरपटत धावतोय. पाण्याचे डोंगर वेगात वर धावतात आणि थप्पी रचाव्या तसे कोस-ळतात. पाऊस घोंघावतोय, वारा घुमतोय.

जमिनीवरील माणसाला ज्या गोष्टींची भीती वाटते, त्याच गोष्टी इखतीआन्द्रला आनंद देतात. अर्थात सांभाळून राहिले पाहिजे, नाही तर पाण्याचा डोंगर त्याचा नाश करील. पण लाटांबरोबर पोहण्यात इखतीआन्द्र माशांइतकाच तरबेज आहे. फक्त लाटांची माहिती पाहिजे: एक लाट वर-खाली नेते, दुसरी लाट तुम्ही भानावर यायच्या आत तुम्हाला उलटे पाडते. लाटेखाली काय करायचे त्याला माहीत होते, वारा संपतो तेव्हा लाटा कशा नाहीशा होतात हे त्याला ठाऊक होते. त्याला माहीत होते की, प्रथम छोट्या लाटा नाहीशा होतात, मग मोठ्या लाटा नाहीशा होतात, पण पाण्यावरील संथ लयबद्ध लहरी खूप वेळपर्यंत टिकतात. लाटेत कोलांटी उडी मारायला त्याला आवडायची, पण तसे करणे धोक्याचे आहे ह्याची त्याला कल्पना होती. एकदा एका लाटेने इखतीआन्द्रला अनपेक्षितपणे उलटे पाडले, तळाशी त्याचे डोके जोरात आपटले व त्याची शुद्ध हरपली. सामान्य माणूस बुडून मेला असता, पण इखतीआन्द्र पाण्यात शांत पडून राहिला.

पाऊस थांबला. पूर्वेकडील वादळापाठोपाठ तो कुठेतरी निघून गेला. वारा बदलला. उष्ण कटिबंधीय उत्तरेकडून उबदार हवा वाहू लागली. मेघांआडून निळ्या नभाचे तुकडे दिसू लागले. सूर्यकिरणांनी मेघांना भेदले व ती लाटांवर आपटली. अजून काळोख्या, उदास असलेल्या आग्नेय आकाशात

दुहेरी इंद्रधनुष्य उमटले. महासागर ओळखू येईना. आता तो शिसासारखा काळा दिसत नव्हता, तर फिकट निळा दिसत होता व जेथे सूर्यकिरणे भेदून गेली होती त्या जागी गडद हिरवे ठिपके दिसत होते.

सूर्य! एका निमिषार्धात नभ आणि महासागर, किनारा व दूरचे डोंगर वेगळे दिसू लागले. वादळानंतर आणि तुफानानंतर हवा किती अद्भुत, हलकी, आर्द्र बनली होती! इखतीआन्द्र कधी फुफ्फुसांमध्ये स्वच्छ, निरोगी खारी हवा भरून घेतो आहे, तर कधी कल्ल्यांमार्फत जोराने श्वासोच्छ्वास सुरू करतोय. तुफान, वादळ, वारा, लाटा, पाऊस नभाला महासागराशी कसे मिसळून टाकतात, हवेला पाण्याशी कसे मिसळून टाकतात, पाण्यात भरपूर प्राणवायू कसा भरतात व त्यामुळे नंतर श्वासोच्छ्वास करणे किती सोपे जाते, हे माणसांमध्ये फक्त इखतीआन्द्रला ठाऊक आहे. तेव्हा सर्व मासे समुद्रातील सर्व गोष्टी अधिक ताज्यातवान्या बनतात.

तुफानानंतर सागरी जंगलांच्या वनस्पतींमधून, खडकाच्या अरुंद फटींमधून, अद्भुत प्रवाळांच्या गुच्छांमधून, स्पंजांमधून छोटे मासे पोहत बाहेर पडतात. त्यांच्यापाठोपाठ खोलवर लपलेले मोठे मासे बाहेर येतात व शेवटी जेव्हा पूर्ण शांत होते तेव्हा नाजुक, दुबळे जेलीमासे बाहेर येतात; पारदर्शी, वजनविरहित शिंप्या व विविध सुंदर मासोळ्या बाहेर पडतात.

तो पहा सूर्यकिरण लाटेवर पडला. भोवतालचे पाणी तात्काळ हिरव्या रंगाचे बनले, पाण्याचे छोटे बुडबुडे चमचमू लागले, फेस फुसफुसू लागला... इखतीआन्द्रपासून जवळच त्याचे मित्र बागडत आहेत – आनंदी, धूर्त, चौकस नजरांनी डोल्फिन त्याच्याकडे पहात आहेत. लाटांमध्ये त्यांच्या तुकतुकीत काळ्या पाठी चमकून जात आहेत. ते एकमेकांचा मजेने

पाठलाग करीत आहेत, फुरफुर आवाज करीत आहेत. इखतीआन्द्र हसतोय, डोल्फिनांना पकडतोय, त्याच्याबरोबर पोहतोय, पाण्यात डुबक्या मारतोय. हा महासागर, हे डोल्फिन, हे नभ आणि हा सूर्य केवळ त्याच्यासाठी निर्माण झालेत असे त्याला भासतेय.

इखतीआन्द्रने डोके वर उचलले आणि डोळे किलकिले करून सूर्याकडे पाहिले. सूर्य पश्चिमेला कलला होता. लौकरच संध्याकाळ होईल. आज घरी लौकर परतायची त्याची इच्छा नाही. निळे आकाश काळोखे बनत नाही आणि त्यात तारे चमकू लागत नाहीत, तोवर तो असाच पाण्यावर डोलत राहील.

पण लौकरच त्याला रिकामपणाचा कंटाळा आला. त्याच्यापासून जवळच छोटे सागरी प्राणी मरतील. तो त्यांना वाचवू शकेल. तो उठला व दूरचा किनारा पाहू लागला. वाळूच्या पट्ट्याजवळील उथळ तळाशी! तेथे त्याच्या मदतीची सर्वांत जास्त गरज आहे. तेथे सागरी लाटा गोंधळ घालताहेत.

प्रत्येक तुफानानंतर अशा पिसाट लाटा सागरी वनस्पतींना व प्राण्यांना किनाऱ्यांवर भिरकावून देतात: जेलीमासे, खेकडे, तारका मासे, कधी कधी बेसावध डोल्फिनसुद्धा. जेलीमासे लौकर मरतात, काही मासे पाण्यापाशी धडपडत परततात, पण त्यांपैकी अनेक किनाऱ्यावरच मरतात. खेकडे बहुतेक सर्व महासागरात परततात. काहीवेळा तुफानात बळी पडले-ल्यांच्या मांसावर जगण्यासाठी ते स्वतःच पाण्यामधून किनाऱ्यावर चालत जातात. किनाऱ्यावर फेकल्या गेलेल्या सागरी प्राण्यांना वाचविणे इखतीआन्द्रला आवडते.

तुफानानंतर तासचे तास तो किनाऱ्यावर फिरायचा आणि

ज्याला वाचविता येणे अजून शक्य असे, त्याला वाचवायचा. पाण्यात परत फेकलेले मासे शेपटचा फडफडवत पोहत जाताना बघून त्याला आनंद व्हायचा. अर्धवट शुद्धीवर असलेले, कुशीवर अथवा पोटावर प्रथम तरंगणारे मासे शेवटी जिवंत झालेले पाहून दरवेळी त्याला आनंद व्हायचा. किनाऱ्यावरचा मोठा मासा उचलून इखतीआन्द्र त्याला पाण्यापाशी घेऊन जायचा; मासा त्याच्या हातांमध्ये फडफडायचा, पण तो हसायचा आणि त्याला समजावून सांगायचा की, भिऊ नको, आणखी थोडा दम धर. अर्थात, जर तो भुकेला असता आणि हाच मासा त्याने महासागरात धरला असता, तर त्याला त्याने आनंदाने खाऊन टाकले असते. पण ते गरजेतून वाईट घडले असते. इथे किनाऱ्यावर तो सागरी प्राण्यांचा रक्षणकर्ता होता, मित्र होता.

सर्वसाधारणपणे इखतीआन्द्र जसा यायचा, तसाच घरी परतायचा – पाण्याखालील प्रवाहांचा उपयोग करून. पण आज त्याला पाण्याखाली फार काळ राहण्याची इच्छा नव्हती. महासागर आणि आकाश फार सुंदर दिसत होते. तरुणाने पाण्यात बुडी मारली, पाण्याखाली तो पोहत गेला आणि पुन्हा पाण्यावरती आला – माशांची शिकार करणाऱ्या सागरी पक्ष्याप्रमाणे.

सूर्याची शेवटची किरणे विझली. पश्चिमेला अजून पिवळा पट्टा खूप वेळ चमकत होता. काळपट राखाडी सावल्यांप्रमाणे उदास लाटा एकमेकींमागून धावत होत्या.

थंडगार हवेनंतर पाण्यात खूप उबदार वाटते. सभोवती अंधार दाटला तरी भीतीदायक वाटत नाही. ह्या घटकेला कुणीही हल्ला करणार नाही. दिवसाचे हिंस्र प्राणी एव्हाना झोपलेत आणि रात्रीचे अजून शिकारीला बाहेर पडलेले नाहीत.

ह्याची त्याला गरज होती: महासागराच्या पृष्ठाजवळून वाहणारा उत्तरेकडून येणारा प्रवाह. अद्याप शांत न झालेल्या पृष्ठावरील लहरी ह्या पाण्याखालील नदीला वर-खाली हिंदोळे देतात, पण ती नदी तरीही गरम उत्तरेकडून थंड दक्षिणेकडे सावकाशपणे वाहात राहते. तिच्या खूप खाली उलटा प्रवाह वाहतोय – दक्षिणेकडून उत्तरेकडे येणारा थंड प्रवाह. किनाऱ्यालगत खूप वेळपर्यंत पोहायची इच्छा असते, तेव्हा इखतीआन्द्र वारंवार ह्या प्रवाहांचा वापर करतो.

आज तो उत्तरेला खूप दूरपर्यंत पोहत गेला. आता हा उबदार प्रवाह त्याला थेट बोगद्यापर्यंत घेऊन जाईल. फक्त डुलकी लागू नये आणि पूर्वी एकदा घडले होते त्याप्रमाणे पुढे पोहत जाऊ नये. कधी तो डोक्यामागे हात धरतो, नर कधी दोन्ही बाजूंना पसरतो, सावकाश पाय ताणतो आणि परत एकत्र जुळवतो – व्यायाम करतोय. प्रवाह त्याला दक्षिणेला नेतोय. उबदार पाणी व हाता-पायांच्या सावकाश हालचालींमुळे त्याचे मन शांत होतेय.

इखतीआन्द्र वरती पाहतो – त्याच्या समोर पोकळी आणि तिच्यात धूलीकणांप्रमाणे बारीक तारे चमकत आहेत. हे निशादीप स्वतःचे दिवे पेटवून महासागराच्या पृष्ठाशी फिरू लागलेत. अंधारात कुठे कुठे निळसर आणि गुलाबी धूसर आकृती दिसतात – प्रकाश पाडणाऱ्या छोट्या प्राण्यांचे ते पुंजके आहेत. मंद हिरवा प्रकाश उजळत चेंडू सावकाश तरंगत जात आहेत. इखतीआन्द्रच्या जवळच जेलीमासा प्रकाशतोय. लांब किनारीच्या विणलेल्या शेडखालच्या दिव्याप्रमाणे तो भासतोय. जेलीमाशाच्या प्रत्येक हालचालीबरोबर लांब किनार वाऱ्याचे झोत बसावेत तशी हलतेय. उथळ तळाशी एव्हाना सागरी तारे पेटलेत. मोठ्या खोल पाण्यात एव्हाना रात्रीच्या मोठ्या हिंस्र प्राण्यांचे दिवे फिरत आहेत. ते एकमे-

कांचा पाठलाग करतात, गोल फिरतात, विझतात व पुन्हा पेटतात.

पुन्हा उथळ तळ. प्रवाळांचे दांडे व डहाळ्या आतमधून निळ्या, गुलाबी, हिरव्या, पांढऱ्या दिव्यांनी उजळल्यात. काही प्रवाळ फिकट प्रकाशात चमचमत आहेत, तर काही तापल्या धातूप्रमाणे उजळून निघालीत.

जमिनीवरून रात्री फक्त आकाशात दूरवर छोटे तारे दिसतात व कधी कधी चंद्र दिसतो. इथे पाण्यात हजारो तारे, हजारो चंद्र, हजारो छोटे रंगीबेरंगी सूर्य मंद नाजुक प्रकाशात उजळत असतात. जमिनीवरील रात्रीपेक्षा महासागरातील रात्र अनेक पटींनी जास्त सुंदर असते.

ह्या दोन रात्रींची तुलना करण्यासाठी इखतीआन्द्र पाण्यावरती पोहत येतो.

हवा मघापेक्षा जास्त उबदार बनलीय. डोक्यावर आकाशाच्या काळ्या-निळ्या घुमटात तारे चमकत आहेत. क्षितिजावर चंद्राची रुपेरी थाळी उभी आहे. चंद्रापासून सर्व महासागरावर चंदेरी रस्ता पसरलाय.

बंदरातून बसक्या आवाजातील लांब भोंगा ऐकू येतो. महाप्रचंड 'हॉरॉक्स' परतीच्या प्रवासाची तयारी करतेय. खूप उशीर झालाय. लौकरच पहाट होईल. इखतीआन्द्र जवळजवळ संपूर्ण चोवीस तास घराबाहेर राहिलाय. वडील बहुधा त्याची कानउघाडणी करणार.

इखतीआन्द्र बोगद्याकडे निघाला, सळईमध्ये हात घालून त्याने लोखंडी जाळी उघडली, पूर्ण अंधारात तो बोगद्यातून पोहत जाऊ लागला. परतीच्या प्रवासात खालच्या भागातून पोहावे लागते; समुद्राकडून बागेतील तलावाच्या दिशेने वाहणाऱ्या थंड प्रवाहातून.

खांद्याला हलकासा धक्का बसल्यामुळे तो जागा झाला.

तो तलावात आहे. पटकन वरती चढून आला. परिचित फुलांच्या गंधांनी भरलेली हवा तो फुफ्फुसांमार्फत आत घेऊ लागतो.

अवघ्या काही मिनिटांनंतर तो पलंगावर एव्हाना गाढ झोपलेला आहे – वडिलांनी आज्ञा केली होती त्यानुसार.

तरुणी आणि काळसर पुरुष

एकदा वादळानंतर इखतीआन्द्र महासागरात पोहत गेला.

पृष्ठभागावर आल्यानंतर इखतीआन्द्रने पाहिले की, जवळच लाटांवर काहीतरी हेलकावत होते – मच्छीमाराच्या गलबताच्या वादळात फाटलेल्या पांढऱ्या शिडासारखे. जवळ पोहत गेल्यानंतर आश्चर्याने त्याने पाहिले – ती एक तरुण मुलगी होती. तिला फळीशी बांधलेले होते. ही सुंदर तरुणी मेली तर नव्हती? इखतीआन्द्र एवढा अस्वस्थ बनला, की प्रथमच त्याला महासागराविषयी वैरभावना वाटली.

कदाचित तरुणी केवळ बेशुद्ध झाली होती? तिचे लडबडते डोके त्याने धरले व फळी पकडून तो किनाऱ्याशी पोहत गेला.

अंगातील सर्व बळ एकवटून तो वेगाने पोहत होता, फक्त तिच्या डोक्याला सावरण्यासाठी मधून मधून थोडा थांबत होता व पुन्हा फळी पकडून किनाऱ्याकडे जात होता. संकटात सापडलेल्या माशाशी जसे तो बोलायचा, तसे तो तिला उद्देशून पुटपुटत होता: "थोडा दम धर!" तरुणीने डोळे उघडावेत अशी त्याची इच्छा होती, पण त्याला भीती वाटत होती. तिला जिवंत पाहण्याची त्याला इच्छा होती,

पण ती त्याला घाबरेल अशी त्याला धास्ती वाटत होती. चष्मा व हातमोजे काढून टाकावेत काय? पण ह्यात वेळ खर्च होईल आणि हातमोजांविना पोहणे जास्त अवघड जाईल. फळीसकट तरुणीला ढकलत तो पुन्हा घाईने किनाऱ्याकडे जाऊ लागला.

किनाऱ्याच्या लाटेच्या पट्ट्याशी तो पोहोचला. इथे सावध राहिले पाहिजे. लाटाच त्याला किनाऱ्यावर ढकलत नेतील. इखतीआन्द्र मधून मधून पाय खाली सोडतो – तळ चाचपतोय. शेवटी तो उथळ पाण्यात गेला, तरुणीला किनाऱ्यावर घेऊन गेला, फळीपासून त्याने तिला सोडले, वाळूच्या ढिगावर वाढलेल्या झुडुपाच्या सावलीत नेले आणि कृत्रिम श्वासोच्छ्‌वासाच्या मदतीने तिला शुद्धीवर आणण्याचा तो प्रयत्न करू लागला.

तिच्या पापण्या थरथरल्याचा, तिच्या पापण्यांवरील केस हलल्याचा त्याला भास झाला. इखतीआन्द्रने तरुणीच्या काळजावर कान टेकविला आणि मंद धडधड ऐकली. ती जिवंत आहे... आनंदाने आरोळी ठोकण्याची त्याला तीव्र इच्छा झाली.

तरुणीने डोळे उघडले, इखतीआन्द्रकडे पाहिले व तिच्या चेहऱ्यावर घबराट पसरली. मग तिने डोळे मिटले. इखतीआन्द्रला दुःख झाले व आनंदही झाला. शेवटी त्याने तरुणीचा जीव वाचविला होता. आता त्याने तेथून निघून जायला हवे होते – तिला घाबरवायचे नव्हते. पण अशा असहाय अवस्थेत तिला एकटीला सोडणे योग्य ठरेल का? तो विचारात गढला होता त्या दरम्यान कुणाच्या तरी जड वेगवान पावलांची त्याला चाहूल लागली. आता यापुढे डळमळत राहण्यात अर्थ नव्हता. इखतीआन्द्रने लाटेत डोक्याच्या बाजूने सूर मारला, जवळच्या खडकापाशी पाण्यातून तो पोहत गेला, परत पाण्याव-

रती आला आणि खडकांआड लपून किनाऱ्याकडे पाहू लागला.

वाळूच्या ढिगांमागून मिशा आणि बोकडदाढी असलेला एक काळसर पुरुष आला. त्याच्या डोक्यावर रुंद कडेची टोपी होती. हळू आवाजात तो स्पॅनिश भाषेत म्हणाला: "ती पहा, येसू आणि मेरीची कृपा!" तो जवळ जवळ धावतच तिच्यापाशी गेला. मग अनपेक्षितपणे महासागराकडे वाकडा वळला आणि किनाऱ्यावर येणाऱ्या लाटेत त्याने डुबकी मारली. पूर्ण भिजल्या अवस्थेत तो तरुणीपाशी धावला आणि तिला कृत्रिम श्वासोच्छ्वासाचे उपचार करू लागला. (आता काय गरज होती?) तरुणीच्या चेहऱ्यावर तो झुकला होता... त्याने तिचे चुंबन घेतले. काहीतरी भराभरा व तावातावाने तो बोलू लागला. इखतीआन्द्रला काही अलग अलग शब्द ऐकू आले: "मी तुम्हाला आधी इशारा दिला होता... शुद्ध वेडेपणा होता... बरं तर बरं, तुम्हाला फळीशी बांधून ठेवणं मला सुचलं..."

तरुणीने डोळे उघडले, डोके वर उचलले. चेहऱ्यावरील भीतीच्या जागी आश्चर्य, चीड, नाराजी उमटली. बोकड-दाढीवाला माणूस अजूनही तावातावाने बोलतोय, तरुणीला उभे रहायला मदत करतोय. पण ती अजून दुबळी आहे आणि तो परत तिला वाळूवर निजवतो. अर्ध्या तासानंतर अखेर ती दोघे तेथून निघाली. इखतीआन्द्र ज्या खडकांपाशी लपला होता, तेथून जवळूनच ती गेली. कपाळाला आठ्या घालीत तरुणी त्या मोठ्या टोपीवाल्याला म्हणाली:

"तर तुम्ही माझा जीव वाचवलात? धन्यवाद. देव तुम्हाला बक्षीस देईल."

"देव नव्हे, तर फक्त तुम्हीच मला बक्षीस देऊ शकता," काळसर पुरुष उत्तरला.

तरुणीने ह्या शब्दांकडे दुर्लक्ष केले. ती गप्प राहिली,

मग म्हणाली :

"आश्चर्य आहे. मला भास झाला होता की, माझ्याजवळ कुठलातरी राक्षस होता."

"तो तुमच्या कल्पनेचा खेळ होता," तो म्हणाला. "कदाचित तो सैतान असावा, तुम्ही मेलात अशी त्याची समजूत झाली असावी आणि तुमचा आत्मा हिसकावण्याचा त्याचा इरादा असावा. देवाची प्रार्थना म्हणा आणि माझ्या दंडाचा आधार घ्या. मी जवळ असताना एकाही सैतानाची तुमच्या केसाला धक्का लावण्याची हिंमत होणार नाही."

आणि ती निघून गेली – सुंदर तरुणी व तरुणीचा जीव आपण वाचविला असे सांगणारा हा वाईट काळसर माणूस. पण त्याचा खोटेपणा उघडकीला आणणे इखतीआन्द्रला शक्य नव्हते. काय हवे तसे वागो तो माणूस – इखतीआन्द्रने आपले काम पूर्ण केले होते.

तरुणी व तिच्याबरोबरचा माणूस वाळूच्या ढिगांमागे अदृश्य झाले, पण इखतीआन्द्र अजूनही त्या दिशेला पहात होता. मग त्याने महासागराकडे तोंड फिरविले. महासागर केवढा प्रचंड आणि रिता होता!..

चंदेरी पोटाच्या निळसर माशाला लाटेने वाळूवर फेकले. इखतीआन्द्रने सभोवार नजर टाकली – कुणीही नाही. लपलेल्या जागेतून तो बाहेर धावला, माशाला उचलून त्याने समुद्रात टाकले. मासा पोहत निघून गेला, पण ह्यावेळी का कोण जाणे, इखतीआन्द्र उदास बनला. वाळूच्या किनाऱ्यावर तो भटकत राहिला, माशांना व तारका माशांना पाण्यात फेकत राहिला. ह्या कामात हळूहळू तो रमला. त्याची नेहमीची उल्हसित वृत्ती परतली. अंधार पडेपर्यंत तो असा भटकत राहिला. फक्त किनाऱ्यावरील वाऱ्याने त्याचे कल्ले जेव्हा

भाजले आणि कोरडे केले, तेव्हा मधून मधून तो पाण्यात बुड्या मारीत होता.

इखतीआन्द्रचा नोकर

इखतीआन्द्रची छान सेवा करणाऱ्या क्रिस्तोविना पहाडात जाण्याचा साल्वातोरनी निर्णय घेतला. इंडियन खूप खूष झाला होता. साल्वातोरांच्या अनुपस्थितीत तो बिनधास्तपणे बाल्ताझारला भेटू शकत होता. "सागरी सैतान" सापडल्याची वार्ता बाल्ताझारला कळविण्यात क्रिस्तोला एव्हाना यश आले होते. इखतीआन्द्रचे हरण कसे करायचे एवढेच आता ठरवायचे बाकी उरले होते.

शेवाळमाखल्या पांढऱ्या दगडांच्या घरात आता क्रिस्तो रहात होता आणि इखतीआन्द्रशी त्याची वारंवार भेट घडत होती. त्यांची पटकन मैत्री जमली. माणसांच्या सहवासाला पारख्या बनलेल्या इखतीआन्द्रला म्हाताऱ्या इंडियनाचा लळा लागला होता. जमिनीवरील जीवनाच्या कथा त्याला क्रिस्तोकडून ऐकायला मिळत. नामवंत शास्त्रज्ञांपेक्षा इखतीआन्द्रला सागरी जीवनाची जास्त माहिती होती. पाण्याखालील जगाची गुपिते तो क्रिस्तोला सांगायचा. इखतीआन्द्रला भूगोलाची उत्तम माहिती होती; महासागर, समुद्र, महत्त्वाच्या नद्या त्याला माहीत होत्या; खगोलशास्त्र, नौकानयन, पदार्थविज्ञान, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र यांचे त्याला थोडेफार ज्ञान होते. पण माणसांविषयी त्याला अत्यंत कमी माहिती होती: जमिनीवर राहणाऱ्या काही वंशांबद्दल, माणसांच्या इतिहासाबद्दल त्याला अंधुक माहिती होती. पण माणसांच्या राजकीय आणि

आर्थिक संबंधांबद्दलचे त्याचे ज्ञान पाच वर्षांच्या लहान मुला-एवढेच होते.

दिवसा जेव्हा उष्मा वाढायचा, तेव्हा इखतीआन्द्र जमिनी-खालील गुंफेत उतरायचा आणि कुठेतरी पोहत जायचा. जेव्हा उष्मा कमी व्हायचा, तेव्हा तो पांढऱ्या घरात अवतरायचा आणि तेथे सकाळपर्यंत रहायचा. पण जर पाऊस पडत असला किंवा समुद्रावर वादळ झाले, तर सबंध दिवस तो घरातच व्यतीत करायचा. दमट हवा असताना जमिनीवर राहणे त्याला आवडायचे.

घर विशेष मोठे नव्हते, फक्त चार खोल्यांचे. स्वयंपाक-घराजवळच्या एका खोलीत क्रिस्तो रहात होता. जवळच भोजनखोली होती व पुढे – मोठे ग्रंथालय. इखतीआन्द्रला स्पॅनिश व इंग्लिश भाषा येत होत्या. शेवटची मोठी खोली इखतीआन्द्रची झोपण्याची खोली होती. त्या खोलीच्या मध्य-भागी तलाव होता. भिंतीपाशी पलंग होता. कधी कधी इखतीआन्द्र पलंगावर झोपायचा, पण तलावात झोपणे त्याला जास्त आवडायचे. आठवड्यातून निदान तीन रात्री इखती-आन्द्रला पलंगावर निजायला लाव, अशी जाण्यापूर्वी एकदा साल्वातोरनी क्रिस्तोला ताकीद दिली होती. जर इखतीआन्द्र रात्री पलंगावर झोपण्यास कबूल नसला, तर क्रिस्तो एखाद्या म्हाताऱ्या दाईप्रमाणे त्याच्याशी कटकट करायचा.

"पण पाण्यात झोपणं मला अनेक पटींनी छान आणि सोयीचं वाटतं," इखतीआन्द्र विरोध करायचा.

"डॉक्टरनी हुकूम दिलाय की, तू पलंगावरच झोपायचं, वडिलांची आज्ञा ऐकली पाहिजे."

साल्वातोरना इखतीआन्द्र वडील म्हणत असे, पण त्यांच्या ह्या नात्याच्या खरेपणाविषयी क्रिस्तोला शंका होती. इखती-आन्द्रची चेहऱ्यावरील व हातांवरील कातडी खूप गोरी होती,

पण खूप काळ पाण्यात राहिल्यामुळे ती तशी बनली असल्याचे शक्य होते. इखतीआन्द्रचा उभट चेहरा, सरळ नाक, पातळ ओठ, मोठे चमकणारे डोळे इंडियनांच्या आराऊकान टोळीतील माणसाशी साम्य दाखविणारे होते व स्वतः क्रिस्तो ह्याच टोळीतील होता.

कुठल्यातरी अज्ञात कापडापासून बनविलेल्या खवल्यांच्या पोषाखाखाली इखतीआन्द्रच्या पूर्णपणे दडलेल्या शरीराच्या त्वचेचा रंग कोणता होता, हे पाहण्याविषयी क्रिस्तोला खूप कुतूहल होते.

"रात्रीच्या वेळी तू सदरा काढून ठेवत नाहीस?" एकदा त्याने तरुणाला विचारले.

"कशाला? माझे खवले मला त्रासदायक वाटत नाहीत, उलट खूप सोयीस्कर वाटतात. कल्ल्यांमार्फत आणि कातडी-मार्फत श्वसन करायला ते अडथळा आणत नाहीत, शिवाय संरक्षणासाठी ते उपयोगी पडतात. शार्कचे दात अथवा धारदार सुरा ह्या चिलखताला फाडू शकणार नाहीत," बिछान्यावर निजत इखतीआन्द्र उत्तरला.

"चष्मा आणि हातमोजे तू कशाला वापरतोस?" पलं-गाजवळ पडलेल्या विचित्र हातमोजांकडे पहात क्रिस्तोने विचारले. हिरवट रबरापासून ते बनविलेले होते आणि बोटांदरम्यानचा भाग जाळींनी जोडलेला होता. पायमोजांची बोटे अधिक लांब होती.

"हातमोजांमुळं जलद पोहायला मला मदत होते. तुफाना-वेळी समुद्राच्या तळातून वाळू वर उसळते, तेव्हा डोळयांचं रक्षण चष्मा करतो. मी नेहमी तो वापरत नाही. पण चष्मा लावला म्हणजे पाण्याखाली जास्त स्पष्ट पाहू शकतो. चष्मा नसला तर पाण्याखाली सगळं धुकं पसरल्यासारखं वाटतं." स्मित करीत इखतीआन्द्र पुढे बोलू लागला: "जेव्हा मी

लहान होतो, तेव्हा शेजारच्या बागेत राहणाऱ्या मुलांबरोबर खेळण्याची वडील मला कधी कधी परवानगी देत. हातमोजांशिवाय त्यांना तलावात पोहताना पाहून मला खूप आश्चर्य वाटलं. 'हातमोजांशिवाय कुणी पोहतो का?' मी त्या मुलांना विचारलं. पण कोणत्या हातमोजांबद्दल मी बोलतोय हे त्यांना समजलं नाही, कारण त्यांच्यासमोर मी पोहलो नव्हतो."

"अजूनही तू आखातात पोहतोस?" क्रिस्तोने कुतूहलाने विचारले.

"अर्थात. फक्त एका बाजूच्या पाण्याखालच्या बोगद्यातून पोहत जातो. कुठल्यातरी दुष्ट माणसांनी मला जाळ्यात जवळजवळ पकडलं होतं, तेव्हापासून मी खूप सावध झालोय."

"हं... म्हणजे आखातात जायला दुसरा पाण्याखालचा बोगदा आहे?"

"खूप बोगदे आहेत. पाण्याखाली माझ्याबरोबर तू पोहू शकत नाहीस हे फार वाईट! मी तुला खूप गंमतीदार गोष्टी दाखवल्या असत्या. सगळी माणसं पाण्याखाली का जगू शकत नाहीत? तुझ्याबरोबर आपण माझ्या सागरी घोड्यावरून सफर मारली असती."

"सागरी घोडा? हा काय प्रकार?"

"डोल्फिन. मी त्याला शिकवलंय. बिचारा! एकदा तुफानात लाटांनी त्याला किनाऱ्यावर फेकलं होतं आणि त्याचा पंख मोडला होता. मी त्याला पाण्यात ओढून आणलं. फार अवघड काम होतं ते. पाण्यातल्यापेक्षा जमिनीवर डोल्फिन अनेक पटींनी जड बनतात. एकूण तुमच्या जमिनीवर सगळंच अवजड आहे. स्वतःचं शरीरसुद्धा. पाण्यात राहणं जास्त सोपं. तर त्या डोल्फिनला मी पाण्यात ओढून आणलं, पण त्याला पोहता येईना – म्हणजे त्याला खाणं मिळवणंही शक्य

नव्हतं. मी त्याला सबंध महिनाभर मासे खाऊ घातले. ह्या काळात त्याला माझी नुसती सवयच झाली असं नाही, तर माझ्यावर त्याचा लोभ जडला. आम्ही मित्र बनलो. इतर डोल्फिनसुद्धा मला ओळखतात. डोल्फिनांबरोबर समुद्रात हुंदडायला खूप मजा येते! लाटा, तुषार, ऊन, वारा, गाज! तळाशीसुद्धा छान वाटतं. जणू दाट निळ्या हवेतून पोहतोय असा भास होतो. सारं शांत. स्वतःच्या शरीराची जाणीव होत नाही. ते स्वतंत्र, हलकं बनतं, प्रत्येक हालचाल आज्ञाधारकपणं पार पाडतं... समुद्रात माझे खूप मित्र आहेत. तुम्ही पक्ष्यांना चारता, तसं मी छोट्या माशांना चारतो– ते सगळीकडं माझ्यापाठी थव्यांनी फिरतात."

"आणि शत्रू आहेत?"

"शत्रूसुद्धा आहेत. शार्क, ऑक्टोपस. पण मी त्यांना भीत नाही. माझ्यापाशी सुरा आहे."

"जर अनपेक्षितपणं त्यांनी झडप घातली तर?"

इखतीआन्द्रला ह्या प्रश्नाचे आश्चर्य वाटले.

"पण मला दुरूनच त्यांची चाहूल लागते."

"पाण्याखाली चाहूल लागते?" आता आश्चर्य करण्याची क्रिस्तोची पाळी होती. "ते गुपचूप पोहत येतात तेव्हासुद्धा?"

"होय. यात न समजण्यासारखं काय आहे? मी कानांनी आणि सबंध शरीरानं ऐकतो. कारण ते पाण्यात तरंग निर्माण करतात–त्या लहरी त्यांच्याआधी माझ्यापर्यंत येऊन पोचतात. त्या लहरी जाणवताच मी सभोवती बघतो."

"झोपलेला असतोस तेव्हासुद्धा?"

"अर्थात."

"पण मासे..."

"अचानक हल्ल्यापायी मासे मरत नाहीत, तर जास्त ताकदवान वैऱ्यापासून रक्षण करू शकत नाहीत म्हणून मरतात.

पण मी – मी सर्वांपेक्षा जास्त ताकदवान आहे. समुद्रातल्या हिंस्र प्राण्यांना हे माहीत आहे. माझ्यापाशी पोहत येण्याचं धाडस ते करीत नाहीत."

"झूरीताचं बरोबर आहे: अशा सागरी तरुणाकडून काम करवून घेतलं पाहिजे," क्रिस्तोच्या मनात विचार आला, "पण पाण्यात ह्याला पकडणं सोपं नाही. 'सगळ्या शरीरानं ऐकतो!' उत्तम सापळा लावला पाहिजे. झूरीताला ह्याबाबत सांगितलं पाहिजे."

"पाण्याखालचं जग खूप सुंदर आहे," इखतीआन्द्र पुढे बोलत होता. "छे:, समुद्र सोडून तुमच्या कोंदट, धुळकट जमिनीवर रहायला मी कधीही येणार नाही."

"जमीन आमचीच का? तूसुद्धा जमिनीचा पुत्र आहेस," क्रिस्तो म्हणाला. "तुझी आई कोण होती?"

"मला माहीत नाही..." अनिश्चित स्वरात इखतीआन्द्र म्हणाला. "वडील सांगतात की, जेव्हा मी जन्मलो, तेव्हा आई वारली."

"पण अर्थात ती बाई होती, म्हणजे माणूस होती, मासा तर नव्हती!"

"शक्य आहे," इखतीआन्द्रने कबुली दिली.

क्रिस्तो खो खो हसू लागला.

"आता मला सांग, तू मच्छीमारांच्या खोड्या का काढल्यास, त्यांची जाळी तोडून होड्यांमधले मासे टाकून का दिलेस?"

"कारण ते खाऊ शकतील त्यापेक्षा जास्त मासे त्यांनी धरले होते."

"पण विकण्यासाठी त्यांनी मासे धरले होते."

इखतीआन्द्रला समजले नाही.

"दुसऱ्या माणसांनासुद्धा खायला मिळावेत म्हणून,"

इंडियनाने खुलासा केला.

"म्हणजे खूप माणसं आहेत?" इखतीआन्द्र चकित झाला. "जमिनीवरचे पक्षी आणि प्राणी त्यांना पुरे पडत नाहीत? कशाला ते महासागरावर येतात?"

"तुला हे एकदम समजावून सांगणं मला शक्य नाही," जांभई देत क्रिस्तो म्हणाला. "झोपायची वेळ झाली. खबरदार, तुझ्या टबात घुसू नको. वडील नाराज होतील." आणि क्रिस्तो तेथून निघून गेला.

भल्या सकाळी क्रिस्तोला इखतीआन्द्र आढळला नाही. दगडी फरशी ओली होती.

"परत टबात झोपला," इंडियन बडबडला. "आणि नंतर बहुधा समुद्रात पोहायला गेला."

न्याहरीला इखतीआन्द्र खूप उशीरा आला.

त्याची मनःस्थिती ठीक नव्हती. बीफस्टेकच्या तुकड्यात काटा खुपसत तो म्हणाला:

"परत भाजलेलं मांस!"

"परत," कडक आवाजात क्रिस्तो उत्तरला. "डॉक्टरांनी तशी आज्ञा दिलीय. आणि तू परत समुद्रात पोटभर कच्चे मासे खाल्लेस? अशा रीतीनं भाजक्या अन्नाची तुझी सवयच तुटेल. आणि टबात झोपलास. पलंगावर झोपायची तुझी इच्छा नाही – कल्ल्यांची हवेची सवय जाईल आणि मग बसशील तक्रार करत, की कुशींमध्ये दुखतंय. आणि न्याहरीला यायला उशीर केलास. डॉक्टर आले म्हणजे त्यांच्यापाशी तुझ्याविरुद्ध तक्रार करीन. मुळीच ऐकत नाहीस."

"नको बोलू, क्रिस्तो. त्यांना दुःख देण्याची माझी इच्छा नाही." इखतीआन्द्रने मान खाली घातली व तो विचारात गढला. मग त्याने एकदम स्वतःचे टपोरे, पण ह्यावेळी उदास बनलेले डोळे इंडियनावर रोखले व तो

म्हणाला: "क्रिस्तो, मी एका तरुणीला पाहिलं. एवढी सुंदर यापूर्वी मी कधीही पाहिली नव्हती — महासागराच्या तळाशीसुद्धा ..."

"तर मग आमच्या जमिनीची तू निंदा का केलीस?" क्रिस्तो म्हणाला.

"डोल्फिनवर बसून मी किनाऱ्यालगत पोहत गेलो आणि ब्यूनोस-आयर्सपासून जवळच तिला किनाऱ्यावर बघितलं. तिचे डोळे निळे आहेत आणि केस सोनेरी." इखतीआन्द्र पुढे म्हणाला: "पण मला बघताच ती घाबरली आणि पळून गेली. कशाला मी चष्मा आणि हातमोजे घातले?" थोडा वेळ गप्प राहून तो हळू आवाजात म्हणाला: "एकदा महासागरात बुडालेल्या कुणा एका तरुणीचा जीव मी वाचवला होता. तेव्हा ती कशी दिसत होती ते मी नीट पाहिलं नव्हतं. ही तीच तर नव्हे? मला वाटतं, त्या मुलीचे केससुद्धा सोनेरी होते. होय, होय... मला आठवतं..." तरुण विचारात गढला, मग आरशापाशी गेला आणि आयुष्यात प्रथमच त्याने स्वत:चे रूप न्याहाळले.

"पुढं तू काय केलंस?"

"मी तिची वाट पाहिली, पण ती परतली नाही. क्रिस्तो, खरंच ती परत कधीही किनाऱ्यावर यायची नाही?"

"ह्याला पोरगी आवडतेय हे चांगलं आहे," क्रिस्तोने मनाशी विचार केला. आत्तापर्यंत क्रिस्तोने शहराची कितीही वाखाणणी केली, तरी ब्यूनोस-आयर्सला जाण्याबाबत इखतीआन्द्रचे मन वळविण्यात त्याला यश आले नव्हते. तेथे तरुणाला पकडणे झूरीताला सोपे गेले असते.

"तरुणी कदाचित किनाऱ्यावर येणार नाही, पण तिला शोधून काढण्यात मी तुला मदत करीन. तू शहरी सूट अंगात घाल आणि माझ्याबरोबर शहरात चल."

"आणि मी तिला पाहीन?" इखतीआन्द्र ओरडला.

"तिथं खूप तरुणी आहेत. कदाचित किनाऱ्यावर तुला भेटलेली तरुणीही दिसेल."

"चल आत्ता!"

"आता उशीर झालाय. पायी तेवढं अंतर कापणं सोपं नाही."

"मी डोल्फिनवर बसून येईन आणि तू किनाऱ्यानं चल."

"केवढा अधीर रे तू!" क्रिस्तो उत्तरला. "उद्या पहाटे आपण दोघं एकत्र निघू. तू आखातात पोहत ये आणि मी किनाऱ्यावर तुझा सूट घेऊन वाट पाहतो. तुझ्यासाठी सूट पैदा करायचाय. ('रात्री भावाची भेट घेतली पाहिजे,' क्रिस्तोने मनाशी विचार केला.) तर उद्या पहाटे!"

शहरात

इखतीआन्द्र आखातामधून पोहत किनाऱ्यावर आला. हातात पांढरा सूट घेऊन क्रिस्तो आधीपासूनच त्याची वाट पहात उभा होता. जणू सापाची कातडी आणून दिलीय अशा नजरेने इखतीआन्द्रने त्या सुटाकडे बघितले व सुस्कारा टाकून तो सूट अंगात घालू लागला. क्वचितच त्याला सूट घालावा लागला होता हे स्पष्ट दिसत होते. इंडियनाने त्याचा टाय बांधायला त्याला मदत केली. मग इखतीआन्द्रला त्याने एकदा न्याहाळले व तो खूष झाला.

"चल," क्रिस्तो उत्साहाने म्हणाला.

इखतीआन्द्रला चकित करण्याची क्रिस्तोची इच्छा होती,

म्हणून शहरातील मुख्य रस्त्यांवरून त्याने त्याला फिरविले — अवेनी दे आल्वीर, प्लाझा दे वेर्तिझ, कॅथेड्रलसकटचा व्हिक्टोरिया चौक, मूर धर्तीचा टाऊनहॉल, फूएर्तो चौक आणि स्वातंत्र्यस्तंभ उभारलेला २५ मे चौक*, त्याच्या भोवतालची सुरेख झाडे व प्रेसिडेंटचा प्रासाद.

पण क्रिस्तोचा बेत फसला. गोंगाट, मोठ्या शहरातील वाहतूक, धूळ, उष्मा, गर्दी ह्यांनी इखतीआन्द्रचा जीव बेजार बनला. लोकांच्या जमावांमध्ये तरुणीला शोधण्याचा त्याने प्रयत्न केला. वारंवार क्रिस्तोचा हात पकडून तो हळूच म्हणत होता:

"ती पहा!" पण स्वतःची चूक चटकन त्याच्या ध्यानात यायची. "नाही, ही दुसरीच..."

दुपार झाली. उष्मा असह्य झाला होता. तळघरातील एका छोट्या रेस्तराँमध्ये जाऊन न्याहरी करण्याचा क्रिस्तोने प्रस्ताव मांडला. तेथे थंडावा होता, पण गोंगाट आणि गर्दी होती. गलिच्छ, वाईट कपडे घातलेले लोक उग्र वासाच्या सिगार ओढत होते. धुरामुळे इखतीआन्द्रचा जीव घुसमटला. चुरगळलेली वर्तमानपत्रे फडफडवीत लोक जोरजोरात वाद घालत होते, न समजणाऱ्या शब्दांमध्ये ओरडत होते. इखतीआन्द्र खूप थंड पाणी प्यायला, पण खाद्यपदार्थांना त्याने हात लावला नाही. कष्टी आवाजात तो म्हणाला:

"माणसांच्या ह्या भोवऱ्यात कुणाला शोधून काढण्यापेक्षा महासागरात ओळखीचा मासा शोधणं जास्त सोपं आहे. तुमची शहरं भयानक आहेत! इथं घुसमट होतेय आणि घाण

---

* २५ मे १८१० रोजी ला-प्लाता प्रांतात क्रांतिकारक लष्करी गट स्थापन झाला. स्थानिक सत्ताधाऱ्यांना अटक करून त्याने हंगामी सरकार घोषित केले व स्पेनशी संबंध तोडले. (लेखकाची टीप.)

वास येतात. माझ्या कुशींमध्ये दुखायला लागलंय. क्रिस्तो, मला घरी जायची इच्छा आहे."

"ठीक आहे," क्रिस्तोने संमती दिली. "फक्त माझ्या एका मित्रापाशी डोकावू आणि घरी परतू."

"माणसांकडं जायची माझी इच्छा नाही."

"त्याचं घर आपल्या वाटेवरच आहे. मी फार वेळ थांबणार नाही."

पैसे चुकते करून इखतीआन्द्रसह क्रिस्तो रस्त्यावर आला. मान खाली घालून जड श्वासोच्छ्वास करीत क्रिस्तोपाठोपाठ इखतीआन्द्र चालू लागला. पांढऱ्या घरांजवळून, निवडुंगे, ऑलीवची आणि नासपातीची झाडे असलेल्या बागांजवळून ते जात होते. नव्या बंदराजवळ राहणाऱ्या स्वतःच्या भावाच्या – बाल्ताझारच्या – घरापाशी इंडियन इखतीआन्द्रला आणत होता.

समुद्रापाशी इखतीआन्द्रने आधाशीपणे दमट हवा छातीत भरून घेतली. सूट फेकून समुद्रात उडी घेण्याची त्याला तीव्र इच्छा झाली होती.

"आत्ता पोहोचू," सोबत्याकडे चिंतेने पहात क्रिस्तो म्हणाला.

त्यांनी रेलमार्ग ओलांडला.

"पोचलो. इथं," क्रिस्तो म्हणाला व अर्धवट उजेडाच्या छोट्या दुकानात ते शिरले.

अर्धवट उजेडाची जेव्हा इखतीआन्द्रच्या डोळयांना सवय झाली, तेव्हा त्याने चकित नजरेने भोवती पाहिले. दुकानातील वस्तू समुद्रतळाची आठवण करून देत होत्या. कपाटात आणि फरशीवरसुद्धा वेगवेगळया शिंपल्यांची रास पडली होती. छतावरून प्रवाळांच्या, तारका माशांच्या, सुकवलेल्या खेकड्यांच्या माळा लोंबत होत्या. पेंढा भरलेले काही मासेही

लोंबत होते. काचेच्या पेट्यांमध्ये मोती होते. एका पेटीत गुलाबी मोती होते – पाणबुडे त्यांना "देवदूताची कातडी" म्हणत. परिचित वस्तूंच्या सहवासात इखतीआन्द्रचे मन किंचित शांत झाले.

"विश्रांती घे, इथं गार आणि शांत आहे," एका जुन्या वेताच्या खुर्चीत तरुणाला बसवीत क्रिस्तो म्हणाला.

"बाल्ताझार! गुत्तीएरे!" इंडियन ओरडला.

"क्रिस्तो, तू आहेस काय?" दुसऱ्या खोलीतून आवाज आला. "इकडं ये."

बैठ्या दारामधून आत जाण्यासाठी क्रिस्तो खाली वाकला.

इथे बाल्ताझारची प्रयोगशाळा होती. दमट हवेमुळे मोत्यांची उडून जाणारी चमक परत आणण्यासाठी आम्लाच्या फिक्या मिश्रणात इथे तो मोत्यांना धूत होता. क्रिस्तोने स्वतःच्या पाठी दार पूर्ण बंद करून घेतले. छतावरील छोट्या खिडकीतून मंद प्रकाश पाझरत होता, जुन्या काळवंडलेल्या मेजावरील बाटल्यांना आणि बरण्यांना उजळत होता.

"रामराम बंधू. गुत्तीएरे कुठं आहे?"

"शेजारणीकडून इस्त्री आणायला गेलीय. तिच्या टाळक्यात फक्त लेस आणि फितींचे विचार. आत्ता परतेल," बाल्ताझार उत्तरला.

"आणि झूरीता?" क्रिस्तोने अधीरपणे विचारले.

"कुठंतरी गायब झालाय, हरामखोर. काल आमचं थोडं भांडण झालं."

"गुत्तीएरेपायी?"

"झूरीता तिच्यापुढं लोळण घ्यायला तयार आहे. पण तिचं एकच उत्तर: नाही-नाही. कसं वागणार तिच्याशी? लहरी आणि हट्टी. स्वतःबद्दल फार मोठ्या कल्पना आहेत तिच्या. अगदी सुंदरात सुंदर इंडियन पोरगी अशा माणसाशी

लग्न करायला एका पायावर तयार होईल, हे तिला समजत नाही. स्वत:च्या मालकीचं गलबत आहे, पाणबुड्यांचं पथक पदरी नोकरीला आहे," मिश्रणात मोती बुडवीत बाल्ताझार वटवटत होता. "झूरीता बहुधा चिडीपायी कुठंतरी दारू पीत बसला असावा."

"आता आपण काय करायचं?"

"तू त्याला आणलंस?"

"बाहेर बसलाय."

बाल्ताझार दारापाशी गेला व किल्लीच्या भोकातून कुतूहलाने डोकावून पाहू लागला.

"दिसत नाही," हळू आवाजात तो म्हणाला.

"पुढच्या भागात खुर्चीवर बसलाय."

"नाही दिसत. तिथं गुत्तीएरे आहे."

बाल्ताझारने पटकन दार उघडले व क्रिस्तोसह तो बाहेर दुकानात आला.

इखतीआन्द्र तेथे नव्हता. अंधाऱ्या कोपऱ्यात बाल्ताझारची मानलेली मुलगी गुत्तीएरे उभी होती. नव्या बंदराच्या पलीकडे दूरपर्यंत तिच्या सौंदर्याची ख्याती पसरली होती. पण ती लाजरी होती, स्वत:च्या आवडीनिवडी जपणारी होती. किंचित किनऱ्या, पण ठाम आवाजात ती वारंवार म्हणायची:

"नाही!"

पेद्रो झूरीताला गुत्तीएरे आवडली होती. तिच्याशी लग्न करायची त्याची इच्छा होती. गलबतांच्या मालकाशी नाते जोडून त्याच्या संगतीत वावरायला म्हाताऱ्या बाल्ताझारचा मुळीच विरोध नव्हता.

पण झूरीताच्या सर्व अनुनयांना गुत्तीएरेने सतत ठाम नकार दिले होते.

बाप व क्रिस्तो जेव्हा खोलीत आले, तेव्हा गुत्तीएरे

मान खाली घालून उभी होती.

"नमस्कार, गुत्तीएरे," ख्रिस्तो म्हणाला.

"तरुण माणूस कुठं आहे?" बाल्ताझारने विचारले.

"तरुणांना मी लपवून ठेवत नाही," स्मित करीत ती उत्तरली. "जेव्हा मी आत आले, तेव्हा तो विचित्रपणं माझ्याकडं टक लावून बघत राहिला. मग एकदम घाबरून छाती आवळत उठला आणि पळाला. मला काही कळायच्या आतच तो दाराबाहेर निघून गेला."

"म्हणजे त्याची तरुणी हीच तर!" ख्रिस्तो मनाशी म्हणाला.

परत समुद्रात

श्वास घुसमटलेला इखतीआन्द्र किनाऱ्यालगत धावला. ह्या भयानक शहरापासून अलग होऊन तो रस्त्याच्या वळणाशी वळला आणि थेट समुद्रकिनाऱ्याच्या दिशेने जाऊ लागला. किनाऱ्यावरील खडकांमागे तो लपला, आजूबाजूला पहात त्याने पटकन अंगातील कपडे काढले, खडकांमध्ये सूट लपविला व धावतच पाण्यात उडी घेतली.

खूप दमलेला असूनही एवढ्या वेगाने तो पूर्वी कधी पोहला नव्हता. मासे घाबरून त्याच्यापासून लांब पळाले. शहरापासून काही मैल अंतर पोहून गेल्यानंतरच केवळ इखती-आन्द्र पाण्याच्या पृष्ठभागाशी आला व किनाऱ्याच्या जवळून पोहू लागला. इथे त्याला घरच्यासारखे वाटत होते. समुद्राच्या तळाशी असलेला प्रत्येक खडक, प्रत्येक फट त्याच्या परिचयाची होती. इथे वाळूच्या तळावर घरकोंबडे मोठे सपाट मासे

राहतात. पुढे लाल प्रवाळांची झुडुपे वाढतात आणि स्वतःच्या फांद्यांआड लालपंखी छोट्या माशांना दडवतात. मच्छीमारांच्या ह्या बुडालेल्या बोटीत ऑक्टोपसांच्या दोन कुटुंबांनी वस्ती केली आहे. अलीकडेच त्यांना मुले झालीत. राखी खडकांखाली खेकडे आहेत. त्यांचे आयुष्य तासन् तास निरखून पाहणे इखतीआन्द्रला आवडायचे. यशस्वी शिकारीनंतरचा त्यांचा छोटा आनंद आणि नांगी तुटल्यानंतर अथवा ऑक्टोपसांनी हल्ला केल्यानंतर त्यांना होणारे दुःख इखतीआन्द्रला ठाऊक होते. किनाऱ्यालगतच्या खडकांमध्ये खूप कालव होते.

अखेरीस आखाताच्या जवळच इखतीआन्द्रने पाण्यावरती डोके काढले. लाटांमध्ये डोल्फिन बागडत असलेले त्याने पाहिले आणि एक प्रदीर्घ आरोळी मारली. मोठ्या डोल्फिनने उत्तरादाखल आनंदाने फुरफुराट केला व लाटांमधून बुचकळ्या मारीत, स्वतःची काळी तुकतुकीत पाठ चमकावीत तो मित्रापाशी पोहत गेला.

"लौकर लीडिंग, लौकर!" भेटीसाठी पोहत जात इखतीआन्द्र ओरडला. त्याने डोल्फिनला पकडत म्हटले: "लौकर पुढं पोहत चल, पुढं चल!"

तरुणाच्या हाताच्या इशाऱ्यानुसार वाऱ्याला आणि लाटांना भेटण्यासाठी डोल्फिन उघड्या समुद्राकडे वेगाने पोहत निघाला. फेस उडवीत, छातीने पाणी कापत तो पुढे जात होता, पण इखतीआन्द्रचे ह्या वेगाने समाधान होत नव्हते.

"काय रे लीडिंग! वेगात, आणखी वेगात!"

इखतीआन्द्रने डोल्फिनला कमाल वेगाने पिटाळले, पण लाटांवरच्या ह्या सफरीने तो मुळीच शांत झाला नाही. मित्राच्या सुळसुळीत पाठीवरून खाली घसरून तो समुद्रात निघून गेला आणि एकटा राहिलेला डोल्फिन गोंधळला. डोल्फिन थोडा वेळ वाट पहात थांबला, त्याने फुरफुर केली,

पाण्यात बुडी मारली, तो पोहला, परत एकदा नाराजीने फुरफुरला, मग शेपटी वळवून किनाऱ्याकडे निघाला ; जाताना तो अधूनमधून मागे वळून पहात होता. त्याचा मित्र पाण्यावरती दिसला नाही आणि आनंदाने बागडणाऱ्या तरुण डोल्फिनांच्या कळपात लीडिंग सामील झाला. महासागराच्या अंधाऱ्या खोल पाण्यात इखतीआन्द्र अधिक खाली खाली जात होता. त्याला एकटे राहण्याची इच्छा होती, नव्या अनुभवांमधून परत थाऱ्यावर यायचे होते, त्याने पाहिलेल्या आणि जाणून घेतलेल्या सर्व गोष्टींचा त्याला निवाडा करायचा होता. धोक्याचा विचार न करता तो खूप दूर पोहत गेला. सर्वांप्रमाणे तो काही नाही – समुद्रात आणि जमिनीवरही तो परका का आहे – हे समजून घ्यायची त्याची इच्छा होती.

सावकाशपणे तो खाली जात होता. पाणी अधिक दाट बनले होते, आता ते त्याला दाबत होते, श्वासोच्छ्वास करणे अधिक अवघड जात होते. इथे दाट हिरव्या-राखी संध्याछाया पसरल्या होत्या. सागरी प्राणी कमी होते आणि त्यांच्यापैकी अनेक इखतीआन्द्रला अनोळखी होते. एवढ्या खोल पाण्यात यापूर्वी कधी तो गेला नव्हता. ह्या मूक अंधाऱ्या जगाची इखतीआन्द्रला प्रथमच भीती वाटली. तो पटकन वरती चढला आणि किनाऱ्याकडे पोहू लागला. सूर्य मावळला होता, त्याची लाल किरणे पाण्यावर पसरली होती. पाण्यात घुसलेली किरणे निळ्या पाण्यात मिसळली गेली आणि नाजुक जांभळट-गुलाबी व हिरवट-निळ्या छटा चमकू लागल्या.

इखतीआन्द्रने चष्मा लावला नव्हता व त्यामुळे माशांना जसा खालून समुद्राचा पृष्ठभाग दिसतो, तसा त्याला दिसत होता. पाण्याखालून वरचा भाग सपाट दिसत नव्हता, तर शंक्वाकृती दिसत होता – जणू तो एका प्रचंड नसराळ्याच्या तळाशी होता. ह्या शंकूच्या कडांना लाल, पिवळी, हिरवी,

निळी आणि जांभळी वर्तुळे असल्याचे भासत होते. त्या पलिकडे पाण्याचा तेजस्वी पृष्ठभाग चमकत होता व त्यात आरशाप्रमाणे पाण्याखालील खडकांची, वनस्पतींची आणि माशांची प्रतिबिंबे पडली होती.

इखतीआन्द्र पालथा झाला, किनाऱ्याकडे पोहत गेला व उथळ तळापासून जवळच असलेल्या पाण्याखालच्या खडकांवर बसला. मच्छीमारांनी होडीतून पाण्यात उड्या मारल्या आणि होडी किनाऱ्यावर ओढून घेतली. त्यांच्यापैकी एकाने गुडघ्यापर्यंत पाय पाण्यात सोडले. इखतीआन्द्रला पाण्यावरती बिनपायांचा मच्छीमार दिसला व पाण्यात फक्त त्याचे पाय. पाण्याच्या पृष्ठाच्या आरशात त्यांचे प्रतिबिंब पडले होते. दुसरा मच्छीमार खांद्यांपर्यंत पाण्यात उतरला. पाण्यात बिनडोक्याचा, चार पायांचा विचित्र प्राणी दिसू लागला. जणू दोन सारख्या दिसणाऱ्या माणसांची मुंडकी उडविली होती व एका माणसाचे खांदे दुसऱ्या माणसाला चिकटवले होते. जेव्हा माणसे किनाऱ्यापाशी येत तेव्हा इखतीआन्द्र त्यांना माशांच्या नजरेने पहायचा: पायांपासून डोक्यांपर्यंत काचेच्या चेंडूमधून पाहिल्याप्रमाणे. त्यांनी त्याला पाहण्यापूर्वीच पाण्यात बुडी मारून पोहत जाणे त्यामुळे त्याला शक्य व्हायचे.

ही बिनडोक्यांची चार पायांची धडे आणि धडांविना डोकी पाहणे आता इखतीआन्द्रला अप्रिय वाटले. लोक... फार गोंगाट करतात, भयानक सिगार ओढतात, त्यांना घाण वास येतात. नाही, त्यापेक्षा डोल्फिन जास्त चांगले — ते स्वच्छ आणि आनंदी आहेत. एकेकाळी डोल्फिनचे दूध तो कसा प्यायला होता त्या आठवणीने इखतीआन्द्रच्या मुद्रेवर स्मित उमटले.

दूर दक्षिणेला एक छोटा उपसागर आहे. पाण्याखालील खडकांचे टोकदार सुळके आणि वाळूचा वळणदार पट्टा

ह्यामुळे समुद्रातील जहाजांना त्याच्या किनाऱ्याला जाणे शक्य होत नाही. तेथील किनारा खडकाळ आहे. मच्छीमार अथवा मोती वेचणारे पाणबुडे ह्या जागी जात नाहीत. फार खोल नसलेल्या तळाशी दाट वनस्पतींचा गालीचा अंथरलेला आहे. उबदार पाण्यात खूप मासे आहेत. इथे एक डोल्फिन मादी अनेक वर्षेपर्यंत नियमितपणे पोहत यायची आणि ह्या उबदार पाण्यात पिले व्यायची – दोन, चार आणि कधी कधी सहासुद्धा. त्या डोल्फिन पिलांचे इखतीआन्द्रला खूप आकर्षण वाटायचे. वनस्पतींआड लपून स्तब्धपणे तासचे तास तो त्या पिलांचे निरीक्षण करायचा. पिले मजेने कधी पाण्यावरती हुंदडायची, तर कधी आईच्या स्तनांना लुचायची, एकमेकांना तोंडांनी ढकलायची. इखतीआन्द्रने सावधपणे त्यांना माणसाळवायला आरंभ केला: छोटे मासे पकडून तो डोल्फिनच्या पिलांना चारायचा. हळूहळू त्या पिलांना व मादीला इखतीआन्द्रची सवय झाली. आता तो पिलांशी बागडायचा, त्यांना पकडायचा, हवेत उडवायचा. त्यांना हे आवडत होते असे दिसले – ती त्याच्यापासून दूर होत नसत आणि चवदार मासे अथवा त्याहून चवदार छोटया ऑक्टोपसांचा खाऊ घेऊन जेव्हा तो उपसागरात यायचा, तेव्हा ती कळपाने त्याच्यापाशी लगबग पोहत जायची.

एकदा ह्या ओळखीच्या डोल्फिन मादीला पिले झाली होती आणि ती खूप लहान असल्यामुळे अजून फक्त दूध पीत होती – छोटे मासे खाणे त्यांना जमत नव्हते. इखतीआन्द्रने विचार केला: डोल्फिनच्या दुधाची चव त्याने का बरे चाखू नये?

तो हळूच चाहूल न लागेल अशा रीतीने मादीच्या अंगाखाली गेला आणि हातांनी तिला धरून तिच्या स्तनाच्या बोंडीतून दूध चोखू लागला. अशा आक्रमणाची मादीला

अपेक्षा नव्हती आणि घाबरून ती तेथून पळाली. इखतीआन्द्रने तात्काळ भेदरलेल्या मादीला सोडले. दुधाला माशाचा उग्र दर्प येत होता.

घाबरलेली मादी अनपेक्षित परक्या पिलापासून सुटून पाण्यात दूर कुठेतरी गायब झाली व बावरलेली तिची पिले चारी दिशांना पळापळ करू लागली. त्या बावळट पिलांना एकत्र आणण्यात इखतीआन्द्रचा खूप वेळ गेला. दरम्यान पिलांची आई परतली व शेजारच्या खाडीत त्यांना घेऊन गेली. केवळ अनेक दिवस उलटल्यानंतरच त्याने त्या डोल्फिन कुटुंबाचा विश्वास व मैत्री परत मिळविली.

क्रिस्तो उगाच अस्वस्थ बनला नव्हता. इखतीआन्द्र तीन दिवस गायब होता. तो परत आला तेव्हा थकलेला होता, पांढुरका दिसत होता, पण मजेत होता.

"तू कुठं नाहीसा झालास?" इखतीआन्द्र परत आल्यामुळे आनंदित झालेल्या इंडियनाने कठोर आवाजात विचारले.

"तळाशी..." इखतीआन्द्र उत्तरला.

"असा फिकट का दिसतोस?"

"मी... मी मरता मरता वाचलो," आयुष्यात प्रथमच इखतीआन्द्र खोटे बोलला आणि फार पूर्वीच घडून गेलेली एक हकीकत त्याने क्रिस्तोला सांगितली.

महासागराच्या खोल तळाशी खडकाळ पठार आहे आणि मध्यभागी एक उभट पोकळी आहे – अस्सल पाण्याखालचे डोंगरी सरोवर.

इखतीआन्द्र ह्या पाण्याखालच्या सरोवरावरून पोहत जात होता. त्याच्या तळाचा आगळा फिकट राखाडी रंग पाहून तो चकित झाला होता. आणखी खाली जाऊन न्याहाळल्यानंतर

त्याचे आश्चर्य वाढले: तेथे वेगवेगळ्या सागरी प्राण्यांची साक्षात स्मशानभूमी होती – छोट्या माशांपासून ते शार्क आणि डोल्फिनांपर्यंत. अगदी अलिकडे मेलेले मासेही इथे होते. पण नेहमीप्रमाणे त्यांच्याभोवती खेकडे व माशांसारखे छोटे हिंस्र प्राणी घोटाळत नव्हते. सर्व मृत आणि निश्चल होते. फक्त कुठे कुठे तळातून वरती वायूचे बुडबुडे उमटत होते. इखतीआन्द्र पोकळीच्या वरच्या कडेशी पोहत होता. तो आणखी खाली गेला आणि अनपेक्षितपणे त्याच्या कल्ल्यांना जोरदार वेदना झाली, त्याचा जीव घुसमटला, त्याचे डोके गरगरले. त्याची जवळजवळ शुद्ध हरपली व पोकळीच्या काठावर तो गटांगळ्या खाऊ लागला. कानशीले ठणकत होती, काळीज धडधडत होते, डोळ्यांसमोर तांबडे धुके पसरले. कुणाच्याही मदतीची अपेक्षा धरण्यात अर्थ नव्हता. तेवढ्यात एक शार्क मासा त्या पोकळीत पडल्यानंतर तडफडत असलेला त्याने पाहिला. बहुधा तो मासा इखतीआन्द्रची शिकार करायला आला होता, पण चुकून ह्या पाण्याखालील सरोवराच्या विषारी पाण्यात तो सापडला होता. त्याचे पोट व त्याच्या कुशी धपापत होत्या, तोंडाचा आ वासला होता, त्याचे शुभ्र टोकदार दात उघडे पडले होते. शार्क मेला. इखतीआन्द्र शहारला. घट्ट जबडा मिटून, कल्ल्यांमधून पाणी आत न घेण्याचा प्रयत्न करीत इखतीआन्द्र त्या सरोवरा-मधून हाता-पायांवर सरपटत किनाऱ्यावर आला, मग वरती आला. त्याचे डोके गरगरले आणि तो परत पडला. मग राखी दगडांपासून पाय फरफटत, हातांनी रेटत त्या सरोवरा-च्या सीमेपासून दहा मीटर दूर अंतरावर तो पोहोचला...

हकीकत संपविल्यानंतर इखतीआन्द्रने आणखी त्याला सा-ल्वातोरांकडून समजलेली माहिती पुढे सांगितली.

"बहुधा ह्या पोकळीत काही विषारी वायूंचे साठे बनलेत–

कदाचित हायड्रोजन सल्फाईड किंवा कार्बन ॲन्हीड्रिड," इखतीआन्द्र म्हणाला. "तुला माहीत आहे, महासागराच्या पृष्ठावरती हे वायू प्राणिल बनतात आणि त्यांचं अस्तित्व जाणवत नाही. पण पोकळीत जिथं ते निर्माण होतात, तिथं जोरदार एकवटलेले असतात. आता मला न्याहरी दे, खूप भूक लागलीय."

घाईने न्याहरी करून इखतीआन्द्रने चष्मा व हातमोजे चढविले आणि तो दारांपाशी गेला.

"तू त्यांच्यासाठीच आला होतास?" चष्म्याकडे बोट दाखवीत क्रिस्तोने विचारले. "तुझं काय बिनसलंय ते सांगत का नाहीस?"

इखतीआन्द्रच्या स्वभावात नवा पैलू निर्माण झाला: तो लपवाछपवी करू लागला.

"नको विचारू क्रिस्तो, माझं काय बिनसलंय, मलाच समजत नाही." आणि तो पटकन खोलीबाहेर गेला.

छोटा सूड

मोतीविक्या बाल्ताझारच्या दुकानात निळ्या डोळ्यांची तरुणी अनपेक्षित भेटल्यामुळे इखतीआन्द्र कमालीचा गोंधळला, दुकानातून बाहेर पळाला व समुद्राकडे धावला. आता त्या तरुणीशी परत ओळख करून घेण्याची त्याला इच्छा झाली होती, पण ही गोष्ट कशी करायची हे त्याला माहीत नव्हते. क्रिस्तोला बोलावून त्याच्याबरोबर जाणे सर्वांत सरळ मार्ग होता. पण क्रिस्तोच्या उपस्थितीत तिची भेट घेण्याची त्याची इच्छा नव्हती. त्या तरुणीला पहिल्या वेळी तो जेथे भेटला

होता, त्या जागी इखतीआन्द्र रोज किनाऱ्यावर पोहत जात होता. तिला भेटण्याच्या आशेने किनाऱ्यानजीकच्या खडकांमागे सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो लपून बसत होता. किनाऱ्यापर्यंत पोहत आल्यानंतर तो चष्मा व हातमोजे काढून ठेवायचा, पांढरा सूट अंगात घालायचा. असे करण्यामागे तरुणी घाबरू नये हा त्याचा हेतू होता. अनेकदा तो पूर्ण चोवीस तास किनाऱ्यावर व्यतीत करायचा, रात्रीच्या वेळी समुद्रात रहायचा, मासे व कालव खायचा, सावध डुलकी काढायचा आणि भल्या सकाळी सूर्योदयापर्यंत पुन्हा स्वतःच्या पहाऱ्याच्या जागी जाऊन बसायचा.

एके संध्याकाळी त्याने मोतीविक्र्याच्या दुकानात जाण्याचा निर्णय घेतला. दारे उघडी होती, पण दुकानाच्या पुढे म्हातारा इंडियन बसलेला होता – तरुणी तेथे नव्हती. इखतीआन्द्र किनाऱ्यावर परतला. खडकाळ किनाऱ्यावर तलम पांढऱ्या फ्रॉकमध्ये व डोक्यावर गवती टोपी घालून तरुणी उभी होती. तिच्यापाशी जावे अथवा न जावे ह्याचा मनाशी निर्णय न झाल्यामुळे इखतीआन्द्र थबकला. तरुणी कुणाची तरी वाट पहात होती. अधीरपणे ती पुढे-मागे येरझाऱ्या मारीत होती व वारंवार रस्त्याकडे नजरा टाकीत होती. खडकाच्या पायथ्याशी उभ्या असलेल्या इखतीआन्द्रकडे तिचे लक्ष गेले नाही.

तरुणीने कुणाला तरी उद्देशून हात हलविला. इखतीआन्द्रने पाहिले – रस्त्यावरून एक तरुण, उंच, रुंद खांद्यांचा माणूस भरभर चालत येत होता. ह्या अनोळखी माणसासारखे फिकट केस व डोळे इखतीआन्द्रने पूर्वी कधी पाहिले नव्हते. तो धिप्पाड तरुण तरुणीपाशी आला व रुंद हात तिच्यासमोर धरत प्रेमळ आवाजात म्हणाला:

"नमस्कार, गुत्तीएरे."

"नमस्कार, ओल्सेन!" ती उत्तरली.

अनोळखीने गुत्तीएरेचा छोटुकला हात घट्ट दाबला.

इखतीआन्द्र त्यांच्याकडे असूयेने पहात होता. तो दु:खी बनला, अगदी रडायच्या बेतात आला.

"आणलंस?" गुत्तीएरेच्या मोत्यांच्या माळेकडे पहात धिप्पाडाने विचारले.

तिने होकारार्थी मान हलविली.

"वडलांना कळणार नाही?" ओल्सेनने विचारले.

"नाही," तरुणी उत्तरली "हे माझे स्वत:चे मोती आहेत. मला हवी तशी मी त्यांची विल्हेवाट लावू शकते."

हळू आवाजात बोलत ओल्सेन आणि गुत्तीएरे कड्याच्या टोकापाशी चालत गेली. मग गुत्तीएरेने मोत्यांची माळ गळ्यामधून काढली, दोऱ्याचे एक टोक धरून तिने हात उंचावला आणि माळेकडे कौतुकाने पहात ती म्हणाली:

"बघ, मावळतीच्या प्रकाशात मोती किती सुंदर चमकताहेत. घे, ओल्सेन..."

ओल्सेनने हात पुढे केला, पण तेवढ्यात गुत्तीएरेच्या हातून माळ सुटली व समुद्रात पडली.

"काय केलं मी हे!" तरुणी किंचाळली.

दु:खी बनलेली गुत्तीएरे व ओल्सेन समुद्रापाशी उभी होती.

"कदाचित ती माळ शोधता येईल?" ओल्सेन म्हणाला.

"इथं पाणी खूप खोल आहे," गुत्तीएरे म्हणाली आणि पुढे बोलली: "किती दुर्दैवाची गोष्ट, ओल्सेन!"

तरुणी खूप कष्टी झाल्याचे इखतीआन्द्रने पाहिले. त्या फिकट केसवाल्या धिप्पाडाला ती तरुणी मोत्यांची माळ भेट देऊ इच्छित होती, ह्या वस्तुस्थितीचा त्याला तात्काळ विसर पडला. तिच्या दु:खाबाबत निर्विकार राहणे इखतीआन्द्रला अशक्य ठरले: तो खडकांमागून बाहेर पडला व ठामपणे गुत्तीएरेपाशी गेला.

ओल्सेनच्या कपाळाला आठ्या पडल्या, पण गुत्तीएरे कुतूहलाने आणि आश्चर्याने इखतीआन्द्रकडे पाहू लागली. दुकानातून एकदम पळून गेलेला तरुण हाच होता हे तिने ओळखले.

"तुमच्या हातून मोत्यांची माळ समुद्रात पडलीय ना?" इखतीआन्द्रने विचारले. "तुमची इच्छा असेल, तर मी शोधून देतो."

"माझे वडील उत्तम मोतीवेचे पाणबुडे आहेत, पण इथं त्यांनासुद्धा ती माळ सापडणं शक्य नाही," तरुणीने प्रत्युत्तर केले.

"मी प्रयत्न करतो," इखतीआन्द्र नम्रपणे उत्तरला. आणि गुत्तीएरेला व तिच्या सोबत्याला आश्चर्यात पाडून इखतीआन्द्रने अंगावरच्या सुटासकट उंच कड्यावरून थेट समुद्रात उडी मारली आणि लाटांआड तो अदृश्य झाला.

ओल्सेनला काय विचार करावा हेच उमजेना.

"कोण आहे हा? कुठून उगवला?"

एक मिनिट सरले, दुसरे मिनिट संपले, पण तरुण परतला नाही.

"मेला," लाटांकडे पहात गुत्तीएरे घाबरून म्हणाली.

तो पाण्याखाली जगू शकतो हे त्या तरुणीला माहीत व्हावे, अशी इखतीआन्द्रची इच्छा नव्हती. शोधाच्या नादात त्याला वेळेचे भान राहिले नाही आणि सर्वसामान्य पाणबुड्यापेक्षा जास्त काळ तो पाण्याखाली राहिला. पाण्यावरती येत इखतीआन्द्र सस्मित म्हणाला:

"जरा धीर धरा. तळाशी खडकांच्या खूप कपारी आहेत, शोधणं अवघड जातंय. पण मी नक्की शोधीन." आणि त्याने परत पाण्यात बुडी मारली.

मोती वेचण्याच्या प्रसंगी गुत्तीएरे अनेकदा हजर होती.

तिला आश्चर्य वाटले की, पाण्यात जवळ जवळ दोन मिनिटे राहिलेल्या तरुणाचा श्वास नियमित होता आणि तो मुळीच थकलेला दिसला नव्हता.

आणखी दोन मिनिटांनंतर इखतीआन्द्रचे डोके परत पाण्यावरती दिसले. त्याच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. पाण्यावरती हात उचलून त्याने मोत्यांची माळ दाखविली.

"खडकांच्या सुळक्यावर अडकली होती," मुळीच धापा न टाकता, जणू दुसऱ्या खोलीतून चालत यावे अशा स्पष्ट सरळ आवाजात इखतीआन्द्र म्हणाला. "जर कपारीत खाली पडली असती, तर मात्र आणखी पुढं जावं लागलं असतं."

तो पटकन खडक चढून वर आला, गुत्तीएरेपाशी गेला व त्याने तिला मोत्यांची माळ दिली. त्याच्या कपड्यांमधून पाणी निथळत होते, पण त्याने तिकडे लक्ष दिले नाही.

"घ्या."

"मी तुमची फार आभारी आहे," गुत्तीएरे म्हणाली व नव्या कुतूहलाने ह्या तरुणाकडे पाहू लागली.

मौन पसरले. पुढे काय करावे हे त्या तिघांनाही उमजत नव्हते. इखतीआन्द्रसमोर ती मोत्यांची माळ ओल्सेनला देण्याचा गुत्तीएरेला धीर होत नव्हता.

"मला वाटतं, हे मोती तुम्ही ह्याला देऊ इच्छित होतात," ओल्सेनकडे बोट दाखवीत इखतीआन्द्र म्हणाला.

ओल्सेनचा चेहरा शरमेने लाल झाला. गोंधळून गुत्तीएरे म्हणाली: "हो," आणि तिने मोत्यांची माळ ओल्सेनपुढे धरली. ओल्सेनने मुकाटपणे माळ घेतली व खिशात टाकली.

इखतीआन्द्र खूष झाला होता. त्याने हा छोटा सूड उगविला होता. हरवलेली माळ ओल्सेनला गुत्तीएरेच्या हातून जरी मिळाली होती, तर प्रत्यक्षात इखतीआन्द्रने ती दिली होती.

तरुणीला अभिवादन करून इखतीआन्द्र भराभर पावले टाकीत रस्त्यावरून गेला.

पण ह्या यशाचा आनंद इखतीआन्द्रच्या मनात फार काळ टिकला नाही. त्याच्या डोक्यात नवे विचार व प्रश्न निर्माण झाले. लोकांबद्दल त्याला फारशी माहिती नव्हती. हा फिकट केसांचा धिप्पाड कोण? गुत्तीएरे स्वतःची मोत्यांची माळ त्याला का देते? कड्याच्या माथ्यावर ती दोघे कशाबद्दल बोलली?

ह्या रात्री इखतीआन्द्र परत डोल्फिनबरोबर लाटांवरून भटकला आणि अंधारात स्वतःच्या आरोळ्यांनी त्याने मच्छीमारांना घाबरवून टाकले.

दुसरा सबंध दिवस इखतीआन्द्रने पाण्याखाली काढला. चष्मा लावून, पण हातमोजे न घालता वाळूच्या तळावर मोत्यांचे शिंपले शोधत तो रांगत होता. संध्याकाळी तो क्रिस्तोला भेटला, तेव्हा क्रिस्तो नाराजीने त्याला खूप बोलला. सकाळी पुन्हा अंगात सूट चढवून कालच्या जागी गुत्तीएरे व ओल्सेन भेटले होते तेथे इखतीआन्द्र उभा राहिला. संध्याकाळी मावळतीच्या सुमाराला कालच्याप्रमाणेच गुत्तीएरे प्रथम आली.

इखतीआन्द्र खडकामागून बाहेर आला व तरुणीपाशी गेला. त्याला पाहताच परिचिताला अभिवादन करावे तसे गुत्तीएरेने मान झुकवून अभिवादन केले व स्मित करीत तिने विचारले:

"तुम्ही माझ्या पाळतीवर आहात?"

"होय," इखतीआन्द्रने सरळ उत्तर दिले. "पहिल्यांदा तुम्हाला पाहिलं होतं तेव्हापासून..." आणि काहीसे गोंधळून तो पुढे म्हणाला: "तुम्ही स्वतःची मोत्यांची माळ त्याला... ओल्सेनला देऊन टाकलीत. पण त्याला माळ देण्यापूर्वी तुम्ही

तिच्याकडं कौतुकानं पहात होतात. तुम्हाला मोती आवडतात?"

"होय."

"तर मग हा घ्या – माझ्याकडून." आणि त्याने तिच्यासमोर मोती धरला.

गुत्तीएरेला मोत्यांची पारख उत्तम होती. इखतीआन्द्रच्या तळव्यावरील मोती तिने आत्तापर्यंत पाहिलेल्या अथवा वडिलांकडून ऐकलेल्या सर्व मोत्यांपेक्षा श्रेष्ठ होता. विशुद्ध शुभ्र रंगाचा तो प्रचंड, डौलदार मोती किमान दोनशे कॅरट वजनाचा होता आणि त्याची किंमत किमान दहा लाख सोन्याचे पेसो होती. चकित झालेली गुत्तीएरे त्या आगळ्या मोत्याकडे व समोर उभ्या राहिलेल्या सुंदर तरुणाकडे आळीपाळीने पहात राहिली. बळकट, चपळ, निरोगी, पण काहीसा लाजरा, चुरगळलेल्या पांढऱ्या सुटातील हा तरुण ब्यूनोस-आयर्समधील श्रीमंत तरुणांसारखा दिसत नव्हता. आणि तिच्यासारख्या अनोळखी तरुणीला तो एवढी मौल्यवान भेटवस्तू देऊ इच्छित होता.

"घ्या ना," इखतीआन्द्र चिकाटीने परत म्हणाला.

"नाही," मान हलवीत गुत्तीएरे म्हणाली. "मी तुमच्याकडून एवढी भारी भेटवस्तू घेऊ शकत नाही."

"ही भेट मुळीच भारी नाही," इखतीआन्द्र आवेशाने म्हणाला. "महासागराच्या तळाशी असे हजारो मोती आहेत."

गुत्तीएरेने स्मित केले. इखतीआन्द्र गोंधळला, शरमला आणि थोड्या मौनानंतर पुढे म्हणाला:

"मी तुम्हाला विनंती करतो."

"नाही."

इखतीआन्द्रच्या कपाळाला आठ्या पडल्या. तो अपमानीत झाला होता.

"जर तुम्हाला नको असेल," इखतीआन्द्र म्हणाला, "तर त्याच्यासाठी घ्या... ओल्सेनसाठी. तो नकार द्यायचा नाही."

गुत्तीएरेला राग आला.

"तो स्वतःसाठी घेत नाही," कठोरपणे ती उत्तरली. "तुम्हाला काहीही माहीत नाही."

"तर मग, नाही?"

"नाही."

तेव्हा इखतीआन्द्रने दूर समुद्रात तो मोती भिरकावून दिला, त्याने मुकाट मान हलविली व मागे वळून तो रस्त्यावरून चालू लागला.

त्याच्या ह्या कृतीने गुत्तीएरे स्तंभित झाली. मुळीच न हलता ती निश्चल उभी होती. साधा खडा फेकावा, तशी दहा लाखांची वस्तू समुद्रात फेकून दिली! तिला शरम वाटली. ह्या विचित्र तरुणाला तिने कशाला कष्टी केले?

"थांबा, कुठं चाललात?"

पण मान खाली घालून इखतीआन्द्र पुढे चालत राहिला. गुत्तीएरेने त्याला गाठले, त्याचा हात धरला आणि त्याच्या चेहऱ्यावर नजर टाकली. तरुणाच्या गालांवरून आसवे ओघळत होती. यापूर्वी तो कधीही रडला नव्हता आणि जणू पाण्याखाली चष्म्याविना पोहताना जसे सभोवताली धूसर दिसते, तसे आत्ता का दिसत होते हे त्याला उमजेना.

"माफ करा, मी तुम्हाला दुखवलं," त्याचे दोन्ही हात पकडत तरुणी म्हणाली.

झूरीताचा अधीरपणा

ह्या प्रसंगानंतर दररोज संध्याकाळी शहरापासून जवळच असलेल्या किनाऱ्यापर्यंत इखतीआन्द्र पोहत जायचा, दगडां-मध्ये लपवून ठेवलेला सूट बाहेर काढायचा, सूट अंगात चढवा-यचा व कड्यावर जायचा. तेथे गुत्तीएरे यायची. ती दोघे किनाऱ्यालगत फिरायची, तावातावाने चर्चा करायची. गुत्तीए-रेचा नवा मित्र कोण होता? ती हे सांगू शकली नसती. तो मूर्ख नव्हता, चतुर होता, गुत्तीएरेला माहीत नसलेल्या खूप गोष्टी त्याला ठाऊक होत्या, पण त्याचवेळी प्रत्येक शहरी पोराला माहीत असलेल्या साध्या गोष्टी त्याला ठाऊक नव्हत्या. ह्याचा खुलासा कसा करायचा? इखतीआन्द्र स्वतः-बद्दल अनिच्छेने बोलायचा. खरे सांगण्याची त्याची इच्छा नव्हती. तरुणीला एवढेच माहीत होते की, इखतीआन्द्र एका डॉक्टरचा मुलगा होता, खूप सधन माणसाचा मुलगा होता. त्याने मुलाचा शहरापासून आणि माणसांपासून दूर सांभाळ केला होता व त्याला वेगळे, एकांगी शिक्षण दिले होते.

कधी कधी ती दोघे खूप वेळपर्यंत किनाऱ्यावर बसून रहात. त्यांच्या पायांशी लाटा खळखळत फुटायच्या. आकाशात तारे चमचम करायचे. संभाषण विरत जायचे. इखतीआन्द्र खूप सुखात होता.

"जायची वेळ झाली," तरुणी म्हणाली.

इखतीआन्द्र अनिच्छेने उठला, तिला उपनगरापर्यंत त्याने सोबत केली, मग घाईघाईने तो परतला, सूट फेकून घरी पोहत आला.

सकाळी न्याहरीनंतर त्याने मोठ्ठा पांढरा पाव बरोबर घेतला व तो आखाताकडे गेला. वाळूच्या तळावर बसून तो

छोटया माशांना पाव खाऊ घालू लागला. मासे त्याच्याकडे थव्यांनी पोहत आले, त्याला त्यांनी वेढा घातला, त्याच्या हातांमधून सुळकांड्या मारल्या व त्याच्या थेट हातांमधून ओल्या पावाचे लचके ते तोडू लागले. कधी कधी मोठे मासे ह्या थव्यांमध्ये घुसून छोटया माशांना पळवून लावत होते. इखतीआन्द्र उठून हिंस्र माशांना हातांनी हाकलू लागला व छोटे मासे त्याच्या पाठीशी दडून बसले.

तो मोती गोळा करू लागला आणि पाण्याखालील एका गुंफेत त्यांचा साठा करू लागला. तो आनंदाने काम करीत होता व लौकरच निवडक मोत्यांचा मोठा ढीग त्याने जमविला.

त्याच्या नकळत तो अर्जेंटिनामधील — कदाचित संपूर्ण दक्षिण अमेरिकेतील — सर्वांत धनिक माणूस बनत होता. त्याची इच्छा असती, तर तो जगातील सर्वांत श्रीमंत माणूस बनू शकला असता. पण श्रीमंतीबद्दल त्याच्या मनात विचार नव्हते.

असे शांत दिवस चालले होते. गुत्तीएरे धुळीच्या, घुसमटवून टाकणाऱ्या, गोंगाटी शहरात रहात होती, एवढी एकच गोष्ट इखतीआन्द्रला आवडत नव्हती. गोंगाटापासून आणि लोकांपासून दूर पाण्याखाली जर ती राहू शकली असती! किती छान झाले असते! त्याने तिला नवे, अज्ञात जग दाखविले असते, पाण्याखालील मैदानातील सुंदर फुले दाखविली असती. पण गुत्तीएरे पाण्याखाली जगू शकत नाही. आणि तो जमिनीवर जगू शकत नाही. आधीच तो हवेमध्ये फार काळ राहतोय. त्याची किंमत तो मोजतो आहे: समुद्रकिनाऱ्यावर तरुणीबरोबर बसल्यानंतर त्याच्या कुशीत वारंवार व जोराने दुखू लागले आहे. पण दुखणे असह्य झाले तरी ती तरुणी स्वत: जाईपर्यंत तो उठत नाही. आणखी एक गोष्ट इखतीआन्द्रला अस्वस्थ करतेय: फिकट केसांच्या धिप्पाड तरुणाबरोबर

गुत्तीएरे कशाबद्दल बोलली होती? दरवेळी हा प्रश्न विचारण्याची त्याला इच्छा होते, पण गुत्तीएरे अपमानीत होईल अशा भीतीने तो बोलत नाही.

एकदा संध्याकाळी तरुणीने इखतीआन्द्रला सांगितले की, दुसऱ्या दिवशी ती येणार नाही.

"का?" कपाळाला आठ्या घालीत त्याने विचारले.

"मी कामात आहे."

"कसल्या कामात?"

"एवढ्या चौकशा माणसानं करू नयेत," स्मित करीत तरुणी उत्तरली. "मला सोडायला सोबत येऊ नका," ती पुढे म्हणाली व निघून गेली.

इखतीआन्द्र समुद्रात शिरला. सबंध रात्र शेवाळमाखल्या दगडांवर तो निजून राहिला. तो उदास बनला होता. पहाटे तो घराकडे पोहत गेला.

आखाताच्या जवळच मच्छीमार होड्यांमधून गोळीबार करून डोल्फिनांची शिकार करीत असल्याचे त्याने पाहिले. गोळीची जखम झालेला मोठा डोल्फिन पाण्यावर उंच उडाला आणि धप्पदिशी पाण्यात कोसळला.

"लीडिंग!" घाबरून इखतीआन्द्र पुटपुटला.

एका मच्छीमाराने एव्हाना होडीतून समुद्रात उडी मारली होती व जखमी मासा पाण्यावरती केव्हा येतो ह्याची तो वाट पहात होता. पण त्याच्यापासून सुमारे शंभर मीटर दूर डोल्फिन वरती आला व जड श्वास घेत पुन्हा पाण्याखाली गेला.

मच्छीमार वेगाने डोल्फिनपाशी पोहत गेला. इखतीआन्द्र मित्राच्या मदतीला धावला. तेवढ्यात डोल्फिन परत पाण्यावरती आला आणि त्याचवेळी मच्छीमाराने डोल्फिनचा पंख पकडून होडीकडे त्याला खेचत न्यायला आरंभ केला.

इखतीआन्द्रने पाण्याखालून पोहत त्या मच्छीमाराला गाठले आणि त्याच्या पायाचा दातांनी कडकडून चावा घेतला. शार्क मासा चावला अशा समजुतीने मच्छीमार जोरात पाय हलवू लागला. दुसऱ्या हातात धरलेल्या सुऱ्याने त्या मच्छीमाराने शत्रूवर जोरात वार केला. तो घाव इखतीआन्द्रच्या खवले नसलेल्या उघड्या मानेवर बसला. इखतीआन्द्रने मच्छीमाराचा पाय सोडला व मच्छीमार वेगाने त्याच्या होडीपाशी पोहत गेला. जखमी डोल्फिन व इखतीआन्द्र आखाताकडे वळले. तरुणाने डोल्फिनला स्वत:पाठोपाठ येण्याची आज्ञा केली व पाण्याखालील गुंफेत बुडी मारली. इथे पाणी फक्त अर्ध्या गुंफेपर्यंत होते. फटींमधून हवा घुसत होती. इथे डोल्फिन बिनधोकपणे श्वसन करू शकत होता. इखतीआन्द्रने डोल्फिनची जखम तपासली. जखम धोक्याची नव्हती. गोळी कातडीखाली चरबीत घुसून बसली होती. केवळ बोटांनी गोळी उपसून काढण्यात इखतीआन्द्र यशस्वी ठरला. त्या वेदना डोल्फिनने मुकाट सहन केल्या.

"जखम भरून येईल," मित्राच्या पाठीवर थाप मारीत इखतीआन्द्र प्रेमाने म्हणाला.

आता स्वत:चा विचार करणे आवश्यक होते. इखतीआन्द्र भराभरा पाण्याखालच्या बोगद्यातून पोहत गेला, बागेत वर चढला व पांढऱ्या घरात गेला.

इखतीआन्द्र जखमी झालेला पाहून क्रिस्तो घाबरला.

"काय झालं तुला?"

"जेव्हा मी डोल्फिनचं रक्षण करायला गेलो, तेव्हा मच्छीमारांनी मला जखमी केलं," इखतीआन्द्र म्हणाला. पण क्रिस्तोने त्याच्यावर विश्वास ठेवला नाही.

"परत माझ्याशिवाय शहरात गेला होतास ना?" जखमेवर पट्टी बांधत त्याने संशयी स्वरात विचारले.

इखतीआन्द्र गप्प राहिला.

"तुझे खवले वर कर," क्रिस्तो म्हणाला आणि इखतीआन्द्रचा खांदा त्याने उघडा केला. खांद्यावर इंडियनाने तांबडा डाग पाहिला. त्या डागाला पाहून क्रिस्तो घाबरला.

"वल्ह्याचा तडाखा मारला?" खांदा चाचपत त्याने विचारले. पण तेथे सूज नव्हती. बहुधा ती जन्मखूण होती.

"नाही," इखतीआन्द्र उत्तरला.

तरुण स्वतःच्या खोलीत विश्रांतीसाठी गेला व म्हातारा इंडियन हातांमध्ये डोके धरून विचारात गढला. खूप वेळ तो तसाच बसून राहिला, मग उठला आणि खोलीतून बाहेर गेला.

क्रिस्तो घाईने शहरात गेला. बाल्ताझारच्या दुकानात तो धापा टाकत शिरला, दुकानाच्या पुढच्या भागात बसलेल्या गुत्तीएरेकडे संशयी कटाक्ष टाकत त्याने विचारले:

"बाप घरात आहे?"

"तिथं," दुसऱ्या खोलीच्या दाराकडे मानेने खूण करीत ती म्हणाली.

क्रिस्तो प्रयोगशाळेत शिरला व पाठीशी त्याने दार लावून घेतले.

त्याचा भाऊ मोती धूत होता. मागल्या वेळेप्रमाणेच बाल्ताझार चिडलेल्या मनःस्थितीत होता.

"तुमच्याबरोबर माणूस वेडा होईल," बाल्ताझार बडबडू लागला. "अजून तू "सागरी सैतानाला" आणत नाहीस म्हणून झूरीता संतापलाय. गुत्तीएरे सबंध दिवसभर कुठंतरी गायब होते. झूरीताबद्दल एक शब्द ऐकायला ती तयार नाही. नुसता एकच ठेका: 'नाही! नाही!' झूरीता म्हणतो: 'वाट बघायचा कंटाळा आला! तिला बळजबरीनं घेऊन जातो. रडेल थोडा वेळ आणि मग येईल ताळ्यावर!' तो

काय वाट्टेल ते करील!"

भावाच्या तक्रारी क्रिस्तोने ऐकून घेतल्या व मग तो म्हणाला:

"ऐक, "सागरी सैतानाला" मी आणू शकलो नाही, कारण गुत्तीएरेप्रमाणेच तो सबंध दिवसभर एकटाच कुठंतरी गायब होतो. माझ्याबरोबर शहरात यायची त्याची इच्छा नाही. माझं मुळीच ऐकेनासा झालाय. इखतीआन्द्रची मी नीट काळजी घेतली नाही म्हणून मला डॉक्टरांची बोलणी खावी लागणार..."

"तर मग इखतीआन्द्रला लौकरात लौकर पकडलं किंवा चोरलं पाहिजे आणि साल्वातोर परतायच्या आतच तू त्याची नोकरी सोड आणि..."

"थांब, बाल्ताझार. भाऊ, माझ्या बोलण्यात अडथळा आणू नको. इखतीआन्द्रच्या बाबतीत आपण घाई करायला नको."

"का नको घाई करायला?"

स्वतःची योजना सांगावी अथवा न सांगावी ह्याचा निर्णय न झाल्याने क्रिस्तोने निःश्वास टाकला.

"त्याचं असं आहे..." तो बोलू लागला.

नेमक्या त्याच क्षणी दुकानात कुणीतरी प्रवेश केला आणि झूरीताचा मोठा आवाज त्यांनी ऐकला.

"घ्या," टबात मोती फेकत बाल्ताझार बरळला, "पुन्हा तोच!"

धाडकन दरवाजा उघडून झूरीता प्रयोगशाळेत आला.

"दोघेही भाऊ इथं आहेत. तुम्ही आणखी किती काळ मला फसवणार?" बाल्ताझार व क्रिस्तो यांच्याकडे आळीपाळीने पहात त्याने विचारले.

क्रिस्तो उठला व सौम्य स्मित करीत म्हणाला:

"शक्य आहे तेवढं सगळं करतोय. धीर धरा. "सागरी सैतान" साधासुधा नाही. त्याला सहजी गळाला अडकवता येणार नाही. एकदा त्याला इथपर्यंत आणलं होतं, पण तेव्हा तुम्ही नव्हतात. "सैतानानं" शहर बघितलं, त्याला आवडलं नाही आणि आता इकडं यायची त्याची इच्छा नाही."

"इच्छा नाही—नसूं दे. मला वाट बघायचा कंटाळा आलाय. ह्या आठवड्यात मी एकदम दोन कामं पार पाडायचं ठरवलंय. साल्वातोर अजून परतला नाही?"

"कोणत्याही दिवशी येतील."

"तर मग घाई केली पाहिजे. पाहुण्यांची वाट पहा. मी निवडक माणसं गोळा केलीत. क्रिस्तो, तू तिथं दार उघडशील आणि बाकीची कामगिरी पार पाडायची जबाबदारी माझी. सगळी तयारी झाल्यावर मी बाल्ताझारला सांगेन." आणि बाल्ताझारकडे वळून तो म्हणाला: "तुझ्याशी मी उद्या बोलेन. पण ध्यानात ठेव, ते आपलं शेवटचं बोलणं असेल!"

भावांनी मुकाटपणे झुकून अभिवादने केली. जेव्हा झूरीताची त्यांच्याकडे पाठ फिरली, तेव्हा इंडियनांच्या चेहऱ्यांवर सौम्य स्मिते झळकली. बाल्ताझारने दबत्या आवाजात शिव्या घातल्या. क्रिस्तो कसल्यातरी विचारात गढला होता.

दुकानात झूरीता गुत्तीएरेशी हळू आवाजात काहीतरी बोलत होता.

"नाही!" गुत्तीएरेचे उत्तर भावांनी ऐकले. बाल्ताझारने नाराजीने डोके हलविले.

"क्रिस्तो!" झूरीताने हाक मारली. "माझ्या बरोबर चल. आज तुझी मला गरज लागेल."

अप्रिय भेट

इखतीआन्द्रला बरे वाटत नव्हते. मानेवरची जखम ठणकत होती. त्याला ताप चढला होता. हवेत श्वसन करणे त्याला जड जात होते.

पण तरीसुद्धा गुत्तीएरेची भेट घ्यायला सकाळी तो किनाऱ्यावरील कड्याकडे गेला. ती दुपारी आली. भयंकर उष्मा होता. तापलेल्या हवेमुळे, पांढऱ्या धुळीमुळे इखतीआन्द्रचा श्वास घुसमटू लागला. समुद्रकिनाऱ्यावर गुत्तीएरेबरोबर थांबण्याची त्याची इच्छा होती, पण तिला घाईने शहरात परत जायचे होते.

"वडलांना कामासाठी बाहेर जायचं आहे आणि मी दुकानात बसलं पाहिजे."

"तर मग मी तुम्हाला सोडायला येतो," तरुण म्हणाला आणि धुळकट उताराच्या रस्त्यावरून ती दोघे शहराकडे निघाली.

वाटेत त्यांना खाली मान घालून येणारा ओल्सेन भेटला. तो कसल्यातरी विचारात गढला होता व गुत्तीएरेला न पाहताच जवळून निघून जाऊ लागला. पण तरुणीने त्याला हाक मारली.

"त्याच्याशी फक्त दोन शब्द मला बोलायचे आहेत," इखतीआन्द्रकडे वळून गुत्तीएरे म्हणाली व मागे वळून ती ओल्सेनपाशी गेली. ती दोघे हळू आवाजात काहीतरी भराभरा बोलली. तरुणी त्याची मनधरणी करीत असल्याचे भासले.

इखतीआन्द्र त्यांच्या पाठी काही पावले गेला.

"ठीक, आज, मध्यरात्रीनंतर," त्याने ओल्सेनचा आवाज ऐकला. धिप्पाडाने तरुणीशी हस्तांदोलन केले, मान तुकविली

आणि वेगाने वाट धरली.

जेव्हा गुत्तीएरे इखतीआन्द्रपाशी आली, तेव्हा त्याचे गाल व कान भाजत होते. ओल्सेनबद्दल गुत्तीएरेपाशी सोक्ष-मोक्ष लावण्याची त्याची इच्छा होती, पण त्याला शब्द सापडे-नात.

"मला सहन होत नाही," तो धापा टाकीत बोलू लागला, "मला समजलं पाहिजे... ओल्सेन... तुम्ही माझ्या-पासून काहीतरी गुपित लपवून ठेवताय. तुम्ही त्याला रात्री भेटणार आहात. तुमचं प्रेम आहे त्याच्यावर?"

गुत्तीएरेने इखतीआन्द्रचा हात पकडला, त्याच्याकडे प्रेमळ-पणे पहात सस्मित मुद्रेने तिने विचारले:

"तुमचा माझ्यावर विश्वास आहे?"

"माझा विश्वास आहे... तुम्हाला माहीत आहे, माझं तुमच्यावर प्रेम आहे," आता इखतीआन्द्रला हा शब्द माहीत झाला होता, "पण मी... मला फार जड जातंय."

हे खरे होते. अनिश्चिततेचा इखतीआन्द्रला त्रास होत होता. आणि त्याच्या कुशीत जोरदार ठणका सुरू झाल्या होत्या. त्याचा श्वास घुसमटत होता. त्याच्या गालांवरील लाली नाहीशी झाली व त्याचा चेहरा फिकट पडला.

"तुम्ही आजारी झाला आहात," तरुणी चिंताक्रांत होत म्हणाली. "कृपा करून शांत व्हा. माझ्या लाडक्या! तुम्हाला सगळं सांगायची माझी इच्छा नव्हती, पण तुमचं मन शांत व्हावं म्हणून सांगत्ये. ऐका."

कुणी एक घोडेस्वार त्यांच्याजवळून दौडत गेला, पण गुत्तीएरेला पाहताच त्याने घोडा मागे वळविला व तरुण जोडीपाशी तो आला. भरघोस मिशा वरती वळविलेल्या व छोटया बोकडदाढीच्या, काळसर वर्णाच्या वयस्क माणसाला इखतीआन्द्रने पाहिले.

ह्या माणसाला इखतीआन्द्रने केव्हातरी, कुठेतरी पाहिले होते. शहरात? नाही... तिथे, किनाऱ्यावर.

घोडेस्वाराने चाबकाची मूठ स्वतःच्या बुटांवर ठोकली, इखतीआन्द्रकडे वैरी नजरेने पाहिले आणि गुत्तीएरे पुढे हात धरला.

तिचा हात पकडताच अनपेक्षितपणे त्याने तिला खोगीरापाशी खेचले व तिच्या हाताचे चुंबन घेऊन तो खो खो हसू लागला.

"सापडलीस!" कपाळाला आठ्या घातलेल्या गुत्तीएरेचा हात सोडून हसत, पण त्याच वेळी खोचक आवाजात तो पुढे म्हणाला: "लग्नाच्या आदल्या दिवशी नवरीनं तरुणांबरोबर भटकणं शोभतं का?"

गुत्तीएरे संतापली, पण त्याने तिला बोलू दिले नाही:

"बाप केव्हाची वाट पाहतोय तुमची. तासाभरानंतर मी दुकानात येईन."

इखतीआन्द्रने शेवटचे शब्द ऐकले नाहीत. त्याच्या डोळ्यांसमोर एकदम अंधारी आली, त्याच्या घशात आवंढा दाटला, त्याचा श्वासोच्छ्‌वास जवळ जवळ थांबला. हवेत थांबणे इतःपर त्याला अशक्य ठरले.

"अस्सं... म्हणजे तुम्ही मला फसवलंत..." निळसर पडलेल्या ओठांनी तो कसाबसा बोलला. त्याला खूप बोलायची इच्छा होती, सारा अपमान ओकून टाकायचा होता अथवा सगळे जाणून घ्यायचे होते. पण कुशींमधील ठणका असह्य झाल्या होत्या, त्याची जवळ जवळ शुद्ध हरपली.

अखेर इखतीआन्द्र जागचा हलला, किनाऱ्याकडे धावला व वाकड्या कड्यावरून त्याने समुद्रात उडी घेतली.

गुत्तीएरेने किंचाळी फोडली. ती पार हबकली. मग पेद्रो झूरीताकडे धावत जात ती म्हणाली:

"लौकर ... वाचवा त्याला !"

पण झूरीता मुळीच हलला नाही.

"जर कुणाची बुडून मरायची इच्छाच असेल, तर त्या इच्छेच्या आड मी येऊ शकत नाही," तो म्हणाला.

पाण्यात उडी मारण्याच्या इराद्याने गुत्तीएरे किनाऱ्याकडे धावली. झूरीताने घोड्याला टाच मारली, तरुणीला गाठले, तिचे खांदे पकडून तिला घोड्यावर बसविले व शहराकडे घोडा पिटाळला.

"जर दुसऱ्यांनी माझ्या भानगडीत ढवळाढवळ केली नाही, तर मी दुसऱ्यांच्या भानगडींमध्ये माझं नाक खुपसत नाही. असं बोलणं जास्त योग्य ठरेल! गुत्तीएरे, भानावर या!"

पण गुत्तीएरेने काही उत्तर दिले नाही. ती बेशुद्ध पडली होती. केवळ वडिलांच्या दुकानात पोहोचल्यानंतर ती शुद्धीवर आली.

"कोण होता हा तरुण माणूस?" पेद्रोने विचारले.

तिरस्कार न लपविता झूरीताकडे पहात गुत्तीएरे म्हणाली:

"सोडा मला!"

झूरीताच्या कपाळाला आठ्या पडल्या. "मूर्खपणा," त्याच्या मनात विचार आला. "तिच्या प्रेमिकाने समुद्रात उडी घेतलीय. हे फार छान झालं!" आणि दुकानाकडे वळत झूरीता ओरडला:

"ए बापा! बाल्ताझार! अरे ए!"

बाल्ताझार धावत बाहेर आला.

"घे तुझी मुलगी. आणि माझे आभार मान. मी तिला वाचवलं; एका तरुणाच्या सुंदर मुखड्यापायी समुद्रात जीव द्यायला चालली होती. आता दुसऱ्यांदा तुझ्या मुलीचा जीव मी वाचवतोय, पण ती अजून मला दूर लोटतेय. ठीक आहे,

लौकरच ह्या सगळ्या हट्टीपणाची अखेर करण्यात येईल." तो मोठ्यांदा हसला. "आणखी तासानंतर मी येईन. आपला करार लक्षात ठेव!"

बाल्ताझारने लवून नमस्कार करीत पेद्रोकडून मुलीला घेतले.

घोड्याला टाच मारून घोडेस्वार निघून गेला.

बाप व मुलगी दुकानात आली. गुत्तीएरेने दुबळेपणाने खुर्चीवर बसकण मारली व हातांनी चेहरा झाकून घेतला.

बाल्ताझारने दार झाकले आणि दुकानात येरझाऱ्या घालीत तो तावातावाने बोलू लागला. पण त्याचे बोलणे कुणीही ऐकले नाही. अशा तऱ्हेने फडताळांवरच्या सुकविलेल्या खेकड्यांना आणि समुद्रातील माशांना उद्देशून बाल्ताझार प्रवचन झोडू शकला असता.

"त्याने पाण्यात उडी घातली," इखतीआन्द्रचा चेहरा आठवत तरुणी मनाशी विचार करत होती. "दुर्दैवी! प्रथम ओल्सेन, मग झूरीताशी ही विचित्र भेट. मला नवरी म्हणण्याचं त्यानं धाडस कसं केलं! आता सर्वनाश झाला..."

गुत्तीएरे रडू लागली. इखतीआन्द्रबद्दल तिला वाईट वाटत होते. साधा, लाजरा – त्याची ब्यूनोस-आयर्समधल्या पोकळ, उर्मट तरुणांशी तुलना तरी करणे शक्य होते?

"आता पुढं काय करायचं?" ती विचार करू लागली. "इखतीआन्द्रप्रमाणं समुद्रात जीव द्यायचा? आत्महत्या करायची?"

बाल्ताझारची वटवट चालूच होती:

"तुला समजतं, गुत्तीएरे? ह्याचा अर्थ पूर्ण सत्यानाश. आपल्या दुकानात तू पाहतेस त्या सर्व गोष्टी झूरीताच्या मालकीच्या आहेत. माझ्या मालकीचा दहावा हिस्सासुद्धा नाही. सगळे मोती झूरीतापासून आपल्याला कमिशनवर मिळ-

तात. पण जर तू पुन्हा त्याला नकार दिलास, तर तो सगळा माल घेऊन जाईल आणि यापुढं माझ्याशी धंद्याचा कोणताही संबंध ठेवणार नाही. सर्वनाश! संपूर्ण नाश! जरा शहाणी हो, तुझ्या म्हाताऱ्या बापाची दया कर!"

"पुढं बोल: 'आणि त्याच्याशी लग्न कर!' नाही!" गुत्तीएरेने तीव्रपणे उत्तर दिले.

"नालायक!" बाल्ताझार बेभान होत ओरडला. "जर असंच असेल, तर... तर... मी नव्हे, खुद्द झूरीताच तुला वठणीवर आणील!" आणि जोरात दार आपटून म्हातारा इंडियन स्वतःच्या प्रयोगशाळेत गेला.

ऑक्टोपसांशी लढाई

समुद्रात उडी घेतल्यानंतर काही काळ जमिनीवरील सर्व अपयशांचा इखतीआन्द्रला विसर पडला. उकाड्याच्या आणि घुसमटवून टाकणाऱ्या जमिनीनंतर थंड पाण्याने तो शांत झाला व त्याला तजेला वाटू लागला. टोचणाऱ्या वेदना थांबल्या. आता त्याचे श्वसन खोल व नियमित होऊ लागले. त्याला पूर्ण विश्रांतीची गरज होती आणि जमिनीवर घडलेल्या प्रसंगांबद्दल विचार न करण्याचा त्याने यत्न केला.

इखतीआन्द्रला काम करण्याची, हालचाल करण्याची इच्छा होती. कोणत्या कामात त्याने स्वतःला गुंतवावे? अंधाऱ्या रात्री उंच कड्यावरून पाण्यात उडी मारायला त्याला आवडायचे, कारण तात्काळ तळ गाठता यायचा. पण आत्ता दुपार होती आणि समुद्रावर मच्छीमारांच्या होड्यांचे काळे तळ डोक्यावर हिंदकळत होते.

"आता असं करावं! गुंफेत सुव्यवस्था निर्माण केली पाहिजे," इखतीआन्द्रने विचार केला.

आखातामधील खडकांच्या भिंतीत मोठ्या कमानीची गुंफा होती व तिच्यातून समुद्रात खोलवर उतरत गेलेल्या पाण्याखालील पठाराचे सुरेख दृश्य दिसायचे. इखतीआन्द्रला फार पूर्वीपासून ही गुंफा आवडली होती. पण तिथे मुक्काम करण्यापूर्वी फार काळापासून तेथे राहणाऱ्यांना हुसकावून लावणे आवश्यक होते – ऑक्टोपसांचा अनेक कुटुंबांना.

इखतीआन्द्रने चष्मा चढविला, धारदार वाकड्या पात्याचा सुरा हाती घेतला आणि धीटपणे तो गुंफेपर्यंत पोहत गेला. गुंफेत प्रवेश करणे भीतीदायक होते आणि शत्रूंना मोकळ्यावर आणण्याचे इखतीआन्द्रने ठरविले. जवळच बुडालेल्या एका होडीत त्याने एक लांब हार्पून केव्हाचा पाहून ठेवला होता. त्याने तो हार्पून उचलला व गुंफेच्या दाराशी उभे राहून हार्पून आत ढोसू लागला. अनोळखी आक्रमणामुळे ऑक्टोपस नाराजीने जागे झाले. कमानीच्या टोकांशी लांब नांग्या वळवळू लागल्या. सावधपणे त्या हार्पूनपाशी येऊ लागल्या. ऑक्टोपसच्या नांग्यांनी हार्पूनला पकडण्यापूर्वीच इखतीआन्द्रने हार्पून ओढून घेतला. हा खेळ काही मिनिटेपर्यंत चालला. आता मेदूझा-गोर्गोनच्या* केसांप्रमाणे अनेक नांग्या कमानीच्या टोकांशी वळवळू लागल्या होत्या. अखेरीस एका म्हाताऱ्या, प्रचंड ऑक्टोपसची सहनशीलता संपली व उर्मट आक्रमकाला धडा शिकविण्याचा त्याने निर्णय घेतला. नांग्यांची भयानक वळवळ करीत तो ऑक्टोपस गुंफेबाहेर आला. इखतीआन्द्रला घाबरविण्याच्या हेतूने रंग बदलीत तो सावकाशपणे चालून येऊ

---

* मेदूझा-गोर्गोन – ग्रीक पुराणातील पंखवाली राक्षसी. तिच्या डोक्यावर केसांऐवजी सापांची डोकी होती.

लागला. इखतीआन्द्र बाजूला पोहत गेला, त्याने हार्पून टाकला व लढाईची तयारी केली. प्रतिस्पर्ध्याला आठ लांब पाय असताना त्याच्याशी केवळ दोन हातांनी लढणे माणसाला किती अवघड जाते ह्याची इखतीआन्द्रला पूर्ण कल्पना होती. ऑक्टोपसची एक नांगी तोडेपर्यंत त्याच्या सात नांग्या माणसाच्या हातांना विळखा घालून पिळतात. म्हणून ऑक्टोपसच्या शरीरावर सुऱ्याचा घाव घालण्याचे तरुणाने ठरविले. ऑक्टोपसच्या नांग्यांच्या देठांपाशी जाता येईल अशा बेताने त्या राक्षसाला जवळ येऊ देऊन इखतीआन्द्रने अनपेक्षित पुढे झेप घेतली आणि ऑक्टोपसच्या डोक्यावरील नांग्यांच्या केंद्राशी त्याने घाव घातला.

हा हल्ला ऑक्टोपसला नेहमी बेसावध धरतो. नांग्या आत वळवून शत्रूवर रोखायला त्याला किमान चार सेकंदांचा अवधी लागतो. दरम्यान इखतीआन्द्रने अचूक वार करून ऑक्टोपसच्या देहाचे दोन तुकडे केले. ऑक्टोपसचे हृदय आणि वळवळणारे स्नायू थांबले. त्याच्या देहाभोवतालच्या प्रचंड नांग्या एकदम गलितगात्र होऊन खाली कोसळल्या.

"एक खलास केला!"

इखतीआन्द्रने परत हार्पून उचलला. ह्यावेळी दोन ऑक्टोपस त्याच्यावर एकाच वेळी चालून आले. त्यांपैकी एक इखतीआन्द्रला थेट सामोरा गेला व दुसरा बगल मारून मागील बाजूने हल्ला करण्याच्या बेतात होता. फार धोका निर्माण झाला होता. इखतीआन्द्रने समोरच्या ऑक्टोपसवर धीटपणे चढाई केली, पण त्याने त्याला ठार मारण्यापूर्वी मागील बाजूच्या ऑक्टोपसने इखतीआन्द्रच्या मानेभोवती विळखा घातला. इखतीआन्द्रने झटकन मानेजवळच्या ऑक्टोपसच्या नांगीवर सुऱ्याचा घाव घालून ती तोडली. मग चेहरा ऑक्टोपसकडे वळवून त्याच्या उरलेल्या नांग्या तोडायला आरंभ केला.

घायाळ झालेला ऑक्टोपस सावकाशपणे समुद्रतळाशी बुडाला. आता इखतीआन्द्र पूर्वीच्या समोरच्या ऑक्टोपसकडे वळला व त्याने त्याचा निकाल लावला.

"तीन," इखतीआन्द्र मोजत होता.

पण लढाई काही काळ थांबविणे भाग पडले. गुंफेतून ऑक्टोपसांची आख्खी तुकडी बाहेर आली आणि ठार झालेल्या ऑक्टोपसांच्या रक्तामुळे गढूळ बनलेल्या पाण्यात नीट दिसेना. ह्या परिस्थितीत ऑक्टोपसांची बाजू वरचढ ठरली असती, कारण स्पर्शाने ते शत्रूला पकडू शकले असते, पण इखतीआन्द्र त्यांना बघू शकत नव्हता. लढाईच्या जागेपासून थोड्या दूर अंतरावर स्वच्छ पाण्यात तो पोहत गेला आणि रक्ताळ पाण्यातून त्याच्या पाठी पोहत आलेल्या आणखी एका ऑक्टोपसला त्याने ठार मारले.

अधून मधून थांबत कित्येक तासपर्यंत ही लढाई चालू राहिली.

शेवटी जेव्हा अखेरचा ऑक्टोपस ठार झाला व पाणी नितळ बनले, तेव्हा पाण्याच्या तळाशी मेलेले ऑक्टोपस पडल्याचे व त्यांच्या तोडलेल्या नांग्या वळवळत असल्याचे इखतीआन्द्रने पाहिले. इखतीआन्द्र गुंफेत गेला. इथे अजून काही छोटे ऑक्टोपस उरले होते – मुठीच्या आकाराचे आणि बोटांच्या आकाराच्या नांग्यांचे. इखतीआन्द्र त्यांना ठार मारणार होता, पण त्याला त्यांची दया आली. "ह्यांना माणसाळवलं पाहिजे. असे पहारेकरी बाळगणं वाईट नाही."

मोठ्या ऑक्टोपसांना गुंफेतून हाकलून दिल्यानंतर इखतीआन्द्रने आपल्या पाण्याखालच्या घरात फर्निचर मांडण्याचा निर्णय घेतला. त्याने घरून लोखंडी पायांचे, संगमरवरी पृष्ठाचे एक टेबल आणि दोन चिनी फुलदाण्या आणल्या. गुंफेच्या मध्यभागी त्याने टेबल ठेवले, टेबलावर फुलदा-

ण्या ठेवल्या व फुलदाण्यांमध्ये माती घालून समुद्रफुलांना त्यांच्यात लावले. फुलदाण्यांमधील काही माती पाण्यामुळे धुवून गेली व काही काळपर्यंत फुलदाण्यांवरती धुराप्रमाणे दोन स्तंभ उमटत राहिले, पण नंतर पाणी स्वच्छ झाले. मग वाऱ्याच्या झुळुकींवर डोलावीत तशी हलक्या लाटांच्या हिंदोळ्यांवर फुले डुलत राहिली.

गुंफेतील भिंतीत एक खाच होती. जणू नैसर्गिक दगडी बाक. गुंफेचा नवा मालक समाधानपूर्वक ह्या बाकावर निजला. पाण्यात तो दगडी बाक खूप मऊ भासत होता.

टेबलावर चिनी फुलदाण्या मांडलेली ही पाण्याखालची विचित्र खोली होती. अशा अपूर्व वास्तुशांतीला पाहण्यासाठी अनेक मासे कुतूहलाने पोहत आले. टेबलाच्या पायांमधून त्यांनी सुळकांड्या मारल्या, फुलदाण्यांमधील फुलांना जणू हुंगण्यासाठी ते पोहत गेले, इखतीआन्द्रच्या हातांवर टेकलेल्या डोक्याखाली त्यांनी डुबक्या मारल्या. संगमरवरी बैलाचे डोके गुंफेत डोकावले, घाबरून त्याने शेपटी झटकली व तो पसार झाला. पांढऱ्या वाळूवरून मोठा खेकडा सरपटत आला, मालकाला सलाम करण्याच्या हेतूने जणू त्याने नांगी वर उचलून परत खाली केली आणि टेबलाखाली ठाण मांडले.

इखतीआन्द्रला ह्या सर्व गोष्टींची खूप गंमत वाटत होती. "माझ्या घराला आणखी कसं सजवावं बरं?" तो विचार करू लागला. "दारापाशी सर्वांत सुंदर पाण्याखालच्या वनस्पती लावीन, फरशीवर मोत्यांचा सडा शिंपीन आणि भिंतीच्या कोपऱ्यांमध्ये शिंपले लावीन. गुत्तीएरेनं माझी ही पाण्याखालची खोली पहायला हवी... पण ती मला फसवतेय. पण कदाचित फसवत नसेलही. ओल्सेनबद्दल काही सांगणार होती, पण तिला सवडच सापडली नाही." इखतीआन्द्रच्या कपाळाला आठ्या पडल्या. काम करण्याचे थांबवताच परत त्याला

एकटेपणा वाटू लागला, इतर माणसांपेक्षा स्वतःचे वेगळेपण जाणवू लागले. "पाण्याखाली कुणीही माणूस का जगू शकत नाही? मी एकटाच फक्त जगू शकतो. वडील लौकर आले तर बरं होईल! मी त्यांना विचारीन..."

निदान एका तरी जिवंत प्राण्याला स्वतःचे पाण्याखालील नवे निवासस्थान दाखविण्याची त्याची इच्छा होती. "लीडिंग," इखतीआन्द्रला डोल्फिनची आठवण झाली. इखतीआन्द्रने एक शंख उचलला, तो पाण्यावरती आला आणि त्याने शंख फुंकला. लौकरच परिचित फुरफुर ऐकू आली – डोल्फिन नेहमी आखाताच्या आसपास असायचा.

जेव्हा डोल्फिन पोहत जवळ आला, तेव्हा इखतीआन्द्रने त्याला प्रेमाने मिठी मारीत म्हटले:

"लीडिंग, चल माझ्याकडं, तुला मी नवी खोली दाखवतो. टेबल आणि चिनी फुलदाण्या तू पूर्वी कधीही पाहिल्या नसतील."

इखतीआन्द्रने पाण्यात बुडी मारली आणि डोल्फिनला पाठोपाठ येण्याची आज्ञा केली.

पण डोल्फिन त्रासदायक पाहुणा ठरला. प्रचंड आकारामुळे आणि अवघड हालचालींमुळे त्याने गुंफेत एवढ्या प्रचंड लाटा उसळवल्या, की टेबलावरील फुलदाण्या गडगडू लागल्या. एवढेच नव्हे तर त्याने टेबलाच्या पायाला मुसकटाने ढुशी मारली व टेबल पाडले. फुलदाण्या खाली कोसळल्या. जर इथे जमीन असती तर त्यांच्या ठिकऱ्याच उडाल्या असत्या. पण इथे तसे काही घडले नाही. फक्त खेकडा बिचारा घाबरला आणि तिरप्या चालीने वेगात खडकाकडे पळाला.

"कसा अजागळ रे तू," गुंफेच्या आत टेबल नीट उभे करीत आणि फुलदाण्या उचलत इखतीआन्द्र मित्राला उद्देशून मनाशी म्हणाला.

डोल्फिनला मिठी घालून इखतीआन्द्र पुढे त्याच्याशी

बोलत राहिला :

"लीडिंग, रहा इथंच माझ्यापाशी."

पण डोल्फिनने लौकरच डोके हलवायला व बेचैनी दाखवायला सुरुवात केली. पाण्याखाली तो फार काळ राहू शकत नव्हता. हवेत जाणे त्याला आवश्यक होते. पंखाला झटका मारून तो गुंफेबाहेर गेला व पाण्यावरती चढला.

"लीडिंगसुद्धा माझ्याबरोबर पाण्याखाली जगू शकत नाही," एकट्या राहिलेल्या इखतीआन्द्रच्या मनात दु:खी विचार आला. "फक्त मासे राहू शकतात, पण ते मूर्ख आणि घाबरट आहेत..."

आणि तो दगडी बाकावर निजला. सूर्य मावळला. गुंफेत अंधार होता. पाण्याची हलकी हालचाल इखतीआन्द्रला हिंदोळत होती.

दिवसभराच्या उत्तेजित मन:स्थितीमुळे व कामामुळे थकलेल्या इखतीआन्द्रला डुलकी लागली.

नवा मित्र

ओल्सेन मोठ्या लाँचमध्ये बसला होता आणि कठड्यावरून पाण्याकडे पहात होता. सूर्य नुकताच क्षितिजावर चढला होता व त्याची तिरपी किरणे खाडीच्या पारदर्शी पाण्याच्या थेट तळापर्यंत घुसली होती. पांढऱ्या वाळूच्या तळावर अनेक इंडियन सरपटत होते. अधूनमधून श्वास घेण्यासाठी ते पाण्यावरती येत आणि पुन्हा पाण्यात बुड्या मारीत. ओल्सेन एकाग्रपणे मोतीवेच्या पाणबुड्यांकडे पहात होता. सकाळचा लौकरचा प्रहर असूनही एव्हाना उष्मा वाढला होता. "मी ताजंतवानं का होऊ नये—एक-दोन डुबक्या माराव्यात?"

त्याने मनाशी विचार केला, पटकन कपडे उतरविले आणि पाण्यात उडी मारली. ओल्सेनने पूर्वी कधीही मोती वेचण्याचे काम केले नव्हते, पण त्याला हे आवडले आणि पाणबुड्या-च्या कामाची सवय असलेल्या इंडियनांपेक्षा तो जास्त काळ पाण्याखाली राहू शकत होता असे त्याला आढळले होते. ओल्सेन इतर मोतीवेच्यांमध्ये सामील झाला व त्याच्या दृष्टीने ह्या नव्या उद्योगात लौकरच रमला.

तिसऱ्या वेळी पाण्याखाली बुडी मारताना त्याने पाहिले की, पाण्याच्या तळाशी गुडघ्यांवर बसलेले दोन इंडियन जणू शार्क मासा अथवा करवत्या मासा पाठीशी लागल्याप्रमाणे उडी मारून लगबगीने पाण्यावरती गेले होते. ओल्सेनने मागे नजर टाकली. त्याच्या दिशेने एक विचित्र प्राणी वेगाने पोहत येत होता. अर्धा-माणूस आणि अर्धा-बेडूक दिसणाऱ्या ह्या प्राण्याच्या अंगावर रुपेरी खवले होते, त्याचे प्रचंड बटबटीत डोळे होते आणि बेडकाचे पंजे होते. बेडकाचे पंजे भराभरा पाण्यात हलवीत तो दमदारपणे पुढे सरकत होता.

गुडघ्यांवरून सरळ उठण्यास ओल्सेनला अवधी मिळण्या-पूर्वीच राक्षस त्याच्यापाशी एव्हाना येऊन ठेपला होता व स्वतःच्या बेडकाच्या पंजामध्ये त्याने ओल्सेनचे हात पकडले होते. ओल्सेन घाबरला होता तरी त्याच्या ध्यानात आले की, ह्या प्राण्याचा सुंदर मानवी चेहरा होता आणि केवळ चमकत्या डोळयांमुळे त्याच्या सौंदर्याला बाधा येत होती. हा विचित्र प्राणी पाण्याखाली होता हे विसरून काहीतरी बोलू लागला होता. ओल्सेनला त्याचा एकही शब्द ऐकू येत नव्हता. त्याने फक्त त्याचे हलणारे ओठ पाहिले. त्या विचित्र प्राण्याने त्याच्या दोन पंजांमध्ये ओल्सेनचा हात घट्ट धरून ठेवला होता. ओल्सेनने पायांना जोरात रेटा दिला व एका मोकळया हाताच्या साह्याने तो पटकन पाण्यावरती

आला. राक्षसाने त्याचा हात न सोडता पाठोपाठ वरती उसळी घेतली. पाण्यावरती येताच ओल्सेनने लॉंचचा कठडा पकडला, त्यात पाय अडकवून तो लॉंचमध्ये चढला आणि बेडकीचे पंजे असलेल्या ह्या अर्धमानवाला स्वत:पासून धक्का मारून त्याने दूर लोटले. राक्षस धाडदिशी पाण्यात पडला. लॉंचवर बसलेल्या इंडियनांनी घाबरून भराभरा पाण्यात उड्या घेतल्या व ते लगबगीने किनाऱ्याच्या दिशेने पोहू लागले.

पण इखतीआन्द्र परत लॉंचपाशी आला व ओल्सेनला उद्देशून स्पॅनिश भाषेत म्हणाला: "ऐका, ओल्सेन, तुमच्याशी मला गुत्तीएरेबद्दल बोलायचं आहे."

पाण्याखालील भेटीप्रमाणेच हे बोलणे ऐकून ओल्सेन अधिक चकित झाला. ओल्सेन धीट स्वभावाचा, भक्कम डोक्याचा माणूस होता. जर विचित्र प्राणी त्याचे आणि गुत्ती-एरेचे नाव जाणत होता, तर हा माणूस होता – राक्षस नव्हे.

"बोला, मी ऐकतोय," ओल्सेन उत्तरला.

इखतीआन्द्र लॉंचमध्ये चढला, त्याने लॉंचच्या नाळेपाशी पायांचा वेढा घातला आणि छातीवर पंजांची घडी घातली.

"चष्मा!" अनोळखीच्या चमकणाऱ्या बटबटीत डोळ्यां-कडे नीट निरखून पाहिल्यावर ओल्सेनच्या ध्यानात आले.

"माझं नाव इखतीआन्द्र. एकदा मी तुम्हाला समुद्रा-च्या तळातून मोत्यांची माळ आणून दिली होती."

"पण तेव्हा तुमचे डोळे आणि हात माणसाचे होते."

इखतीआन्द्रने स्मित केले आणि स्वत:चे बेडकाचे पंजे त्याने झटकले.

"काढता येतात," त्याने तुटक उत्तर दिले.

"मला तसंच वाटलं."

किनाऱ्यावरील खडकावरून इंडियन अत्यंत कुतूहलाने ह्या विचित्र संभाषणाकडे पहात होते, मात्र त्यांना एकही शब्द

ऐकू येत नव्हता.

"तुमचं गुत्तीएरेवर प्रेम आहे?" थोड्या मौनानंतर इखतीआन्द्रने विचारले.

"होय, गुत्तीएरेवर माझं प्रेम आहे," ओल्सेनने सरळ उत्तर दिले.

इखतीआन्द्रने जड सुस्कारा टाकला.

"आणि ती तुमच्यावर प्रेम करते?"

"आणि ती माझ्यावर प्रेम करते."

"पण ती माझ्यावर प्रेम करते."

"तो तिचा प्रश्न आहे," ओल्सेनने खांदे उडविले.

"तिचा प्रश्न म्हणजे? ती तुमची नवरी आहे ना?"

ओल्सेनच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटले, पण पूर्वीच्याच थंडपणे तो उत्तरला:

"नाही, ती माझी नवरी नाही."

"तुम्ही खोटं बोलताय!" इखतीआन्द्र तडकला. "घोड्यावर बसलेल्या त्या काळसर माणसाच्या तोंडून मी स्वतः ऐकलं की, ती नवरी आहे."

"माझी?"

इखतीआन्द्र गडबडला. नाही, गुत्तीएरे ओल्सेनची नवरी, असे काळसर माणूस म्हणाला नव्हता. पण त्या काळसर, म्हाताऱ्या, अप्रिय माणसाची तरुण नवरी असणं कसं शक्य आहे? असे कधी घडते? काळसर माणूस बहुधा तिचा नातेवाईक असावा... इखतीआन्द्रने वेगळ्या रीतीने प्रश्न विचारण्याचा निर्णय घेतला.

"तुम्ही इथं काय करत होतात? मोती शोधत होतात?"

"स्पष्ट सांगतो, तुमचे प्रश्न मला आवडत नाहीत," कपाळाला आठ्या घालीत ओल्सेन उत्तरला. "आणि गुत्तीएरेपासून तुमच्याबद्दल जर मला काही माहिती मिळाली नसती,

तर तुम्हाला याच क्षणी लाँचवरून समुद्रात फेकून दिलं असतं आणि आपलं संभाषण संपलं असतं. तुमच्या सुऱ्याला हात घालू नका. तुम्ही उठायच्या आत वल्ह्यानं तुमचं डोकं मी फोडू शकेन. पण इथं मी खरंच मोती शोधत होतो हे तुमच्यापासून लपविण्याची मला गरज आहे असं वाटत नाही."

"मी समुद्रात फेकला होता तो मोठ्ठा मोती? गुत्तीएरेनं तुम्हाला त्याबद्दल सांगितलं?"

ओल्सेनने होकारार्थी मान हलविली.

इखतीआन्द्रला जिंकल्यासारखे वाटले.

"बघितलंत. मी तिला म्हटलं होतं की, तुम्ही त्या मोत्याला नकार देणार नाही. तुम्हाला देण्यासाठी तो मोती मी तिला देऊ केला होता. पण ती कबूल झाली नाही आणि आता तुम्ही स्वतःच मोती शोधताय."

"होय, कारण आता तो तुमच्या मालकीचा नाही, तर महासागराचा आहे. आणि जर मी तो शोधला, तर त्यात माझ्यावर कुणाच्याही उपकारांचं ओझं नसेल."

"तुम्हाला मोती एवढे आवडतात?"

"दागिने आवडायला मी काही बाई नव्हे," ओल्सेनने टोमणा मारला.

"पण मोती... काय म्हणतात बरं? हो! विकणं शक्य आहे," इखतीआन्द्रला विशेष न समजलेला तो शब्द आठवला, "आणि खूप पैसे मिळवता येतील."

ओल्सेनने परत होकारार्थी मान हलविली.

"म्हणजे तुम्हाला पैसे आवडतात?"

"तुम्हाला माझ्यापासून नेमकं काय पाहिजे?" आता ओल्सेनने चिडक्या आवाजात विचारले.

"गुत्तीएरे तुम्हाला मोती का भेट देते, हे मला माहीत करून घ्यायचंय. तुम्ही तिच्याशी लग्न करणार होतात ना?"

"नाही, गुत्तीएरेशी लग्न करण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता," ओल्सेन म्हणाला. "आणि जरी इरादा असता, तरी आता त्याबद्दल विचार करायला उशीर झालाय. गुत्तीएरे दुसऱ्याची बायको बनलीय."

इखतीआन्द्रचा चेहरा पांढराफटक पडला व त्याने ओल्सेन-चा हात पकडला.

"त्या काळसर माणसाची तर नव्हे?" घाबरून त्याने विचारले.

"होय, तिनं पेद्रो झूरीताशी लग्न केलं!"

"पण ती... मला वाटलं, तिचं माझ्यावर प्रेम होतं," हळू आवाजात इखतीआन्द्र म्हणाला.

ओल्सेनने त्याच्याकडे सहानुभूतीने पाहिले आणि सावका-शपणे आखूड पाईप पेटवीत तो म्हणाला:

"होय, मला वाटतं, तिचं तुमच्यावर प्रेम होतं. पण तुम्ही तर तिच्या डोळयांदेखत समुद्रात उडी टाकून जीव दिलात तुम्ही बुडून मेलात अशी निदान तिची समजूत झाली."

इखतीआन्द्र नवलाने ओल्सेनकडे बघू लागला. आपण पाण्याखाली जगू शकतो ह्याचा इखतीआन्द्रने गुत्तीएरेपाशी कधीही उच्चार केला नव्हता. कड्यावरून त्याने समुद्रात मारलेली उडी म्हणजे तरुणीला त्याची आत्महत्या वाटेल, असा विचारसुद्धा त्याच्या मनात कधी आला नव्हता.

"काल रात्री मी गुत्तीएरेला भेटलो," ओल्सेन पुढे बोलत होता. "तुमच्या मरणाचं तिला फार दु:ख वाटतंय. 'इखतीआन्द्रच्या मरणाला मी जबाबदार आहे' असं ती म्हणाली."

"पण दुसऱ्या माणसाशी एवढ्या घाईनं तिनं लग्न का केलं? तिचा... तिचा जीव मी वाचवला होता. हो, हो! महासागरात बुडालेली तरुणी गुत्तीएरेसारखीच होती असं

मला केव्हापासून वाटत होतं. मी तिला किनाऱ्यावर घेऊन गेलो आणि खडकांमागं लपलो. मग तो काळसर माणूस आला – मी त्याला ताबडतोब ओळखलं – आणि त्यानं तिची खात्री पटवली की, त्यानं तिचा जीव वाचवला."

"गुत्तीएरेनं मला ही हकीकत सांगितली होती," ओल्सेन म्हणाला. "तिचा जीव खरोखर कुणी वाचवला हे तिला अजूनही माहीत नाही – झूरीता अथवा ती शुद्धीवर आली तेव्हा तिला अस्पष्ट दिसलेला विचित्र प्राणी. तुम्ही तिला वाचवलंत हे तुम्ही स्वतःच तिला का सांगितलं नाहीत?"

"स्वतः ह्याबद्दल बोलणं प्रशस्त वाटलं नाही. शिवाय, जोवर झूरीताला पाहिलं नव्हतं, तोवर गुत्तीएरेलाच मी वाचवलं होतं अशी मला खात्री वाटत नव्हती. पण ती कबूल कशी झाली?" इखतीआन्द्रने विचारले.

"हे कसं घडलं," सावकाशपणे ओल्सेन स्वतःशी म्हणाला, "माझं मलाच समजत नाही."

"तुम्हाला माहीत आहे तेवढं निदान सांगा," इखतीआन्द्रने विनंती केली.

"बटणं तयार करण्याच्या कारखान्यात शिंपले तपासनीसाचं काम मी करतो. तिथं माझी गुत्तीएरेशी ओळख झाली. ती शिंपले आणायची – बाप स्वतः कामात असला तर तिला पाठवायचा. ओळखीनंतर आमची मैत्री जमली. कधी कधी बंदरावर भेटत असू, समुद्रकिनाऱ्यावर भटकत असू. तिच्या दुःखाबद्दल मला तिनं सांगितलं: एका श्रीमंत स्पॅनिश माणसानं तिला लग्नाची मागणी घातली होती."

"हाच का तो? झूरीता?"

"होय, झूरीता. गुत्तीएरेच्या बापाची, इंडियन बाल्ताझारची, हे लग्न व्हावी अशी फार इच्छा होती. अशा हेवा वाटण्यासारख्या नवऱ्याला नाकारू नको, म्हणून तो तऱ्हात-

ऱ्हांनी गुत्तीएरेचं मन वळवायचा प्रयत्न करत होता."

"हेवा वाटण्यासारखं त्याच्यात काय आहे? म्हातारा, किळसवाणा, घाण वास येणारा," इखतीआन्द्रला राहवले नाही.

"बाल्ताझारच्या दृष्टीनं झूरीता उत्तम जावई. शिवाय बाल्ताझार झूरीताला फार मोठी रक्कम देणं लागत होता. गुत्तीएरेनं लग्नाला नकार दिला असता, तर झूरीता बाल्ताझारचा सत्यानाश करू शकला असता. त्या मुलीला कसं जगावं लागत होतं ह्याची जरा कल्पना करा: एका बाजूला चीड आणणाऱ्या झूरीताच्या प्रणयचेष्टा आणि दुसऱ्या बाजूला बापाची सतत टोचून बोलणी, धमक्या..."

"गुत्तीएरेनं झूरीताला हाकलून का लावलं नाही? तुम्ही एवढे धिप्पाड आणि ताकदवान, मग तुम्ही झूरीताला झोडपून का काढलं नाही?"

ओल्सेनने स्मित केले आणि त्याला आश्चर्य वाटले: इखतीआन्द्र मूर्ख नाही, पण असले विचित्र प्रश्न विचारतोय. कुठे हा लहानाचा मोठा झाला?

"तुम्हाला वाटतं तेवढं असं करणं सोपं नाही," ओल्सेन उत्तरला. "झूरीताच्या आणि बाल्ताझारच्या संरक्षणाला कायदा, पोलीस, न्यायालय उभे राहिले असते." इखतीआन्द्र हे काहीही समजले नाही. "थोडक्यात, तसं करणं शक्य नव्हतं!"

"तर मग ती पळून का गेली नाही?"

"पळून जाणं सोपं होतं. आणि बापापासून पळून जाण्याचा तिनं निर्णय घेतला होता. तिला मदत करायचं मी वचन दिलं होतं. ब्यूनोस-आयर्स सोडून उत्तर अमेरिकेत निघून जाण्याची मी स्वत: केव्हाची तयारी करतोय. माझ्याबरोबर चलण्याची गुत्तीएरेला मी सूचना केली."

“तुमची तिच्याशी लग्न करायची इच्छा होती?” इखतीआन्द्रने विचारले.

“किती विचित्र आहात तुम्ही,” परत स्मित करीत ओल्सेन म्हणाला. “मी तुम्हाला आधीच सांगितलंय, आमची मैत्री होती. पुढं काय घडलं असतं – मला माहीत नाही...”

“तुम्ही का गेला नाहीत?”

“कारण आमच्यापाशी प्रवासाला पैसे नव्हते.”

“म्हणजे ‘हॉरॉक्स’ मधून प्रवास करणं एवढं महाग आहे?”

“‘हॉरॉक्स’ मधून! तिच्यामधून फक्त लाखोपती प्रवास करतात. काय हो इखतीआन्द्र, तुम्ही इथं चंद्रावरून आलात काय?”

इखतीआन्द्र गडबडला, लाजून त्याचा चेहरा लाल झाला आणि अत्यंत साध्या गोष्टी त्याला माहीत नव्हत्या असे उघड करणारे प्रश्न ओल्सेनला यापुढे न विचारण्याचा त्याने निर्णय घेतला.

“साध्या मालवाहू-उतारू बोटीतून प्रवास करण्याइतपतसुद्धा आमच्यापाशी पैसे नव्हते. शिवाय तिथं गेल्यानंतरसुद्धा काही दिवस खर्च होता. कामं काही रस्त्यावर पडलेली नसतात.”

इखतीआन्द्र पुन्हा ओल्सेनला प्रश्न विचारणार होता, पण त्याने स्वतःला आवरले.

“तेव्हा गुत्तीएरेनं स्वतःची मोत्यांची माळ विकायचं ठरवलं.”

“मला जर हे आधी माहीत असतं!” स्वतःच्या पाण्याखालील खजिन्यांची आठवण होताच इखतीआन्द्र उद्‌गारला.

“कशाबद्दल?”

“नाही, असंच... पुढं सांगा ओल्सेन.”

“पळून जाण्याची सगळी पूर्वतयारी झाली होती.”

“आणि मी... माझं काय? माफ करा... म्हणजे मलाही सोडून जाण्याचा तिचा बेत होता?”

“तुमची ओळखसुद्धा झाली नव्हती तेव्हापासून ह्या सगळ्याची सुरुवात झाली होती. नंतर, माझ्या माहिती-प्रमाणं ती तुम्हाला ह्याबद्दल सांगू इच्छित होती. कदाचित आमच्याबरोबर चलण्याचा प्रस्ताव मांडणार होती. निदान पळून जाण्याबद्दल तुम्हाला सांगण्याची संधी मिळाली नसती, तर नंतर तिनं तुम्हाला पत्र लिहून कळवलं असतं.”

“पण तुमच्याबरोबर का, माझ्याबरोबर का नाही? तुमच्याशी सल्ला-मसलत केली, तुमच्याबरोबर पळून जाण्याची तयारी केली!”

“माझी तिच्याशी वर्षापेक्षा जास्त काळापासून ओळख आहे, पण तुमची...”

“बोला, बोला, माझ्या शब्दांकडं लक्ष देऊ नका.”

“तर सगळी तयारी झाली होती,” ओल्सेन पुढे बोलू लागला. “तेवढ्यात गुत्तीएरेच्या डोळ्यांदेखत तुम्ही समुद्रात उडी मारलीत आणि योगायोगानं झूरीता तुम्हा दोघांना भेटला. भल्या सकाळी कारखान्यात जाण्यापूर्वी मी गुत्तीएरेकडं गेलो. पूर्वी मी वारंवार असं करायचा. बाल्ताझार माझ्याशी चांगलं वागायचा. कदाचित माझ्या मुठींचा त्याला धाक वाटत असावा किंवा कदाचित – गुत्तीएरेच्या हट्टीपणाला कंटाळून झूरीतानं तिचा नाद सोडला, तर दुसरा जावई म्हणून तो माझ्याकडं पहात असावा. पण निदान बाल्ताझार आम्हाला अडथळा करत नव्हता आणि झूरीताच्या नजरेला एकत्र पडू नका, एवढीच त्यानं आम्हाला विनंती केली होती. अर्थात म्हाताऱ्या इंडियनाला आमच्या बेतांबद्दल मुळीच संशय नव्हता. ह्या सकाळी मी गुत्तीएरेला सांगणार होतो की,

बोटीची तिकीटं विकत घेतलीत आणि रात्री दहा वाजता तिनं तयार रहायचं. बाल्ताझार मला भेटला, तो खूप बेचैन होता. 'गुत्तीएरे घरात नाही. आणि ती... यापुढं घरात असणार नाही.' बाल्ताझार मला म्हणाला. 'अर्ध्या तासापूर्वी झूरीता नव्याकोऱ्या चकचकीत मोटारीतून घरी आला होता. काय सुरेख मोटार!' बाल्ताझार हरखून म्हणाला. 'आमच्या रस्त्यावर मोटार क्वचित दिसते आणि थेट घरापाशी एखादी मोटार येऊन थांबली तर अप्रूपाची गोष्ट! मी आणि गुत्तीएरे रस्त्यावर धावलो. झूरीता मोटारीचं दार उघडून उभा होता. बाजारापर्यंत फिरवून आणतो असं तो गुत्तीएरेला म्हणाला. गुत्तीएरे ह्या वेळेला बाजारात जाते हे त्याला ठाऊक होतं. गुत्तीएरेनं चमकणारी मोटार पाहिली. तरुण मुलीला ही वस्तू किती प्रिय हे तुम्हाला समजू शकतं. पण गुत्तीएरे धूर्त, पटकन विश्वास टाकणारी नव्हे. तिनं नम्रपणं नकार दिला. अशा हट्टी मुली कधी भेटल्यात तुम्हाला!' बाल्ताझार चिडून म्हणाला आणि दुसऱ्याच क्षणी खो खो हसू लागला. 'पण झूरीता डगमगला नाही. तो तिला म्हणाला, 'तुम्ही लाजताय हे मी पाहतोय. तेव्हा तुम्हाला मदत करायची मला परवानगी द्या.' त्यानं तिला धरलं आणि मोटारीत बसवलं. गुत्तीएरेनं किंकाळी फोडली: 'बाबा!' आणि ती नाहीशी झाली.'"

"'मला वाटतं, आता ती परतणार नाहीत. झूरीता तिला स्वत:कडं घेऊन गेला,' बाल्ताझारनं स्वत:ची हकीकत संपवली आणि घडलेल्या गोष्टींचा त्याला खूप आनंद झालेला दिसला."

"'तुमच्या डोळ्यांदेखत तुमच्या मुलीला पळवण्यात आलं आणि तुम्ही शांतपणं, आनंदानं ह्याबद्दल सांगताय!' चिडून मी बाल्ताझारला म्हणालो."

" 'कशाबद्दल मी चिंता करायची?' बाल्ताझारनं आश्चर्यानं विचारलं. जर हा कुणी दुसरा माणूस असता, तर गोष्ट वेगळी. पण झूरीताला मी खूप काळापासून ओळखतोय. जर त्याच्यासारख्या कंजूसानं मोटारीवर पैसा खर्चायला का कू केली नाही, तर ह्याचा अर्थ गुत्तीएरे त्याला फार आवडतेय. जर घेऊन गेलाय, तर तिच्याशी लग्न करील. आणि तिला धडा मिळाला: हट्टीपणा करू नको! श्रीमंत माणसं वाटेवर पडलेली नसतात. रडत बसायचं तिला मुळीच कारण नाही. पाराना शहरापासून जवळच झूरीताचा 'डोलोरेस' नावाचा हासिन्दा आहे. तिथं त्याची आई राहते. बहुधा तिकडंच तो माझ्या गुत्तीएरेला घेऊन गेला.' "

"आणि तुम्ही बाल्ताझारला चोपलं नाही?" इखतीआन्द्रने विचारले.

"तुमचं बोलणं ऐकलं म्हणजे मी नुसत्या मारामाऱ्या केल्या पाहिजेत असं वाटतंय!" ओल्सेन उत्तरला. "खरं सांगायचं तर बाल्ताझारची कणीक तिंबायची ताबडतोब इच्छा झाली होती. पण नंतर विचार केला की, त्यामुळं केवळ मामला बिनसेल. अजून सगळंच गमावलं नाही अशी माझी समजूत झाली... बाकी तपशील मी सांगत नाही. पण आधी बोललो त्याप्रमाणं गुत्तीएरेची भेट घेण्यात मला यश आलं."

"हासिन्दा 'डोलोरेस' मध्ये?"

"होय."

"आणि त्या नालायक झूरीताला ठार मारून तुम्ही गुत्तीएरेला सोडवलं नाहीत?"

"पुन्हा मारहाण, एवढंच नव्हे ठार मारायचं! तुम्ही एवढे रक्तपिपासू आहात हे कुणाला खरं वाटेल?"

"मी रक्तपिपासू नाही," डबडबल्या डोळ्यांनी इखतीआन्द्र उद्गारला. "पण ही चीड आणणारी गोष्ट आहे!"

ओल्सेनला इखतीआन्द्रची कीव वाटू लागली.

"तुमचं बरोबर आहे, इखतीआन्द्र," ओल्सेन म्हणाला. "झूरीता आणि बाल्ताझार ही नालायक माणसं आहेत. त्यांच्याबद्दल चीड आणि तिरस्कार वाटणं योग्य आहे. त्यांना झोडपून काढायला हरकत नव्हती. पण तुम्हाला वाटतं त्यापेक्षा आयुष्य फार अवघड आहे. झूरीतापासून पळून जायला गुत्तीएरेनं स्वतःच नकार दिला."

"तिनं स्वतः?" इखतीआन्द्रचा विश्वास बसेना.

"होय, स्वतः!"

"का?"

"पहिली गोष्ट, तिची खात्री झालीय की तुम्ही आत्महत्या केलीय – तिच्या खातर बुडालात. तुमच्या मरणाचं तिच्यावर खूप दडपण पडलंय. त्या बिचारीनं तुमच्यावर फार प्रेम केलं असं दिसतंय. 'आता माझं आयुष्य संपलं, ओल्सेन,' ती मला म्हणाली. 'आता मला कसलीही इच्छा नाही. मी सर्वच बाबतीत उदासीन बनलेय. झूरीतानं बोलावून आणलेल्या पाद्र्यानं आमचं लग्न लावलं, तेव्हा मला काहीही कळलं नाही. माझ्या बोटात अंगठी घालत पाद्री म्हणाला की, देवाच्या इच्छेविना काहीही घडत नसतं. आणि देवानं केलेली जुळणी माणसानं तोडू नये. झूरीताशी मी सुखी होणार नाही, पण देवाचा कोप ओढवून घ्यायची मला भीती वाटते, म्हणून त्याला सोडून मी येत नाही.'"

"पण हा सगळा मूर्खपणा आहे! कसला देव? वडील म्हणतात की, देव म्हणजे छोट्या मुलांसाठी परीकथा!" इखतीआन्द्र रागाने ओरडला. "तुम्ही तिला हे पटवू शकला नाहीत?"

"दुर्दैवानं गुत्तीएरे ह्या परीकथेवर विश्वास ठेवतेय. मिशन-ऱ्यांनी तिला कट्टर कॅथलिक बनवलीय. मी केव्हाचा प्रयत्न

करतोय, पण तिची श्रद्धा नाहीशी करणं जमलं नाही. चर्च आणि देव यांच्या विरुद्ध बोललो तर आमची मैत्री तोडण्याची धमकी तिनं मला घातली होती. तेव्हा गप्प बसावं लागलं. आणि हासिन्दात तिचं मन पालटवत बसायला माझ्यापाशी पुरेसा अवधी नव्हता. अवघ्या काही शब्दांची तिच्याशी देवघेव करायची मला संधी मिळाली. आणखी ती असं म्हणाली. गुत्तीएरेशी लग्न केल्यावर झूरीता हसून उद्‌गारला : 'एक काम पार पाडलं. पाखराला पकडून पिंजऱ्यात बसवलं. आता मासा पकडायचा राहिलाय!' त्यानं गुत्तीएरेला खुलासा केला आणि हा मासा म्हणजे कोण हे तिनं मला सांगितलं. "सागरी सैतानाला" पकडण्यासाठी झूरीता ब्यूनोस-आयर्सला येतोय आणि मग गुत्तीएरे लक्षाधी-शाची बायको बनेल. तुम्हीच तर नव्हेत तो "सागरी सैतान"? तुम्ही स्वतःला काहीही अपाय होऊ न देता पाण्याखाली खूप वेळपर्यंत वावरू शकता, मोती वेचणाऱ्या पाणबुड्यांना घाबरवता ..."

सावधपणापायी इखतीआन्द्रने ओल्सेनला स्वतःचे रहस्य सांगितले नाही. त्या रहस्याचा खुलासा करणे त्याला नाही तरी जमलेच नसते. प्रश्नाला उत्तर न देता उलट त्यानेच प्रश्न केला:

"झूरीताला "सागरी सैतान" कशाला पाहिजे?"

"सैतानाला" मोती वेचण्याच्या कामाला जुंपायची पेद्रोची इच्छा आहे. जर तुम्हीच "सागरी सैतान" असाल, तर सांभाळा!"

"आगावू सुचनेबद्दल आभारी आहे," इखतीआन्द्र म्हणाला.

किनाऱ्यावर त्याचे उद्योग सर्वांना माहीत आहेत, वर्त-मानपत्रांमध्ये आणि मासिकांमध्ये त्याच्याबद्दल खूप माहिती

छापून आली आहे, अशी इखतीआन्द्रला पुसटसुद्धा कल्पना नव्हती.

"मला शक्य नाही," अचानक इखतीआन्द्र आवेगाने म्हणाला, "मी तिची भेट घेतलीच पाहिजे. निदान शेवटची. पाराना शहर? मला माहीत आहे. पाराना नदीवरून तिकडं वाट जाते. पण पाराना शहरापासून हासिन्दा 'डोलोरेस' पर्यंत कसं जायचं?"

ओल्सेनने समजावून सांगितले.

इखतीआन्द्रने ओल्सेनशी गच्च हस्तांदोलन केले.

"माफ करा मला. तुम्ही मला शत्रू वाटत होतात, पण अनपेक्षितपणं मित्र सापडला. अच्छा. मी गुत्तीएरेला शोधायला जातोय."

"आत्ता?" स्मित करीत ओल्सेनने विचारले.

"होय, एकही मिनिट वाया घालवत नाही," इखतीआन्द्र उत्तरला व पाण्यात उडी मारून किनाऱ्याकडे जाऊ लागला.

ओल्सेनने केवळ डोके हलविले.

भाग दूसरा

वाटेवर

इखतीआन्द्रने प्रवासाची तयारी पटकन केली. किनाऱ्यावर लपवलेले सूट व बूट त्याने घेतले, सुरा लटकावलेल्या पट्ट्याने त्यांना आवळून पाठीशी बांधले. चष्मा व हातमोजे चढवून तो निघाला.

रीओ-दे-ला-प्लाता आखातात अनेक महासागरी आगबोटी आणि जहाजे, दुकाठी गलबते व लाँच उभ्या होत्या. त्यांच्या दरम्यान छोटया टग बोटी फिरत होत्या. पाण्याखालून त्यांचे तळ पाण्याच्या पृष्ठभागावर सर्वत्र फिरणाऱ्या पाणकिड्यांसारखे दिसत होते. नांगरांच्या साखळ्या व दोर पाण्याच्या तळापासून उगवलेल्या महासागरी पाणतळातील जंगलांच्या वनस्पतींच्या सडपातळ बुंध्यांप्रमाणे भासत होते. लोकांनी टाकलेली सर्व तऱ्हेची घाण, लोखंडी तुकडे, दगडी कोळसा, जुन्या रबरी नळयांचे तुकडे, फाटलेली शिडे, फुटक्या विटा, फुटक्या बाटल्या, रिकामी डबडी इत्यादी वस्तूंचे ढीग आखाताच्या तळाशी साचलेले होते. किनाऱ्याच्या नजीकच्या तळाशी कुत्र्यांची व मांजरांची प्रेते पडलेली होती.

पाण्यावरती तेलाचा पातळ थर पसरला होता. सूर्य अजून मावळला नव्हता, पण इथे एव्हाना हिरवट-राखी संध्याछाया दाटल्या होत्या. पाराना नदी वाळू व गाळमिश्रित गढूळ पाणी समुद्रात ओतत होती.

11-907

जहाजांच्या ह्या जंजाळात इखतीआन्द्र वाट चुकू शकला असता, पण आखातात वाहात येणाऱ्या नदीच्या हलक्या प्रवाहाचा त्याला दिशादर्शकासारखा उपयोग झाला. "माणसं किती अस्वच्छ आहेत," उकीरडयाची आठवण करून देणाऱ्या पाण्याच्या तळावरून नजर फिरविताना त्याच्या मनात विचार आला. आखाताच्या मध्यभागातून, जहाजांच्या तळांखालून तो पोहत होता. आखाताच्या घाणेरडया पाण्यात त्याचा श्वास घुसमटत होता, कोंदट खोलीत बसलेल्या माणसाप्रमाणे त्याची अवस्था बनली होती.

पाणतळाशी अनेक ठिकाणी माणसांची प्रेते व प्राण्यांचे सापळे त्याला आढळले. एका प्रेताची कवटी फुटलेली होती, गळयात दोरीने धोंडा बांधलेला होता. इथे कुणाचा तरी गुन्हा पुरण्यात आला होता. ह्या भयानक जागांपासून लौकर दूर पोहत जाण्याचा इखतीआन्द्रने प्रयत्न केला.

पण आखातापासून जेवढा अधिक वरच्या बाजूला तो जाऊ लागला, तेवढा पाण्याच्या उलटया प्रवाहाचा जोर त्याला जास्त जाणवू लागला. पोहणे अवघड बनले. महा-सागरातही प्रवाह असतात, पण तेथे त्यांची त्याला मदत होई. इखतीआन्द्रला त्यांची उत्तम माहिती होती. खलाशी जसा वाऱ्यांचा उपयोग करतो, तसा तो प्रवाहांचा उपयोग करायचा. पण इथे केवळ एक उलटा वाहणारा प्रवाह होता. इखतीआन्द्र पट्टीचा पोहणारा होता, पण अगदी मंद गतीने तो पुढे सरकत होता ह्याची त्याला चीड येत होती.

अचानक अगदी जवळ काहीतरी धपकन पडले आणि त्या आघातापासून तो थोडक्यात वाचला. कुठल्यातरी जहाजाने नांगर टाकला होता. "इथं पोहणं धोक्याचं आहे," इखती-आन्द्रच्या मनात आले व त्याने भोवती नजर टाकली. एक मोठी आगबोट त्याचा पाठलाग करताना त्याला दिसली.

इखतीआन्द्र पाण्यात आणखी खाली गेला आणि जेव्हा आगबोटीचा तळ त्याच्यापासून पुढे गेला, तेव्हा बोटीचा कणा त्याने हाताने पकडला. लोखंडावर बहुहस्त प्राण्यांच्या वसाहतीचा संपूर्ण खरबरीत थर चिकटलेला होता, त्यामुळे बोटीच्या आड्याला धरणे त्याला शक्य झाले. तशा अवस्थेत पाण्याखाली पडून राहणे फारसे सोयीस्कर नव्हते, पण आता त्याला आडोसा लाभला होता आणि बोटीच्या वेगासह भराभर पुढे जात होता.

दोआबाचा प्रदेश संपला आणि आगबोट पाराना नदीतून जाऊ लागली. नदीच्या पाण्यात प्रचंड गाळ होता. ह्या गोड्या पाण्यात इखतीआन्द्रला श्वासोच्छ्वास करणे अवघड जात होते. त्याचे हात बधीर बनले होते, पण आगबोट सोडण्याची त्याची इच्छा नव्हती. "ह्या प्रवासात मी लीडिंगला घेऊ शकलो नाही हे किती वाईट," त्याला डोल्फिनची आठवण झाली. पण डोल्फिनला नदीत ठार मारले असते, कारण सबंध प्रवास पाण्याखालून करणे लीडिंगला शक्य झाले नसते आणि भरपूर वाहतूक असलेल्या नदीच्या पाण्याच्या पृष्ठभागावर येण्याचे इखतीआन्द्र टाळत होता.

इखतीआन्द्रच्या हातांना कळ लागली होती. शिवाय सबंध दिवसभरात काहीही न खाल्ल्यामुळे त्याला जोरदार भूक लागली होती. थांबणे भाग होते. बोटीचे आडे सोडून तो पाण्याच्या तळाशी गेला.

संध्याछाया दाट बनल्या. इखतीआन्द्रने गाळभरला तळ निरखून पाहिला. पण त्याला खाण्यासाठी मासे अथवा कालव सापडेनात. त्याच्या आसपास गोड्या पाण्यातील मासे सुळसुळत होते, पण त्यांची त्याला माहिती नव्हती. शिवाय सागरी माशांपेक्षा हे मासे जास्त धूर्त असल्याचे त्याच्या ध्यानात आले. त्यांना पकडणे अधिक अवघड होते. जेव्हा रात्र झाली

आणि मासे झोपले, तेव्हा कुठे एक मोठा पाईक मासा पकडण्यात इखतीआन्द्र यशस्वी ठरला. त्याचे मांस वातड होते आणि गाळाची चव त्याला जाणवत होती, पण इखतीआन्द्र कमालीचा भुकेला होता, त्यामुळे त्याने माशाचे मोठमोठे लचके तोडून काट्यांसकट गिळले.

आता विश्रांती आवश्यक होती. ह्या नदीत शार्क अथवा ऑक्टोपसांची भीती नसल्यामुळे निदान शांतपणे झोपणे शक्य होते. पण झोपेत असताना पाण्याच्या प्रवाहाबरोबर तो खालच्या दिशेला वाहात जाणार नाही ह्याबद्दल दक्षता बाळगणे आवश्यक होते. इखतीआन्द्रने पाण्याच्या तळाशी काही दगड गोळा केले, त्यांचा कट्टा रचला आणि एका दगडाभोवती हाताचा विळखा घालून तो झोपला.

पण लौकरच त्याची झोपमोड झाली. कुठलीतरी आगबोट जवळ येत असल्याचे त्याला जाणवले. इखतीआन्द्रने डोळे उघडले तेव्हा त्याला सिग्नलचे दिवे दिसले. आगबोट खालून वरती येत होती. इखतीआन्द्र पटकन उठला व आगबोटीला धरण्यासाठी सज्ज झाला. पण गुळगुळीत तळाची ही मोटार बोट होती. इखतीआन्द्रने तिला पकडण्याचे काही व्यर्थ प्रयत्न केले, पंख्याच्या तडाख्यातून तो थोडक्यात वाचला.

अशा अनेक बोटी वरून खाली गेल्या आणि शेवटी नदीच्या वरच्या अंगाला जाणाऱ्या एका उतारूवाहू आगबोटीची कडा धरण्यात इखतीआन्द्र यशस्वी झाला.

पाराना शहरापर्यंत इखतीआन्द्र अशा रीतीने पोहोचला. त्याच्या प्रवासाचा पहिला टप्पा संपला होता. पण सर्वांत अवघड भाग अजून पुढेच होता — जमिनीवरील प्रवास.

भल्या सकाळीच शहराच्या गोंगाटी बंदरापासून दूर, माणसांची वर्दळ नसलेल्या जागी इखतीआन्द्र पोहत गेला; त्याने सावधपणे सभोवती नजर टाकली व तो किनाऱ्यावर

आला. त्याने चष्मा आणि हातमोजे काढले, किनाऱ्यावरील वाळूत त्यांना पुरले, सूट उन्हात वाळवला व अंगात घातला. त्या सुरकुतल्या सुटात तो भटक्या दिसत होता. पण ह्याबद्दल त्याने विशेष विचार केला नाही.

ओल्सेनने सांगितल्याप्रमाणे इखतीआन्द्र उजव्या किनाऱ्यालगतच्या रस्त्याने निघाला. पेद्रो झूरीताचा 'डोलोरेस' हासिन्दा कुठे आहे असे तो वाटेत भेटणाऱ्या मच्छीमारांना विचारीत होता.

मच्छीमार संशयाने त्याला न्याहाळून बघत होते आणि नकारार्थी डोकी हलवीत होते.

तासामागून तास उलटत होते, उष्मा वाढत होता, पण शोधाला अजून दिशा लाभत नव्हती. जमिनीवर अनोळखी ठिकाणे शोधणे इखतीआन्द्रला अजिबात जमत नव्हते. उष्म्याने तो हैराण झाला होता, त्याचे डोके गरगरत होते आणि चित्त एकवटणे त्याला अवघड जात होते.

तजेला यावा म्हणून इखतीआन्द्रने अनेकदा कपडे उतरविले आणि पाण्यात बुचकळ्या मारल्या.

अखेरीस दुपारी चारच्या सुमाराला त्याला एक म्हातारा शेतमजूर भेटला. इखतीआन्द्रचे बोलणे ऐकल्यानंतर म्हातारा मान डोलावीत म्हणाला:

"ह्या रस्त्यानं थेट मैदानं ओलांडून जा. शेवटी एक मोठं तळं लागेल, पूल ओलांड, छोटं टेकाड चढून जा, तिथं तुला मिशावाली डोलोरेस भेटेल."

"मिशावाली का? 'डोलोरेस' हासिन्दा आहे ना?"

"होय, हासिन्दा. पण त्या हासिन्दाच्या म्हाताऱ्या मालकिणीचं नावसुद्धा डोलोरेस आहे. ही डोलोरेस पेद्रो झूरीताची आई. म्हातारीला भरघोस मिशा आहेत. तिच्यापाशी नोकरी करण्याचा मुळीच विचार करू नको. तुला जिवंत खाईल.

अस्सल हडळ आहे. असं म्हणतात, झूरीतानं तरुण बायको आणलीय. सासू तिला सुखानं जगू देणार नाही," बडबड्या शेतकऱ्याने माहिती पुरविली.

"गुत्तीएरेबद्दल हा बोलतोय," इखतीआन्द्रच्या मनात आले.

"खूप लांब आहे?" त्याने विचारले.

"संध्याकाळपर्यंत पोचशील," सूर्याकडे पहात म्हातारा म्हणाला.

म्हाताऱ्याचे आभार मानून गव्हाच्या आणि मक्याच्या शेतांलगत जाणाऱ्या रस्त्यावरून इखतीआन्द्र भराभरा पावले टाकू लागला. लौकर चालण्यामुळे तो थकू लागला. रस्त्याचा पांढरा पट्टा दूरवर पसरला होता. गव्हाच्या शेतांऐवजी उंच दाट गवताची कुरणे आली, त्या कुरणांमध्ये मेंढ्यांचे कळप चारत होते.

इखतीआन्द्र दमला होता, त्याच्या कुशीत जोरदार ठणका सुरू झाल्या होत्या. तहानेने तो व्याकुळला होता. सभोवार पाण्याचा एक थेंब दिसत नव्हता. "तळं निदान लौकर दिसावं!" त्याच्या मनात आले. त्याचे गाल व डोळे खोल गेले. त्याचे श्वसन जड बनले होते. खूप भूक लागली होती. पण इथे खाणार काय? दूर कुरणात बकऱ्यांचा कळप चरत होता, पण त्यांच्या राखणीला धनगर आणि कुत्रे होते. दगडी भिंतीपलिकडे नासपातीच्या आणि मोसंब्यांच्या झाडांच्या फांद्या लोंबत होत्या, फळे पिकलेली होती. पण इथे काही महासागर नव्हता. इथे सगळे परक्यांचे, सगळी विभागणी झालेली, सगळ्याभोवती कुंपणे, सगळ्याची राखण. फक्त मुक्त पाखरे कुणाची नाहीत. ती उडतात, रस्त्यांलगत चिवचिवतात. पण त्यांना धरणे अवघड. शिवाय ही पाखरे धरायला परवानगी आहे का? कदाचित तीसुद्धा कुणाच्या

तरी मालकीची असायची. इथे पाणसाठ्यांच्या, बागांच्या आणि कळपांच्या मध्यभागी भुकेने व तहानेने सहज मरता येईल.

इखतीआन्द्रला वाटेत हात पाठीशी धरून चालणारा एक लठ्ठ माणूस भेटला. त्या माणसाच्या पांढऱ्या जाकीटावर चकचकीत बटणे होती, डोक्यावर टोकदार पांढरी टोपी होती व कमरेला रिवॉल्वरची चामडी पिशवी लटकत होती.

"काय हो, 'डोलोरेस' हासिन्दा खूप लांब आहे?" इखतीआन्द्रने त्या माणसाला विचारले.

लठ्ठ माणसाने इखतीआन्द्रला संशयाने न्याहाळले.

"तुला काय पाहिजे? कुठून आलास?"

"ब्यूनोस-आयर्सहून ..."

जाकीटवाला माणूस एकदम सावध बनला.

"मला तिथं कुणाची तरी भेट घ्यायचीय," इखतीआन्द्र पुढे म्हणाला.

"हात पुढं कर," लठ्ठ माणूस म्हणाला.

इखतीआन्द्रला ह्याचे आश्चर्य वाटले, पण कोणत्याही वाईटाची अपेक्षा न बाळगता त्याने हात पुढे केले. लठ्ठ्याने खिशातून हातकड्या काढल्या आणि पटकन इखतीआन्द्रच्या हातांमध्ये घातल्या.

"छान सापडलास," चकचकीत बटणवाला माणूस म्हणाला आणि इखतीआन्द्रच्या कुशीत ढोसत ओरडला: "चल! मी तुला 'डोलोरेस' पर्यंत घेऊन जातो!"

"तुम्ही माझ्या हातात बेड्या का घातल्यात?" बेड्यांकडे पहात हात वर धरून गोंधळल्या मनाने इखतीआन्द्रने विचारले.

"बडबड पुरे!" लठ्ठ्या कठोरपणे ओरडला. "चल पुढं!"

मान खाली घालून इखतीआन्द्र पाय फरफटत रस्त्यावरून

चालू लागला. निदान परत मागे जावे लागत नव्हते ही चांगली गोष्ट होती. काय घडले होते हे त्याला समजले नव्हते. आदल्या रात्री शेजारच्या फार्मवर खून झाला होता व दरोडा पडला होता हे त्याला ठाऊक नव्हते. पोलीस गुन्हेगारांचा आता शोध घेत होते. सुरकुतल्या सुटामध्ये त्याचा अवतार संशयास्पद दिसत होता, ह्याची इखतीआन्द्रला कल्पना नव्हती. त्याच्या प्रवासाच्या उद्दिष्टाबाबतच्या संदिग्ध उत्तराने त्याचे भवितव्य निश्चित केले होते.

पोलीसाने इखतीआन्द्रला अटक केली होती आणि पारानाला तुरुंगात त्याची रवानगी करण्यासाठी नजीकच्या खेड्यात इखतीआन्द्रला तो घेऊन चालला होता.

इखतीआन्द्रला फक्त एकच गोष्ट उमजली होती: त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले होते आणि त्याच्या प्रवासात दु:खद अडथळा आला होता. पहिल्याच संधीला सुटका कशी करून घ्यावी ह्याबाबत तो विचार करू लागला.

स्वत:च्या यशावर खूष झालेल्या लठ्ठ पोलीसाने लांब सिगार शिलगावली. इखतीआन्द्रवर धुराचे लोट सोडत तो पाठीमागून चालत होता. इखतीआन्द्रचा जीव घुसमटला.

"कृपा करून माझ्या तोंडावर धूर सोडू नका, मला श्वास घेणं अवघड जातंय," मागे वळून इखतीआन्द्र पोलीसाला म्हणाला.

"का ऽऽ य? धूम्रपान करू नका म्हणतात? हा-हा-हा!" पोलीस खो खो हसला. मग त्याच्या सबंध चेहऱ्याला सुरकुत्या पडल्या. "वा रे, केवढा नाजुक!" आणि इखतीआन्द्रच्या चेहऱ्यावर धुराचा लोट सोडत तो ओरडला: "चाल पुढं!" इखतीआन्द्रने आज्ञेचे पालन केले.

शेवटी अरुंद पुलासह तळे जेव्हा इखतीआन्द्रच्या नजरेस पडले, तेव्हा नकळत त्याच्या पावलांचा वेग वाढला.

"तुझ्या डोलोरेसकडं जाण्याची घाई करू नको!" लठ्ठ्या खेकसला.

ते पुलावर आले. पुलाच्या मध्यभागी इखतीआन्द्र एकदम कठड्यावर वाकला आणि त्याने स्वत:ला पाण्यात झोकून दिले.

हातकड्या घातलेल्या माणसाकडून अशा कृतीची पोलीसाने मुळीच अपेक्षा केली नव्हती.

त्याचप्रमाणे पुढील निमिषार्धात लठ्ठ्याने जे काही केले, त्याची इखतीआन्द्रने अपेक्षा धरली नव्हती. पोलीसाने इखतीआन्द्रपाठोपाठ पाण्यात उडी मारली–गुन्हेगार बुडून मरेल अशी त्याला भीती वाटली होती. पोलीस त्याला जिवंत अवस्थेत ठाण्यावर हजर करू इच्छित होता: हातकड्या घातलेल्या अवस्थेत अटक केलेला माणूस बुडून मेला असता, तर पुढे अनेक कटकटी निर्माण झाल्या असत्या. पोलीसाने एवढ्या लगबगीने इखतीआन्द्रमागोमाग उडी मारली होती, की इखतीआन्द्रच्या डोक्याचे केस तो पकडू शकला होता व आता सोडत नव्हता. तेव्हा केस गमावण्याचा धोका पत्करून इखतीआन्द्रने पोलीसाला तळाशी खेचले. लौकरच पोलीसाने केसांवरची पकड सोडल्याचे इखतीआन्द्रला जाणवले. इखतीआन्द्र काही मीटर दुसऱ्या बाजूला पोहत गेला आणि पोलीस पाण्यातून वरती गेला अथवा नाही हे पहायला त्याने पाण्यावरती डोके काढले. पोलीस एव्हाना वरती होता आणि इखतीआन्द्रचे डोके पाहताच तो ओरडला:

"बुडशील हरामखोरा! माझ्यापाशी पोहत ये!"

"ही कल्पना चांगली आहे," इखतीआन्द्रने विचार केला व अचानक तो ओरडू लागला:

"वाचवा! बुडतोय..." आणि त्याने तळाशी बुडी मारली.

पोलीसाने पाण्यात बुड्या मारून त्याला कसे शोधले ते इखतीआन्द्र तळाशी बसून पहात होता. शेवटी निराश होऊन पोलीस किनाऱ्यावर चढला.

"आता निघून जाईल," इखतीआन्द्रला वाटले. पण पोलीस गेला नाही. इतर पोलीस येईपर्यंत त्याने प्रेतापाशी थांबण्याचे ठरविले होते. बुडालेला माणूस तळयाच्या तळाशी पडला होता म्हणून परिस्थिती बदलत नव्हती.

दरम्यान खेचराच्या पाठीवर पोती लादून एक शेतकरी पुलावरून जात होता. पोती उतरव आणि खेचरावर बसून नजीकच्या पोलीस ठाण्यावर चिठी नेऊन दे, असा पोलीसाने त्या शेतकऱ्याला हुकूम ठोकला. इखतीआन्द्रची अवस्था अधिकच बिकट बनत चालली होती. त्यात भर म्हणून तळयात जळवा होत्या. त्या इखतीआन्द्रच्या शरीराला चिकटून त्याचे रक्त पिऊ लागल्या आणि त्यांना झटकून टाकणे त्याला अशक्य ठरले. स्थिर पाण्याला न डहुळता हे काम सावधपणे करणे आवश्यक होते आणि पोलीसाचे लक्ष वेधवून घेणे इष्ट नव्हते.

अर्ध्या तासानंतर शेतकरी परतला, त्याने हाताने रस्त्याकडे खूण केली, खेचरावर स्वतःची पोती लादली आणि घाई-घाईने तो निघून गेला. पाच मिनिटांनंतर तळयापाशी तीन पोलीस आले. दोघांनी डोक्यांवरून हलकी होडी वाहून आणली होती व तिसऱ्याने वल्ही आणि आकडा धरले होते.

त्यांनी पाण्यात होडी सोडली व बुडालेल्या माणसाचा शोध सुरू केला. इखतीआन्द्रला त्यांच्या शोधाची भीती वाटत नव्हती. त्याच्या दृष्टीने हा पोरखेळ होता – फक्त ह्या जागेपासून त्या जागेपर्यंत त्याला जावे लागत होते. तळयाचा सारा तळ त्यांनी आकड्याने ढवळून काढला, पण त्यांना प्रेत सापडले नाही.

इखतीआन्द्रला अटक करणारा पोलीस आश्चर्याने हातवारे

करीत होता. इखतीआन्द्रला ह्याची मजा वाटली. पण ही मजा जास्त काळ टिकली नाही. पोलीसांच्या आकड्याने नळ्यातील गाळ ढवळून निघाला होता. पाणी गढूळ बनले. आता हातापलिकडच्या अंतरावरील इखतीआन्द्र काही पाहू शकत नव्हता. हे फार धोक्याचे होते. पण मुख्य म्हणजे ह्या पाण्यात कल्ल्यांमार्फत श्वसन करण्यास त्याला त्रास होऊ लागला. प्राणवायू पुरत नव्हता, त्यात आणखी गाळाच्या लोटांची भर पडली होती.

इखतीआन्द्र घुसमटला आणि कल्ल्यांमधील वेदना वाढल्या. इतःपर सहन करणे अशक्य ठरले. त्याच्या तोंडून नकळत कण्हण्याचा आवाज बाहेर पडला आणि तोंडातून काही बुड-बुडे वर गेले. काय करायचे? तळ्याबाहेर पडायचे – दुसरा मार्गच नव्हता. कितीही धोका असला तरी तळ्याबाहेर येणे आवश्यक होते. अर्थात त्याला त्यांनी तात्काळ धरले असते, कदाचित मारहाण केली असती, तुरुंगात पाठविले असते. काही हरकत नव्हती. इखतीआन्द्र धडपडत उथळ पाण्यात गेला आणि त्याने पाण्याबाहेर डोके उंचावले.

"आ-आ-आ-आ!" पोलीस विचित्र आवाजात ओरडला आणि किनाऱ्याकडे लौकर पोहत जाता यावे म्हणून त्याने होडीतून तळ्यात उडी मारली.

"येशू-मारीया! ओ-ओ!" होडीच्या तळाशी आडवे होत दुसरा ओरडला.

किनाऱ्यावरील उरलेले दोघे पोलीस दबत्या आवाजात देवाचा धावा करू लागले. भीतीने ते पांढरेफटक पडले होते आणि थरथर कापत होते. एकमेकापाठी लपण्याचा त्यांचा प्रयत्न चालला होता.

इखतीआन्द्रने अशी अपेक्षा केली नव्हती आणि पोलीस एवढे का घाबरले हे त्याच्या चटकन ध्यानात आले नाही.

मग त्याला आठवण झाली की, स्पॅनिश लोक धर्मावर आणि भुताखेतांवर विश्वास ठेवणारे होते. आपल्यासमोर दुसऱ्या जगातील पिशाच उभे आहे अशी बहुधा पोलीसांची समजूत झाली होती. इखतीआन्द्रने त्यांना आणखी घाबरविण्याचे ठरविले: त्याने दात विचकले, डोळे गरागरा फिरविले, किनाऱ्याकडे सावकाश जाताना तोंडातून भयानक आवाज काढले. अत्यंत सावकाशपणे तो रस्त्यावर चढला आणि संथ पावलांनी तेथून नाहीसा झाला.

एकही पोलीस जागचा हलला नाही, एकाही पोलीसाने इखतीआन्द्रला धरले नाही. अतिश्रद्धेपायी, पिशाचाबद्दल वाटणाऱ्या भीतीपायी त्यांना, स्वतःच्या नोकरीतील कर्तव्याला पार पाडता आले नाही.

हा तर "सागरी सैतान"!

पेद्रो झूरीताची आई – डोलोरेस – ही गुबगुबीत म्हातारी होती, तिचे नाक बाकदार होते आणि हनुवटी पुढे आलेली होती. दाट मिशांमुळे तिच्या चेहऱ्याला विचित्र आणि भयानक रूप प्राप्त झाले होते. बाईच्या दृष्टीने अशा मिशा असणे फार दुर्मिळ होते व त्यामुळे आसपासच्या प्रदेशात तिला "मिशावाली डोलोरेस" असे टोपणनाव लाभले होते.

जेव्हा तिचा मुलगा त्याच्या तरुण बायकोला घेऊन आला, तेव्हा तिने गुत्तीएरेकडे अप्रिय नजरेने न्याहाळून पाहिले. लोकांमधील उणीवा शोधण्याची डोलोरेसला खोड होती. गुत्तीएरेचे सौंदर्य पाहून म्हातारी चकित झाली, पण तिने आपले आश्चर्य दाखविले नाही. मिशावाली डोलोरेस

अशी होती: स्वयंपाकघरात वावरताना तिने विचार केला व निर्णय घेतला की, गुत्तीएरेचे सौंदर्य हेच तिची उणीव होते.

मुलाबरोबर एकांतात राहिल्यानंतर म्हातारी नाराजीने डोके हलवीत म्हणाली:

"छान आहे! फारच छान आहे!" आणि उसासत पुढे म्हणाली: "अशा सुंदरीला जवळ बाळगून तू संकटात पडशील... त्यापेक्षा एखाद्या स्पॅनिश पोरीशी तू लग्न करायला पाहिजे होतं." आणखी विचार करून ती पुढे म्हणाली: "फार मानी आहे. पण हात मऊ, नाजुक आहेत. कामं करायची नाही."

"मोडून काढू तिला," पेद्रो उत्तरला आणि हिशोबांमध्ये गढून गेला.

डोलोरेसने जांभई दिली व मुलाला अडथळा होऊ नये म्हणून संध्याकाळची गार हवा खायला ती बाहेर बागेत गेली. चंद्राच्या प्रकाशात स्वप्ने रंगवायला तिला आवडायचे.

फुलांच्या सुगंधाने बाग भरून गेली होती. शुभ्र लिली चांदण्यात चमकत होत्या. वेलींची पाने किंचित सळसळत होती.

सुगंधी पांढऱ्या फुलांच्या झाडांच्या मध्यभागी असलेल्या बाकावर डोलोरेस बसली आणि स्वप्नरंजनात दंग झाली: शेजारचा मळा ती विकत घेईल, सुरेख लोकरीच्या मेंढयांची पैदास करील, नवीन पडव्या बांधील.

"तुम्हाला पटकी होवो!" गालावर चापटी मारीत म्हातारी चिडून ओरडली. "हे डास मेले माणसाला स्वस्थ बसू देत नाहीत!"

नकळतपणे आकाशात ढग पसरला आणि सगळी बाग अर्धवट अंधारात बुडाली. क्षितिजावर तेजस्वी निळसर पट्टा

उमटला – पाराना शहरातील दिव्यांचा तो उजेड होता.

तेवढ्यात सखल दगडी कुंपणावर एका माणसाचे डोके तिने पाहिले. बेड्या अडकवलेले कुणाचे तरी हात वर झाले आणि सावधपणे त्याने भिंतीपलिकडे बागेत उडी मारली.

म्हातारी घाबरली. "बागेत कैदी आलाय," तिची समजूत झाली. मोठ्यांदा किंचाळायची तिची इच्छा होती, पण तसे करणे तिला शक्य झाले नाही. उठून पळण्याचा तिने प्रयत्न केला, पण तिचे पाय जागचे हलेनात. बाकावर बसूनच ती त्या अनोळख्याचा मागोवा घेऊ लागली.

हातकड्या घातलेला माणूस सावधपणे झुडुपांमधून घराच्या दिशेने आला व खिडक्यांमधून डोकावून पाहू लागला.

तेवढ्यात – किंवा तिला भास झाला – त्या कैद्याने हळूच हाक मारली:

"गुत्तीएरे!"

"अस्सं, अशी आहे गुणसुंदरी! गुन्हेगारांशी मैत्री ठेवते! ही सुंदरी मला आणि माझ्या मुलाला ठार मारील, हासिन्दा लुटून नेईल, ह्या कैद्याबरोबर पळून जाईल!" डोलोरेसच्या मनात विचार आला.

अचानक म्हातारीच्या मनात सुनेबद्दल अत्यंत तिटकारा निर्माण झाला. त्यामुळे तिच्या अंगात बळ संचारले. ताडकन उठून ती घरात धावली.

"लौकर!" दबत्या आवाजात डोलोरेस मुलाला म्हणाली. "बागेत कैदी घुसलाय. तो गुत्तीएरेला हाका मारीत होता."

घराला आगीच्या ज्वाळांनी जणू वेढले होते अशा घाईने पेद्रो धावला, त्याने हाती फावडे घेतले आणि घराभोवती तो धावला.

भिंतीपाशी मळक्या, चुरगळलेल्या सुटातील अनोळखी

उभा होता, त्याच्या हातात बेड्या होत्या आणि तो खिडकीकडे पहात होता.

"हलकट!" झूरीता पुटपुटला आणि त्याने तरुणाच्या डोक्यावर फावड्याचा आघात केला.

मुळीच आवाज न करता तरुण खाली कोसळला.

"खलास झाला..." झूरीता हळूच म्हणाला.

"खलास," त्याच्या पाठोपाठ आलेल्या डोलोरेसने अशा सुरात म्हटले, जणू तिच्या मुलाने विषारी विंचू ठेचला होता.

झूरीताने प्रश्नार्थकपणे आईकडे पाहिले.

"कुठं टाकायचं ह्याला?"

"तळ्यात!" म्हातारीने आज्ञा केली. "तळं खूप खोल आहे."

"प्रेत तरंगून वर येईल."

"गळ्यात धोंडा बांधू. जरा थांब..."

डोलोरेस घरात धावली आणि ठार मारलेल्या माणसाच्या प्रेताला कोंबण्यासाठी घाईघाईने पोते शोधू लागली. पण त्या दिवशी सकाळीच सर्व पोत्यांमध्ये गहू भरून तिने ती पोती चक्कीकडे धाडली होती. तेव्हा तिने उशीचा लांबट अभ्रा व एक दोरी घेतली.

"पोती नाहीत," ती मुलाला म्हणाली. "ह्या अभ्र्यात दगड भर आणि अभ्रा दोरीनं त्याच्या हातकड्यांना बांध..."

झूरीताने होकारार्थी डोके हलविले, प्रेत खांद्यावर उचलले आणि बागेच्या टोकाशी असलेल्या छोट्या तळ्यापाशी तो गेला.

"रक्ताचे डाग पाडू नको," मुलापाठोपाठ हातात दोरी व अभ्रा घेऊन जाणारी डोलोरेस दबत्या आवाजात म्हणाली.

"धुवून टाकणार," पेद्रो म्हणाला आणि रक्त जमिनी-

वर सांडावे अशा हेतूने त्याने तरुणाचे डोके उलटे खाली धरले.

तळयापाशी झूरीताने भराभरा अभ्र्यात दगड भरले, प्रेताच्या हातांना अभ्रा गच्च बांधला आणि प्रेत तळयात फेकले.

" आता कपडे बदलले पाहिजेत," पेद्रो आकाशाकडे पहात म्हणाला. "पाऊस पडणार. जमिनीवरचे रक्ताचे डाग पावसाचं पाणी सकाळपर्यंत धुवून काढील."

"तळयाचं पाणी रक्तामुळं गुलाबी तर होणार नाही?" मिशावाल्या डोलोरेसने विचारले.

"नाही होणार. तळयात वाहतं पाणी आहे... हराम-खोर!" घराकडे जाताना झूरीता घोगऱ्या आवाजात उद्‌गारला व एका खिडकीकडे मुठी वळवून त्याने धमकावले.

"बघितलीस तुझी सुंदरी कशी आहे!" मुलापाठोपाठ जात म्हातारी खवटपणे म्हणाली.

गुत्तीएरेला पोटमाळयावरची खोली देण्यात आली होती. ह्या रात्री तिचा डोळा लागत नव्हता. खोलीत कोंदट वाटत होते, डास चावत होते. गुत्तीएरेच्या मनात उदास विचारांनी गर्दी केली होती.

इखतीआन्द्रला, त्याच्या मृत्यूला ती विसरू शकत नव्हती. नवऱ्यावर तिचे प्रेम नव्हते, सासूबद्दल तिला तिटकारा वाटत होता. आणि ह्या मिशावाल्या म्हातारीबरोबर गुत्तीएरेला पुढचे आयुष्य कंठायाचे...

ह्या रात्री इखतीआन्द्रचा आवाज ऐकल्याचा गुत्तीएरेला भास झाला होता. त्याने तिला तिच्या नावाने हाका मारल्या होत्या. बागेमधून काहीतरी खुसपूस, कुणाचे तरी दबते आवाज ऐकू आले होते. ह्या रात्री झोपणे अशक्य असल्याचे गुत्तीएरेच्या ध्यानात आले. ती बागेत गेली.

सूर्य अजून उगवला नव्हता. बागेत पहाटेचा फिकट उजेड पडला होता. आकाशात मेघ नव्हते. गवतावर आणि झाडांवर भरपूर दंव चमकत होते. पातळ झग्यात, अनवाणी पायांनी गुत्तीएरे गवतावरून चालत गेली. एकदम ती थबकली आणि जमिनीवर निरखून पाहू लागली. तिच्या खिडकीसमोर-च्या पाऊलवाटेवरील वाळूवर रक्ताचे डाग पडले होते. तेथेच रक्ताने माखलेले फावडे पडले होते.

रात्री इथे काहीतरी गुन्हा घडला होता. नाही तर हे रक्ताचे डाग कुठून आले?

गुत्तीएरे नकळत रक्ताच्या डागांचा मागोवा घेत तळ्यापर्यंत पोहोचली.

"गुन्ह्याचे अखेरचे पुरावे ह्या तळ्यात तर लपविण्यात आलेले नाहीत?" तळ्याच्या हिरव्या पृष्ठाकडे भीतीने पहात असताना तिच्या मनात विचार आला.

तळ्याच्या हिरवट पाण्यातून इखतीआन्द्रचा चेहरा तिच्याकडे पहात होता. त्याच्या कानशीलापाशी जखम होती. चेहऱ्यावर वेदना व आनंदाच्या भावना एकाच वेळी उमटल्या होत्या.

बुडालेल्या इखतीआन्द्रच्या चेहऱ्याकडे गुत्तीएरे एकटक बघत होती. तिला खरेच वेड तर लागले नव्हते?

गुत्तीएरे तेथून दूर पळून जायच्या बेतात होती. पण ती तेथून हलू शकली नाही, त्याच्यावर खिळलेली नजर हलवू शकली नाही.

इखतीआन्द्रचा चेहरा सावकाशपणे पाण्यामधून वरती आला. संथ पाण्यावर लहरी उमटवत आता तो पाण्यावरती स्पष्ट दिसू लागला. हातकड्या अडकवलेले हात इखतीआन्द्रने गुत्तीएरेपुढे धरले आणि फिकट स्मित करीत प्रथमच त्याने तिला "तू" म्हणून संबोधले.

12-907

“गुत्तीएरे! माझ्या लाडके! अखेर, गुत्तीएरे, मी...” पण त्याने वाक्य पूर्ण केले नाही.

गुत्तीएरेने दोन्ही हातांनी स्वतःचे डोके गच्च धरले आणि घाबरून ती ओरडली:

“चालता हो! दुर्दैवी पिशाचा, नाहीसा हो! तू मेलास हे मला ठाऊक आहे. कशाला तू माझ्यापाशी आलास?”

“नाही-नाही, गुत्तीएरे, मी मेलो नाही,” घाईघाईने पिशाच उत्तरले. “मी बुडालो नव्हतो. मला माफ कर... मी तुझ्यापासून लपवलं... मी असं का वागलो, मला माहीत नाही... जाऊ नकोस, माझं बोलणं पुरतं ऐकून घे. मी जिवंत आहे, – माझ्या हातांना स्पर्श करून बघ...”

हातकड्या घातलेले हात त्याने तिच्याकडे ताणले. गुत्ती-एरे अजूनही त्याच्याकडे टक लावून पहात होती.

“भिऊ नको, मी जिवंत आहे... मी पाण्याखाली जगू शकतो. इतर माणसांसारखा मी नाही. मी एकटाच पाण्या-खाली जगू शकतो. समुद्रात जेव्हा मी उडी मारली, तेव्हा बुडून मेलो नव्हतो. मला हवेत श्वास घेणं कठीण झालं होतं, म्हणून मी पाण्यात उडी घेतली.”

इखतीआन्द्रचा झोक गेला, पण तरीही घाईघाईने आणि असंबद्धपणे तो बोलत राहिला:

“गुत्तीएरे, मी तुझा खूप शोध घेतला. काल रात्री जेव्हा मी तुझ्या खिडकीपाशी आलो, तेव्हा तुझ्या नवऱ्यानं माझ्या डोक्यावर मारलं आणि मला तळ्यात फेकून दिलं. पाण्यात मी शुद्धीवर आलो. दगड भरलेलं पोतं मी सोडवू शकलो, पण हे...” इखतीआन्द्रने हातकड्या दाखविल्या, “ह्यांना मी काढू शकत नाही...”

आता गुत्तीएरेचा विश्वास बसत चालला की, तिच्यासमोर पिशाच नव्हते, तर जिवंत माणूस होता.

"पण तुमच्या हातात बेड्या का?" तिने विचारले.

"ह्याबद्दल मी तुला नंतर सांगीन... गुत्तीएरे, आपण पळून जाऊ. माझ्या वडिलांपाशी आपण आसरा घेऊ, तिथं आपल्याला कुणीही पकडू शकणार नाही... आपण दोघं तिथं एकत्र राहू... गुत्तीएरे, माझे हात धर ना... ओल्सेन म्हणाला की, मला लोक "सागरी सैतान" म्हणतात, पण मी माणूस आहे. का तू मला घाबरतेस?"

संपूर्ण गाळाने माखलेला इखतीआन्द्र तळयातून बाहेर आला आणि थकून गवतावर आडवा झाला.

गुत्तीएरे त्याच्यावर ओणवी झाली व अखेर तिने त्याचा हात धरला. "बिच्चारा, माझा लाडका," ती म्हणाली.

"किती सुरेख भेट!" अचानक उपरोधिक आवाज ऐकू आला.

त्या दोघांनी मागे वळून पाहिले — थोड्या अंतरावर झूरीता उभा होता.

झूरीतासुद्धा गुत्तीएरेप्रमाणे सबंध रात्र झोपला नव्हता. गुत्तीएरेची किंकाळी ऐकून तो बागेत आला होता व त्याने त्या दोघांचे संपूर्ण संभाषण ऐकले होते. ज्याच्या प्राप्तीसाठी झूरीता दीर्घ काळ अयशस्वीपणे धडपडत होता तो "सागरी सैतान" साक्षात समोर पाहताच झूरीताने इखतीआन्द्रला 'मेदूझा' वर नेण्याचा तत्क्षणी मनाशी निर्णय केला. पण नंतर विचार करून वेगळे वागण्याचे त्याने ठरविले.

"इखतीआन्द्र, तुम्ही गुत्तीएरेला डॉक्टर साल्वातोरांकडं नेऊ शकणार नाही, कारण गुत्तीएरे माझी बायको आहे. शिवाय तुम्ही तरी बापापाशी पोहचाल अथवा नाही याबद्दल मला शंका आहे. पोलीस तुमची वाट पाहताहेत."

"पण मी काहीही गुन्हा केलेला नाही!" इखतीआन्द्र ओरडला.

"गुन्ह्याविना पोलीस असल्या हातकड्या अडकवत नाहीत. आणि जर तुम्ही माझ्या हातात सापडला आहात, तर पोलीसांच्या ताब्यात तुम्हाला देणं माझं कर्तव्य आहे."

"तुम्ही खरंच असं करणार?" गुत्तीएरेने नवऱ्याला चिडून विचारले.

"तसं करणं माझं कर्तव्य आहे," खांदे उडवीत पेद्रो उत्तरला.

"जर कैद्यांना चारी दिशांना त्यानं मोकळं सोडलं, तर ते चांगलं ठरेल?" अचानक त्यांच्या संभाषणात डोलोरेस आली. "कशाबद्दल सोडायचं? ह्या चोरानं परक्यांच्या खिडक्यांमध्ये डोकावून बघावं आणि परक्यांच्या बायका पळवून न्याव्यात म्हणून?"

गुत्तीएरे नवऱ्यापाशी गेली, तिने त्याचा हात धरीत लाडिक आवाजात म्हटले:

"सोडून द्या त्याला. तुम्हाला मी विनंती करते. तुमचा मी काहीही अपराध केलेला नाही..."

मुलाने बायकोसमोर माघार घेऊ नये ह्या धास्तीने डोलोरेस हात झटकीत ओरडली:

"पेद्रो, तिचं मुळीच ऐकू नको!"

"बायकांनी विनंती केली की, माझा इलाज चालत नाही," झूरीता सौम्यपणे म्हणाला. "मी कबूल आहे."

"आत्ता लग्न केलं, तेवढ्यात बायकोच्या मुठीत गेला," म्हातारी बडबडली.

"जरा थांब, आई. तरुण माणसा, तुमच्या बेड्या आपण तोडू. तुम्हाला सभ्य पोषाख घालायला देऊ आणि 'मेदूझा' वर घेऊन जाऊ. रीओ-दे-ला-प्लातामध्ये तुम्ही गलबतावरून उडी मारून तुम्हाला हव्या त्या ठिकाणी पोहत जाऊ शकता. पण एका अटीवर मी तुमची सुटका करीन:

तुम्ही गुत्तीएरेला विसरलं पाहिजे! आणि गुत्तीएरे, तुला मी बरोबर नेतो. तसं करणं सुरक्षित होईल."

"तुमच्याबद्दल माझी कल्पना होती, त्यापेक्षा तुम्ही जास्त चांगले आहात," गुत्तीएरे प्रामाणिकपणे म्हणाली.

झूरीताने समाधानपूर्वक मिशा पिळल्या आणि बायकोसमोर तो झुकला.

डोलोरेस स्वतःच्या मुलाला चांगली ओळखून होती – तो काहीतरी धूर्त डाव खेळत होता हे तिच्या पटकन ध्यानात आले. पण त्या खेळाला जास्त खरेपणा लाभावा म्हणून देखाव्याखातर ती चिडून बडबडली:

"भूल घातली! आता बैस तिच्या मुठीत!"

पूर्ण वेगाने!

"उद्या साल्वातोर येतोय. तापामुळं मी अडकून पडलो आणि आपल्या दोघांना बोलण्यासारखं खूप काही आहे," क्रिस्तो बाल्ताझारला उद्देशून म्हणाला. बाल्ताझारच्या दुकानात ते बसले होते. "ऐक बंधू, नीट लक्ष देऊन ऐक आणि मला बोलण्यात अडथळा करू नकोस, नाही तर कशाबद्दल बोलायचंय ह्याचा मला विसर पडेल."

विचार एकवटण्यासाठी क्रिस्तो थोडा वेळ गप्प राहिला व मग पुढे बोलू लागला:

"झूरीतासाठी आपण दोघं खूप श्रमलो. आपल्या दोघांपेक्षा तो जास्त श्रीमंत आहे आणि त्यापेक्षा जास्त श्रीमंत व्हायची त्याची इच्छा आहे. "सागरी सैतानाला" तो पकडू पाहतोय..."

बाल्ताझारने बोलण्यासाठी तोंड उघडले.

"गप्प बैस बंधू, बोलू नको, नाही तर जे मला बोलायची इच्छा आहे ते विसरून जाईन. "सागरी सैतानाला" स्वतःचा गुलाम बनविण्याची झूरीताची इच्छा आहे. "सागरी सैतान" म्हणजे काय आहे माहीत आहे तुला? साक्षात खजिना. कधी ऐकली नसशील एवढी संपत्ती. "सागरी सैतान" समुद्राच्या तळाशी सुंदर सुंदर खूप मोती गोळा करू शकतो. पण नुसतेच मोती तो गोळा करू शकेल असं नाही, तर समुद्राच्या तळाशी प्रचंड खजिने असलेली अनेक जहाजं बुडालेली आहेत. त्या खजिन्यांना तो आपल्यासाठी उचलून आणील. मी म्हणतोय आपल्यासाठी, झूरीतासाठी नव्हे. इखतीआन्द्र गुत्तीएरेवर प्रेम करतोय हे तुला माहीत आहे बंधू?"

बाल्ताझार काही तरी बोलू इच्छित होता, पण क्रिस्तोने त्याला बोलू दिले नाही.

"गप्प रहा आणि ऐक. मला अडथळा आणतात तेव्हा बोलणं जमत नाही. होय, इखतीआन्द्र गुत्तीएरेवर प्रेम करतोय. माझ्यापासून काहीही लपून रहात नाही. जेव्हा मला हे माहीत झालं, तेव्हा मी म्हणालो: 'छान. खुशाल इखतीआन्द्र गुत्तीएरेच्या प्रेमात आणखी जास्त पडो. झूरीतापेक्षा तो जास्त चांगला नवरा आणि जावई ठरेल.' आणि गुत्तीएरेचंही इखतीआन्द्रवर प्रेम आहे. इखतीआन्द्रच्या नकळत मी त्यांच्यावर पाळत ठेवली होती. खुशाल भेटोत एकमेकांना."

बाल्ताझारने सुस्कारा टाकला, पण क्रिस्तोच्या बोलण्यात त्याने अडथळा आणला नाही.

"बंधू, एवढ्यावरच सारं संपलेलं नाही. पुढं ऐक. खूप वर्षांपूर्वी घडलेल्या एका प्रसंगाची मी तुला आठवण करून देतो. वीस वर्षांपूर्वी तुझी बायको जेव्हा तिच्या नाते-

वाईकांकडून परतत होती, तेव्हा मी तिला सोबत करत होतो. तुला आठवतं, ती स्वतःच्या आईच्या दफनासाठी डोंगरात गेली होती. वाटेत प्रवासात तुझी बायको बाळंत झाली आणि वारली. मूलही मेलं. तेव्हा मी तुला सगळी हकीकत सांगितली नाही, तुला जास्त दुःख देण्याची इच्छा नव्हती. पण आता सांगतो. तुझी बायको वाटेत मेली, पण मूल अजून खूप दुबळं होतं तरी जिवंत होतं. इंडियन खेड्यात हे घडलं. एका म्हातारीनं मला सांगितलं की, तिथून जवळच मोठे चमत्कार करणारा साल्वातोर नावाचा देव राहतो..."

बाल्ताझारने कान टवकारले.

"तिनं मला सल्ला दिला की, मुलाचा जीव वाचवायचा असेल, तर साल्वातोरकडं मुलाला घेऊन जा. मी तो भला सल्ला मानला आणि साल्वातोरकडं मूल घेऊन गेलो. 'ह्याला वाचवा,' मी म्हणालो. साल्वातोरनं मुलाला घेतलं आणि मान हलवीत तो म्हणाला: 'ह्याला वाचवणं अवघड आहे.' आणि आत घेऊन गेला. मी संध्याकाळपर्यंत वाट बघितली. संध्याकाळी नीग्रो बाहेर आला आणि म्हणाला: 'मूल मेलं.' तेव्हा मी तिथून निघून गेलो."

"तर असं आहे," क्रिस्तो पुढे बोलू लागला, "साल्वातोरनं नीग्रोमार्फत सांगितलं की, मूल मेलं. त्या नवजात बाळाच्या – तुझ्या मुलाच्या – अंगावर मी जन्मखुणेचा एक डाग बघितला होता. त्या डागाचा आकार मला चांगला आठवतो." थोडा वेळ गप्प बसून क्रिस्तो पुढे म्हणाला: "अलीकडंच इखतीआन्द्रच्या मानेवर कुणी तरी जखम केली. त्याच्या जखमेवर पट्टी बांधताना त्याच्या खवल्यांची कॉलर मी बाजूला सारली, तेव्हा तुझ्या मुलाप्रमाणंच हुबेहूब जन्मखुणेचा डाग मला दिसला." बाल्ताझार डोळे विस्फारून क्रिस्तोकडे बघत राहिला. चिंतेच्या सुरात त्याने विचारले:

"इखतीआन्द्र माझा मुलगा आहे असं तुला वाटतं?"

"चूप रहा बंधू, चूप रहा आणि ऐक. होय, मला असं वाटतंय. साल्वातोरनं खोटं सांगितलं असं मला वाटतंय. तुझा मुलगा मेला नाही आणि साल्वातोरनं त्याला "सागरी सैतान" बनवला."

"ओ-ओ!" बाल्ताझार बेभान होत ओरडला. "कशी हिंमत केली त्यानं! माझ्या हातांनी मी साल्वातोरला ठार करीन!"

"चूप! साल्वातोर तुझ्यापेक्षा जास्त सामर्थ्यवान आहे. शिवाय, कदाचित माझी चूक होत असेल. वीस वर्षं उलटलीत. दुसऱ्या एखाद्या माणसाच्या मानेवरही जन्मखुणेचा डाग असू शकतो. इखतीआन्द्र कदाचित तुझा मुलगा असेल अथवा नसेलही. इथं सावध वागलं पाहिजे. तू साल्वातोरपाशी जा आणि इखतीआन्द्र तुझा मुलगा आहे असं सांग. मी तुझ्या बाजूनं साक्ष देईन. साल्वातोरपाशी तू तुझ्या मुलाची मागणी कर. जर त्यानं नकार दिला, तर त्याला सांग की, लहान मुलांना तो अपंग बनवतो अशा आरोपाखाली त्याला कोर्टात खेचशील. ह्या गोष्टीला तो घाबरेल. जर धमकीचा उपयोग झाला नाही, तर कोर्टात त्याच्यावर खटला भर. इखतीआन्द्र तुझा मुलगा असल्याचं आपण जर कोर्टात सिद्ध करू शकलो नाही, तर गुत्तीएरेशी त्याचं लग्न लावून देऊ. नाही तरी गुत्तीएरे तुझी मानलेली मुलगी आहे. तेव्हा तू बायकोच्या आणि मुलाच्या मरणांमुळं दुःखानं वेडापिसा झाला होतास, म्हणून ही अनाथ गुत्तीएरे मी तुझ्यासाठी शोधून आणली होती..."

बाल्ताझार खुर्चीवरून ताडकन उठला. खेकड्यांना आणि कालवांना पायांखाली तुडवीत तो आता दुकानात येरझाऱ्या घालू लागला.

"माझा मुलगा! माझा मुलगा! केवढं दुर्दैव!"

"दुर्दैव का म्हणतोस?" क्रिस्तो चकित झाला.

"मी तुझ्या बोलण्यात अडथळा आणला नाही आणि लक्षपूर्वक सगळं ऐकून घेतलं. आता तू माझं बोलणं ऐक. तू तापानं आजारी होतास त्या दरम्यान गुत्तीएरेनं पेद्रो झूरीताशी लग्न केलं!"

ह्या बातमीने क्रिस्तो थक्क झाला.

"आणि इखतीआन्द्र... बिचारा माझा मुलगा..." बाल्ताझारने डोके खाली घातले. "इखतीआन्द्र झूरीताच्या ताब्यात आहे!"

"अशक्य," क्रिस्तोने आक्षेप घेतला.

"होय, होय. इखतीआन्द्र 'मेदूझा'वर आहे. आज सकाळी झूरीता माझ्याकडं आला होता. त्यानं आपल्या दोघांची टिंगल केली, फुशारक्या मारल्या आणि आपली निंदा केली. आपण त्याला फसवलं असं तो म्हणाला. आपल्याविना त्यानं स्वतः इखतीआन्द्रला पकडलंय! आता तो आपल्याला एक छदाम देणार नाही. मीसुद्धा त्याच्याकडून पैसे घेणार नाही. स्वतःच्या मुलग्याला विकणं शक्य आहे काय?"

बाल्ताझार कमालीचा निराश बनला होता. क्रिस्तो नाराजीने भावाकडे बघत होता. आता निर्णायकपणे पुढची पावले टाकणे आवश्यक होते. पण मदत करण्याऐवजी बाल्ताझारने कामात बिघाड आणण्याची अधिक शक्यता होती. इखतीआन्द्र आणि बाल्ताझार यांचे खरोखरीच नाते आहेत, असा खुद्द क्रिस्तोला फारसा विश्वास वाटत नव्हता. मात्र नवजात बालकावर जन्मखुणेचा डाग त्याने पाहिला होता, ही गोष्ट खरी होती. पण एवढा पुरावा पुरेसा नव्हता. इखतीआन्द्रच्या मानेवर डाग पाहिल्यानंतर क्रिस्तोने त्या साम्याचा फायदा उचलण्याचे ठरविले. पण बाल्ताझारची त्याच्या

कथनावर अशी वेडपट प्रतिक्रिया घडेल हे त्याला आधी कुठून माहीत? उलट बाल्ताझारकडून ऐकलेल्या बातम्यांनी क्रिस्तो घाबरला होता.

"आता आसवं ढाळत बसायला सवड नाही. कामाला लागलं पाहिजे. साल्वातोर उद्या भल्या सकाळीच परत येतोय. धीर धर. उद्या सूर्योदयाला धक्क्यावर माझी वाट बघ. इखतीआन्द्रला वाचवलं पाहिजे. मात्र लक्षात ठेव, तू इखतीआन्द्रचा बाप आहेस हे साल्वातोरला बोलू नको. झूरीता कुठल्या दिशेला जातोय?"

"त्यानं सांगितलं नाही, पण मला वाटतं, तो उत्तरेकडं जातोय. पनामाच्या किनाऱ्यावर जाण्याचा झूरीता केव्हापासून बेत करतोय."

क्रिस्तोने मान हलविली.

"लक्षात ठेव: उद्या सकाळी सूर्योदयापूर्वी तू किनाऱ्यावर हजर असलं पाहिजे. संध्याकाळपर्यंत जरी माझी वाट बघावी लागली, तरी जागचा हलू नको!"

क्रिस्तो घाईघाईने परतला. साल्वातोरांशी घडणाऱ्या आगामी भेटीबद्दल तो सबंध रात्रभर विचार करीत राहिला. साल्वातोरांसमोर त्याला स्वतःचा प्रामाणिकपणा सिद्ध करणे आवश्यक होते.

साल्वातोर पहाटे आले. डॉक्टरांना नमस्कार करीत दुःखी आणि नेक मुद्रा करीत क्रिस्तो म्हणाला:

"आपल्याकडं एक वाईट गोष्ट घडलीय... आखातात पोहायला जाऊ नको असं इखतीआन्द्रला मी हजारवेळा बजावलं होतं..."

"काय झालं त्याला?" साल्वातोरनी अधीरपणे विचारले.

"त्याला पळवून गलबतावर नेलंय... मी..."

साल्वातोरनी क्रिस्तोचे खांदे गच्च आवळले आणि त्याच्या

डोळयांमध्ये ते रोखून पाहू लागले. हे अवघे निमिषमात्र चालू राहिले, पण त्या पारखणाऱ्या नजरेखाली क्रिस्तोचा चेहरा नकळतपणे बदलला. साल्वातोरांच्या कपाळाला आठ्या पडल्या, ते काहीतरी बडबडले आणि क्रिस्तोच्या खांद्यावरील बोटांची पकड सोडत म्हणाले:

"ह्याबद्दल नंतर तू मला तपशीलवार सांग."

साल्वातोरनी नीग्रोला हाक मारली, क्रिस्तोला न समजणाऱ्या भाषेत नीग्रोशी ते काही शब्द बोलले आणि इंडियनाकडे वळून कडक आवाजात ते ओरडले:

"माझ्यामागून चल!"

प्रवासातील कपडे न बदलता, मुळीच विश्रांती न घेता साल्वातोर घरातून बाहेर पडले व भराभर बागेत गेले. त्यांच्या वेगाशी वेग राखताना क्रिस्तोची तारांबळ उडत होती. तिसऱ्या भिंतीपाशी त्यांना दोन नीग्रो येऊन मिळाले.

"इमानी कुत्र्याप्रमाणं मी इखतीआन्द्रची राखण करत होतो," वेगाने चालण्यामुळे धापा टाकीत क्रिस्तो म्हणाला. "मी त्याच्यापासून मुळीच दूर जात नव्हतो..." पण साल्वातोर त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत होते. डॉक्टर एव्हाना तलावापाशी उभे होते आणि झडपांमधून तलावातील पाणी ओसरून जाईपर्यंत अधीरपणे पाय आपटत होते.

"माझ्यामागून चल," जमिनीखाली जाणाऱ्या जिन्यावरून उतरत साल्वातोरनी परत हुकूम केला. क्रिस्तो आणि दोन नीग्रो साल्वातोरांपाठोपाठ पूर्ण अंधारातून जात होते. भुयारी वळणांची उत्तम माहिती असलेल्या माणसाप्रमाणे साल्वातोर काही पायऱ्या वगळून उड्या मारीत जात होते.

खालच्या चौकात उतरल्यानंतर पहिल्या वेळेप्रमाणे साल्वातोरनी विजेचा खटका ओढला नाही, उलट अंधारात हाताने चाचपून उजव्या भिंतीमधील दार उघडले व अंधाऱ्या कॉरी-

डॉरमध्ये ते गेले. इथे पायऱ्या नव्हत्या आणि दिवे न पेटवता साल्वातोर आणखी वेगाने चालत गेले.

"चुकून मी एखाद्या सापळ्यात अडकलो आणि विहीरीत बुडालो तर?" साल्वातोरांपाठी घाईने चालताना क्रिस्तोच्या मनात विचार आला. अशा रीतीने खूप वेळपर्यंत ते चालत होते. शेवटी फरशी खाली उतरत जात असल्याचे क्रिस्तोला जाणवले. अधूनमधून पाण्याच्या सपकाऱ्याचा मंद आवाज ऐकल्याचा त्याला भास झाला. तेवढ्यात त्यांचा प्रवास संपला. पुढे गेलेल्या साल्वातोरनी दिवा पेटविला. लांबट आकाराच्या एका मोठ्या गुंफेत पाण्यात दगडावर ते उभे असल्याचे क्रिस्तोला आढळले. तो दगड उतरत दूरवर गुंफेच्या छताशी जाऊन भिडला होता. एका टोकाला छोटी पाणबुडी नौका उभी होती. साल्वातोर, क्रिस्तो, दोन नीग्रो त्या नौकेत बसले. साल्वातोरनी केबिनमधील दिवा पेटविला, एका नीग्रोने वरची झडप खाडदिशी बंद केली, दुसऱ्याने इंजिन सुरू केले. नौका हलली, सावकाशपणे वळून खाली जाऊ लागली आणि त्याचवेळी हळूहळू पुढे निघाली. दोन मिनिटे उलटली व ते पाण्यावरती आले. साल्वातोर आणि क्रिस्तो ब्रिजवर आले. पाणबुड्या नौकेतून प्रवास करण्याचा क्रिस्तोचा हा पहिलाच अनुभव होता. पण महासागरावर तरंगणारी ही नौका पाहून जहाजबांधणीकारही चकित झाले असते. तिची रचना आगळी होती आणि तिचे इंजिन जबरदस्त ताकदवान असल्याचे स्पष्ट जाणवत होते. अजून पूर्ण वेग न धरलेली नौका वेगाने पुढे जात होती.

"इखतीआन्द्रला पळवणारे कोणत्या दिशेला गेलेत?"

"किनाऱ्यालगत उत्तरेला," क्रिस्तो उत्तरला. "माझ्या भावाला आपल्याबरोबर घ्या असं सांगण्याचं मी धाडस करतो. मी त्याला आगावू सूचना दिलीय आणि तो किनाऱ्यावर

वाट पाहतोय."

"कशाला?"

"मोतीवेच्या झूरीतानं इखतीआन्द्रला पळवलंय!"

"तुला कुठून ही माहिती समजली?" साल्वातोरनी संशयाने विचारले.

"इखतीआन्द्रला आखातात पकडणाऱ्या दुकाठी गलबताचं मी भावापाशी वर्णन केलं आणि पेद्रो झूरीताचं ते 'मेदूझा' गलबत असल्याचं भावानं ओळखलं. मोती वेचण्याच्या कामासाठी झूरीतानं इखतीआन्द्रला पळवलं आहे. माझा भाऊ बाल्ताझार मोती वेचण्याच्या जागा उत्तम जाणतो. त्याचा आपल्याला उपयोग होईल."

साल्वातोरनी विचार केला.

"ठीक आहे! आपण तुझ्या भावाला घेऊ!"

बाल्ताझार धक्क्यावर भावाची वाट पहात होता. नौका किनाऱ्याकडे वळली. आपल्या मुलाला हिरावून त्याला विचित्र माणूस बनविणाऱ्या साल्वातोरांकडे बाल्ताझार किनाऱ्यावरून कपाळाला आठ्या घालून पहात होता. पण तरीही त्याने साल्वातोरना नम्रपणे वाकून नमस्कार केला आणि तो नौकेवर चढला.

"पूर्ण वेगानं!" साल्वातोरनी हुकूम दिला.

साल्वातोर कप्तानाच्या ब्रिजवर उभे होते आणि महासागराच्या पाण्याकडे टक लावून पहात होते.

आगळा कैदी

इखतीआन्द्रच्या हातकड्या झूरीताने कानस घासून तोडल्या, त्याला नवा सूट दिला व किनाऱ्यावर इखतीआन्द्रने

लपवून ठेवलेला चष्मा आणि हातमोजे घ्यायला परवानगी दिली. पण 'मेदूझा' च्या डेकवर इखतीआन्द्रने पाऊल ठेवले त्या क्षणी झूरीताच्या हुकूमानुसार इंडियनांनी इखतीआन्द्रला धरले व कैदेत टाकले. ब्यूनोस-आयर्समध्ये झूरीताने गलबतावर शिधा भरण्यासाठी थोडा मुक्काम केला. तो बाल्ताझारला भेटला, स्वतःच्या पराक्रमांच्या त्याने फुशारक्या मारल्या आणि रीओ-दे-जानेरोच्या दिशेने किनाऱ्यालगत गलबत हाकारले. दक्षिण अमेरिकेचा पूर्व किनारा ओलांडून कॅरीबीयन सागरात मोती शोधण्याचा त्याचा इरादा होता.

गुत्तीएरेला त्याने कप्तानाच्या केबिनमध्ये ठेवले. रीओ-दे-ला-प्लाताच्या आखातात त्याने इखतीआन्द्रला सोडून दिले, असे झूरीताने गुत्तीएरेला सांगितले होते. पण त्याचा खोटेपणा लौकरच उघडकीला आला. कैदेतील इखतीआन्द्रच्या आरोळ्या आणि कण्हण्याचे आवाज संध्याकाळी गुत्तीएरेच्या कानांवर पडले. तिने इखतीआन्द्रचा आवाज ओळखला. ह्यावेळी झूरीता वरच्या डेकवर होता. गुत्तीएरेने केबिनबाहेर जाण्याचा प्रयत्न केला, पण दाराला कुलूप लावलेले होते. गुत्तीएरे दारावर मुठी आपटू लागली – तिच्या ओरडण्याला कुणीही दाद दिली नाही. इखतीआन्द्रच्या आरोळ्या ऐकून झूरीताने अस्सल शिव्या हासडल्या, कप्तानाचा ब्रिज उतरून इंडियन खलाशाबरोबर तो कोठडीत गेला. तेथे विलक्षण कोंदट वातावरण होते आणि अंधार होता.

"ओरडतोस कशाला?" झूरीताने उर्मटपणे विचारले.

"मी ... मी घुसमटतोय," इखतीआन्द्रचा आवाज त्याला ऐकू आला. "पाण्याविना मी जगू शकत नाही. इथं विलक्षण कोंदट आहे. मला समुद्रात सोडा. नाही तर सकाळपर्यंत मी जगणार नाही ..."

झूरीताने झडप खाडदिशी बंद केली व तो डेकवर आला.

“खरंच तो मेला तर पंचाईत,” चिंतायुक्त मनाने झूरीता विचार करू लागला. इखतीआन्द्रचा मृत्यू त्याला मुळीच फायदेशीर नव्हता.

झूरीताच्या आज्ञेनुसार कोठडीत एक पिंप आणण्यात आले आणि खलाशी पाणी वाहून आणू लागले.

“हा तुझा आंघोळीचा टब,” झूरीता इखतीआन्द्रला उद्देशून म्हणाला. “खुशाल बुचकळ्या मार त्यात! उद्या सकाळी तुला समुद्रात सोडीन.”

इखतीआन्द्र घाईने पिंपात बसला. त्याची ही आंघोळ दारात उभे असलेले इंडियन खलाशी गोंधळल्या नजरांनी पहात होते. ‘मेदूझा’ वरील कैदी म्हणजेच “सागरी सैतान” आहे हे त्यांना अद्याप माहीत नव्हते.

“डेकवर जा!” झूरीता खलाशांवर खेकसला.

पिंपात पोहणे शक्य नव्हते, एवढेच नव्हे तर शरीर पूर्ण नाणणे शक्य नव्हते. पूर्ण बुचकळी मारण्यासाठी इखतीआन्द्रला अंगाची मुटकुळी बनवावी लागली. ह्या पिंपात पूर्वी कधीतरी खारवलेले डुकराचे मांस ठेवलेले होते. पाण्याला लौकरच तो उग्र वास येऊ लागला आणि कोठडीतील कोंदट वातावरणा-एवढाच त्या पिंपातही इखतीआन्द्रचा जीव घुसमटू लागला.

समुद्रावर ह्यावेळी ताजे आग्नेयेचे वारे वाहात होते, दुकाठी गलबताला ते उत्तरेकडे ढकलत होते.

झूरीता कप्तानाच्या ब्रिजवर खूप वेळपर्यंत उभा राहिला व केवळ पहाटेपूर्वी तो केबिनमध्ये गेला. त्याची बायको केव्हाच झोपली असावी अशी त्याची कल्पना होती. पण अरुंद टेबला-पाशी हातांवर डोके टेकवून ती खुर्चीवर बसून होती. झूरीता आत येताच ती उठली आणि छताला टांगलेल्या दिव्याच्या मंद उजेडात झूरीताला तिचा फिकट पडलेला, कपाळाला आठ्या घातलेला चेहरा दिसला.

"तुम्ही मला फसवलंत," अस्पष्ट आवाजात ती म्हणाली.

बायकोच्या तिटकाऱ्याच्या नजरेखाली झूरीता काहीसा अस्वस्थ बनला आणि अस्वस्थता लपविण्याच्या हेतूने त्याने काही न समजल्याचा भाव चेहऱ्यावर आणला, मिशांना पीळ भरला व काहीशा थट्टेने त्याने उत्तर दिले:

"तुमच्यापाशी राहता यावं म्हणून इखतीआन्द्रनं 'मेदूझा'-वर राहण्याचं ठरवलं."

"तुम्ही खोटं बोलताय! तुम्ही नीच, विश्वासघातकी आहात. तुमचा मला तिटकारा वाटतो!" गुत्तीएरेने अचानक भिंतीवर टांगलेली कटयार पकडली आणि झूरीतावर वार केला.

"ओहो!" झूरीता उद्गारला. त्याने पटकन गुत्तीएरेचा हात धरला होता आणि एवढ्या जोरात पिळला, की गुत्तीए-रेच्या हातून कटयार खाली पडली.

झूरीताने लाथेने कटयार केबिनबाहेर उडवून लावली, बायकोचा हात सोडत म्हटले:

"हे जास्त बरं! तुम्ही फार अस्वस्थ बनला आहात. ग्लासभर पाणी घ्या!"

आणि तो केबिनबाहेर गेला. त्याने दारात किल्ली फिर-विली आणि वरच्या डेकच्या दिशेने तो चालू लागला.

पूर्वा एव्हाना गुलाबी बनली होती आणि क्षितिजामागे दडलेल्या सूर्याने उजळलेले विरळ ढग ज्वालांच्या जिभांप्रमाणे भासत होते. सकाळच्या खाऱ्या व ताज्या वाऱ्यांनी शिडे तट्ट फुगली होती. सागरपक्षी पाण्यावर घिरट्या घालीत होते, पाण्यावरती उड्या मारणाऱ्या माशांची पारध करायला टपले होते.

आता सूर्य वर आला. झूरीता अजूनही हात पाठीशी धरून डेकवर फेऱ्या मारीत होता.

"हरकत नाही, घेईन सांभाळून," गुत्तीएरेबद्दल विचार करीत तो म्हणाला.

शिडे गुंडाळण्याची त्याने खलाशांना मोठ्या आवाजात आज्ञा दिली. लाटांवर हेलकावत 'मेदूझा' नांगर टाकून उभे राहिले.

"मला साखळी आणून द्या आणि त्या कैद्याला इथं आणा," झूरीताने हुकूम केला. इखतीआन्द्रचे मोती वेचण्याचे कसब जोखून पाहण्यास तो अधीर बनला होता. "शिवाय तो समुद्रात ताजातवाना बनेल," त्याने विचार केला.

दोन इंडियनांच्या पहाऱ्यात इखतीआन्द्र आला. तो कमालीचा थकलेला दिसत होता. त्याने चहूबाजूंना नजर टाकली. तो डोलकाठीशी उभा होता. कठड्यापासून अवघ्या काही पावलांचे अंतर होते. एकदम इखतीआन्द्र पुढे धावला, कठड्यापर्यंत पोहोचला आणि उडी मारायला वाकला. पण ह्याच क्षणी झूरीताची दणकट मूठ त्याच्या डोक्यावर आदळली. इखतीआन्द्र डेकवर बेशुद्ध कोसळला.

"घाई करायची गरज नाही," झूरीता धडा शिकविण्याच्या स्वरात म्हणाला.

साखळीची खळखळ ऐकू आली. खलाशाने झूरीताच्या हाती बारीक लोखंडी साखळी दिली. त्या साखळीच्या एका टोकाला लोखंडी कडी होती.

बेशुद्ध पडलेल्या तरुणाच्या कमरेभोवती झूरीताने ती कडी अडकवली, तिला कुलूप ठोकले आणि खलाशांना तो म्हणाला:

"आता त्याच्या डोक्यावर पाणी ओता."

लौकरच तरुण शुद्धीवर आला आणि कमरेभोवती अडकवलेल्या साखळीकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागला.

"आता तू माझ्यापासून पळून जाणार नाहीस," झूरीताने

त्याला खुलासा केला. "मी तुला समुद्रात सोडतो. तू माझ्या-साठी मोत्यांचे शिंपले शोधायचे. जेवढे जास्त मोती आणशील, तेवढा जास्त वेळ तुला समुद्रात रहायला मिळेल. जर तू मला मोत्यांचे शिंपले आणून द्यायला नकार दिलास, तर कोठडीत त्या पिंपात तुला बसून रहावे लागेल. समजलं? आहे कबूल?"

इखतीआन्द्रने होकारार्थी डोके हलविले.

समुद्राच्या स्वच्छ पाण्यात लौकरात लौकर डुबण्यासाठी तो झूरीताला जगातील सर्व खजिने आणून द्यायला कबूल होता.

झूरीता, साखळदंड बांधलेला इखतीआन्द्र व खलाशी दुकाठी गलबताच्या कठड्यापाशी पोहोचले. गुत्तीएरेची केबिन गलबताच्या दुसऱ्या बाजूला होती. साखळदंडात जखडलेला इखतीआन्द्र तिच्या दृष्टीला पडू नये अशी झूरीताची इच्छा होती.

साखळीसह इखतीआन्द्र समुद्रात उतरला. ती साखळी तोडणे शक्य झाले तर! पण ती खूप भक्कम होती. इखती-आन्द्रने मुकाट दैवापुढे मान तुकविली. मोत्यांचे शिंपले वेचून त्यांना तो खांद्यावरून लटकणाऱ्या मोठ्या थैलीत भरू लागला. लोखंडी कडी कुशीत टोचत होती आणि श्वसनात अडथळा आणत होती. तरीही, कोंदट कोठडीपेक्षा आणि उग्र वासाच्या पिंपापेक्षा इखतीआन्द्र इथे कितीतरी पटींनी सुखी होता.

गलबताच्या कठड्याशी उभे असलेले खलाशी हे अभूतपूर्व दृश्य आश्चर्याने पहात होते. मिनिटामागून मिनिटे उलटत होती, पण समुद्राच्या तळाशी गेलेला माणूस वरती येण्याच्या विचारात नव्हता. सुरवातीला पाण्यावर हवेचे बुडबुडे उमटले होते, पण नंतर लौकरच ते थांबले.

"त्याच्या छातीत अजून जर थोडीशी हवा उरली असेल,

तर शार्क मला खुशाल खावो. पाण्यात तो माशासारखा वावरतोय असं दिसतंय," पाण्यात डोकावून पहात म्हातारा पाणबुड्या आश्चर्याने म्हणाला. समुद्राच्या तळाशी गुडघ्यांवर सरपटणारा तरुण वरून स्पष्ट दिसत होता.

"कदाचित हाच "सागरी सैतान" असेल," एक खलाशी हळूच आवाजात म्हणाला.

"तो कुणीही असो, पण कप्तान झूरीतानं झकास सौदा केलाय," दुय्यम तांडेल म्हणाला. "असा एक मोतीवेच्या दहाजणांच्या तोडीचा आहे."

इखतीआन्द्रने त्याला वरती उचलून घेण्याचा इशारा देण्यासाठी साखळीला हिसका मारला, तेव्हा सूर्य एव्हाना माध्यान्ही चढला होता. त्याची थैली शिंपल्यांनी गच्च भरलेली होती. मोती वेचण्याचे काम पुढे चालू ठेवण्यासाठी थैली मोकळी करणे आवश्यक होते.

आगळ्या मोतीवेच्याला खलाशांनी भराभरा वर ओढले. मोतीवेच कशी झाली होती हे पाहण्यास सगळे अधीर बनले होते.

सर्वसामान्य मोत्यांचे शिंपले काही दिवसपर्यंत तसेच कुजवत ठेवतात – त्यामुळे आतील मोती काढणे अधिक सोपे जाते. पण आता खलाशांची आणि खुद्द झूरीताची अधीरता कळसाला पोहोचली होती. सर्वांनी तात्काळ सुऱ्यांनी शिंपले उघडायला आरंभ केला.

खलाशांनी जेव्हा काम पूर्ण केले, तेव्हा सगळे एकाच वेळी गोंगाट करीत बोलू लागले. डेकवर एकच हलकल्लोळ माजला होता. कदाचित इखतीआन्द्रला सुदैवाने उत्तम जागा लाभली होती. पण एकाच बुडीत त्याने आणलेली लूट सर्वांच्या अपेक्षांपलिकडची होती. ह्या मोत्यांमध्ये सुमारे वीस मोती मोठ्या वजनाचे, टप्पोरे होते, बहारदार रंगांचे होते.

पहिल्याच वेचीत झूरीताला अफाट संपत्ती लाभली होती. अवघ्या एका मोठ्या मोत्याच्या विक्रीतून नवे सुंदर गलबत खरेदी करणे शक्य होते. झूरीता धनिक होण्याच्या वाटेवर होता. त्याची स्वप्ने खरी ठरली होती.

खलाशी मोत्यांकडे आधाशी नजरेने पहात होते हे झूरीता-च्या ध्यानात आले. त्याला ही गोष्ट आवडली नाही. त्याने घाईघाईने स्वतःच्या गवती टोपीत मोती ओतले व तो म्हणाला:

"न्याहरीची वेळ झाली. इखतीआन्द्र, तू चांगला मोतीवे-च्या आहेस. माझ्यापाशी एक स्वतंत्र केबिन आहे. तिथं मी तुला ठेवतो. तिथं तुला कोंदट वाटणार नाही. तुझ्यासाठी मी जस्ताची टाकी बनवून घेतो, कदाचित तुला तिची गरज पडणार नाही, कारण तू दररोज समुद्रात पोहशील. अर्थात साखळीसकट, पण त्याला काय करणार? नाही तर तू तुझ्या खेकड्यांकडं जाशील आणि परतणार नाहीस."

झूरीताशी संभाषण करण्याची इखतीआन्द्रची इच्छा नव्हती. पण जोवर ह्या लोभी माणसाचा तो कैदी बनला होता, तोवर स्वतःच्या राहण्याच्या व्यवस्थेबद्दल विचार करणे आवश्यक होते.

"वास मारणाऱ्या पिंपापेक्षा जस्ताची टाकी चांगली ठरेल," तो झूरीताला म्हणाला, "पण माझा श्वास घुसमटू नये म्हणून तुम्ही वारंवार पाणी बदललं पाहिजे."

"किती वेळानं?" झूरीताने विचारले.

"दर अर्ध्या तासानं," इखतीआन्द्र उत्तरला. "त्यापेक्षा वाहतं पाणी जास्त चांगलं ठरेल!"

"अरे वा, तुझ्या मागण्या वाढत चालल्यात. तुझं कौतुक केल्यानंतर यश तुझ्या डोक्यात चढायला लागलंय!"

"मी नखरे करत नाही," अपमानीत स्वरात तरुण म्हणाला. "मला... जरा समजून घ्या, मोठा मासा जर

बादलीत ठेवलात, तर लौकरच तो झोपतो. पाण्यातला प्राणवायू मासा श्वसनात वापरत असतो आणि मी... मोठा मामा आहे," स्मित करीत इखतीआन्द्र म्हणाला.

"प्राणवायूबाबत मला माहीत नाही, पण पाणी बदललं नाही तर मासा मरतो हे मला ठाऊक आहे. कदाचित तुझं म्हणणं खरं असेल. पण तुझ्या टाकीत पंपानं सतत ताजं पाणी ओतण्यासाठी माणसं कामावर लावली, तर ते फार महागात पडेल. तुझ्या मोत्यांपेक्षा जास्त महाग. तू माझं दिवाळं काढशील!"

इखतीआन्द्रला मोत्यांची किंमत ठाऊक नव्हती आणि झूरीता पाणबुड्यांना व खलाशांना अगदी कमी पगार देतो हेही त्याला माहीत नव्हते. झूरीताच्या शब्दांवर विश्वास ठेवून तो ओरडला:

"मला बाळगणं जर तुम्हाला फायद्याचं नसेल, तर मला समुद्रात सोडा!" आणि इखतीआन्द्रने महासागराकडे नजर टाकली.

"चलाख आहेस!" झूरीता मोठ्यांदा हसला.

"कृपा करा! मी स्वेच्छेनं मोती आणून देईन. मी केव्हाच मोत्यांचा ढीग साठवून ठेवलाय," आणि इखतीआन्द्रने डेकपासून गुडघ्यांपर्यंत हाताने ढीगाचा आकार दाखविला. "छान गुळगुळीत, वाटाण्याच्या आकाराचे... मी सगळे तुम्हाला देईन, मात्र मला सोडा!"

झूरीताचा श्वास रोधला.

"खोटं!" शांतपणे बोलण्याचा प्रयत्न करीत झूरीताने विरोध दर्शविला.

"मी आजपर्यंत कधीही खोटं बोललो नाही," चिडून इखतीआन्द्र म्हणाला.

"कुठं आहे तुझा खजिना?" झूरीताने आता स्वतःची

अधीरता न लपविता विचारले.

"पाण्याखालच्या गुंफेत. लीडिंगशिवाय दुसऱ्या कुणालाही ती गुंफा माहीत नाही."

"लीडिंग? हा कोण?"

"माझा डोल्फिन."

"अस्सं! खरोखरीच सैतानीपणा आहे हा!" झूरीताने मनाशी विचार केला, "जर हे खरं असेल, — मला वाटतं तो खोटं बोलत नाही — तर माझ्या स्वप्नांच्या हे सगळं पलीकडचं आहे. मी प्रचंड श्रीमंत होईन, माझ्या तुलनेत रॉथशील्ड आणि रॉकफेलर दरिद्री ठरतील. ह्या तरुणावर विश्वास ठेवायला हरकत नाही. शब्दावर विश्वास ठेवून त्याला सोडावं काय?"

पण झूरीता व्यवहारी माणूस होता. कुणाच्या शब्दावर विश्वास ठेवण्याची त्याला सवय नव्हती. इखतीआन्द्रचा खजिना कसा प्राप्त करावा ह्याबाबत तो विचार करू लागला. "जर गुत्तीएरेनं इखतीआन्द्रला विनंती केली, तर तो नकार देणार नाही आणि खजिना आणून देईल."

"कदाचित मी तुला सोडून देईन," झूरीता म्हणाला, "पण काही काळपर्यंत तुला माझ्यापाशी रहावं लागणार आहे. हो. त्यासाठी माझ्याजवळ कारणं आहेत. तुला अडवून ठेवल्याबद्दल तुला स्वतःलाच खेद होणार नाही असं मला वाटतं. पण जोवर तू माझा पाहुणा आहेस, जरी अनिच्छेनं, तोवर तुझ्या सुखसोयीकडं पाहणं माझं मी कर्तव्य मानतो. खूप महागड्या टाकीपेक्षा मोठा लोखंडी पिंजरा जास्त चांगला ठरेल. पिंजरा तुझं शार्कपासून रक्षण करील आणि ह्या पिंजऱ्यातून कठड्यावरून तुला पाण्यात सोडण्यात येईल."

"पण मला हवेत राहणंसुद्धा आवश्यक आहे."

"त्यात काय विशेष! आम्ही तुला अधूनमधून वरती

ओढून घेऊ. टाकीत पाणी भरत बसण्यापेक्षा हे अधिक स्वस्त पडेल. थोडक्यात, तू खूष राहशील अशी व्यवस्था करू!"

झूरीताची मन:स्थिती फार छान होती. खलाशांना न्याहरीबरोबर एकेक ग्लास वोदका देण्याचा त्याने हुकूम केला.

इखतीआन्द्रला परत कोठडीत नेण्यात आले. टाकी अजून तयार नव्हती. झूरीताने धडधडत्या काळजाने कप्तानाच्या केबिनचे दार उघडले आणि दारातच उभे राहून मोत्यांनी गच्च भरलेली टोपी गुत्तीएरेला दाखविली.

"मला माझ्या वचनाची आठवण आहे," स्मित करीत तो बोलू लागला, "बायकोला मोती आवडतात, भेटी आवडतात. खूप मोती मिळवायचे असले, तर चांगला पाणबुड्या पदरी बाळगला पाहिजे. म्हणून मी इखतीआन्द्रला धरलं. बघ — अवघ्या एका सकाळची वेच!"

गुत्तीएरेने मोत्यांवर धावती नजर टाकली. आश्चर्याचा चीत्कार तिने मोठ्या प्रयासाने दाबून धरला. पण झूरीताच्या हे ध्यानात आले आणि समाधानपूर्वक हसत तो म्हणाला:

"तू अर्जेंटिनामधली सर्वांत श्रीमंत बाई होशील, कदाचित सबंध अमेरिकेतली! तुझ्यापाशी सगळं असेल. राजांना हेवा वाटेल असा राजवाडा तुझ्यासाठी मी बांधीन. भविष्यकाळाचा पहिला हप्ता म्हणून ह्यातले निम्मे मोती आत्ता घे!"

"नाही! गुन्हेगारीच्या मार्गानं मिळवलेल्या ह्या मोत्यांपैकी एकही मोती मला नको," गुत्तीएरे ताडकन उत्तरली. "आणि कृपया, मला एकटीला राहू दे!"

झूरीता चिडला व निराश बनला. अशा गोष्टीची त्याने अपेक्षा केली नव्हती.

"आणखी फक्त दोन शब्द. तुमची इच्छा नाही का," आदर दाखविण्याखातर त्याने "तुमची" शब्द वापरला. "की मी इखतीआन्द्रला सोडावं?"

गुत्तीएरेने अविश्वासाच्या नजरेने झूरीताकडे पाहिले. आता कोणता नवा धूर्त डाव तो खेळत होता हे जाणण्याचा ती तर्काने प्रयत्न करीत होती.

"पुढं काय?" थंडपणे तिने विचारले.

"इखतीआन्द्रचं नशीब तुमच्या हातात आहे. पाण्याखाली त्यानं कुठंतरी साठवून ठेवलेले मोती त्यानं 'मेदूझा'वर आणून द्यावेत, एवढा फक्त तुम्ही हुकूम द्या आणि "सागरी सैताना-ला" मी चारी दिशांना मोकळं सोडतो!"

"माझं बोलणं नीट आठवणीत ठेवा. माझा तुमच्या एकाही शब्दावर विश्वास नाही. तुम्ही मोती घ्याल आणि पुन्हा इखतीआन्द्रला बेड्यांमध्ये अडकवून ठेवाल. हे तेवढंच खरं आहे, जेवढं मी एका अत्यंत खोटारड्या आणि विश्वास-घातकी माणसाची बायको आहे हे खरं आहे. चांगलं लक्षात ठेवा आणि तुमच्या कृष्णकृत्यांमध्ये मला गुंतवण्याचा कधीही प्रयत्न करू नका. आणि पुन्हा एकदा सांगत्ये – कृपया, मला एकटीला राहू दे!"

यापुढे बोलण्यासारखे काही उरले नव्हते आणि झूरीता तेथून निघून गेला. स्वतःच्या केबिनमध्ये त्याने बटव्यात मोती ओतले, काळजीपूर्वक बटवा पेटीत ठेवला, पेटीला कुलूप घातले व तो डेकवर आला. बायकोबरोबरच्या भांडणाचा त्याच्यावर विशेष परिणाम घडला नव्हता. तो स्वतःला श्रीमंत झालेला बघत होता, त्याला मुजरे करायला आलेल्या लोकांच्या घोळक्यात बघत होता.

कप्तानाच्या ब्रिजवर जात त्याने सिगार पेटविली. भावी श्रीमंतीचे विचार त्याच्या मनाला सुखद वाटत होते. नेहमी तीक्ष्ण बघणाऱ्या त्याच्या नजरेने ह्यावेळी मात्र पाहिले नाही की, खलाशी गटागटांनी जमून आपापसात कशाबद्दल तरी हळू आवाजांमध्ये बोलत होते.

सोडून दिलेले 'मेदूसा'

झूरीता पुढच्या डोलकाठीसमोर कठड्याशी उभा होता. दुय्यम तांडेलाच्या इशाऱ्यासरशी काही खलाशी पेद्रोवर एकदम तुटून पडले. खलाशांपाशी शस्त्रे नव्हती, पण त्यांची संख्या खूप होती. पण झूरीतावर वर्चस्व स्थापन करणे तेवढे सोपे ठरले नाही. झूरीताच्या पाठीशी दोन खलाशांनी त्याला आवळून धरले होते. झूरीताने जमावातून स्वतःला सोडवून घेतले आणि काही पावले धावून सर्व ताकदीनिशी कठड्यावर मागील बाजूने झोकून दिले.

वेदनेने ओरडत खलाशांनी स्वतःचा बळी सोडला व ते डेकवर कोसळले. झूरीता ताठ उभा राहिला व नव्या शत्रूंवर त्याने मुठींचे प्रहार करायला आरंभ केला. तो नेहमी रिवॉल्वर जवळ बाळगून असायचा, पण खलाशांचा हल्ला अनपेक्षित होता आणि रिवॉल्वर बाहेर उपसायला त्याला सवडच लाभली नव्हती. तो हळू हळू पुढच्या डोलकाठीकडे माघार घेत गेला आणि एकदम माकडाच्या चपळाईने डोलकाठीवर चढू लागला.

एका खलाशाने त्याचा पाय धरला, पण झूरीताने दुसऱ्या मोकळ्या पायाचा खलाशाच्या डोक्यावर तडाखा मारला. स्तंभित झालेला खलाशी डेकवर कोसळला. झूरीता डोलकाठीच्या माथ्यापर्यंत चढून गेला व तेथे बसून खलाशांना शिव्या घालू लागला. ह्या ठिकाणी तो काहीसा सुरक्षित होता. रिवॉल्वर बाहेर उपसत तो ओरडला:

"माझ्यापाशी चढून येण्याचा प्रयत्न करणाऱ्या पहिल्याच्या डोक्यात गोळी घालीन!"

खाली खलाशी गोंगाट करीत होते, पुढे काय करावे

ह्याबाबत विचारविनिमय करीत होते.

"कप्तानाच्या केबिनमध्ये बंदुका आहेत!" इतरांच्या आवाजांवर स्वतःचा आवाज चढविण्याचा प्रयत्न करीत दुय्यम तांडेल ओरडला. "चला, दार तोडू!"

काही खलाशी झडपेकडे गेले.

"तावडीत सापडलो," झूरीताने मनाशी विचार केला. "आता ते माझी चाळण करतील!"

अनपेक्षित मदतीचा शोध घेण्याच्या इराद्याने तो समुद्र न्याहाळू लागला. आणि झूरीताचा स्वतःवर विश्वास बसेना: महासागराच्या पाण्याचा पृष्ठभाग कापत एक पाणबुडी नौका विलक्षण वेगाने 'मेदूझा' कडे येत असलेली त्याने पाहिली.

"आता ती पाण्याखाली न जावो!" झूरीता मनाशी म्हणाला. "ब्रिजवर माणसं उभी आहेत. मला न बघता ती जवळून निघून तर जाणार नाहीत?"

"धावा! मदत करा! मला ठार मारताहेत!" सर्व ताकदीनिशी झूरीता खच्चून ओरडला.

पाणबुडीतील माणसांनी त्याला पाहिल्याचे स्पष्ट झाले. वेग कमी न करता नौका 'मेदूझा' कडे येत राहिली.

गलबताच्या झडपेतून एव्हाना सशस्त्र खलाशी बाहेर पडले. ते डेकवर पांगले आणि आता अनिश्चितपणे थबकले. 'मेदूझा'च्या दिशेने सशस्त्र पाणबुडी येत होती – बहुधा नाविक दलाची. ह्या अनाहूत साक्षीदारांसमोर झूरीताला ठार मारणे शक्य नव्हते.

झूरीताला स्वतःच्या विजयाचा आनंद झाला. पण त्याचा हा आनंद फार काळ टिकला नाही. पाणबुडीच्या ब्रिजवर बाल्ताझार व क्रिस्तो उभे होते – त्यांच्याशेजारी हिंस्र नाकाचा व गरुडाच्या डोळ्यांचा उंच माणूस उभा होता. नौकेच्या डेकवरून तो मोठ्यांदा ओरडला:

"पेद्रो झूरीता! तुम्ही पळवून नेलेल्या इखतीआन्द्रला ताबडतोब आमच्या हवाली करा! तुम्हाला पाच मिनिटांचा अवधी देतो, नाही तर तुमचं गलबत समुद्राच्या तळाला पाठवतो."

"विश्वासघातकी!" क्रिस्तो व बाल्ताझारकडे तिटकाऱ्याने पाहताना झूरीताच्या मनात विचार आला. "पण स्वतःचा जीव गमावण्यापेक्षा इखतीआन्द्रला गमावणे जास्त इष्ट ठरेल!"

"मी त्याला आत्ता आणतो," डोलकाठीवरून खाली उतरत झूरीता म्हणाला.

स्वतःचे जीव वाचवले पाहिजेत हे एव्हाना खलाशांच्या ध्यानात आले. त्यांनी भराभरा होडचा पाण्यात सोडल्या, खाली उड्या घेतल्या व ते किनाऱ्याकडे जाऊ लागले. त्यांच्यापैकी प्रत्येकजण फक्त स्वतःची काळजी वाहात होता.

झूरीता स्वतःच्या केबिनकडे धावला, मोत्यांचा बटवा त्याने घाईघाईने सदऱ्यात कोंबला, हातात पट्टा व रुमाल घेतले. दुसऱ्याच मिनिटाला त्याने गुत्तीएरेच्या केबिनचे दार उघडले, तिला हातांवर उचलून डेकवर आणले.

"इखतीआन्द्रची प्रकृती चांगली नाही. तुम्हाला तो केबिनमध्ये आढळेल," गुत्तीएरेला न सोडता झूरीता म्हणाला. कठड्यापाशी धावत जाऊन त्याने तिला होडीत बसविले, होडी पाण्यात सोडली आणि स्वतः तिच्यात उडी मारली.

आता पाणबुडी होडीचा पाठलाग करू शकत नव्हती, कारण तेथे पाणी खूप उथळ होते. पण पाणबुडीच्या डेकवरचा बाल्ताझार गुत्तीएरेने एव्हाना बघितला होता.

"बाबा, इखतीआन्द्रला वाचवा! तो..." पण ती वाक्य पूर्ण करू शकली नाही, कारण झूरीताने तिच्या तोंडात रुमाल कोंबला आणि पट्ट्याने घाईघाईने तिचे हात बांधले.

"सोडा बाईला!" ही बळजबरी बघून साल्वातोर ओरडले.

"ही बाई – माझी बायको आहे आणि माझ्या खाजगी भानगडीत नाक खुपसायचा कुणालाही हक्क नाही!" भराभर वल्ही मारीत झूरीता उत्तरादाखल ओरडला.

"बाईशी असं वागण्याचा कुणालाही हक्क नाही!" साल्वातोर संतापून ओरडले. "थांबा, नाही तर मी गोळी झाडीन!"

पण झूरीता होडी पुढे वल्हवीत राहिला.

साल्वातोरनी रिवॉल्वर झाडले. होडीच्या कठड्यावर गोळी आपटली.

झूरीताने गुत्तीएरेला उचलले व तिचा आडोसा धरीत तो ओरडला:

"झाडा गोळ्या!"

गुत्तीएरे त्याच्या हातांमध्ये धडपडत होती.

"कमालीचा नालायक," रिवॉल्वर खाली करीत साल्वातोरनी माघार घेतली.

पाणबुडीच्या ब्रिजवरून बाल्ताझारने पाण्यात उडी टाकली व झूरीताच्या होडीचा पोहून पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. पण झूरीता एव्हाना किनाऱ्यावर पोहोचला होता. त्याने जोरात वल्हे मारले आणि दुसऱ्याच क्षणी लाटेने होडीला वाळूच्या किनाऱ्यावर फेकले. पेद्रोने गुत्तीएरेला धरले आणि किनाऱ्यावरील खडकांआड तो नाहीसा झाला.

झूरीताला गाठणे शक्य नाही असे पाहून बाल्ताझार दुकाठी गलबतापाशी पोहत गेला आणि नांगराच्या साखळीवरून चढून डेकवर गेला. त्याने इखतीआन्द्रला सर्व गलबतभर धुंडाळले. पण गलबतावर कुणीही नव्हते.

"इखतीआन्द्र गलबतावर नाही!" साल्वातोरना उद्देशून बाल्ताझार ओरडला.

"पण तो जिवंत आहे आणि इथंच आसपास कुठंतरी

असला पाहिजे! गुत्तीएरे म्हणाली : 'इखतीआन्द्र ...' जर ह्या दरोडेखोरानं तिच्या तोंडात रुमाल कोंबला नसता, तर त्याचा ठिकाणा आपल्याला समजला असता," क्रिस्तो म्हणाला.

समुद्राच्या पृष्ठभागावर नजर फिरवताना क्रिस्तोच्या ध्यानात आले की, पाण्यावर डोलकाठ्यांचे माथे उभे होते. बहुधा नुकतेच इथे जहाज बुडाले होते. ह्या बुडालेल्या जहाजावर तर इखतीआन्द्र नाही?

"कदाचित, ह्या बुडालेल्या जहाजातील संपत्ती शोधायला इखतीआन्द्रला झूरीतानं धाडलं नसेल?" क्रिस्तो म्हणाला.

टोकाशी कडी असलेली साखळी डेकवरून बाल्ताझारने उचलली.

"झूरीता इखतीआन्द्रला ही साखळी बांधून पाण्यात सोडायचा असं दिसतंय. साखळीविना इखतीआन्द्र पोहून पसार झाला असता. नाही, बुडालेल्या जहाजावर तो असणं शक्य नाही."

"होय," साल्वातोर विचारमग्नपणे म्हणाले. "झूरीतावर आपण विजय मिळवला, पण इखतीआन्द्र आपल्याला गवसला नाही."

बुडालेले जहाज

झूरीताचा पाठलाग करणाऱ्यांना त्या सकाळी 'मेदूझा' वर काय घडले होते त्याची कल्पना नव्हती.

खलाशांनी सबंध रात्रभर विचारविनिमय केले होते आणि सकाळच्या प्रहरी त्यांनी निर्णय घेतला होता : पहिली सोयीस्कर

संधी मिळताच झूरीतावर झडप घालायची, त्याला ठार मारायचे आणि इखतीआन्द्रचा व गलबताचा ताबा घ्यायचा.

भल्या सकाळी झूरीता कप्तानाच्या ब्रिजवर उभा होता. वारा पडला होता व ताशी दोन नॉटच्या वेगाने 'मेदूझा' मंदपणे पुढे सरकत होते.

महासागरावर एक ठिपका झूरीताच्या दृष्टीस पडला. दुर्बीणीतून पाहिल्यावर त्याला आढळले की, बुडालेल्या जहाजाची रेडिओकाठी पाण्यावर डोकावत होती.

लौकरच झूरीताला पाण्यावर जीवरक्षक शंकू तरंगताना दिसला.

त्या शंकूला उचलण्यासाठी त्याने पाण्यात होडी सोडण्याची आज्ञा केली.

शंकू उचलून आणला तेव्हा झूरीताने त्यावरील अक्षरे वाचली: 'माफाल्दू.'

"'माफाल्दू' बुडालं?" झूरीता चकित झाला. हे अमेरिकन उतारूवाहू प्रचंड जहाज त्याला ठाऊक होते. अशा जहाजावर खूप मौल्यवान वस्तू असल्या पाहिजेत. "ह्या बुडालेल्या जहाजावरच्या मौल्यवान वस्तू इखतीआन्द्रनं गोळा करून आणल्या तर? पण साखळीची लांबी पुरेल? शक्य नाही... जर इखतीआन्द्रला साखळीविना सोडलं, तर तो परतणार नाही..."

झूरीता विचारात पडला. लोभीपणा आणि इखतीआन्द्रला गमावण्याची भीती, अशा भावनांचा त्याच्या मनात संघर्ष चालला होता.

पाण्यातून वर डोकावणाऱ्या डोलकाठ्यांपाशी 'मेदूझा' सावकाशपणे आले.

खलाशांनी डेकवर गर्दी केली होती. वारा पूर्ण पडला होता. 'मेदूझा' थांबले.

"कोणे एके काळी मी 'माफाल्दू'वर काम केलं होतं,"

एक खलाशी म्हणाला. "खूप मोठं, छान जहाज. आख्खं शहर. आणि श्रीमंत अमेरिकन उतारू."

"संकटाचा रेडिओवरून इशारा देण्यापूर्वीच 'माफाल्दू' बुडालेलं दिसतंय," झूरीता विचार करीत होता. "कदाचित रेडिओयंत्रणा बिघडली असावी. नाही तर भोवतालच्या सगळ्या बंदरांमधून मोटारबोटी, लाँच वगैरे धावून आल्या असत्या; त्यांच्यातून सरकारी अधिकारी, पत्रकार, छायाचित्रकार, सिनेमावाले, पाणबुडे आले असते. दिरंगाई करून चालणार नाही. इखतीआन्द्रला साखळीविना खाली सोडण्याचा धोका पत्करला पाहिजे. दुसरा मार्ग नाही. पण त्याला परत कसे यायला लावायचे? आणि धोकाच पत्करायचा, तर इखती-आन्द्रच्या मोत्यांच्या ढीगाच्या खंडणीच्या बदल्यात त्याला का पाठवू नये? पण त्याचा खजिना तेवढा मौल्यवान आहे का? इखतीआन्द्र अतिशयोक्ती तर करीत नाही?"

अर्थात इखतीआन्द्रचा मोत्यांचा साठा आणि बुडालेल्या 'माफाल्दू' वरची संपत्ती, अशा दोन्ही गोष्टी प्राप्त करणे शक्य आहे. मोत्यांचा साठा कुठे जात नाही, इखतीआन्द्र-विना तो कुणालाही सापडणार नाही, मात्र खुद्द इखतीआन्द्र झूरीताच्या हाती राहिला पाहिजे. पण काही दिवसांनंतर, कदाचित काही तासांनंतर, 'माफाल्दू'वरील मौल्यवान वस्तू प्राप्त करणे अशक्य ठरेल.

"तेव्हा प्रथम 'माफाल्दू,'" झूरीताने निर्णय घेतला. नांगर टाकण्याचा त्याने हुकूम दिला. नंतर तो केबिनमध्ये गेला, काहीतरी चिठी लिहून त्या कागदासह इखतीआन्द्रच्या केबिनकडे आला.

"तुला वाचता येतं, इखतीआन्द्र? गुत्तीएरेनं तुला चिठी लिहिलीय."

इखतीआन्द्रने पटकन चिठी घेतली व वाचली:

"इखतीआन्द्र ! माझी विनंती पूर्ण कर. 'मेदूझा' शेजारी एक बुडालेलं जहाज आहे. समुद्रात जा आणि त्या जहाजावर सापडतील तेवढ्या मौल्यवान वस्तू घेऊन ये. झूरीता तुला साखळीविना सोडेल, पण तू 'मेदूझा' वर परतलं पाहिजे. इखतीआन्द्र, माझ्यासाठी एवढं कर आणि तू लौकरच स्वतंत्र होशील. गुत्तीएरे !"

इखतीआन्द्रला यापूर्वी कधीही गुत्तीएरेकडून पत्रे मिळाली नव्हती आणि तिचे हस्ताक्षर त्याच्या परिचयाचे नव्हते. हे पत्र मिळाल्याबद्दल त्याला खूप आनंद झाला, पण त्याचवेळी तो विचारात पडला. हा झूरीताचा कावा असेल तर?

"गुत्तीएरेनं स्वतःच मला का सांगितलं नाही?" पत्राकडे बोट दाखवीत इखतीआन्द्रने विचारले.

"तिची तब्येत अजिबात बरी नाही," झूरीता उत्तरला, "पण तू परत येताच तिला भेटशील."

"गुत्तीएरेला ह्या मौल्यवान वस्तू कशाला पाहिजेत?" इखतीआन्द्र अजूनही अविश्वासाने प्रश्न विचारीत होता.

"जर तू अस्सल माणूस असतास, तर असले प्रश्न विचारले नसतेस. कोणत्या बाईला चांगले कपडे, महागडे दागिने घालावेसे वाटत नाहीत? ह्यासाठी पैसे आवश्यक असतात. बुडालेल्या जहाजावर खूप पैसे पडलेत. आता ते कुणाच्याही मालकीचे नाहीत – मग गुत्तीएरेसाठी तू ते का आणू नयेस? सर्वांत मुख्य – सोन्याची नाणी शोधली पाहिजेत. तिथं टपालाच्या कातडी पिशव्या असणार. शिवाय, उतारूंच्या अंगांवर सोन्याचे दागिने, अंगठ्या असतील..."

"मी प्रेतांच्या अंगांवरच्या वस्तू ओरबाडून आणीन असं तुम्हाला वाटतं?" इखतीआन्द्रने नाराजीने विचारले. "आणि माझा एकूणच तुमच्यावर विश्वास नाही. गुत्तीएरे लोभी नाही. तिनं मला अशा कामाला पाठवणं शक्य नाही..."

"नालायक!" झूरीता ओरडला. जर ह्या क्षणी त्याने इखतीआन्द्रची खात्री पटवली नाही, तर त्याचा सारा कट वाया जाणार आहे. हे त्याच्या ध्यानात आले.

झूरीताने स्वत:ला सावरले आणि दिलखुलास हसत तो म्हणाला:

"तुला फसवणं शक्य नाही हे मला दिसतंय. तुझ्याबरोबर उघड वागलं पाहिजे. तर ऐक. 'माफाल्दू' वरचं सोनं गुत्तीएरेला नकोय, पण मला पाहिजे. ह्यावर तुझा विश्वास बसतो?"

इखतीआन्द्रने नकळत स्मित केले.

"पूर्ण!"

"उत्तम! आता तू माझ्यावर विश्वास ठेवू लागला आहेस – तेव्हा आपण बोलू शकतो. होय, मला सोनं पाहिजे. जर 'माफाल्दू' वरचं सोनं तुझ्या मोत्यांच्या साठ्याच्या किंमतीएवढं असेल, तर ते सोनं तू मला आणून देशील त्याच्या दुसऱ्या क्षणी मी तुला महासागरात मोकळा सोडून देईन. पण वाईट गोष्ट म्हणजे तुझा माझ्यावर मुळीच विश्वास नाही आणि माझा तुझ्यावर. मला धोका वाटतो: जर तुला साखळीविना मी पाण्यात सोडलं, तर तू डुबकी मारशील आणि ..."

"जर मी परत येईन असा तुम्हाला शब्द दिला, तर मी तो पाळीन."

"ह्याचा खरेपणा पारखून पाहण्याचा प्रसंग अजून मला लाभला नाही. मी तुला आवडत नाही आणि तुझा शब्द जर तू पाळला नाहीस, तर त्यात मला आश्चर्य वाटणार नाही. पण तू गुत्तीएरेवर प्रेम करतोस आणि तिची विनंती तू पूर्ण करशील. होय ना? म्हणून मी तिच्याशी बोललो. अर्थात, मी तुला सोडून द्यावं अशी तिची इच्छा आहे. म्हणून

14–907

तिनं पत्र लिहून माझ्यापाशी दिलं, तुझा स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा होणं सोपं जावं ह्या इच्छेनं. आता तुला सगळं समजलं ?"

झूरीताचे सर्व बोलणे इखतीआन्द्रला शक्य आणि खरे वाटले. पण इखतीआन्द्रच्या ध्यानात एक खोच आली नाही की, त्याच्या मोत्यांच्या ढीगाच्या किंमतीएवढेच 'माफाल्दू' वरचे सोने झूरीता जेव्हा प्राप्त करील, तेव्हाच त्याला सोडून देण्याचे झूरीता वचन देत होता...

"त्यांची तुलना करण्यासाठी," झूरीता मनाशी विचार करीत होता, "इखतीआन्द्रला स्वतःचे मोती आणावे लागतील, तशी मी त्याच्यापाशी मागणी करीन. मग माझ्या हाती 'माफाल्दू' वरचे सोने, मोत्यांचा साठा व इखतीआन्द्र!"

पण झूरीताच्या मनातील विचार इखतीआन्द्रला समजणे शक्य नव्हते. झूरीताच्या प्रांजलपणामुळे त्याची समजूत पटली व थोडा वेळ विचार करून इखतीआन्द्र कबूल झाला.

झूरीताने सुटकेचा निःश्वास टाकला.

"तो फसवणार नाही," झूरीताने विचार केला. "चल लौकर!"

इखतीआन्द्र पटकन डेकवर चढला व त्याने समुद्रात उडी मारली.

इखतीआन्द्रने साखळीविना समुद्रात उडी मारलेली खलाशांनी पाहिले. 'माफाल्दू'वर बुडालेली संपत्ती आणण्यासाठी इखतीआन्द्र गेला होता हे त्यांच्या ताबडतोब ध्यानात आले. म्हणजे झूरीता एकटाच सगळी संपत्ती घशात घालणार? दिरंगाई करण्यात अर्थ नव्हता, म्हणून त्यांनी झूरीतावर हल्ला चढविला.

खलाशी जेव्हा झूरीताच्या पाठी लागले होते, त्या दरम्यान बुडालेल्या जहाजावर इखतीआन्द्र पाहणी करू लागला होता.

वरच्या डेकवरील प्रचंड झडपेतून तो खाली पोहत गेला. तेथील जिना एखाद्या मोठ्या घरातील जिन्याची आठवण करून देत होता. पुढे प्रशस्त कॉरीडॉर होते. इथे जवळ जवळ अंधार होता. फक्त उघड्या दारांमधून क्षीण तिरपा प्रकाश पाझरत होता.

ह्या उघड्या दारांपैकी एका दारातून इखतीआन्द्र पोहत गेला. तेथे मोठा दिवाणखाना होता. गोलाकार मोठ्या गवाक्षांमधून येणाऱ्या प्रकाशाने तो प्रचंड हॉल मंद उजळला होता. शेकडो माणसे एकाचवेळी तेथे सामावू शकली असती. भारी किंमतीच्या झुंबरावर इखतीआन्द्र बसला व त्याने भोवती नजर फिरविली. फार विचित्र दृश्य होते. लाकडी खुर्च्या व छोटी टेबले वरती छतापाशी तरंगत होती. छोट्या रंगमं-चावर झाकण उघडलेला पियानो उभा होता. मऊ गालीचे फरशीवर पसरलेले होते. तांबड्या लाकडाच्या भिंतींवरच्या पॉलीशला कुठे कुठे चरे पडले होते. एका भिंतीपाशी ताडाची झाडे उभी होती.

इखतीआन्द्रने झुंबर ढकलले व तो ताडांपाशी पोहत गेला. एकदम चकित होऊन तो थबकला. त्याच्याप्रमाणेच हालचाली करीत कुणी एक माणूस त्याच्या दिशेने येत होता. "आरसा," इखतीआन्द्रने ओळखले. ह्या प्रचंड आरशाने पूर्ण भिंत व्यापली होती व दिवाणखान्याचे त्यात फिकट प्रतिबिंब पडले होते.

इथे मौल्यवान वस्तू शोधण्यात अर्थ नव्हता. इखतीआन्द्र कॉरीडॉरमध्ये पोहत गेला, आणखी खालच्या डेकवर उतरला आणि वरच्या दिवाणखान्याप्रमाणेच शानदार दालनात गेला. इथे रेस्तराँ होते. कँटीनच्या फडताळांवर, काऊंटरवर, फरशी-वर मद्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थांचे हवाबंद डबे, बुचे विखुरली होती. पाण्याच्या दाबामुळे बाटल्यांची बुचे आत

घुसली होती आणि खोकी सपाट झाली होती. टेबलांवर बशा-भांडी मांडलेली होती, पण काही चांदीचे काटे व सुऱ्या खाली पडली होती.

इखतीआन्द्र केबिनांकडे निघाला.

अमेरिकन ऐषाआरामाचा शेवटचा शब्द दाखविणाऱ्या त्या केबिनांमधून तो फिरला, पण एकही प्रेत त्याला आढळले नाही. फक्त तिसऱ्या डेकवरच्या एका केबिनमध्ये छतापाशी तरंगणारे फुगलेले एक प्रेत त्याने पाहिले.

"बहुधा अनेकांना प्राणरक्षक होड्यांमधून वाचवलं असावं," इखतीआन्द्रच्या मनात आले.

पण आणखी खालती, तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या डेकवर जेव्हा तो गेला, तेव्हा तेथे त्याला भयानक चित्र दिसले: इथल्या केबिनांमध्ये स्त्रिया, पुरुष व मुले अडकली होती. गोऱ्या, चिनी, नीग्रो व इंडियन माणसांच्या प्रेतांचा खच पडला होता.

जहाजाच्या कर्मचाऱ्यांनी सर्वप्रथम पहिल्या वर्गाच्या श्रीमंत उतारूंना वाचविण्याचा प्रयत्न केला होता व उरलेल्यांना त्यांच्या दैवावर मोकळे सोडून दिलेले दिसत होते. काही केबिनांमध्ये इखतीआन्द्रला आत जाणे शक्य झाले नाही. दारांमध्ये प्रेते आडवी पडली होती. घबराटीत लोकांनी चेंगराचेंगरी केली होती, दारापाशी दाटी केली होती, दुसऱ्यांना अडथळा केला होता व स्वत:ला वाचविण्यासाठी दुसऱ्यांना अटकाव केला होता.

लांब कॉरीडॉरमध्ये माणसे सावकाश तरंगत होती. उघड्या गवाक्षांमधून पाणी घुसले होते आणि फुगलेली प्रेते पाण्यावर हिंदकळत होती. इखतीआन्द्रला भयानक वाटू लागले आणि ह्या पाण्याखालील स्मशानभूमीपासून दूर जाण्याची त्याने घाई केली.

"मला कुठं पाठवतेय हे काय गुत्तीएरेला माहीत नव्हतं?" इखतीआन्द्र विचार करू लागला. "बुडालेल्या माणसांचे खिसे उलटे करायला आणि त्यांच्या सूटकेस उघडायला खरंच ती इखतीआन्द्रला भाग पाडत होती? नाही, ती असं करणं शक्य नव्हते! झूरीताच्या सापळ्यात तो परत अडकला होता हे स्पष्ट होते." इखतीआन्द्रने निर्णय केला: "मी वरती पोहत जातो आणि मागणी करतो की, गुत्तीएरेनं डेकवर यावं आणि स्वत: विनंतीला पुष्टी द्यावी."

एका डेकपासून दुसऱ्या डेकपर्यंत एखाद्या माशाप्रमाणे सुळकांडत इखतीआन्द्र पोहत वरती गेला.

तो वेगाने 'मेदूझा' जवळ गेला.

"झूरीता!" त्याने हाक मारली. "गुत्तीएरे!"

पण त्याला कुणीही उत्तर दिले नाही. मूक 'मेदूझा' लाटांवर हिंदकळत होते.

"कुठं गेले सगळे?" इखतीआन्द्र विचार करू लागला. "झूरीताचा आणखी नवा डाव काय आहे?" इखतीआन्द्र सावधपणे गलबतापाशी पोहत गेला आणि डेकवर चढला.

"गुत्तीएरे!" तो आणखी एकदा ओरडला.

"आम्ही इथं आहोत!" किनाऱ्यावरून जेमतेम पोहोचणारा झूरीताचा आवाज इखतीआन्द्रच्या कानी पडला. इखतीआन्द्रने पाहिले तेव्हा किनाऱ्यावरील झुडूपांआडून सावधपणे डोकावणारा झूरीता त्याला दिसला.

"गुत्तीएरे आजारी झालीय! इकडं पोहत ये, इखतीआन्द्र!" झूरीता ओरडला.

गुत्तीएरे आजारी! आत्ता तो तिला पाहील. इखतीआन्द्रने पाण्यात उडी मारली व तो भराभरा किनाऱ्याकडे पोहू लागला.

तो जेव्हा पाण्यातून बाहेर पडला, तेव्हा गुत्तीएरेचा

घुसमटलेला आवाज त्याने ऐकला :

"झूरीता खोटं बोलतोय ! इखतीआन्द्र, वाचव स्वतःला !"

इखतीआन्द्र पटकन मागे वळला आणि पाण्याखाली पोहत गेला. जेव्हा तो किनाऱ्यापासून खूप दूर गेला, तेव्हा पाण्यावरती येऊन त्याने सभोवार नजर टाकली. किनाऱ्यावर काहीतरी पांढरे फडफडताना त्याने पाहिले.

कदाचित त्याच्या पलायनाबद्दल गुत्तीएरे अभिनंदन करीत होती. पुन्हा कधी ती त्याला भेटेल का?..

इखतीआन्द्र भराभर उघड्या समुद्रात पोहत गेला. दूरवर एक छोटी बोट दिसत होती. फेसाचा वेढा पडलेली बोट धारदार नाकाने पाणी कापत दक्षिणेकडे जात होती.

"लोकांपासून लांब राहणं जास्त चांगलं," इखतीआन्द्रने विचार केला आणि खोल बुडी मारून तो पाण्याखाली अदृश्य झाला.

भाग तिसरा

नव्याने अवतरलेला बाप

पाणबुडीमधून केलेल्या अयशस्वी प्रवासानंतर बाल्ताझारची मनःस्थिती कमालीची उदास बनली होती. इखतीआन्द्र सापडला नव्हता, झूरीता गुत्तीएरेसह कुठेतरी गायब झाला होता.

"हलकट गोरे!" स्वतःच्या दुकानात एकटा बसलेला म्हातारा बडबडत होता. "आमच्या जमिनीवरून त्यांनी आम्हाला पळवून लावलं आणि आम्हाला त्यांचे गुलाम बनवलं. आमच्या मुलांना ते अपंग बनवतात आणि आमच्या मुली पळवून नेतात. आमचा समूळ नाश करू पाहताहेत."

"रामराम बंधू!" बाल्ताझारने क्रिस्तोचा आवाज ऐकला. "बातमी! फार मोठी बातमी! इखतीआन्द्र सापडला."

"काय?" बाल्ताझार पटकन उठला. "सांग लौकर!"

"सांगतो, पण मला मधे अडवू नकोस, नाही तर काय सांगायचंय ते विसरेन. इखतीआन्द्र सापडला. मी तेव्हा बरोबर सांगितलं होतं: तो बुडालेल्या जहाजावर होता. आपण पुढं गेलो, तो मागाहून पोहत घरी आला."

"कुठं आहे तो? साल्वातोरकडं?"

"होय."

"मी साल्वातोरकडं जातो आणि माझा मुलगा परत दे अशी मागणी करतो..."

"नाही देणार!" क्रिस्तो म्हणाला. "साल्वातोरनं इखतीआन्द्रला समुद्रात जायला मनाई केलीय. पण मी कधी कधी

गुपचूप त्याला सोडतो ..."

"देईल! जर नाही दिला, तर साल्वातोरला मी ठार मारीन. आत्ताच चल."

क्रिस्तोने घाबरून हात झटकले:

"निदान उद्यापर्यंत थांब. माझ्या "नातीला" भेटण्याची परवानगी मी साल्वातोरकडून कशीबशी मिळवलीय. साल्वातोर फार संशयी बनलाय. डोळ्यांमध्ये रोखून बघतो तेव्हा जणू सुरीनं खुपसतो असं वाटतं. उद्यापर्यंत थांब अशी तुला विनंती करतो."

"ठीक आहे. उद्या मी साल्वातोरकडं येईन. आणि आत्ता आखाताकडं जातो. कदाचित समुद्रात दुरून तरी माझा मुलगा दिसेल."

आखाताजवळच्या कड्यावर बाल्ताझार सबंध रात्रभर लाटांकडे निरखून पहात बसला होता. समुद्र खवळलेला होता. दक्षिणेच्या थंड वाऱ्यांचे झोत वाहात होते, लाटांवरचा फेस उडवून लावत होते आणि किनाऱ्यानजीकचे खडक भिजवून काढत होते. किनाऱ्यावर लाटा सपाटून आपटत होत्या. आकाशातून भराभरा जाणाऱ्या ढगांमधून धावता डोकावणारा चंद्र लाटा चमकावीत होता. बाल्ताझारने कितीही प्रयत्न केले तरी फेसाळलेल्या महासागरात त्याला काहीही दिसत नव्हते. पहाट झाली तरी बाल्ताझार किनाऱ्यानजीकच्या कड्यावर तसाच निश्चल बसून होता. महासागराचा काळा रंग आता राखाडी बनला, पण तो तसाच रिता आणि निर्जन होता.

एकदम बाल्ताझार हलला. त्याच्या तीक्ष्ण डोळ्यांना लाटांवर काहीतरी काळे तरंगताना दिसले. माणूस! कदाचित कुणी बुडालेला! नाही, तो शांतपणे हात डोक्यामागे धरून उताणा तरंगत होता. हा तोच तर नव्हे?

बाल्ताझार चुकला नव्हता. तो इखतीआन्द्र होता.

बाल्ताझार उठला आणि छातीशी हात आवळून ओरडला:

"इखतीआन्द्र! माझ्या मुला!" आणि म्हाताऱ्याने हात वर करून पाण्यात उडी घेतली.

कड्यावरून उडी मारल्यानंतर तो पाण्यात खूप खोलवर गेला. पण जेव्हा पाण्यावरती आला, तेव्हा तेथे कुणीही नव्हते. लाटांविरुद्ध जोराने लढत बाल्ताझारने परत पाण्यात बुडी मारली, पण एका प्रचंड लाटेने त्याला धरले व उलटेपालटे करीत, खळाळत किनाऱ्यावर फेकून दिले.

पूर्ण ओलाचिप्प बनलेल्या बाल्ताझारने उठता उठता लाटेकडे पाहिले व जड निःश्वास टाकला.

"मला भास तर झाला नव्हता?"

जेव्हा उन्हात आणि वाऱ्यामुळे बाल्ताझारचे कपडे वाळले, तेव्हा साल्वातोरांच्या इस्टेटीचे रक्षण करणाऱ्या भिंतीपाशी तो गेला आणि लोखंडी दरवाजा ठोठावू लागला.

"कोण आहे?" दाराच्या भोकातून पहात नीग्रोने विचारले.

"डॉक्टरांपाशी माझं महत्त्वाचं काम आहे."

"डॉक्टर कुणालाही भेटत नाहीत," नीग्रो उत्तरला व भोकावरची झडप बंद झाली.

बाल्ताझार ठोठावत आणि ओरडत राहिला, पण कुणीही त्याला दार उघडले नाही. फक्त भिंतीपलीकडून कुत्र्यांचे भयानक भुंकणे ऐकू येत होते.

"जरा थांब, नालायक स्पॅनिशा!" बाल्ताझारने धमकी घातली व तो शहराकडे परतला.

न्यायालयाच्या इमारतीपासून जवळच पूल्केरीया* 'पा-

* पूल्केरीया – गुत्ता.

ल्मा'ची जाड दगडी भिंतीची बैठी जुनी शुभ्र इमारत होती. तिच्या दर्शनी भागात छोटा व्हरांडा होता, त्याच्यावर पट्ट्या-पट्ट्यांचे आच्छादन होते, टेबलांची रांग होती आणि निळ्या फुलदाण्यांमध्ये निवडुंगे ठेवली होती. ह्या व्हरांड्यात फक्त संध्याकाळी माणसांची वर्दळ व्हायची. दिवसा माणसे आतील बैठ्या छताच्या थंडगार खोल्यांमधून बसणे पसंत करीत. पूल्केरीया एक प्रकारे न्यायालयाची कचेरी होता. खटले चालू असत त्या दरम्यान इथे फिर्यादी, वादी, साक्षीदार आणि अजून पहाऱ्यात न गेलेले गुन्हेगार ह्यांची वर्दळ चालायची.

रांगेत त्यांचा नंबर येईपर्यंतचे कंटाळवाणे तास इथे मद्य अथवा पूल्के पीत ते लोक घालवीत असत. न्यायालय आणि 'पाल्मा' दरम्यान धावपळ करणारा चतुर पोरगा न्यायालयात काय चालले होते ह्याच्या खबरी द्यायचा. हे सोयीचे होते. लबाड वकील आणि उघडपणे स्वतःची सेवा देऊ करणारे खोटे साक्षीदारही इथेच येत.

स्वतःच्या दुकानाच्या कामानिमित्त बाल्ताझार पूर्वी अनेकदा 'पाल्मा'मध्ये आला होता. तक्रार अर्ज लिहून देणारा आवश्यक माणूस इथे भेटतो हे त्याला ठाऊक होते. म्हणून बाल्ताझार इकडे आला होता.

तो पटकन व्हरांडा ओलांडून थंडगार दालनात गेला, समाधानाने त्याने थंड हवा छातीत घेतली, कपाळावरचा घाम पुसला व जवळच घुटमळणाऱ्या पोऱ्याला विचारले:

"लार्रा आलाय?"

"डॉन फ्लोरेस दे लार्रा आलेत, त्यांच्या नेहमीच्या जागी बसलेत," पोऱ्याने जोरात उत्तर दिले.

डॉन फ्लोरेस दे लार्रा अशा भपकेबाज नावाने ज्या इसमाला संबोधत होते, तो एकेकाळी न्यायालयात सामान्य कारकून होता व लाच खाल्ल्याबद्दल त्याला नोकरीतून हाकलून

देण्यात आले होते. आता त्याच्यापाशी खूप गिऱ्हाईके होती: ज्यांची कामे यशस्वी होण्याची खात्री नसे असे सर्व लोक ह्या थोर सल्लागारापाशी येत. बाल्ताझार पूर्वी त्याच्यापाशी येत असे.

विस्तीर्ण चौकटीच्या गॉथिक खिडकीजवळच्या टेबलाशी लार्रा बसला होता. त्याच्यापुढील टेबलावर मद्याचा चषक उभा होता आणि फुगीर तपकिरी ॲटॅची केस पडली होती. कामाला सदैव तयार असलेले त्याचे पेन त्याच्या जीर्ण ऑलीव रंगाच्या सुटाच्या वरच्या खिशाला अडकवलेले होते. लार्रा लठ्ठ, टकल्या, लाल गालांचा, लाल नाकाचा, गुळगुळीत दाढी केलेला व मानी होता. खिडकीतून वाहणाऱ्या वाऱ्यामुळे त्याचे डोक्यावरील उरलेले पांढरे केस उभे रहात होते. खुद्द न्यायालयाच्या अध्यक्षांपेक्षा जास्त ऐटीत तो अशीलांना भेटायचा.

बाल्ताझारला पाहताच त्याने मान ऐटीत किंचित तुकविली आणि समोरच्या वेताच्या खुर्चीत बसण्याची खूण करीत म्हटले:

"कृपया बसा. काय काम आहे? मद्य पाहिजे? पूल्के?"

नेहमी तो ऑर्डर द्यायचा, पण अशील पैसे द्यायचे.

बाल्ताझारने त्याचे बोलणे ऐकल्याचे जाणवले नाही.

"मोठं काम आहे. महत्त्वाचं काम आहे लार्रा."

"डॉन फ्लोरेस दे लार्रा," चषकातून मद्याचा घोट घेत सल्लागाराने चूक दुरुस्त केली.

पण बाल्ताझारने ह्या दुरुस्तीकडे लक्ष दिले नाही.

"तुमचं नेमकं काय काम आहे?"

"तुला माहीत आहे, लार्रा..."

"डॉन फ्लोरेस दे..."

"तुझ्या ह्या युक्त्या नवऱ्यांसाठी राखून ठेव!" बाल्ताझार चिडून ओरडला. "इथं फार गंभीर मामला आहे."

“तर मग लौकर बोल,” आता लार्रा दुसऱ्या स्वरात उत्तरला.

“तुला “सागरी सैतान” माहीत आहे?”

“प्रत्यक्ष ओळखीचा बहुमान लाभला नाही, पण खूप ऐकलंय,” सवयीनुसार लार्रा परत ऐटीत उत्तरला.

“तर असं आहे! ज्याला “सागरी सैतान” म्हणतात, तो माझा मुलगा इखतीआन्द्र आहे.”

“हे शक्य नाही!” लार्रा उद्गारला. “तू जादा प्यायला आहेस, बाल्ताझार.”

इंडियनाने टेबलावर जोरात मूठ आपटली:

“कालपासून माझ्या तोंडात समुद्राच्या पाण्याच्या काही घोटांशिवाय दुसरं काहीही गेलेलं नाही.”

“म्हणजे परिस्थिती आणखीच वाईट...”

“वेडा झालोय? नाही, माझं डोकं पूर्ण ठिकाणावर आहे. चूप राहून ऐक.”

आणि बाल्ताझारने सर्व हकीकत लार्राला सांगितली. लार्राने इंडियनाचा प्रत्येक शब्द लक्षपूर्वक ऐकून घेतला. त्याच्या पांढऱ्या भुवया आणखी आणखी उंचावत गेल्या. शेवटी त्याला राहवले नाही, स्वतःचा बडेजाव तो विसरला आणि गुबगुबीत पंजा टेबलावर आपटत ओरडला:

“दहा लाख सैतान!”

पांढरा एप्रन घातलेला व मळका रुमाल हातात धरलेला पोऱ्या धावत आला: “काय हुकूम?”

“बर्फासकट दोन बाटल्या सोतेर्नाच्या!” आणि बाल्ताझारकडे वळून लार्रा म्हणाला: “सुरेख! उत्तम काम! खरंच तू स्वतः ही कथा रचलीस? पण प्रामाणिकपणानं सांगायचं तर ह्या कथेतला सर्वात कच्चा दुवा – तुझं बापाचं नातं!”

"तुला शंका वाटतेय?" संतापाने बाल्ताझारचा चेहरा लालबुंद बनला.

"अरे मित्रा, असा रागावू नको. मी फक्त वकीलाच्या दृष्टिकोनातून बोलतोय. कायद्याच्या दृष्टीनं तो कच्चा दुवा आहे. पण ही बाब सुधारता येईल. हो. आणि खूप पैसा मिळवता येईल."

"मला मुलगा पाहिजे, पैसे नव्हेत," बाल्ताझारने टोमणा मारला.

"पैसा सर्वांना आवश्यक असतो, विशेषतः कुटुंबात माणसं वाढतात अशा तुझ्यासारख्यांना," लार्रा गंभीरपणे म्हणाला आणि धूर्तपणे डोळे किलकिले करीत पुढे बोलू लागला: "सर्वांत महत्त्वाची आणि मौल्यवान बाब म्हणजे साल्वातोर नेमक्या कोणत्या प्रयोगांमध्ये आणि शस्त्रक्रियांमध्ये गुंतलाय हे आपल्याला समजलंय. इथं असे सुरुंग पेरता येतील की, सोसाट्याच्या वाऱ्यात पिकलेली संत्री जशी टपाटपा पडतात, तसे साल्वातोरच्या थैलीतून पेसोंचा पाऊस कोसळेल."

लार्राने ग्लासात ओतलेल्या मद्याचा किंचित घोट घेत बाल्ताझार म्हणाला:

"मला माझा मुलगा पाहिजे. तू कोर्टाकडं याबद्दल अर्ज लिहून दे."

"नाही-नाही! कोणत्याही परिस्थितीत नाही!" लार्राने घाबरून विरोध केला. "अशी सुरवात केली तर सगळा विचका होईल. हे पाऊल सर्वांत शेवटी टाकायचं."

"तुझा काय सल्ला आहे?" बाल्ताझारने विचारले.

"पहिली गोष्ट," लार्राने जाडजूड बोट वाकवीत म्हटले, "अत्यंत सभ्य भाषेत आपण साल्वातोरला पत्र पाठवायचं. आपण त्याला कळवू की, त्याचे सर्व बेकायदेशीर प्रयोग आणि शस्त्रक्रिया आपल्याला माहीत आहेत. ह्याबाबत आपण

तोंड बंद ठेवावं अशी त्याची इच्छा असेल, तर त्यानं आपल्याला मोठी रक्कम द्यावी. एक लाख. हो, एक लाख – किमान!" लार्राने प्रश्नार्थक मुद्रेने बाल्ताझारकडे पाहिले.

बाल्ताझार कपाळाला आठ्या घालून गप्प राहिला.

"दुसरी गोष्ट," लार्रा पुढे बोलू लागला. "नमूद केलेली रक्कम जेव्हा आपल्याला मिळेल – आणि ती नक्की मिळणार – तेव्हा आपण प्रोफेसर साल्वातोरला दुसरं पत्र पाठवायचं. आणखीच नम्र भाषेतून. आपण त्याला कळवू की, इख्तीआन्द्रचा खरा बाप आम्हाला सापडलाय आणि आमच्यापाशी निर्विवाद पुरावा आहे. आपण त्याला लिहू की, बापाला मुलगा हवा आहे आणि त्यासाठी तो कोर्टात जायला मागं-पुढं पाहणार नाही. तेव्हा साल्वातोरनं इख्ती-आन्द्रला कसं अपंग बनवलंय ह्याची हकीकत त्या खटल्यात बाहेर यायची शक्यता आहे. जर खटला टाळण्याची आणि मुलगा स्वत:जवळ ठेवण्याची साल्वातोरची इच्छा असेल, तर आम्ही सांगू त्या माणसांना, सांगू त्या ठिकाणी आणि सांगू त्या वेळी दहा लाख डॉलर दिले पाहिजेत."

पण बाल्ताझार ऐकत नव्हता. त्याने बाटली उचलली व लार्राच्या डोक्यावर मारण्यासाठी वरती उगारली. बाल्ता-झार एवढा चिडलेला लार्राने पूर्वी कधी पाहिले नव्हते.

"रागावू नको. मी थट्टेनं बोललो. ठेव रे बाटली खालती!" टकलावर हात झाकीत लार्रा उद्गारला.

"तू!. तू!..." संतापलेला बाल्ताझार ओरडला. "माझ्या पोटच्या मुलाला, इख्तीआन्द्रला, मी विकावं असं सुचवतोस? तुला काळीज नाही? किंवा तू माणूस नसून विंचू आहेस, अथवा विषारी कोळी आहेस? किंवा बापाच्या भावनांची तुला मुळीच ओळख नाही?"

"पाच! पाच! पाच!" आता लार्रा संतापून ओरडला. "बापांच्या पाच भावना! पाच मुलगे आहेत मला! वेगवेगळ्या आकारांचे पाच सैतान! पाच तोंडं! माहीत आहे, समजतं, जाणवतं! तुझा मुलगा तुला मिळेल. फक्त धीर धर आणि शेवटपर्यंत ऐकून घे."

बाल्ताझार शांत झाला. त्याने बाटली टेबलावर परत ठेवली, मान खाली घातली व लार्राकडे पाहिले.

"बोल!"

"ठीक! साल्वातोर आपल्याला दहा लाख देईल. हे पैसे तुझ्या इखतीआन्द्रला उपयोगी पडतील. आणि त्यातले थोडे माझ्या वाट्याला येतील. माझ्या खटाटोपांबद्दल — सुमारे एक लाख. आपण दोघं त्याबद्दल बोलू. साल्वातोर दहा लाख देईल. माझे प्राण पैजेला लावतो! आणि त्यानं पैसे दिले रे दिले..."

"की आपण त्याच्यावर खटला भरायचा!"

"आणखी थोडी कळ काढ. मोठ्या वर्तमानपत्रांच्या संपादकांना आपण सनसनाटी गुन्ह्याची बातमी देऊ करू आणि त्याबद्दल वीस-तीस हजारांची रक्कम घेऊ — किरकोळ खर्चासाठी ते पैसे उपयोगी पडतील. कदाचित गुप्त पोलीसांच्या गुप्त फंडांमधूनही काही पैसे आपल्याला मिळतील. कारण अशा खटल्यातून पोलीसांचे एजंट स्वतःच्या कारकीर्दी बनवू शकतील. साल्वातोरला आपण पुरतं पिळून काढलं म्हणजे मग कोर्टात जा, तुझ्या बापाच्या भावना भडाभडा बोल आणि तुझा बापाचा हक्क शाबित करायला व तुझा लाडका मुलगा परत मिळवायला खुद्द फेमिदा* देवी तुला मदत करो!"

---

* फेमिदा — सुव्यवस्था, न्याय आणि हक्कांची प्राचीन ग्रीक देवता.

लार्रीने एका दमात ग्लासातील मद्य पिऊन टाकले, ग्लास टेबलावर आपटला व विजयी मुद्रेने बाल्ताझारकडे पाहिले.

"काय म्हणणं आहे?"

"मला अन्न जात नाही, रात्री झोप येत नाही. आणि तू काम अखंड ताणत न्यायची सूचना देतोस..." बाल्ताझार बोलू लागला.

"पण कशासाठी?" लार्रीने तावातावाने त्याचे बोलणे मध्येच तोडले. "कशासाठी? लाखोंसाठी! ला-खों-साठी! तुझं डोकं चालेनासं झालंय काय? इखतीआन्द्रशिवाय गेली वीस वर्षं जगत आला आहेस ना..."

"जगलो. पण आता... थोडक्यात, कोर्टासाठी अर्ज लिहून दे."

"खरंच तुझी अक्कल संपली!" लार्री उद्गारला. "अरे बाल्ताझार, शुद्धीवर ये! लक्षात घे! लाखो! पैसा! सोनं! जगातल्या सर्व गोष्टी विकत घेता येतील. सर्वोत्तम तंबाखू, मोटार, वीस गलबतं, हा पूल्केरीया..."

"कोर्टासाठी अर्ज लिही, नाही तर मी दुसऱ्या वकीला-पाशी जाईन," बाल्ताझारने ठामपणे जाहीर केले.

यापुढे विरोध करण्यात अर्थ नव्हता हे लार्रीच्या ध्यानात आले. त्याने मान डोलावली, दीर्घ सुस्कारा टाकला, तपकिरी ॲटॅची केसमधून कागद उपसला, वरच्या खिशातून पेन खेचले.

बाल्ताझारच्या मुलाला बेकायदेशीररीत्या हस्तगत करून अपंग बनविल्याबद्दल साल्वातोरविरुद्धचा तक्रार-अर्ज नंतर-च्या काही मिनिटात लिहून तयार झाला.

"शेवटचं सांगतो: परत विचार कर," लार्री म्हणाला.

"दे," इंडियनाने अर्ज घेण्यासाठी हात पुढे केला.

"सरकारी वकीलापाशी दे. माहीत आहे?" लारनि अशीलाला सूचना दिली आणि तो खालच्या आवाजात पुटपुट-ला: "जिन्यावरून कोसळून तुझा पाय मोडो!"

सरकारी वकीलाच्या कचेरीतून बाहेर पडताना मोठ्या शुभ्र जिन्यापाशी बाल्ताझारला झूरीता भेटला.

"तू इथं कशाला आलास?" झूरीताने इंडियनाकडे मंशयाने पहात विचारले. "माझ्याविरुद्ध तक्रार केलीस काय?"

"तुम्हा सर्वांविरुद्ध तक्रारी गुदरल्या पाहिजेत," बाल्ता-झारने सर्व स्पॅनिशांना उद्देशून उत्तर दिले. "पण तिथं कुणीच नाही. माझ्या मुलीला तू कुठं लपवून ठेवलंस?"

"मला अरे-तुरे करायची हिंमत कशी करतोस?" झूरीता भडकला. "जर माझ्या बायकोचा बाप नसतास, तर काठीनं झोडपून काढलं असतं!"

बाल्ताझारला उर्मटपणे हाताने दूर ढकलून झूरीता जिना चढून गेला व ओकच्या लाकडाच्या मोठ्या दारांमागे नाहीसा झाला.

अभूतपूर्व खटला

ब्यूनोस-आयर्सच्या सरकारी वकीलांकडे एक वेगळेच पाहुणे आले होते – स्थानिक कॅथेड्रलचे डीन, बिशप जुआन दे गार्सिलास्सो.

लठ्ठ, बुटके, अंधुक डोळ्यांचे, बारीक केस कापलेले व मिशांना कलप केलेले सरकारी वकील बिशपांच्या स्वाग-तासाठी आरामखुर्चीतून उठले. स्वतःच्या लेखनाच्या टेबला-जवळच्या कातडी आच्छादनाच्या खुर्चीत यजमानाने सन्माननीय पाहुण्यांना आदरपूर्वक बसविले.

बिशप आणि सरकारी वकील यांच्यात मुळीच साम्य नव्हते. सरकारी वकीलांचा चेहरा गुबगुबीत आणि लालबुंद होता, त्यांचे ओठ जाड व नाक नासपातीसारखे मोठे होते. त्यांच्या हातांची बोटे लठ्ठ आखूड खुंटांची आठवण करून देत आणि ढेरपोटावरील बटणे कोणत्याही क्षणी तुटून चरबी बाहेर पडेल असे वाटत होते.

बिशपचा चेहरा खप्पड आणि फिकट होता. बाकदार पातळ नाक, टोकदार हनुवटी आणि पातळ निळसर ओठ ठरीव जेसुईटाची ओळख करून देत होते. बिशप त्यांच्या संभाषणकर्त्यांच्या डोळ्यांमध्ये मुळीच बघत नव्हते, पण तीक्ष्णपणे ते त्याचे निरीक्षण करीत होते. बिशपांचा प्रभाव फार मोठा होता आणि अवघड राजकीय खेळांसाठी ते स्वेच्छेने चर्चच्या कामांमधून सवड काढत. यजमानांशी नमस्कार-चमत्कार होताच बिशप तात्काळ आपल्या भेटीमागील हेतू स्पष्ट केला.

"प्रोफेसर साल्वातोरांच्या खटल्याची परिस्थिती काय आहे हे मला जाणून घ्यायची इच्छा आहे," हळू आवाजात बिशप म्हणाले.

"महाराज, तुम्हालाही ह्या खटल्यात रस वाटतो!" सरकारी वकील नम्रपणे उद्गारले. "होय, हा अपवादात्मक खटला आहे!" टेबलावरील एक लठ्ठ फाईल उचलून काही कागद उलटत सरकारी वकील पुढे म्हणाले: "पेद्रो झूरीताच्या तक्रारीनुसार आम्ही प्रोफेसर साल्वातोरांच्या घराची झडती घेतली. प्राण्यांवर साल्वातोरांनी आगळ्या शस्त्रक्रिया केल्या-बद्दलचं झूरीताचं निवेदन अगदी खरं ठरलं. साल्वातोरांच्या बागांमध्ये विकृत प्राण्यांचा साक्षात कारखाना आढळला. फार आश्चर्यकारक! उदाहरणार्थ, साल्वातोर..."

"झडतीत काय सापडलं ते मी वर्तमानपत्रांमधून वाच-

लंय," बिशपनी सौम्यपणे बोलण्यात अडथळा आणला. "खुद्द माल्वातोरांबाबत तुम्ही कोणते उपाय योजलेत? त्यांना अटक केलीय?"

"होय, त्यांना अटक झालीय. शिवाय पुरावा आणि फिर्यादी–पक्षाचा साक्षीदार म्हणून इखतीआन्द्र नावाच्या एका तरुणाला आम्ही शहरात आणलंय. तोच "सागरी सैतान" आहे. आम्हाला कैक दिवस बुचकळ्यात ठेवणारा सुप्रसिद्ध "सागरी सैतान" हा साल्वातोरांच्या प्राणिसंग्रहालयातील एक राक्षस असेल, अशी कुणाला कल्पना? आता विद्यापीठातील तज्ज्ञ ह्या अद्‌भुत प्राण्यांचा अभ्यास करताहेत. अर्थात संपूर्ण प्राणिसंग्रहालय, हे सर्व प्राणी पुरावा म्हणून शहरात आणणं आम्हाला शक्य झालं नाही. पण इखतीआन्द्रला आणलंय आणि कोर्टाच्या इमारतीच्या तळघरात ठेवलंय. त्याची आम्हाला खूप कटकट होतेय. त्याच्यासाठी मोठी टाकी बनवावी लागली, कारण तो पाण्याविना जगू शकत नाही. आणि त्याची प्रकृती खरंच बिघडली होती. स्पष्ट आहे की, ह्या तरुणाला जलमानव बनवताना साल्वातोरनी त्याच्या शरीरयंत्रणेत काही आगळे बदल केले आहेत. आमचे शास्त्रज्ञ ह्या प्रश्नाची उकल करताहेत."

"मला साल्वातोरांच्या भवितव्याबाबत जास्त कुतूहल आहे," बिशप पूर्वीच्याच हळू आवाजात म्हणाले. "कोणत्या कलमाखाली त्यांना शिक्षा होईल? तुमचं मत काय आहे: त्यांना शिक्षा होईल अथवा नाही?"

"साल्वातोरांचा खटला फार वेगळा आहे," सरकारी वकील उत्तरले. "कबूल करतो, कोणत्या कलमाखाली हा गुन्हा ठरवावा हे मी अद्याप निश्चित केलेलं नाही. आरोप ठेवणं सर्वांत सोपं ठरलं असतं अर्थात ह्या तरुणाचं त्यांनी केलेलं बेकायदेशीर चिच्छेदन आणि विकृतीकरण..."

बिशपांच्या कपाळाला आठ्या पडू लागल्या.

"तुमचं मत आहे की, साल्वातोरांची ही सगळी कृत्यं गुन्हा सिद्ध करायचा पुरावा नाहीत?"

"आहेत अथवा नाहीत, पण नेमका कोणता गुन्हा?" सरकारी वकील पुढे म्हणाले. "माझ्यापाशी आणखी एक तक्रार-अर्ज आला आहे – बाल्ताझार नावाच्या कुणा इंडियना-कडून. इखतीआन्द्र त्याचा मुलगा आहे असा तो दावा करतोय. पुरावा कच्चा आहे. पण इखतीआन्द्र खरोखरीच त्याचा मुलगा आहे असं जर तज्ज्ञांनी सिद्ध केलं, तर फिर्यादीचा साक्षीदार म्हणून ह्या इंडियनाचा आम्ही उपयोग करू शकू."

"म्हणजे वैद्यकीय आचारसंहितेचा भंग केल्याबद्दलचा गुन्हा तेवढा साल्वातोरांवर ठेवता येईल आणि पालकांच्या परवानगीविना मुलावर शस्त्रक्रिया केल्याबद्दल फार तर त्यांच्याविरुद्ध खटला चालेल?"

"आणि कदाचित विकृती निर्माण केल्याबद्दल. ही गंभीर बाब आहे. पण ह्यातही एक अवघड पेच आहे. तज्ज्ञांचा असा कल आहे की – अर्थात तात्पुरता – प्राण्यांना असं विकृत बनविण्याचा आणि तशा विचित्र शस्त्रक्रिया करण्याचा विचार सर्वसामान्य माणसाच्या डोक्याला शिवणारसुद्धा नाही. साल्वातोर मनानं आजारी आहेत असं तज्ज्ञांचं मत पडणं शक्य आहे."

पातळ ओठ गच्च आवळून आणि टेबलाच्या कोपऱ्याकडे नजर लावून बिशप गप्प बसले होते. मग अत्यंत हळू आवाजात ते म्हणाले:

"तुमच्याकडून माझी ही अपेक्षा नव्हती."

"काय, महाराज?" सरकारी वकीलांनी दचकून विचारले.

"कायद्याचा एक घटक असलेले तुमच्यासारखे गृहस्थसुद्धा

साल्वातोरांच्या बेकायदेशीर शस्त्रक्रियांचं समर्थन करण्याचा कसा प्रयत्न करताय ?"

"पण ह्यात वाईट काय ?"

"आणि गुन्हा सिद्ध न करण्याचा प्रयत्न करताय. चर्चचं न्यायालय – स्वर्गातलं न्यायालय – साल्वातोरांच्या कृत्यांकडं दुसऱ्या दृष्टीतून पाहतं. तुमच्या मदतीला येऊन तुम्हाला सल्ला देण्याची मला परवानगी द्या."

"कृपया सांगा," गोंधळून सरकारी वकील म्हणाले.

प्रवचन करावे अशा थाटात प्रथम हळू आवाजात आरंभ करून बिशपांनी टप्प्याटप्प्याने आवाज चढवीत नेला:

"साल्वातोरांची कृत्यं समर्थनीय आहेत असं तुमचं म्हणणं आहे ? त्यांनी केलेल्या विकृतींमुळं प्राण्यांना आणि माणसाला पूर्वी प्राप्त नसलेले काही खास फायदे लाभलेत असं तुमचं मत आहे ? काय ह्याचा अर्थ ? देवानं माणसांना खरंच अपूर्ण बनवलंय ? माणसाच्या देहाला पूर्णत्व मिळावं म्हणून प्रोफेसर साल्वातोरनी ढवळाढवळ करणं खरंच आवश्यक आहे ?"

सरकारी वकील स्तब्ध बसून ऐकत होते. चर्चच्या अधिकाऱ्यासमोर त्यांना स्वतःलाच अपराधी वाटत होते. अशी त्यांना मुळीच अपेक्षा नव्हती.

"पवित्र बायबलच्या, जेनेसिसच्या, पहिल्या प्रकरणातील २६ वी कविता तुम्ही विसरलात 'आणि देव म्हणाला: माणसाला आपलं रूप देऊ, आपल्यासारखं बनवू' आणि पुढची २७ वी कविता: 'आणि देवानं माणसाला स्वतःचं रूप देऊन घडवलं.' पण साल्वातोर ह्या प्रतिमेला बिघडवू पहात आहेत आणि तुम्हालासुद्धा त्यांचं कृत्य समर्थनीय वाटतं ?"

"माफ करा, फादर..." सरकारी वकीलांच्या तोंडून फक्त एवढेच शब्द बाहेर पडले.

“देवाला त्याची निर्मिती सुरेख वाटली नाही काय,” बिशप भावनावेगाने म्हणाले, “परिपूर्ण वाटली नाही काय? तुम्हाला माणसांचे कायदे चांगले आठवतात, पण देवाचे कायदे मात्र तुम्ही विसरताय. त्याच पुस्तकातली ३१ वी कविता आठवा: ‘देवानं स्वत: निर्माण केलेल्या सर्व गोष्टी पाहिल्या, किती छान होत्या!’ पण तुमच्या साल्वातोरना वाटतं की, काही दुरुस्ती केली पाहिजे, फेररचना केली पाहिजे, माणसांना जलमानव बनवलं पाहिजे – आणि तुम्हाला हे सर्व बुद्धिमत्तादर्शक वाटतं, समर्थनीय वाटतं. ही देवाची विटंबना नाही? हा पाखंडीपणा नाही? भ्रष्टाचार नाही? अथवा धार्मिक अपराधांना नागरी कायद्यानं आता शिक्षा होत नाही? ‘देवानं माणसाला नीट घडवलं नाही. माणसाला पुन्हा घडवण्यासाठी डॉक्टर साल्वातोरांच्या हवाली केलं पाहिजे,’ असं प्रत्येकजण म्हणू लागला तर उद्या काय होईल? हा धर्माचा राक्षसी भंग ठरणार नाही काय?.. देवानं निर्माण केलेल्या सर्व गोष्टी त्याला चांगल्या वाटल्या. पण साल्वातोर प्राण्यांना दुसरी डोकी जोडू लागलेत, त्यांच्या कातड्या बदलू लागलेत, देवाची टर उडवण्यासाठी जणू भयानक राक्षस बनवू लागलेत. आणि साल्वातोरांचा गुन्हा सिद्ध करणारा पुरावा गोळा करणं तुम्हाला अवघड जातं?”

बिशप बोलायचे थांबले. सरकारी वकीलांवर त्यांच्या भाषणाचा पडलेला प्रभाव पाहून ते खूष झाले होते. थोडा वेळ गप्प राहून ते पुन्हा हळू बोलू लागले आणि त्यांचा आवाज क्रमाक्रमाने वरती चढत गेला:

“मी म्हणालो की, साल्वातोरांच्या भवितव्याबाबत मला जास्त कुतूहल आहे. पण इखतीआन्द्रच्या भविष्याबाबत उदासीन राहणं मला शक्य आहे काय? ह्या प्राण्याला ख्रिश्चन नावसुद्धा नाही. ग्रीक भाषेत इखतीआन्द्र म्हणजे “माणूस-

मासा." जरी इखतीआन्द्र स्वतः अपराधी नसला, तो केवळ बळी ठरला असला, तरी त्याची निर्मिती देवविरोधी भ्रष्टाचारी आहे. केवळ स्वतःच्या अस्तित्वामुळं तो विचारांचा गोंधळ उडवू शकतो, पापी विचार निर्माण करू शकतो, कमी श्रद्धावानांच्या मनात चंचलता निर्माण करू शकतो. इखतीआन्द्रनं जगणं इष्ट नाही! देवानं त्याला स्वतःकडं घेऊन जाणं सर्वांत चांगलं ठरेल. हा दुर्दैवी तरुण जगण्यास नालायक म्हणून त्याला स्वर्गाचं बोलावणं योग्य ठरेल," बिशपनी अर्थपूर्ण नजरेने सरकारी वकीलांकडे पाहिले. "निदान त्याला अपराधी ठरवून कैदेत टाकलं पाहिजे. कारण त्यानंही काही गुन्हे केलेत: त्यानं मच्छीमारांचे मासे पळवले, त्यांची जाळी तोडली आणि त्यांच्यात प्रचंड घबराट माजवली. जरा आठवण करा—मच्छीमारांनी मासे धरणं बंद केलं होतं आणि शहरात माशांचा तुटवडा पडला होता. अश्रद्ध साल्वातोर आणि त्याच्या हातून बनलेलं हे पोर इखतीआन्द्र—म्हणजे देवाला, चर्चला आव्हान आहेत! त्यांचा नाश होईपर्यंत चर्च शस्त्रं खाली ठेवणार नाही!"

बिशपनी त्यांचे प्रवचन पुढे चालू ठेवले. सरकारी वकील त्यांच्यासमोर दबून बसले होते, त्यांनी डोके खाली झुकविले होते, ह्या रागीट शब्दांचा प्रवाह थोपविण्याचा त्यांना धीर होत नव्हता. शेवटी बिशपांचे भाषण संपले, तेव्हा सरकारी वकील उठून बिशपपाशी गेले आणि म्हणाले:

"ख्रिश्चन ह्या नात्यानं पापक्षालनासाठी मी तुमच्यापाशी कबुलीजबाब द्यायला येईन. कायद्याचा अंमलदार ह्या नात्यानं मी तुमचे तुमच्या मदतीबद्दल आभार मानायला येईन. आता साल्वातोरांचे गुन्हे मला स्पष्ट समजले. त्यांना दोषी ठरवून शिक्षा देण्यात येईल. इखतीआन्द्रसुद्धा कायद्याच्या तलवारीपासून बचावणार नाही."

प्रतिभावान वेडा

कोर्टाच्या खटल्यात डॉक्टर साल्वातोर मुळीच खचले नव्हते. तुरुंगात ते शांत राहिले, त्यांचा आत्मविश्वास कायम होता. मोठ्या माणसाने लहान मुलांशी बोलावे तशा समजावणीच्या सुरात ते पोलीस अधिकाऱ्यांशी व तज्ज्ञांशी बोलत होते.

रिकामटेकडे बसण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. ते खूप लिहीत होते, तुरुंगातील इस्पितळात त्यांनी काही अप्रतिम शस्त्रक्रिया केल्या. तुरुंगातील त्यांच्या पेशंटांमध्ये तुरुंगाधिकाऱ्याच्या बायकोचा समावेश होता. विषारी गाठीच्या वाढीमुळे ती मरण्याचा धोका निर्माण झाला होता. वैद्यकीय सल्ल्यासाठी पाचारण केलेल्या डॉक्टरने कोणताही उपचार उपयोगी ठरणार नाही असे जाहीर केले, त्याच क्षणाला साल्वातोरनी तिचा जीव वाचविला होता. खटल्याचा दिवस उजाडला.

कोर्टाच्या प्रचंड हॉलमध्ये बघ्यांची गर्दी मावत नव्हती. कॉरीडॉरांमध्ये, कोर्टाच्या इमारतीसमोरच्या चौकात लोकांचे जमाव दाटले होते. उघड्या खिडक्यांमधून लोक डोकावत होते. काही अतिचौकस लोक तर कोर्टाच्या इमारतीनजीकच्या झाडांवर चढून बसले होते.

आरोपीच्या पिंजऱ्यात साल्वातोर शांतपणे बाकावर बसले होते. ते अशा डौलात बसले होते की, बघणाऱ्यांना वाटले असते, ते आरोपी नव्हेत, तर न्यायाधीश आहेत. साल्वातोरनी बचावाचा वकील नाकारला.

शेकडो आधाशी डोळे त्यांना पहात होते. पण साल्वातोरांच्या तीव्र नजरेला नजर भिडविण्याची फार कमी लोकांची हिंमत झाली.

इखतीआन्द्रविषयीही जनतेत खूप कुतूहल निर्माण झाले होते, पण तो हॉलमध्ये नव्हता. गेल्या काही दिवसात त्याची प्रकृती बिघडली होती आणि चौकस नजरा टाळण्यासाठी तो बहुतेक सर्व वेळ पाण्याच्या टाकीत लपून बसत होता. साल्वातोरांवरील खटल्यात इखतीआन्द्र केवळ फिर्यादींचा साक्षीदार होता – सरकारी वकीलांच्या भाषेत पुराव्याची वस्तू होता.

साल्वातोरांच्या खटल्यानंतर इखतीआन्द्रच्या गुन्ह्यांबाबतचा खटला वेगळा चालणार होता.

सरकारी वकीलांना असे वागावे लागले, कारण साल्वातोरांच्या खटल्याची बिशपनी घाई केली होती. इखतीआन्द्रविरुद्ध पुरावे गोळा करायला काही अवधीची गरज होती. इखतीआन्द्रविरोधी खटल्यात साक्षीदार गोळा करण्यासाठी सरकारी वकीलांचे एजंट 'पाल्मा' पूल्केरीयात सावधपणे फिरत होते. तरीही, बिशप सतत सरकारी वकीलांना सुचवीत राहिले होते की, दुर्दैवी इखतीआन्द्रला देवाने स्वतःपाशी घेऊन जाणे इष्ट ठरेल. देवाच्या करणीला मानवी हात केवळ बिघडवून टाकतो हे सिद्ध करायला तसा मृत्यू उत्तम पुरावा ठरला असता.

विद्यापीठातील तीन प्राध्यापक तज्ज्ञांनी आपले निष्कर्ष वाचले. त्यांचा प्रत्येक शब्द न शब्द न्यायालयातील श्रोत्यांनी लक्षपूर्वक ऐकला.

"न्यायालयाच्या मागणीनुसार," उतार वयाचे मुख्य तज्ज्ञ प्राध्यापक शैन म्हणाले, "प्राध्यापक साल्वातोरांच्या प्रयोगशाळांमध्ये शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या प्राण्यांची आणि इखतीआन्द्र नावाच्या तरुणाची आम्ही तपासणी केली. त्यांच्या छोटया, पण सुसज्ज प्रयोगशाळेची व शस्त्रक्रियादालनाची आम्ही पाहणी केली. प्राध्यापक साल्वातोर यांनी

विद्युत-विच्छेदन आणि अल्ट्राव्हायोलेट जंतुविरहितीकरणासारख्या अत्याधुनिक तंत्रांचा वापर तर केलाच आहे, शिवाय आधुनिक प्लास्टिक शस्त्रक्रियेला अज्ञात असलेल्या अनेक उपकरणांचा वापर केला आहे. अर्थात ही उपकरणं त्यांनी स्वतःच्या डिझाईनांनुसार बनविली आहेत हे स्पष्ट आहे. प्राध्यापक साल्वातोरांनी प्राण्यांवर केलेल्या प्रयोगांबाबत तपशीलवार चर्चा करण्याची माझी इच्छा नाही. थोडक्यात, त्या अत्यंत धाडसी आणि बुद्धिमान शस्त्रक्रिया होत्या. त्यांनी संपूर्ण इंद्रियांची आणि अवयवांची आरोपणं केली, दोन प्राण्यांना एकत्र शिवलं, एका श्वसनेंद्रियाच्या प्राण्यांना दोन श्वसनेंद्रिये बसवली आणि त्याउलटही केलं, माद्यांचं नरांमध्ये रूपांतर केलं, कायाकल्पाच्या नव्या रीती वापरल्या. साल्वातोरांच्या बागांमध्ये अवघ्या काही महिने वयाच्या बालकांपासून ते चौदा वर्षे वयापर्यंतची वेगवेगळ्या इंडियन टोळ्यांची मुलं आम्हाला आढळली."

"मुलांची परिस्थिती कशी होती?" सरकारी वकीलांनी विचारले.

"सगळी मुलं निकोप आणि आनंदी आहेत. ती बागेत बागडतात आणि खेळतात. त्यांच्यापैकी अनेकांचे जीव साल्वातोरनी वाचवलेत. इंडियनांनी त्यांच्यावर विश्वास टाकला होता आणि दूरदूरच्या ठिकाणांहून मुलं आणून ठेवली."

हॉलमध्ये कुणाचा तरी सुस्कारा ऐकू आला.

"सगळ्या टोळ्यांनी आपली मुलं साल्वातोरांपाशी नेली."

सरकारी वकील अस्वस्थ होऊ लागले. बिशपांशी चर्चा केल्यानंतर त्यांच्या विचारांना नवी दिशा लाभली होती व साल्वातोरांचे कौतुक आता त्यांना सहन होत नव्हते. त्यांनी तज्ज्ञांना विचारले:

“साल्वातोरांनी केलेल्या शस्त्रक्रिया उपयुक्त आणि समर्थनीय होत्या, असं तर तुम्हाला वाटत नाही?”

पण तज्ज्ञ होकारार्थी उत्तर देतील अशा धास्तीने पांढऱ्या केसांच्या व कठोर चेहऱ्याच्या मुख्य न्यायाधीशांनी घाईघाईने मध्येच म्हटले :

“तज्ज्ञांच्या शास्त्रीय प्रश्नांबाबतच्या वैयक्तिक मतांबद्दल न्यायालयाला रस नाही. कृपया पुढं बोला. आराऊकान टोळीतल्या इखतीआन्द्र नावाच्या तरुणाच्या पाहणीत काय आढळलं?”

“त्याच्या शरीरावर कृत्रिम खवल्यांचं आच्छादन होतं,” तज्ज्ञ पुढे म्हणाले. “हे आच्छादन कसल्यातरी अज्ञात, लवचिक पण भक्कम वस्तूपासून बनवलंय. ह्या वस्तूचं पृथक्करण अजून पूर्ण झालेलं नाही. इखतीआन्द्र पाण्यात वावरताना चष्मा वापरायचा. दोन वक्रीभवनाची खास जाड भिंगं त्याला बसवलेली आहेत. त्यामुळं पाण्याखाली स्पष्ट पाहता यायचं. जेव्हा आम्ही इखतीआन्द्रच्या अंगावरचे खवले काढले, तेव्हा त्यांच्या खांद्यांच्या प्रत्येक हाडाखाली दहा सेंटीमीटर व्यासाची गोल भोकं आढळली. त्यांच्यावर शार्कच्या कल्ल्यांसारख्या दिसणाऱ्या पाच पातळ पट्ट्या बसवलेल्या होत्या.”

हॉलमध्ये दबते आश्चर्योद्‌गार उमटले.

“होय,” तज्ज्ञ पुढे म्हणाले, “ह्यावर विश्वास बसणं अवघड आहे, पण इखतीआन्द्रला माणसाची फुफ्फुसं आहेत आणि त्याचवेळी शार्कचे कल्ले आहेत. म्हणून तो जमिनीवर आणि पाण्याखाली जगू शकतो.”

“जलमानव?” सरकारी वकीलांनी उपरोधी स्वरात विचारले.

“होय, काही प्रमाणात जलमानव. जमिनीवर आणि पाण्यात श्वसन करणारा.”

“पण इखतीआन्द्रला शार्कचे कल्ले कसे लाभले?” मुख्य न्यायाधीशांनी विचारले.

तज्ज्ञांनी दोन्ही हात पसरीत उत्तर दिले:

“हे कोडं कदाचित खुद्द प्राध्यापक साल्वातोर आपल्याला उलगडून सांगतील. आमचं मत असं बनलं: हेक्केल यांच्या जीवशास्त्रीय नियमांनुसार, प्रत्येक प्राण्याच्या जीवनविकासात त्याच्या आदिपूर्वजांच्या उत्क्रांतीच्या सर्व अवस्था येऊन जातात. खात्रीपूर्वक सांगता येईल की, कल्ल्यांमार्फत श्वसन करणाऱ्या पूर्वजांपासून माणूस निर्माण झाला आहे.”

सरकारी वकील खुर्चीवरून ताडकन उठले, पण मुख्य न्यायाधीशांनी हाताच्या इशाऱ्याने त्यांना खाली बसविले.

“गर्भाच्या विकासाच्या विसाव्या दिवशी चार समांतर कल्ल्यांच्या कांड्या दिसतात; स्नायूंच्या कूर्चा. पुढं त्यांच्यात स्थित्यंतर घडतं: पहिल्या कूर्चेची श्रवणनलिका बनते आणि खालच्या भागाचं खालच्या जबड्यात रूपांतर होतं; दुसऱ्या कूर्चेचं जिभेखालचं हाड बनतं; तिसऱ्या कूर्चेच्या थायरॉईड ग्रंथी बनतात. हा सर्वसामान्य विकास आहे आणि इखती-आन्द्रच्या बाबतीत प्राध्यापक साल्वातोरनी तो थोपवला असं आम्हाला वाटत नाही. अर्थात पूर्ण वाढ झालेल्या माणसांच्या खालच्या जबड्याखाली अपूर्ण वाढीचे कल्ले आढळले आहेत. पण अशा कल्ल्यांच्या अवशेषांच्या मदतीनं अर्थातच पाण्याखाली जगता येणार नाही. जर सुरळीत विकास झाला नसता तर दोन्हीपैकी एक गोष्ट घडली असती: कल्ले विकसित झाले असते, तर श्रवणेंद्रियाचा आणि इतर क्रियांचा विकास घडला नसता. तेव्हा अर्धा मासा-अर्धा मानव अशा राक्षसात इखती-आन्द्रचं रूपांतर झालं असतं. अथवा कल्ल्यांचा विकास न घडता त्याचा मानव म्हणून सुरळीत विकास झाला असता. पण इखतीआन्द्र उत्तम श्रवणेंद्रिय असलेला, खालच्या जबड्याची

पूर्ण वाढ झालेला, व्यवस्थित फुफ्फुसं असलेला तरुण आहे; शिवाय त्याच्या कल्ल्यांचाही पूर्ण विकास झालेला आहे. कल्ले आणि फुफ्फुसं कशी कार्य करतात, त्यांचे एकमेकांशी कोणते संबंध आहेत, तोंडातून फुफ्फुसांवाटे कल्ल्यांमध्ये पाणी जाते काय अथवा इखतीआन्द्रच्या देहावर कल्ल्यांवरच्या गोलाकार छिद्रांमधून पाणी कल्ल्यांमध्ये जाते – हे आम्हाला माहीत नाही. जर शरीरविच्छेदन केलं, तरच ह्या प्रश्नांची उत्तरं आम्ही देऊ शकू. पुन्हा सांगतो – ह्या कोड्याचं उत्तर फक्त प्राध्यापक साल्वातोर देऊ शकतील. बिबट्या वाघांसारखे दिसणारे कुत्रे, इतर विचित्र प्राणी व जमिनीवर आणि पाण्यातही जगू शकणारी माकडं कशी निर्माण झाली, ह्याचा प्राध्यापक साल्वातोरनी आम्हाला खुलासा करावा."

"तुमचा एकूण निष्कर्ष काय?" मुख्य न्यायाधीशांनी तज्ज्ञांना विचारले.

शास्त्रज्ञ आणि शल्यविशारद म्हणून ख्यातनाम असलेल्या प्रा. शैन यांनी प्रांजलपणे उत्तर दिले:

"मी कबूल करतो की, ह्या प्रकरणात मला काहीही समजत नाही. एवढंच म्हणेन की, प्रा. साल्वातोरांचं कार्य फक्त प्रतिभावान माणसालाच शक्य आहे. असं दिसतं की, शल्यक्रियेत अंतिम पारंगतता साध्य केल्यानंतर प्राण्यांच्या आणि माणसांच्या अवयवांची स्वतःच्या मनाप्रमाणं जोडतोड करण्याचा साल्वातोरनी निर्णय घेतला असावा. आणि ह्या बाबतीत त्यांची कामगिरी थक्क करणारी असली, तरी त्यांचं धाडस आणि त्यांच्या विचारांची व्याप्ती... वेडेपणाची भासतात."

साल्वातोर तुच्छतेने हसले.

त्यांना माहीत नव्हते की, तुरुंगवासाऐवजी वेड्याच्या इस्पितळात ठेवून त्यांची शिक्षा कमी करण्याचा तज्ज्ञांनी

निर्णय घेतला होता.

"ते वेडे आहेत असं मी म्हणत नाही," साल्वातोरांच्या स्मिताकडे पहात तज्ज्ञ पुढे म्हणाले, "पण तरीही आमच्या मते आरोपीला मानसिक रुग्णांच्या इस्पितळात मानसोपचारतज्ज्ञांच्या देखरेखीखाली दीर्घ काळ ठेवावं."

"आरोपीच्या वेडेपणाच्या प्रश्नाचा विचार न्यायालय नंतर करील," मुख्य न्यायाधीश म्हणाले. "तज्ज्ञांच्या आणि सरकारी वकीलांच्या काही प्रश्नांचा खुलासा करण्याची प्रा. साल्वातोरांची इच्छा आहे काय?"

"होय," साल्वातोर उत्तरले. "मी खुलासा करतो. पण त्याचबरोबर हे माझे शेवटचे शब्द असतील."

आरोपीचे भाषण

साल्वातोर शांतपणे उठले आणि जणू कुणाला तरी शोधल्याप्रमाणे त्यांनी हॉलवरून नजर फिरविली. प्रेक्षकांमध्ये बाल्ताझार, क्रिस्तो व झूरीताला साल्वातोरनी ओळखले. पहिल्या ओळीत बिशप बसले होते. साल्वातोरनी बिशपांवर काही वेळपर्यंत नजर रोखून धरली. साल्वातोरांच्या चेहऱ्यावर पुसटसे स्मित उमटले. मग सबंध हॉलवर लक्षपूर्वक न्याहाळत साल्वातोर नजरेने कुणाला तरी धुंडाळू लागले.

"ह्या हॉलमध्ये माझा बळी मला दिसत नाही," शेवटी साल्वातोर म्हणाले.

"मी बळी आहे!" जागेवरून एकदम उठत बाल्ताझार ओरडला. क्रिस्तोने भावाला हाताने खेचून परत जागेवर बसविले.

"कोणत्या बळींबद्दल तुम्ही बोलताय?" मुख्य न्यायाधी-

शांनी विचारले. "जर तुम्हाला विकृत प्राणी अभिप्रेत असतील, तर त्यांना इथं हजर करण्याची न्यायालयाला जरूरी वाटली नाही. पण जलमानव इखतीआन्द्र कोर्टाच्या इमारतीत आहे."

"मला देवाबद्दल म्हणायचं होतं," साल्वातोर शांतपणे व गंभीरपणे उत्तरले.

हे उत्तर ऐकताच मुख्य न्यायाधीश चकितपणे खुर्चीच्या पाठीशी रेलून बसले. "साल्वातोर खरेच वेडा झाला काय? अथवा तुरुंग टाळण्यासाठी त्यानं वेडाचं सोंग पांघरण्याचं ठरवलंय?"

"तुम्हाला नेमकं काय म्हणायचंय?" मुख्य न्यायाधीशांनी विचारले.

"मला वाटतं, कोर्टाला हे स्पष्ट आहे," साल्वातोर उत्तरले. "ह्या प्रकरणात मुख्य त्रास कुणाला झालाय? अर्थात एकट्या देवाला. कोर्टाच्या मताप्रमाणं त्याच्या अधिकारात मी माझ्या कृत्यांनी अधिक्षेप करतो, त्याच्या क्षेत्रात ढवळाढवळ करतो. तो स्वतःच्या निर्मितींवर खूष होता, तेवढ्यात कुणी एक डॉक्टर येऊन म्हणतो: 'हे वाईट बनवलंय. ह्यात बदल करणं आवश्यक आहे.' आणि देवाच्या करणीत स्वतःच्या मनाप्रमाणं तो बदल करू लागतो..."

"हा पाखंडीपणा आहे! आरोपीच्या नेमक्या शब्दांची दफतरात नोंद व्हावी," स्वतःच्या धार्मिक भावनांचा अपमान झालेल्या माणसाप्रमाणे सरकारी वकील म्हणाले.

साल्वातोरनी खांदे उडविले:

"मी केवळ खटल्यातील आरोपाचा सारांश सांगतोय. मगळ्या आरोपांचा रोख ह्याच दिशेनं नाही काय? मी खटल्यातील आरोप वाचलेत. प्रथम मी विच्छेदनं केली आणि विकृत रूपं दिली असा माझ्यावर आरोप करण्यात आला

16-907

होता. आता माझ्यावर आणखी एक आरोप लादलाय— धार्मिक भ्रष्टाचार केल्याचा. कुठून हे वारं वाहात आलंय? कॅथेड्रलच्या दिशेनं तर नव्हे?"

आणि प्रा. साल्वातोरनी बिशपांकडे पाहिले.

"तुम्ही स्वतःच खटला असा रचलाय की, फिर्यादी म्हणून अदृश्यपणं खुद्द देव उभा आहे आणि आरोपीच्या पिंजऱ्यात माझ्याबरोबर चार्ल्स डार्विन उभे आहेत. ह्या हॉलमध्ये बसलेल्या काही व्यक्ती कदाचित माझ्या शब्दांमुळं दुखावतील, पण मी अजूनही ठामपणं म्हणतो की, प्राण्यांची आणि माणसाची शरीरयंत्रणा परिपूर्ण नाही व तिच्यात दुरुस्त्या आवश्यक ठरतात. ह्या हॉलमध्ये उपस्थित असलेले कॅथेड्रलचे बिशप जुआन दे गार्सिलास्सो माझ्या ह्या विधानाला दुजोरा देतील अशी आशा करतो."

ह्या शब्दांमुळे संपूर्ण हॉल आश्चर्यचकित झाला.

"१९१५ साली युद्धआघाडीवर मी जाण्याच्या जरा आधी," साल्वातोर पुढे बोलू लागले, "सन्माननीय बिशप महाशयांच्या शरीररचनेत एक छोटी दुरुस्ती करण्याचा प्रसंग माझ्यावर आला होता—त्यांचं अॅपेंडिक्स कापून काढण्याचा. आंत्रपुच्छाचा हा त्रासदायक आणि अनावश्यक भाग. मला आठवतं की, माझ्या धार्मिक पेशंटनं देवानं दिलेल्या त्याच्या बिशपच्या देहातील एक भाग कापण्यास त्यावेळी शस्त्रक्रियेच्या टेबलावर मुळीच विरोध केला नव्हता. काय, असं घडलं नव्हतं?" बिशपांकडे तीव्र नजर टाकीत साल्वातोरनी विचारले.

जुआन दे गार्सिलास्सो स्तब्ध बसले होते. फक्त त्यांच्या फिकट गालांवर किंचित गुलाबी रंग चढला व त्यांची पातळ बोटे हलकेच थरथरली.

"आणि मी खाजगी प्रॅक्टिस करत होतो, तेव्हा आणखी एक केस घडली नव्हती काय? सन्माननीय सरकारी वकील

मेन्योर आऊगूस्तो दे... नवयौवनाचा लाभ करून द्या अशी विनंती घेऊन माझ्याकडे आले नव्हते का?"

ह्या शब्दांवर सरकारी वकील आक्षेप घेऊ इच्छित होते, पण लोकांच्या हास्यकल्लोळात त्यांचे शब्द ऐकू आले नाहीत.

"तुम्ही विषयांतर करू नका," मुख्य न्यायाधीश कठोर-पणे म्हणाले.

"ही मागणी खुद्द कोर्टापाशीच मी करायला हवी," साल्वातोर उत्तरले. "मी नव्हे, तर कोर्टानं प्रश्न तसा मांडलाय. केवळ कल्ल्यांचा श्रवणेंद्रियांमध्ये आणि वाचा–इंद्रियामध्ये विकास घडल्यामुळं बोलू व ऐकू शकणारी कालची माकडं आणि मासे आपण आहोत, ही कल्पना ह्या हॉलमध्ये बसलेल्या सर्व माणसांना घाबरवून गेली नाही काय? जर ती माकडं अथवा मासे नाहीत, तर निदान त्यांचे वंशज." आणि असह्यपणाच्या भावनांचे प्रदर्शन करणाऱ्या सरकारी वकीलांकडे वळून ते म्हणाले: "शांत व्हा! इथं उत्क्रांती सिद्धांतावर कुणाशी वाद घालण्याचा अथवा व्याख्यान ठो-कण्याचा माझा मुळीच इरादा नाही." काही काळ गप्प राहून साल्वातोर म्हणाले: "प्राण्यामधून माणसाचा विकास घडला ह्यात वाईट काही नाही, पण तो अजून प्राण्यासारखाच वागतो हे वाईट आहे... उद्धट, दुष्ट, अविचारी. माझ्या विद्वान सहकाऱ्यांनी निष्कारण तुम्हाला घाबरवलं. गर्भाच्या विकासाबाबत ते बोलले नसते तरी चाललं असतं. प्राण्यांच्या गर्भावर अथवा त्यांचा संकर घडवण्यावर मी कधी प्रभाव पाडला नाही. मी शल्यविशारद आहे. चाकू हेच माझं एकमेव हत्यार. आणि शल्यविशारद ह्या नात्यानं लोकांना मी मदत केली, त्यांच्यावर उपचार केले. आजाऱ्यांवर शस्त्रक्रिया केल्यानंतर काहीवेळा इंद्रियांचं आरोपण करण्याचे प्रसंग आले. ह्या रीतीत परिपूर्णता आणण्यासाठी प्राण्यांच्या इंद्रियांची

आरोपणं करण्याचे प्रयोग मी केले.

"शस्त्रक्रिया केलेल्या प्राण्यांना माझ्या प्रयोगशाळेत ठेवून त्यांच्यावर आरोपण केलेल्या पूर्णतया नव्या इंद्रियांचं व अवयवांचं मी दीर्घ काळ निरीक्षण केलं, अभ्यास केला. माझी निरीक्षणं संपल्यानंतर त्या प्राण्यांना मी बाहेर बागेत सोडलं. अशा रीतीनं माझी म्युझियम बाग बनली. दूरचा संबंध असलेल्या प्राण्यांच्या शरीरघटकांच्या अदलाबदलीत आणि आरोपणात मला विशेष रस होता: उदाहरणार्थ, मासे व सस्तन प्राणी आणि त्याउलट. ह्या प्रांतात सद्यःकालीन शास्त्रज्ञांना जे सर्वथा अशक्य वाटतं, ते साध्य करण्यात मी यशस्वी ठरलो. पण खरं तर ह्यात काय विशेष आहे? जे मी आज केलं, ते उद्या प्रत्येक शल्यविशारद करू लागेल. प्राध्यापक शैन यांना जर्मन शल्यविशारद झाऊयेरब्रुख यांनी अलीकडं केलेल्या शस्त्रक्रिया माहीत असतील. दुसऱ्या मांडीच्या हाडाच्या जागी नडगीचं हाड बसविण्यात त्यांना यश आलं."

"पण इखतीआन्द्र?" तज्ज्ञांनी विचारले.

"होय, इखतीआन्द्र – माझा अभिमानविषय आहे. इखतीआन्द्रच्या शस्त्रक्रियेत केवळ तांत्रिक अडचणी नव्हत्या. मानवी शरीरयंत्रणेचं संपूर्ण कार्य मला बदलावं लागलं. ह्या मुलावर सुरक्षित शस्त्रक्रिया करण्यापूर्वी सहा माकडं प्रयोगांमध्ये मेली."

"ह्या शस्त्रक्रियेचं स्वरूप काय होतं?" मुख्य न्यायाधीशांनी विचारले.

"ह्या मुलावर मी लहान शार्कच्या कल्ल्यांचं आरोपण केलं आणि जमिनीवर व पाण्यात जगणं मुलाला शक्य झालं."

लोकांमधून आश्चर्याचे उद्‍गार उमटले. हॉलमध्ये उपस्थित असलेले वर्तमानपत्रांचे वार्ताहर ही बातमी कचेरीत देण्यासाठी घाईघाईने टेलीफोनांकडे धावले.

"पुढं मला आणखी यश साध्य करता आलं. माझी शेवटची कामगिरी – तुम्ही पाहिलेलं जलमाकड – कोणताही अपाय न होता दीर्घ काळ जमिनीवर अथवा पाण्यात जगू शकतं. पण इखतीआन्द्र पाण्याविना जास्तीत जास्त तीन-चार दिवस जगू शकतो. पाण्याविना खूप काळपर्यंत जमिनीवर राहणं त्याला अपायकारक आहे: फुफ्फुसांवर ताण पडतो, कल्ले कोरडे पडतात आणि इखतीआन्द्रच्या कुशीमध्ये टोचणाऱ्या वेदना सुरू होतात. दुर्दैवानं मी दूर प्रवासाला गेलो होतो त्या काळात मी घालून दिलेली शिस्त इखतीआन्द्रनं मोडली. तो जमिनीवर खूप काळ राहिला, स्वतःच्या फुफ्फुसांना त्यानं फार ताण दिला आणि त्यामुळं तो गंभीर आजारी पडलाय. त्याच्या शरीरयंत्रणेतलं संतुलन बिघडलंय आणि आता त्यानं जास्त काळ पाण्यात राहणं आवश्यक आहे. जलमानवामधून आता तो मानवी-मासा बनलाय ..."

"आरोपीला प्रश्न विचारण्याची परवानगी द्यावी," सरकारी वकील मुख्य न्यायाधीशांना उद्देशून म्हणाले. "जल-मानव निर्माण करण्याचा विचार साल्वातोरांच्या मनात का आला आणि असं करण्यामागं कोणता उद्देश होता?"

"विचार तोच – माणूस परिपूर्ण नाही. उत्क्रांतीच्या क्रमात माणसानं त्याच्या प्राणी-पूर्वजांचे अनेक गुणधर्म गमावले. उदाहरणार्थ, पाण्यात जगणं शक्य झाल्यास माणसाचे प्रचंड फायदे होतील. आणि ह्या फायद्याचा लाभ त्यानं का घेऊ नये? उत्क्रांतीच्या सिद्धांतावरून आपल्याला माहीत आहे की, आता जमिनीवर राहणारे सर्व प्राणी पूर्वी पाण्यात राह-णाऱ्या प्राण्यांपासून निर्माण झालेत. आणि काही प्राणी नंतर परत पाण्यात गेल्याचंही आपल्याला ठाऊक आहे. डॉल्फिन मूळचा मासा होता, मग जमिनीवर येऊन तो सस्तन प्राणी बनला आणि नंतर परत पाण्यात गेला तरी देवमाशाप्रमाणं

तो सस्तन राहिला. ते दोघंही फुफ्फुसांमार्फत श्वसन करतात. डोल्फिनलासुद्धा भूचर आणि जलचर बनवता येईल. वस्तुत: इखतीआन्द्र माझ्यापाशी मागणी करत होता की, त्याच्या डोल्फिन मित्राला पाण्याखाली जास्त काळ राहता यावं असा एखादा उपाय मी योजावा. ती आवश्यक शस्त्रक्रिया मी करणार होतो. माणसांमधला पहिला मासा आणि माशां-मधला पहिला माणूस असलेल्या इखतीआन्द्रला एकाकी वाटणं स्वाभाविक होतं. जर अनेक माणसं त्याच्यासारखी बनली तर गोष्ट वेगळी. मग महाबलाढ्य महाभूत पाणी माणसाच्या पायांशी शरणागत होऊन लोळण घेईल. ह्या महाभूताच्या ताकदीची तुम्हाला कल्पना आहे? पृथ्वीचा तीन-चतुर्थांश भाग पाण्यानं व्यापलाय. पण हा केवळ पृष्ठभाग. महासाग-राच्या थरांमध्ये माणसं वस्ती करू शकतील. कोट्यवधी माणसांना तिथं रहायला भरपूर जागा मिळेल, खाण्याचे आणि कच्च्या मालाचे अक्षय साठे हाताशी लाभतील.

"आणि महासागराची ताकद! महासागरांचं पाणी ७९ अब्ज अश्वशक्तीएवढी सौरशक्ती सामावून घेतं, हे तुम्हाला ठाऊक आहे? जर हवा तापवण्यात आणि इतर मार्गांनी ही शक्ती खर्च झाली नसती, तर महासागर केव्हाच उकळू लागले असते. अफाट शक्तीचा साठा. भूचर मानवजात तिचा कसा वापर करते? मुळीच वापरत नाही.

"शिवाय समुद्र प्रवाहांची ताकद! फक्त गल्फ-प्रवाह आणि फ्लोरीडाचा प्रवाह दर तासाला ९१ अब्ज टन पाणी वाहून नेतात. मोठ्या नदीपेक्षा ३ हजार पट जास्त. ही गोष्ट अवघ्या एका समुद्र-प्रवाहाची! भूचर मानवजात त्यांचा कसा वापर करते? मुळीच वापरत नाही.

"आणि लाटांची व भरती-ओहटींची ताकद! लाटेच्या तडाख्याची ताकद अडतीस हजार किलोग्राम असते हे तुम्हाला

माहीत आहे – पृष्ठभागाच्या एक चौरस मीटरवर अडतीस टन. त्रेचाळीस मीटर उंचीपर्यंत लाट वरती जाऊ शकते आणि दहा लाख टन खडक उचलू शकते. भरती सोळा मीटरपेक्षा जास्त उंची गाठते – चारमजली घराच्या उंचीएवढी. ह्या शक्तींचा मानवजात कसा वापर करते? मुळीच वापर करत नाही.

"जमिनीवरील प्राणी पृष्ठभागापेक्षा जास्त उंचीवर जाऊ शकत नाहीत अथवा खूप खोलवर जाऊ शकत नाहीत. महासागरात सर्वत्र जीवन आहे – विषुववृत्तापासून ध्रुवांपर्यंत, पृष्ठभागापासून थेट दहा किलोमीटर खोलपर्यंत.

"महासागराच्या अमर्याद संपत्तीचा वापर आपण कसा करतो? मासे धरतो – पण फक्त वरच्या थरातील. खोल-वरच्या संपत्तीला मुळीच हात लावत नाही. फक्त स्पंज, प्रवाळ, मोती आणि लव्हाळी गोळा करतो.

"पाण्याखालती आपण काही कामं करतो: पुलांचे खांब उभारतो, बांध घालतो, बुडालेली जहाजं वर काढतो – बस्स. पण हेसुद्धा मोठ्या कष्टांनी, मोठे धोके पत्करून आणि बहुतेक वेळा त्यात माणसांचे बळी पडतात. जमिनीवरचा दुर्दैवी माणूस पाण्याखाली दुसऱ्या मिनिटाला मरतो! मग पाण्याखाली तो कशी कामं करणार?

"पण पाणबुड्याचा पोषाख न घालता, प्राणवायूच्या टाक्या बरोबर न घेता, जर माणूस पाण्याखाली जगू व काम करू शकला, तर बाब वेगळी.

"किती भांडारं तो उघडेल! इखतीआन्द्र मला म्हणाला होता... पण मानवी लोभाच्या सैतानाला जागं करायला मला भीती वाटते. इखतीआन्द्रनं समुद्रतळापासून दुर्मिळ धातूंचे आणि खनिज मातीचे नमुने मला आणून दिले होते. घाबरू नका, ते नमुने अगदी छोटे होते, पण महासागराच्या तळाशी

त्यांचे प्रचंड साठे असणं शक्य आहे.

"आणि बुडालेली संपत्ती?

"निदान 'लुझितानिया' ह्या महासागरी आगबोटीची आठवण करा. १९१६ च्या वसंतात जर्मनांनी तिला आयर्लंडच्या किनाऱ्यापाशी बुडवलं. 'लुझितानिया' च्या ठार झालेल्या दीड हजार प्रवाशांच्या वैयक्तिक मौल्यवान वस्तूंव्यतिरिक्त बोटीवर १५ कोटी डॉलर किंमतीची सोन्याची नाणी आणि ५ कोटी डॉलरचं सोनं होतं. (**हॉलमध्ये उद्गार!**) त्याशिवाय 'लुझितानिया' वर ॲमस्टरडॅमला नेण्यासाठी हिरे भरलेल्या दोन पेट्या होत्या. त्या हिऱ्यांमध्ये जगातील एक सर्वोत्तम हिरा – 'कालीफ' – होता. त्याची किंमत अनेक दशलक्ष डॉलर भरली असती. अर्थात इखतीआन्द्रसारखा माणूससुद्धा तेवढ्या खोलवर पाण्यात जाऊ शकणार नाही. त्यासाठी खास माणूस बनवावा लागेल (**सरकारी वकीलांचा रागीट फूत्कार**), जो खोलवर पाण्यातील माशांप्रमाणं प्रचंड दाब सहन करू शकेल. मला ह्यात अशक्य काही वाटत नाही. अर्थात त्यासाठी काही अवधी लागेल."

"तुम्ही बहुधा स्वतःचं सर्वशक्तीमान देवासारखं वर्णन करताय!" सरकारी वकील म्हणाले.

साल्वातोरनी ह्या टोमण्याकडे दुर्लक्ष करून पुढे म्हटले:

"जर माणूस पाण्यात जगू शकला, तर महासागराच्या तळाशी त्याच्या संशोधनाची प्रगती महाप्रचंड पावलांनी घडली असती. मानवांचे बळी समुद्र घेईनासा झाला असता. बुडालेल्या माणसांबाबत शोक करण्याची पाळी आपल्यावर आली नसती."

मानवजातीने पादाक्रांत केलेल्या पाण्याखालील जगाचे दृश्य हॉलमध्ये उपस्थित असलेल्यांच्या नजरांसमोर तरळल्याचा भास झाला. महासागरावर प्रभुत्व मिळवल्यास केवढे प्रचंड लाभ होते! खुद्द मुख्य न्यायाधीशांनीसुद्धा न राहवून विचारले:

"तर मग तुमच्या प्रयोगांची फलितं तुम्ही प्रसिद्ध का केली नाहीत?"

"आरोपीच्या पिंजऱ्यात अडकण्याची मला घाई नव्हती," स्मित करीत साल्वातोर उत्तरले, "शिवाय मला भीती वाटली की, आपल्या अस्तित्वात असलेल्या समाजपद्धतीत, माझ्या शोधांमुळं चांगलं घडण्याऐवजी नुकसानच जास्त होईल. एव्हाना इखतीआन्द्रभोवती झगडा सुरू झालाय. कुणी माझ्याविरुद्ध इथं तक्रार गुदरली? माझ्यापासून इखतीआन्द्रला चोरून नेणाऱ्या ह्या झूरीतानं. आणि पुढं ह्या झूरीतापासून इखतीआन्द्रला जनरल आणि ॲडमिरल हिसकावून घेऊन गेले असते. त्यांनी ह्या जलमानवाला युद्धनौका बुडवायच्या कामाला जुंपलं असतं. नाही, ज्या देशात लोभामुळं मोठ्या शोधांचं वाईटात रूपांतर घडतं, मानवी हालअपेष्टा वाढविण्यासाठी केवळ त्यांचा वापर होतो, अशा ठिकाणी इखतीआन्द्रला अथवा अनेक 'इखतीआन्द्रना" सार्वजनिक मालमत्ता बनवण्याची माझी इच्छा नाही. मी विचार केला..."

साल्वातोर गप्प झाले आणि एकदम स्वर बदलून पुढे म्हणाले :

"ह्या विषयावर बोलायची माझी इच्छा नाही. अन्यथा मला वेडा समजतील," आणि साल्वातोरनी सस्मित मुद्रेने तज्ज्ञांकडे पाहिले. "नाही, वेडा म्हणवून घेण्याचा बहुमान मी नाकारतो, त्याचबरोबर प्रतिभावंत म्हणवून घेणंही नाकारतो. मी वेडा नाही, माथेफिरू नाही. जे करायची इच्छा होती ते मी प्रत्यक्षात घडवलं ना? माझ्या सर्व कामगिऱ्या तुम्ही स्वतःच्या डोळयांनी पाहिल्यात. जर माझी कृत्यं तुम्हाला गुन्हेगारी वाटत असतील, तर कठोरपणं त्यांच्याबाबत न्यायनिवाडा करा. मी दयायाचना करणार नाही."

तुरुंगात

इखतीआन्द्रच्या केवळ शारीरिक परिस्थितीचीच नव्हे, तर त्याच्या मानसिक क्षमतेची कसोटी पाहण्याची जबाबदारी तज्ज्ञांवर पडली होती.

"हे कोणतं वर्ष? कोणता महिना? तारीख कोणती? आठवड्यातला कोणता वार?" तज्ज्ञ प्रश्न विचारीत होते.

पण इखतीआन्द्र प्रत्येक प्रश्नाला उत्तर देत होता:

"माहीत नाही."

अत्यंत साध्या प्रश्नांची उत्तरे देणे त्याला अवघड गेले होते. पण तो विचित्र होता असे म्हणता आले नसते. त्याच्या वेगळ्या अस्तित्वामुळे आणि संगोपनामुळे त्याला अनेक गोष्टी माहीत नव्हत्या. एखाद्या मोठ्या बालकासारखा तो राहिला होता. तज्ज्ञ अशा निष्कर्षाला आले: "इखतीआन्द्र त्याच्या कृत्यांना जबाबदार नव्हता." ह्यामुळे खटल्यामधून तो मुक्त झाला होता. कोर्टाने इखतीआन्द्रवरील खटला काढून घेतला होता आणि त्याला कुणा पालकाच्या ताब्यात द्यावे असा निर्णय देण्यात आला. इखतीआन्द्रचे पालकत्व घेण्यास दोन लोक पुढे सरसावले: झूरीता आणि बाल्ताझार.

झूरीताने सूड उगविण्यासाठी खटला भरला होता, हे साल्वातोरांचे विधान बरोबर ठरले होते. पण इखतीआन्द्रला गमावल्याबद्दल झूरीताने केवळ साल्वातोरांवरच सूड उगवला नव्हता. झूरीताचे दुसरे उद्दिष्ट होते: त्याला पुन्हा इखती-आन्द्रची मालकी पाहिजे होती आणि म्हणून त्याचा पालक होण्याचा त्याचा प्रयत्न चालला होता. झूरीताने अनेक मौल्य-वान मोती लाच म्हणून दिले होते आणि न्यायालयातील सदस्यांना व पालकत्व ठरविणाऱ्या सल्लागारांना विकत

घेतले होते. आता झूरीता त्याच्या उद्दिष्टांच्या नजीक पोहो-
चला होता.

बाल्ताझारने बाप असल्याचा दावा करून इखतीआन्द्रच्या पालकत्वाची मागणी केली होती. पण त्याला यश आले नव्हते. लार्रीने खूप प्रयत्न केले, पण एकट्या क्रिस्तोच्या साक्षीवर विसंबून इखतीआन्द्रच्या वीस वर्षांपूर्वीच्या जन्मकहाणीवर विश्वास ठेवण्यास तज्ज्ञांनी नकार दिला. शिवाय क्रिस्तो हा बाल्ताझारचा भाऊ होता, त्यामुळे त्याची साक्ष विश्वसनीय मानण्यात आली नव्हती.

ह्या प्रकरणात सरकारी वकील आणि बिशप ह्यांचे हितसंबंध गुंतल्याचे लार्रीला माहीत नव्हते. पळवून नेऊन विकृत बनविलेल्या मुलाचा बाप म्हणून खटल्याच्या वेळी बाल्ताझारची गरज होती. पण बाल्ताझारला इखतीआन्द्रचा बाप म्हणून मान्यता देणे आणि इखतीआन्द्रला त्याच्या ताब्यात देणे – हे न्यायालयाच्या व चर्चच्या हिशेबात बसत नव्हते; इखतीआन्द्रचा काटा काढणे आवश्यक होते.

आता भावाकडे रहायला आलेला क्रिस्तो बाल्ताझारबद्दल काळजीत पडला. झोपेचा व खाण्याचा विसर पडलेला बाल्ताझार तासचे तास विचारमग्न अवस्थेत स्तब्ध बसून रहायचा. कधी कधी अचानक बेभान बनायचा आणि दुकानात फेऱ्या मारत ओरडू लागायचा: "माझा मुलगा, माझा मुलगा!" अशा क्षणी तो स्पॅनिशांना वाईट वाईट शिव्या द्यायचा.

एकदा अशा झटक्यानंतर बाल्ताझारने अनपेक्षितपणे क्रिस्तोला म्हटले:

"हे बघ बंधू, मी तुरुंगात जातो. पहारेकऱ्यांना माझ्याजवळचे उत्तमोत्तम मोती देतो, म्हणजे ते मला इखतीआन्द्रला भेटायची परवानगी देतील. मी त्याला समजावून सांगतो.

त्याला स्वत:ला बापाची ओळख पटेल. मुलगा बापाला ओळखणार नाही, असं घडायचं नाही. त्याच्यामधलं माझं रक्त त्याला सांगेल."

क्रिस्तोने भावाला ह्यापासून परावृत्त करण्याचे खूप प्रयत्न केले, पण व्यर्थ. बाल्ताझार स्वत:च्या योजनेशी ठाम राहिला.

बाल्ताझार तुरुंगाकडे गेला. तो पहारेकऱ्यांसमोर रडला-भेकला, त्यांच्या पायांशी लोळला व अखेर त्यांच्यापुढे मोती ओतून त्याने तुरुंगाच्या दरवाजामधून तुरुंगातील इखतीआन्द्रच्या खोलीपर्यंत मजल मारली.

जाळी मारलेल्या अरुंद खिडकीमधून अपुरा प्रकाश येणाऱ्या ह्या छोटया खोलीत वातावरण घुसमटवून टाकणारे होते व घाण वास येत होता. टाकीतील पाणी तुरुंगातील पहारेकरी क्वचित बदलत होते आणि आगळया कैद्याला खाऊ घातलेल्या माशांचे फरशीवर पडलेले कुजणारे अवशेष तेथून घेऊन जाण्याची तसदी त्यांनी घेतली नव्हती.

खिडकीसमोरील भिंतीशी लोखंडी टाकी उभी होती.

बाल्ताझार टाकीपाशी गेला व इखतीआन्द्रला स्वत:मध्ये झाकून घेणाऱ्या पाण्याच्या काळयाभोर पृष्ठभागाकडे त्याने नजर टाकली.

"इखतीआन्द्र!" बाल्ताझार हळूच म्हणाला. "इखतीआन्द्र..." त्याने आणखी एकदा हाक मारली.

पाण्याचा पृष्ठभाग थरारला, पण तरुण पाण्याबाहेर डोकावला नाही.

आणखी थोडा वेळ थांबून बाल्ताझारने स्वत:चा थरथरणारा हात पुढे ताणला आणि कोमट पाण्यात बुडविला. हाताला खांद्याचा स्पर्श झाला.

टाकीमधून एकदम इखतीआन्द्रचे ओले डोके दिसले. खांद्यापर्यंत पाण्यातून वरती येत त्याने विचारले:

"कोण आहे? तुम्हाला काय पाहिजे?"

बाल्ताझार गुडघे टेकवून बसला आणि हात पुढे ताणून घाईघाईने बोलला:

"इखतीआन्द्र! तुझ्यापाशी तुझा बाप आलाय. तुझा खरा बाप. साल्वातोर तुझा बाप नव्हे. साल्वातोर दुष्ट माणूस आहे. त्यानं तुला विकृत केलं... इखतीआन्द्र! इखतीआन्द्र! अरे, माझ्याकडं नीट निरखून पहा ना! स्वतः-च्या बापाला ओळखलं नाहीस?"

तरुणाच्या दाट केसांमधून त्याच्या फिकट चेहऱ्यावर पाणी मंदपणे निथळत होते आणि हनुवटीवरून खाली ठिपकत होते. म्हाताऱ्या इंडियनाकडे त्याने दुःखाने, काहीशा आश्चर्याने पाहिले.

"मी तुम्हाला ओळखत नाही," तरुण उत्तरला.

"इखतीआन्द्र," बाल्ताझार ओरडला, "माझ्याकडं नीट पहा!" आणि म्हाताऱ्या इंडियनाने एकदम तरुणाचे डोके पकडले, त्याला स्वतःपाशी ओढले व कढत अश्रू ढाळीत त्याच्यावर चुंबनांचा वर्षाव केला.

ह्या अनपेक्षित प्रेमामुळे घाबरलेल्या इखतीआन्द्रने पटकन टाकीत बुडी मारली. टाकीतील काही पाणी दगडी फरशीवर उडाले.

कुणाच्या तरी भक्कम हाताने बाल्ताझारची मानगूट पकडली, त्याला हवेत उचलले आणि खोलीच्या कोपऱ्यात फेकले. बाल्ताझारचे डोके दगडी भिंतीवर जोरात आपटले व तो फरशीवर बेशुद्ध पडला.

जेव्हा बाल्ताझारने डोळे उघडले, तेव्हा झूरीता समोर उभा असलेला त्याला दिसला. झूरीताच्या उजव्या हाताची मूठ गच्च वळलेली होती आणि डाव्या हातातील कागद तो विजयोन्मादाने फडकावीत होता.

"बघितलास ? इखतीआन्द्रचा पालक म्हणून माझी नेमणूक झाल्याचा हुकूम. आता श्रीमंत मुलाचा दुसरीकडं कुठंतरी शोध घ्यायला जा. ह्या तरुणाला उद्या सकाळी मी माझ्याकडं घेऊन जाईन. समजलं ?"

फरशीवर पडलेला बाल्ताझार धमकावणीच्या सुरात गुरगुरला.

पण दुसऱ्याच क्षणी बाल्ताझार ताडकन पायांवर उठला आणि जंगली आरोळी मारीत स्वतःच्या शत्रूवर तुटून पडला.

इंडियनाने झूरीताच्या हातून कागद खेचून घेतला, स्वतःच्या तोंडात कागदाचा बोळा कोंबला आणि झूरीतावर बुक्क्यांचा वर्षाव तो करीत राहिला. दोघांची भयंकर झुंज सुरू झाली.

हातात किल्ल्या घेऊन दाराशी उभ्या असलेल्या तुरुंगाच्या पहारेकऱ्याने तटस्थ राहण्याचे ठरविले. झुंजणाऱ्या दोघाही माणसांकडून त्याला भरपूर लाच मिळालेली होती व त्यांना अडथळा करण्याची त्याची इच्छा नव्हती. पण जेव्हा झूरीता म्हाताऱ्याचा गळा आवळू लागला, तेव्हा पहारेकरी अस्वस्थ बनला :

"त्याचं नरडं दाबू नका !"

पण रागाने बेभान बनलेल्या झूरीताने पहारेकऱ्याच्या इशाऱ्याकडे लक्ष दिले नाही आणि खोलीत जर नवीन व्यक्ती आली नसती, तर बाल्ताझारची धडगत नव्हती.

" छान ! श्रीमान पालक स्वतःच्या पालकत्वाच्या हक्कासाठी सराव करताहेत !" साल्वातोरांचा आवाज ऐकू आला. "तुम्ही बघत काय राहिलात ? अथवा तुम्हाला स्वतःची जबाबदारी समजत नाही ?" जणू तुरुंगाचे प्रमुख अधिकारी असल्याच्या स्वरात साल्वातोर पहारेकऱ्यावर खेकसले.

साल्वातोरांच्या ओरडण्याचा परिणाम झाला. पहारेकरी झुंजणाऱ्यांच्या मध्ये आडवा पडला.

गोंगाटामुळे आणखी पहारेकरी तेथे धावत आले व लौकरच झूरीताला आणि बाल्ताझारला वेगवेगळ्या दिशांना ओढत नेण्यात आले.

झूरीता लढ्यात स्वतःला विजयी समजू शकत होता. पण पराजित साल्वातोर त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा अजूनही जास्त सामर्थ्यवान होते. इथे तुरुंगात एक कैदी म्हणून वावरत असतानाही घटनांवर आणि लोकांवर ते वर्चस्व राखून होते.

" भांडखोरांना खोलीतून बाहेर न्या," साल्वातोरनी पहारेकऱ्यांना हुकूम दिला. " मला इखतीआन्द्रशी एकट्यानं रहायचंय."

पहारेकऱ्यांनी आज्ञापालन केले. झूरीता व बाल्ताझारच्या निषेधांकडे आणि बडबडीकडे लक्ष न देता पहारेकरी त्यांना बाहेर घेऊन गेले. खोलीचे दार बंद करण्यात आले.

कॉरीडॉरमधील आवाज जेव्हा नाहीसे झाले, तेव्हा साल्वातोर टाकीपाशी गेले आणि पाण्यातून डोकावून पाहणाऱ्या इखतीआन्द्रला म्हणाले:

" ऊठ इखतीआन्द्र. खोलीच्या मध्यभागी ये. तुझी तपासणी करणं आवश्यक आहे."

तरुणाने आज्ञापालन केले.

" आता ठीक," साल्वातोर पुढे म्हणाले, " उजेडापाशी ये. श्वास घे. खोल. आणखी. श्वास बंद कर. अस्सं..."

साल्वातोरनी इखतीआन्द्रच्या छातीवर बोटांनी ठोकले आणि तरुणाचे .अनियमित श्वसन ऐकले.

" धाप लागतेय?"

" होय, बाबा," इखतीआन्द्र उत्तरला.

" तू स्वतःच दोषी," साल्वातोर म्हणाले. " तू जमिनीवर

तेवढा काळ राहणं योग्य नव्हतं."

इखतीआन्द्रने डोके खाली घातले आणि तो विचारात गढला. मग अचानक त्याने डोके वरती उचलले आणि साल्वातोरांच्या डोळ्यांना डोळे भिडवत विचारले:

"बाबा, पण का योग्य नव्हतं? इतर सर्वांना मनाई नाही, मग मलाच एकट्याला का म्हणून?"

कोर्टात उत्तर देण्यापेक्षा राग दडलेल्या त्या नजरेला नजर देणे साल्वातोरना कितीतरी पटींनी अवघड गेले. पण तरीही साल्वातोरनी नजर दुसरीकडे वळविली नाही.

"कारण तुझ्यापाशी जे आहे, ते दुसऱ्या एकाही माणसापाशी नाही: पाण्याखाली जगण्याची क्षमता... इखतीआन्द्र, इतरांप्रमाणं इथं जमिनीवर राहण्याचा अथवा फक्त पाण्याखाली राहण्याचा, ह्यापैकी एका गोष्टीचा निवाडा तुला करायला सांगितला असता, तर तू काय निवडलं असतंस?"

"मला माहीत नाही..." विचारात पडत तरुण उत्तरला.

पाण्याखालील जग आणि जमीन, गुत्तीएरे त्याला सारखीच प्रिय होती. पण गुत्तीएरे आता त्याने गमावली होती...

"आता मी महासागर निवडीन," तरुण म्हणाला.

"तू याआधीच निवाडा केला आहेस. माझं न ऐकल्यामुळं तुझ्या शरीरयंत्रणेचं संतुलन तू बिघडवून टाकलं आहेस. आता यापुढं तू फक्त पाण्यात जगू शकशील."

"पण बाबा, ह्या भयंकर, घाणेरड्या पाण्यात नव्हे. मी इथं मरीन. मला विशाल महासागर हवाय!"

साल्वातोरनी उसासा दाबला.

"इखतीआन्द्र, ह्या तुरुंगातून तुझी लौकरात लौकर सुटका व्हावी म्हणून मी शक्य ते सर्व प्रयत्न करीन. धीर धर!" इखतीआन्द्रच्या खांद्यावर धीराची थाप मारून साल्वातोर स्वतःच्या कोठडीकडे निघून गेले.

अरुंद टेबलाजवळच्या स्टुलावर बसून साल्वातोर खोल विचारांमध्ये गढले.

कुठल्याही शल्यविशारदाप्रमाणे त्यांना अपयश माहीत होते. परिपूर्णता मिळविण्यापूर्वी त्यांच्या स्वतःच्या चुकांमुळे त्यांच्या चाकूखाली काही मानवी जीव बळी पडले होते. पण त्या बळींविषयी त्यांनी कधीही विचार केले नव्हते. काही दशक मेले, पण हजारो वाचले. हे गणित त्यांना पूर्ण समाधान देत होते.

पण इखतीआन्द्रच्या भवितव्याबाबत ते स्वतःला जबाबदार समजत होते. इखतीआन्द्र त्यांचा अभिमानविषय होता. हा तरुण म्हणजे त्यांची सर्वोत्तम कामगिरी होता. शिवाय इखतीआन्द्रवर त्यांचा जीव जडला होता आणि त्याच्यावर ते पुत्रवत प्रेम करीत होते. आता इखतीआन्द्रच्या आजारामुळे, त्याच्या आगामी जीवनाविषयीच्या विचारांमुळे साल्वातोर बेचैन बनले होते, चिंताक्रांत बनले होते.

कोठडीचा दरवाजा कुणीतरी ठोठावला.

"आत या!" साल्वातोर म्हणाले.

"श्रीमान प्रोफेसर, मी तुम्हाला त्रास तर देत नाही ना?" तुरुंगाच्या व्यवस्थापकांनी हळू आवाजात विचारले.

"मुळीच नाही," साल्वातोर उठत उत्तरले. "तुमची पत्नी आणि तुमचं बाळ यांच्या तब्येती कशा आहेत?"

"धन्यवाद, ती दोघं छान आहेत. त्यांना मी माझ्या सासूपाशी, इथून दूर, अँडीजमध्ये धाडलं..."

"होय, डोंगरी हवा त्यांच्या दृष्टीनं चांगली ठरेल," साल्वातोर उत्तरले.

व्यवस्थापक तेथेच थांबून राहिले. दाराकडे नजर टाकून ते साल्वातोरांपाशी आले व हळू आवाजात म्हणाले:

"प्रोफेसर! माझ्या बायकोला तुम्ही वाचवल्याबद्दल मी

तुमचा ऋणी आहे. माझं तिच्यावर प्रेम आहे..."

"माझे आभार मानू नका. ते माझं कर्तव्य आहे."

"तुमच्या कर्जात राहण्याची माझी इच्छा नाही," व्यवस्थापक म्हणाले. "आणि केवळ तेवढंच नव्हे. माझं फार शिक्षण झालेलं नाही. पण मी वर्तमानपत्रं वाचतो आणि प्रोफेसर साल्वातोर कोण आहेत हे मला माहीत आहे. चोर-दरोडेखोरांबरोबर अशा थोर माणसाला तुरुंगात अडकवून ठेवणं योग्य नव्हे."

"माझ्या विद्वान मित्रांनी माझी वेड्यांच्या इस्पितळात रवानगी करण्यात यश मिळवलेलं दिसतंय," साल्वातोर स्मित करीत म्हणाले.

"वेड्यांचं इस्पितळ म्हणजे तुरुंगच," व्यवस्थापक म्हणाले. "उलट तुरुंगाहून तिथं जास्त वाईट. दरोडेखोरां-ऐवजी तुमच्याभोवती वेड्यांचा गराडा पडेल. साल्वातोर वेड्यांमध्ये! नाही, नाही, असं घडणं योग्य नव्हे!"

आवाज आणखी खाली आणत व्यवस्थापक पुटपुटले:

"मी सर्व विचार केलाय. कुटुंबाची डोंगरात पाठवणी मी उगीच केलेली नाही. आता तुम्हाला पळून जाता येईल अशी मी व्यवस्था करतो आणि स्वतः लपून राहतो. गरजेपायी मी इथं नोकरीला आलो, पण ह्या कामाचा मला अत्यंत तिटकारा आहे. मी त्यांना सापडणार नाही... आणि जिथं पाद्री आणि व्यापारी राज्य चालवतात अशा ह्या नतद्रष्ट देशातून तुम्ही निघून जा. आणखी मी तुम्हाला सांगणार होतो," काही काळ घुटमळल्यानंतर ते पुढे म्हणाले. "मी तुम्हाला सरकारी गुपित सांगतोय..."

"कदाचित न सांगणं चांगलं," साल्वातोरनी त्यांना अडविले.

"होय, पण... मला स्वतःला शक्य होत नाही... मला

देण्यात आलेल्या भयंकर हुकूमांची अंमलबजावणी करणं मला शक्य होत नाही. सबंध आयुष्यभर मन खात राहिलं असतं. जर हे रहस्य मी सांगून टाकलं, तर मन खात राहणार नाही. तुम्ही माझ्यासाठी खूप काही केलंय, पण ते... मला गुन्ह्यात गुंतवू पाहणाऱ्या वरिष्ठांना मी काहीही देणं लागत नाही."

"म्हणजे?" साल्वातोरनी तुटक विचारले.

"होय, इखतीआन्द्रला ना बाल्ताझारच्या ताब्यात देणार, ना झूरीताच्या. वस्तुतः झूरीतापाशी आता पालकत्वाचा कागद आहे. पण झूरीतानं प्रचंड लाच चारली असली, तरी इखतीआन्द्र त्याला मिळणार नाही, कारण... इखतीआन्द्रचा खून करण्याचं ठरलंय."

साल्वातोर किंचित दचकले.

"असं? पुढं सांगा!"

"होय, इखतीआन्द्रला ठार करणार आहेत. ह्या बाबतीत बिशपनी सर्वांत जास्त आग्रह धरला होता, अर्थात 'ठार मारा' असे शब्द मात्र त्यांनी एकदाही उच्चारले नाहीत. त्यांनी माझ्यापाशी विष दिलंय, बहुधा पोटॅशियम सायनाईड. आज रात्री इखतीआन्द्रच्या टाकीतील पाण्यात ते विष मी मिसळायचं असा हुकूम आहे. तुरुंगाच्या डॉक्टरना ह्या कटात आधीच सामील करून घेतलंय. तुम्ही इखतीआन्द्रला जलमानव बनवताना केलेल्या शस्त्रक्रियेपायी तो मेला, असा डॉक्टर नंतर दाखला देतील. जर ह्या हुकूमाची मी अंमलबजावणी केली नाही, तर माझ्याशी ते फार क्रूर वागतील. माझ्यावर कुटुंबाची जबाबदारी आहे... आणि नंतर ते माझा खून करतील आणि ह्याबद्दल कुणालाही काही माहीत होणार नाही. मी त्यांच्या हाती पूर्ण अडकलोय. पूर्वी मी एका गुन्ह्यात सापडलो होतो... फार मोठा गुन्हा नाही... चुकून

योगायोगानं घडला... तरीही मी पळून जायचं ठरवलंय आणि पळण्याची सारी पूर्वतयारी केलीय. पण इखतीआन्द्रला ठार मारणं मला शक्य नाही, तसं करायची माझी इच्छा नाही. तुम्हाला आणि इखतीआन्द्रला असं दोघांनाही वाचवणं – एवढ्या अपुऱ्या वेळात अवघड आहे, जवळजवळ अशक्य. पण तुम्हाला मी वाचवू शकतो. मी सारा विचार केलाय. इखतीआन्द्रबद्दल मला वाईट वाटतं, पण तुमचं आयुष्य जास्त महत्त्वाचं आहे. तुम्ही तुमच्या कसबामधून दुसरा इखतीआन्द्र निर्माण करू शकाल, पण जगात दुसरे साल्वातोर कुणीही निर्माण करू शकणार नाही."

साल्वातोर व्यवस्थापकांपाशी गेले, त्यांचा हात दाबत ते म्हणाले:

"धन्यवाद, पण माझ्यासाठी तुमचा त्याग मी स्वीकारू शकत नाही. तुम्हाला पकडतील आणि तुमच्यावर खटला भरतील..."

"कोणताही त्याग नाही! मी सारा विचार केलाय."

"जरा थांबा. हा त्याग मी स्वतःसाठी स्वीकारू शकत नाही. पण जर तुम्ही इखतीआन्द्रला वाचवलंत, तर माझी सुटका करण्यापेक्षाही जास्त उपकार तुम्ही माझ्यावर कराल. मी निरोगी आहे, बळकट आहे आणि स्वतंत्र्य मिळवायला मदत करणारे मित्र सर्वत्र मी मिळवू शकेन. पण इखतीआन्द्रला ताबडतोब मुक्त करणं अत्यंत आवश्यक आहे."

"हा तुमचा हुकूम आहे असं मी मानतो," व्यवस्थापक म्हणाले.

जेव्हा व्यवस्थापक निघून गेले, तेव्हा साल्वातोर स्मित करीत स्वतःशी म्हणाले:

"असं जास्त चांगलं. भांडणाचं कारण ठरलेलं सफरचंद कुणालाच मिळू नये!"

खोलीत येरझाऱ्या घालत साल्वातोर हळूच पुटपुटले : "बिचारा पोरगा!" मग टेबलापाशी जाऊन त्यांनी काहीतरी लिहिले व नंतर दारापाशी जाऊन दार ठोठावले.

"तुरुंगाच्या व्यवस्थापकांना माझ्याकडं बोलवा."

जेव्हा व्यवस्थापक आले, तेव्हा त्यांना साल्वातोर म्हणाले :

"आणखी एक विनंती. इखतीआन्द्रशी माझी भेट घडवू शकाल, शेवटची भेट?"

"अगदी सोपं. वरिष्ठांपैकी आत्ता इथं कुणीही नाही. सारा तुरुंग तुमच्या स्वाधीन."

"उत्तम. आणखी एक विनंती."

"तुमच्या सेवेला हजर आहे."

"इखतीआन्द्रला मोकळं करून तुम्ही माझ्यावर फार मोठे उपकार करता आहात."

"पण प्रोफेसर, तुम्ही माझ्यावर त्याआधी खूप मोठे उपकार करून ठेवले आहेत..."

"आपल्या उपकारांची फिटंफाट झाली असं मानू," साल्वातोर मध्येच म्हणाले. "पण तुमच्या कुटुंबाला मी मदत करू शकतो आणि तशी माझी इच्छा आहे. ही चिठी घ्या. इथं पत्ता आहे आणि "S" एवढं एकच अक्षर आहे. म्हणजे साल्वातोर. ह्या पत्त्यावर जा. हा विश्वासू माणूस आहे. जर तुम्हाला तात्पुरता निवारा पाहिजे असेल, पैशांची गरज असेल..."

"पण..."

"पण-बिण काही नाही. आता लौकर मला इखती-आन्द्रपाशी न्या."

साल्वातोर खोलीत आले तेव्हा इखतीआन्द्रला आश्चर्य वाटले. ह्यावेळी त्यांची नजर होती तशी दुःखी आणि ममताळू

नजर इखतीआन्द्रने पूर्वी कधीही पाहिली नव्हती.

"इखतीआन्द्र, माझ्या मुला," साल्वातोर म्हणाले. "मला वाटलं होतं त्यापेक्षा खूप आधी आपण एकमेकांपासून तुटणार आहोत. कदाचित प्रदीर्घ काळपर्यंत. तुझ्याबद्दल मला फार काळजी वाटत होती. तुझ्याभोवती हजारो धोके घोंघावत आहेत... जर तू इथंच राहिलास, तर कदाचित मरशील. किंवा फार तर झूरीताचा अथवा त्याच्यासारख्याच दुसऱ्या कुणा हिंस्र माणसाचा कैदी बनशील."

"आणि बाबा, तुम्ही?"

"अर्थात कोर्ट मला शिक्षा करील, तुरुंगात डांबून ठेवील. बहुधा दोन वर्षं किंवा त्याहून जास्त काळ मला तुरुंगवास सोसावा लागेल. जोवर मी तुरुंगात असेन, तोवर तू सुरक्षित जागी आणि इथून जास्तीत जास्त दूर राहणं आवश्यक आहे. तशी सुरक्षित जागा आहे, पण खूप दूर, दक्षिण अमेरिकेच्या विरुद्ध टोकाला, तिच्या पश्चिमेला, प्रचंड महासागरात, तूआमोतू बेटांपैकी एका बेटावर किंवा प्रशांत महासागरातल्या लो आर्चिपेलागोच्या एका बेटावर. तिथपर्यंत पोहोचणं तुला सोपं जाणार नाही, पण इथं घरी, ला प्लाता आखातात तुझ्यावर जी संकटं येतील, त्यांच्या तुलनेनं प्रवासातील अडचणी काहीच नव्हेत. धूर्त शत्रूंच्या जाळ्यांमध्ये अथवा सापळ्यांमध्ये इथं अडकण्यापेक्षा ह्या बेटांपर्यंत वाट काढणं जास्त सोयीचं ठरेल.

"कोणता मार्ग तुला आखून देऊ? दक्षिणेकडून अथवा उत्तरेकडून दक्षिण अमेरिकेला वळसा घालून तू पश्चिमेला जाऊ शकतोस. दोन्ही मार्गांचे आपापले फायदे-तोटे आहेत. उत्तरेकडून जाणारी वाट जास्त लांब आहे. शिवाय, ही वाट निवडलीस, तर पनामाच्या कालव्यातून तुला अटलांटिक-मधून प्रशांत महासागरात जावं लागेल : हे धोक्याचं आहे,

तुला पकडतील, विशेषत: झडपांमध्ये किंवा किंचित जरी तुझं दुर्लक्ष झालं, तर जहाजाखाली तू चिरडला जाशील. कालवा विशेष रुंद नाही आणि खोलही नाही. त्याची सर्वांत जास्त रुंदी फक्त ९१ मीटर आहे आणि खोली साडेबारा मीटर. नव्या महासागरगामी आगबोटींचे तळ कालव्याच्या तळाशी जवळजवळ खरचटत जातील.

"पण तू सतत उबदार पाण्यातून प्रवास करशील. शिवाय पनामाच्या कालव्यापासून पश्चिमेला तीन महासागरी मार्ग जातात: दोन न्यूझीलंडला आणि एक – फिजी बेटांकडं आणि त्यापुढं. मधला मार्ग निवडून आणि आगबोटीमागून जात अथवा तिला धरून तू मुक्कामापर्यंत पोहोचू शकशील. निदान न्यूझीलंडला जाणारे दोन्ही मार्ग तूआमोतू आर्चिपेलागोच्या पट्ट्यातून जातात. तुला किंचित उत्तरेला वर जावं लागेल.

"दक्षिणेकडून जाणारी वाट जवळची आहे, पण दक्षिणी थंड पाण्यांमधून, तरंगत्या बर्फांच्या प्रदेशातून प्रवास करावा लागेल. विशेषत: दक्षिण अमेरिकेचं दक्षिण टोक असलेल्या केप हॉर्नला वळसा घातलास तर. मागेल्लानची सामुद्रधुनी कमालीची अशांत आहे. गलबतांना आणि आगबोटींना जेवढा तिथं धोका, तेवढा अर्थातच तुला धोका नाही, पण तरीही तिथं धोकादायक आहे. शिडांच्या गलबतांची तर तिथं अस्सल स्मशानभूमी. पूर्वेला ती रुंद आहे आणि पश्चिमेला अरुंद, खडकाळ. जोरदार पश्चिमी वारे पाण्याला पूर्वेकडं लोटतात – म्हणजे तुला उलट पोहावं लागणार. तिथल्या पाण्यातल्या भोवऱ्यांमध्ये तू नष्ट होण्याची शक्यता आहे.

"म्हणून मी तुला सल्ला देतो की, लांबच्या वाटेनं जाणं जास्त चांगलं आणि मागेल्लानमधून पोहत जाण्यापेक्षा केप हॉर्नला वळसा घालणं अधिक इष्ट. महासागराचं पाणी

हळूहळू थंड होत जातं आणि मला आशा आहे की, तुला हळूहळू सवय होईल आणि तुझी प्रकृती ठीक राहील. खाण्याच्या टंचाईचा प्रश्न उद्‌भवत नाही – पाण्याप्रमाणंच तुझं खाणं नेहमी हाताशी असेल. तुला लहानपणापासून समुद्राचं पाणी प्यायची सवय आहे आणि त्यामुळं तुला काही अपाय होत नाही.

"पनामाच्या कालव्यातून जाण्यापेक्षा केप हॉर्नपासून तूआमोतू बेटांपर्यंत वाट काढणं तुला जास्त अवघड जाईल. केप हॉर्नपासून उत्तरेला मोठ्या आगबोटींची विशेष वाहतुक नाही. मी तुला नेमके अक्षांश-रेखांश सांगतो. तुझ्यासाठी मी बनवून घेतलेल्या खास उपकरणांच्या साह्यानं तू ती जागा शोधशील. पण ह्या उपकरणांचं थोडं ओझं तुला वाहावं लागेल आणि हालचालींना त्यांचा किंचित अडथळा होईल."

"मी लीडिंगला सोबत घेऊन जाईन. तो ओझं वाहील. लीडिंगला सोडून जाणं मला शक्य आहे काय? बहुधा आत्ताच तो माझ्या भेटीसाठी कासावीस बनला असणार."

"कोण कुणासाठी जास्त कासावीस बनलंय ते माहीत नाही," साल्वातोरनी पुन्हा स्मित केले. "तर लीडिंगला बरोबर घेणार. उत्तम. तूआमोतू बेटांपर्यंत तू पोहोचलास, म्हणजे एकमेव प्रवाळ बेट शोधून काढ. त्याची खूण : त्याच्यावर उंच डोलकाठी उभी आहे आणि काठीवर दिशादर्शकाच्या जागी मोठा मासा. लक्षात ठेवणं अवघड नाही. कदाचित ह्या बेटाला शोधायला तुला एक, दोन अथवा तीन महिनेसुद्धा खर्चावे लागतील – काही बिघडत नाही. तिथं पाणी उबदार आहे. कालवं भरपूर आहेत."

मध्येच अडथळा न करता सहनशीलपणे संपूर्ण बोलणे ऐकून घ्यायला साल्वातोरनी इखतीआन्द्रला शिकविले होते, पण जेव्हा साल्वातोर स्वतःच्या खुलाशात ह्या जागी पोहोचले,

तेव्हा इख्तीआन्द्रला दम धरवला नाही :

"आणि दिशादर्शक माशाच्या ह्या बेटावर मला काय सापडेल ?"

"मित्र. विश्वासू मित्र. त्यांची आस्था आणि त्यांचं प्रेम," साल्वातोर उत्तरले. "तिथं माझा जुना मित्र राहतो – फ्रेंच शास्त्रज्ञ आर्मान विल्बूआ, नामवंत महासागरतज्ज्ञ. खूप वर्षांपूर्वी मी युरोपात होतो तेव्हा त्याच्याशी माझी ओळख आणि मैत्री झाली. आर्मान विल्बूआ खूप स्वारस्यपूर्ण माणूस आहे, पण त्याच्याबद्दल तपशीलवार हकीकत सांगत बसायला आता मला सवड नाही. प्रशांत महासागरातल्या त्या एकाकी प्रवाळ बेटावर तो कसा गेला त्याबद्दलची हकीकत तू स्वतःच जाणून घेशील अशी आशा करतो. पण तो स्वतः एकाकी नाही. त्याच्याबरोबर त्याची छान, प्रेमळ बायको राहते, मुलगा आणि मुलगी राहतात. मुलीचा जन्म बेटावर झाला. आता ती सतरा वर्षांची असावी आणि मुलगा पंचवीस वर्षांचा.

"माझ्या पत्रांवरून तुला ते ओळखतात आणि स्वतःपैकी एक म्हणून कुटुंबात तुला सामील करून घेतील अशी खात्री आहे..." साल्वातोर गप्प झाले. "अर्थात यापुढं तुला बहुतेक वेळ पाण्यात रहावं लागणार. पण मित्रांशी भेटायला आणि गप्पा मारायला दिवसातले काही तास तू किनाऱ्यावर जाऊ शकशील. कदाचित तुझी प्रकृती सुधारेल आणि पूर्वी-प्रमाणं जमिनीवरसुद्धा पाण्याइतकाच वेळ तू राहू शकशील.

"आर्मान विल्बूआ तुला बापाप्रमाणं वाटेल. त्याच्या महासागरशास्त्राच्या संशोधनकार्यात तू अटळ मदतनीस ठरशील. महासागराबद्दल आणि त्यातल्या वसती करणाऱ्यांबद्दल तुला आत्ता असलेलं ज्ञान दहा प्रोफेसरांच्या तोडीचं आहे." साल्वातोरनी स्मित केले. "कोर्टात त्या वेडपट तज्ज्ञांनी तुला ठरीव प्रश्न विचारले – आज कोणता दिवस, महिना,

तारीख आणि तू उत्तरं देऊ शकला नाहीस, कारण ह्या गोष्टींमध्ये तुला कधी रस नव्हता. जर त्यांनी तुला पाण्याखालच्या प्रवाहांबद्दल, ला-प्लाता आखातामधल्या व आसपासच्या पाण्याच्या तपमानाबद्दल, खारटपणाबद्दल प्रश्न विचारले असते, तर तुझ्या उत्तरांच्या आधारावर जाडजूड शास्त्रीय ग्रंथ तयार करू शकले असते. आर्मान विल्बूआसारख्या अनुभवी आणि बुद्धिमान संशोधकाच्या मार्गदर्शनाखाली जर तुझ्या पाण्याखालच्या सफरी घडल्या, तर तुला अफाट ज्ञान लाभेल आणि नंतर ते ज्ञान तू लोकांना देऊ शकशील. माझी खात्री आहे की, महासागरशास्त्रात तुम्हा दोघांची कामगिरी त्या शास्त्राच्या विकासातला महत्त्वाचा टप्पा ठरेल. तुझं नाव आर्मान विल्बूआच्या नावाच्या जोडीनं घेतलं जाईल — मी त्याला ओळखतो आणि तो स्वत: तसा आग्रह धरील. शास्त्रीय कामगिरीमार्फत तू मानवजातीची सेवा बजावशील.

"जर तू इथंच राहिलास, तर अडाणी आणि लोभी माणसांच्या फायद्यासाठी तुला राबवतील. लगूनच्या स्वच्छ नितळ पाण्यात आणि आर्मान विल्बूआच्या कुटुंबात तुला शांतता आणि सुख लाभेल अशी मला खात्री आहे.

"आणखी एक सल्ला. ज्या क्षणी तू महासागरात जाशील — कदाचित आज रात्रीसुद्धा हे घडू शकेल — त्या क्षणी ताबडतोब पाण्याखालच्या बोगद्यातून घरी पोहत जा (घरी आत्ता फक्त विश्वासू जिम आहे), नौकानयनाची उपकरणं घे, सुरा आणि इतर वस्तु घे, तुझ्या लीडिंगला शोध आणि महासागरावर सूर्य उगवण्यापूर्वीच प्रवासाला नीघ.

"अच्छा, इखतीआन्द्र! पुन्हा भेटू!"

आयुष्यात प्रथमच साल्वातोरनी इखतीआन्द्रला मिठी मारली, त्याचे चुंबन घेतले. मग स्मित करीत इखतीआन्द्रच्या खांद्यावर थाप मारीत ते म्हणाले:

"असा हुशार पोरगा कुठंही चमकेल!" आणि पटकन ते खोलीतून बाहेर गेले.

पलायन

बटणांच्या फॅक्टरीतून ओल्सेन नुकताच परतला होता व जेवायला बसला होता. कुणीतरी दार ठोठावले.

"कोण आहे?" जेवणात अडथळा आल्याबद्दल नाराजीच्या स्वरात ओल्सेनने ओरडून विचारले.

दार उघडून गुत्तीएरे खोलीत आली.

"गुत्तीएरे! तू? कुठून आलीस?" खुर्चीवरून उठत आश्चर्याने आणि आनंदाने ओल्सेन उद्गारला.

"नमस्कार, ओल्सेन," गुत्तीएरे म्हणाली. "चालू दे तुझं जेवण." आणि दाराशी टेकून गुत्तीएरेने जाहीर केले:

"यापुढं नवऱ्याबरोबर आणि त्याच्या आईबरोबर राहणं मला शक्य नाही. झूरीतानं माझ्या अंगावर हात टाकायची हिंमत केली. मी त्याचं घर सोडून आले. ओल्सेन, मी कायमची आलेय."

ह्या बातमीने ओल्सेन जेवायचा थांबला.

"किती अनपेक्षित!" तो उद्गारला. "बैस! तुला उभं राहणं अशक्य झालंय. पण असं कसं? तू तर म्हणाली होतीस: 'देवानं जे जोडलं, ते माणूस तोडू शकत नाही?' संपलं? फार उत्तम. आनंद झाला. तू बापाकडं परतलीस?"

"बाबाना काहीही माहीत नाही. झूरीता नक्की बाबांच्या घरी मला शोधायला येईल आणि जबरीनं परत नेईल. मी एका मैत्रिणीकडं राहिलेय."

"आणि पुढं काय करायचा तुझा इरादा आहे?"

"मी कारखान्यात काम करीन. ओल्सेन, मला कारखान्यात काम मिळवून द्यायला मदत कर, अशी तुला विनंती करायला आलेय... कोणतंही काम चालेल."

ओल्सेनने चिंताक्रांतपणे डोके हलविले:

"आता हे फार अवघड आहे. अर्थात मी प्रयत्न करीन." थोडा विचार करून ओल्सेनने विचारले: "तुझ्या नवऱ्याला काय वाटेल?"

"मला त्याची पर्वा नाही."

"पण बायकोबद्दल नवऱ्याला तर माहिती हवी," स्मित करीत ओल्सेन म्हणाला. "तू अर्जेंटिनात राहते आहेस हे विसरू नको. झूरीता तुला हुडकून काढील आणि तेव्हा... तुला स्वत:लाच ठाऊक आहे की, तो तुला स्वस्थ जगू देणार नाही. कायदा आणि लोकमत त्याच्या बाजूचे आहेत."

गुत्तीएरे विचारात पडली व मग ठामपणे म्हणाली:

"तर मग तशा परिस्थितीत मी कॅनडाला, अलास्काला जाईन..."

"ग्रीनलँडला, उत्तर ध्रुवावर!" आता अधिक गंभीरपणे ओल्सेन म्हणाला: "आपण ह्यावर विचार करू. इथं तू राहणं धोक्याचं आहे. इथून निघून जाण्याचा माझा पूर्वीपासूनच इरादा आहे. कशाला आलो मी इथं लॅटिन अमेरिकेत? इथं पाद्र्यांचं फार मोठं वर्चस्व आहे. तेव्हा पळून जाण्यात आपल्याला यश आलं नाही हे फार वाईट झालं. तुला पळवून नेणं झूरीताला शक्य झालं आणि आपली तिकीटं व पैसे वाया गेले. आता मला वाटतं, युरोपच्या बोटीच्या तिकीटासाठी माझ्याप्रमाणंच तुझ्यापाशीही पैसे नसणार. पण आपण थेट युरोपात गेलंच पाहिजे असं नाही. जर आपण – मी मुद्दाम "आपण" म्हणतोय, कारण तू सुरक्षित जागी जाईपर्यंत मी तुला एकटीला सोडणार नाही – जर आपण

शेजारच्या पॅराग्वेपर्यंत जाऊ शकलो, त्यापेक्षा जास्त चांगलं म्हणजे ब्राझिलपर्यंत पोहोचू शकलो, तर तुझा शोध घेणं झूरीताला अवघड ठरेल आणि युरोपात अथवा अमेरिकेत जाण्याची पूर्वतयारी करायला आपल्याला सवड सापडेल... डॉक्टर साल्वातोर आणि इखतीआन्द्र तुरुंगात एकत्र आहेत हे तुला माहीत आहे?"

"इखतीआन्द्र? तो सापडला? कशाबद्दल त्याला तुरुंगात टाकलंय? मी त्याला भेटू शकेन?" गुत्तीएरेने ओल्सेनवर प्रश्नांचा भडिमार केला.

"होय, इखतीआन्द्र तुरुंगात आहे आणि तो परत झूरीताचा गुलाम होण्याची शक्यता आहे, साल्वातोर आणि इखतीआन्द्रविरुद्धचा खटला अत्यंत खोटा आहे, त्यांच्यावर खोटे आरोप लादण्यात आलेत."

"किती भयंकर! त्याला वाचवणं शक्य नाही?"

"मी सतत प्रयत्न करत होतो, पण व्यर्थ. पण तुरुंगाचा व्यवस्थापक अनपेक्षितपणं आमच्या मदतीला आलाय. आज रात्री इखतीआन्द्रची आम्ही मुक्तता करणार आहोत. आत्ताच मला दोन लहान चिठ्या मिळाल्यात: एक साल्वातोरांकडून आणि दुसरी तुरुंगाच्या व्यवस्थापकाकडून."

"इखतीआन्द्रला भेटायची माझी इच्छा आहे!" गुत्तीएरे म्हणाली. "मी तुझ्याबरोबर आले तर चालेल?"

ओल्सेन विचारात पडला.

"मला वाटतं, नाही चालणार," तो उत्तरला. "आणि इखतीआन्द्रला तू न भेटणं जास्त चांगलं!"

"पण का?"

"कारण इखतीआन्द्र आजारी आहे. माणूस म्हणून तो आजारी आहे, पण मासा म्हणून ठीक आहे."

"मला समजत नाही."

"इखतीआन्द्र यापुढं हवेत श्वसन करू शकत नाही. तुला त्यानं परत बघितलं तर काय होईल? त्याच्या दृष्टीनं हे फार जड जाईल आणि कदाचित तुलासुद्धा! तुझी वारंवार भेट घेण्याची त्याला इच्छा होईल आणि जमिनीवरचं आयुष्य त्याचा पूर्ण नाश करील."

गुत्तीएरेने डोके खाली घातले.

"होय, तुझं म्हणणं बरोबर आहे..." विचार करून ती म्हणाली.

"त्याच्यात आणि इतर माणसांमध्ये एक अलंघ्य अडथळा आला आहे – महासागर. इखतीआन्द्रचं भवितव्य निश्चित झालंय. इथून पुढं केवळ पाण्यातच तो राहू शकेल."

"पण तिथं तो कसा राहील? महासागरात एकटा – माशांमध्ये आणि सागरी राक्षसांमध्ये एकटा माणूस?"

"त्याच्या पाण्याखालच्या जगात तो सुखी होता, जोवर..."

गुत्तीएरेचा चेहरा लाल झाला.

"आता अर्थातच पूर्वीप्रमाणं तो सुखी होणार नाही..."

"पुरे, ओल्सेन," गुत्तीएरे दुःखाने म्हणाली.

"काळ हाच ह्यावर उत्तम इलाज. कदाचित हरवलेली मनःशांती त्याला परत लाभेल. मासे आणि सागरी प्राण्यांमध्ये तो जगेल. जर एखाद्या शार्कने त्याचा अकाली बळी घेतला नाही. तर खूप म्हातारपणापर्यंत, पांढरे केस होईपर्यंत तो जगेल... आणि मरण? मरण सगळीकडं सारखंच..."

संध्याछाया दाट बनल्या आणि खोलीत अंधार झाला.

"मला जायला पाहिजे," ओल्सेन उठत म्हणाला.

गुत्तीएरेही उठली.

"पण मी निदान दुरून त्याला बघितलं तर?" तिने विचारले.

"अर्थात चालेल. मात्र तुझी चाहूल तिथं लागू देऊ नकोस."

"मी वचन देते."

कोरोनेल दीआसच्या दिशेने तुरुंगाच्या आवारात पाणी वाहून नेणाऱ्या गाडीवानाच्या पोषाखात ओल्सेनने जेव्हा प्रवेश केला, तेव्हा पूर्ण अंधार पडला होता.

पहारेकऱ्याने त्याला हटकले:

"कुठं चाललास?"

" सैतानासाठी " समुद्राचं पाणी नेतोय, " ओल्सेनने तुरुंगाच्या व्यवस्थापकाच्या पढविण्यानुसार उत्तर दिले.

सर्व पहारेकऱ्यांना ठाऊक होते की, तुरुंगात एक विचित्र कैदी होता – "सागरी सैतान" – आणि त्याला गोडे पाणी चालत नसल्यामुळे समुद्राचे पाणी भरलेल्या टाकीत तो बसून रहात होता. हे समुद्राचे पाणी अधूनमधून बदलत होते, मोठे पिंप लादलेल्या गाडीमधून आणत होते.

ओल्सेन तुरुंगाच्या इमारतीपाशी गाडी घेऊन गेला, कोपऱ्याशी वळला. तेथे तुरुंगाचा भटारखाना होता व सेवकांचे जाण्या-येण्याचे दार होते. व्यवस्थापकांनी आधीच पूर्वतयारी केली होती. कॉरीडॉरमध्ये व दाराशी उभ्या राहणाऱ्या पहारेकऱ्यांना वेगवेगळ्या कारणांपायी दुसरीकडे पाठविण्यात आले होते. व्यवस्थापकांसह मोकळेपणाने इखतीआन्द्र तुरुंगाबाहेर चालत आला.

"लौकर पिंपात उडी मार!" व्यवस्थापक म्हणाले.

इखतीआन्द्रने क्षणाचाही विलंब लावला नाही.

"हाकल गाडी!"

ओल्सेनने लगामांचा तडाखा मारला, तुरुंगाच्या आवारातून तो बाहेर पडला आणि आवेनी दा आल्वारवरून रीतेरो स्टेशनजवळून सावकाशपणे तो गाडी हाकू लागला.

त्याच्या पाठीमागे, थोड्या अंतरावरून एका स्त्रीची आकृती चालत होती.

ओल्सेन शहरामधून बाहेर पडला तेव्हा चांगलीच अंधारी रात्र झाली होती. समुद्रकिनाऱ्याला वळसा घालून रस्ता जात होता. वाऱ्याचा जोर वाढला होता. लाटा किनाऱ्याकडे धावत येत होत्या आणि खळाळत खडकांवर आपटत होत्या.

ओल्सेनने सभोवती पाहिले. रस्त्यावर कुणीही दिसत नव्हते. फक्त दूरवरून वेगाने येणाऱ्या मोटारीचे दिवे चमकत होते. "मोटार निघून जाऊ दे!"

हॉर्न वाजवीत आणि प्रकाशाने डोळे दिपवून टाकीत मोटार वेगाने शहराकडे निघून गेली.

"आता वेळ झाली!" ओल्सेनने मागे वळून पाहिले आणि खडकांमागे लपण्याची गुत्तीएरेला खूण केली. मग पिंपावर ठोकत तो ओरडला: "मुक्कामाला पोचलो! बाहेर पड!"

पिंपातून डोके बाहेर डोकावले.

इखतीआन्द्रने भोवती नजर टाकली, तो पटकन पिंपातून बाहेर आला व जमिनीवर त्याने उडी मारली.

"धन्यवाद, ओल्सेन!" ओल्या हाताने ओल्सेनचा हात गच्च दाबत इखतीआन्द्र म्हणाला.

इखतीआन्द्र धापा टाकीत होता.

"उपकार कसले मानतोस! अच्छा! सांभाळ स्वतःला किनाऱ्यापाशी पोहू नको. धोकेबाज माणसांच्या तावडीत पुन्हा अडकू नको."

साल्वातोरांकडून इखतीआन्द्रला कोणत्या सूचना मिळाल्या होत्या हे ओल्सेनलासुद्धा ठाऊक नव्हते.

"हो-हो," इखतीआन्द्र धापा टाकीत म्हणाला. "मी खूप खूप दूर पोहत जाईन, जिथं एकही गलबत येत नाही अशा शांत प्रवाळ बेटावर जाईन. धन्यवाद ओल्सेन!" आणि तो समुद्राकडे धावला.

ऐन लाटांपाशी तो अचानक मागे फिरला आणि ओरडला:

"ओल्सेन! ओल्सेन! जर कधी तुमची गुत्तीएरेशी भेट झाली, तर तिला माझा नमस्कार द्या आणि सांगा की, मी तिची नेहमी आठवण काढीन!"

इखतीआन्द्रने समुद्रात उडी टाकीत आरोळी मारली:

"अच्छा, गुत्तीएरे!" आणि तो पाण्याखाली गेला.

"अच्छा इखतीआन्द्र!.." खडकांमागे उभी असलेली गुत्तीएरे हळूच उत्तरली.

सोसाट्याचा वारा वाहात होता, लोकांना पायांवर उभे राहणे अशक्य करीत होता. समुद्र गर्जत होता, वाळू सळसळत होती, गोटे खळखळत होते.

कुणाच्या तरी हाताने गुत्तीएरेचा दंड धरला.

"चल गुत्तीएरे!" ओल्सेन प्रेमळपणे म्हणाला.

तो गुत्तीएरेला रस्त्यावर घेऊन गेला.

गुत्तीएरेने पुन्हा एकदा समुद्रावर दृष्टिक्षेप टाकला आणि ओल्सेनच्या हातावर झुकून ती शहराकडे निघाली.

साल्वातोरनी शिक्षा भोगली, ते घरी परतले आणि शास्त्रीय संशोधनात गुरफटले. सध्या ते दूरच्या प्रवासाची तयारी करीत आहेत.

क्रिस्तो त्यांच्या सेवेत आहे.

झूरीताने नवे गलबत घेतले आहे आणि कॅलीफोर्नियाच्या आखातात तो मोती वेचतोय. आणि जरी तो अमेरिकेतील सर्वांत धनवान माणूस बनला नाही, तरी त्याला तक्रारीला जागा नाही. वायुभारमापकाच्या दर्शकाप्रमाणे त्याच्या मिशांची टोके वरती वळलेली आहेत.

गुत्तीएरेने घटस्फोट घेतला आणि ओल्सेनशी लग्न केले. ती दोघे न्यूयॉर्कमध्ये राहतात आणि हवाबंद डब्यांच्या कारखान्यात काम करतात. ला-प्लाताच्या आखाताच्या किनाऱ्यावर कुणीही "सागरी सैतानाची" आठवण काढत नाही.

पण एखाद्या उकाड्याच्या रात्री, समुद्रावरून येणारा विचित्र आवाज ऐकल्यानंतर म्हातारे मच्छीमार तरुणांना म्हणतात :

"सागरी सैतान" असा शंख फुंकायचा" आणि त्याच्या-बद्दलच्या दंतकथा सांगू लागतात.

ब्यूनोस-आयर्समधील फक्त एका माणसाला इखतीआन्द्रचा विसर पडलेला नाही.

शहरातील सर्व पोरे म्हाताऱ्या, अर्धवट वेड्या इंडियन भिकाऱ्याला ओळखतात.

"तो पहा येतोय "सागरी सैतानाचा" बाप!"

पण त्या पोरांकडे इंडियन दुर्लक्ष करतो.

स्पॅनिश माणूस भेटताच दरवेळी म्हातारा त्याच्याकडे डोळे वटारून पाहतो, थुंकतो आणि एखादी शिवी हासडतो.

पण म्हाताऱ्या बाल्ताझारला पोलीस हात लावीत नाहीत. त्याचे वेड त्रासदायक नाही, तो कुणालाही अपाय करीत नाही.

फक्त समुद्रावर जेव्हा तुफान उसळते, तेव्हा म्हातारा इंडियन कमालीचा बेचैन बनतो.

तो समुद्रकिनाऱ्यावर धावतो आणि पाण्यात वाहून जाण्याचा धोका पत्करून खडकावर उभे राहून तुफान थांबेपर्यंत रात्रं-दिवस अखंड ओरडत राहतो:

"इखतीआन्द्र! इखतीआन्द्र! माझ्या मुला!.."

पण समुद्र स्वतःचे गुपित राखून आहे.

